# एस . वाय . बी . ए .

## समाजशास्त्र - भारतीय समाज : मुद्दे आणि समस्या

# घटक १

# सामाजिक समस्या आणि सामाजिक विघटन

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

  १.२.१ सामाजिक समस्या

  १.२.२ सामाजिक विघटन

  १.२.३ भारतीय समाजातील ज्वलंत समस्या – शेतकरी आत्महत्या

१.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.४ सारांश

१.५ पारिभाषिक शब्द शब्दार्थ

१.६ संदर्भ सूची

१.७ सरावासाठी प्रश्न


## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासातून आपल्याला......

१. सामाजिक समस्येचा अर्थ आणि स्वरूप समजून घेता येईल.

२. सामाजिक समस्येची कारणे स्पष्ट करता येतील.

३. सामाजिक विघटनाचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करता येईल.

४. सामाजिक विघटनाची कारणे सांगता येतील.

५. भारतीय समाजातील ज्वलंत समस्या – शतेकरी आत्महत्या स्पष्ट करता येईल.

६. शेतकरी आत्महत्येची कारणे स्पष्ट करता येतील.

७. शेतकरी आत्महत्येवर उपाययोजना सांगता येतील.

## १.१ प्रस्तावना :

सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे हा समाजशास्त्राचा एक महत्त्वाचा अभ्यासविषय मानला जातो. कारण या सामाजिक समस्या समाजातील व्यक्तींवर मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम करतात. त्याचा परिणाम अपिरहार्यपणे समाजावर होतो. प्रत्येक व्यक्ती ही समस्याग्रस्त असते. जगातील कोणतीही व्यक्ती समस्यांपासून मुक्त नाही. व्यक्तीपुढे कोणती ना कोणती समस्या असते आणि व्यक्ती ती समस्या सोडविण्याच्यादृष्टीने प्रयत्नशील असते. मुळातच सामाजिक समस्या या मानवनिर्मित आहेत. त्याचे बरेवाईट परिणाम शेवटी मानवी समाजालाच भोगावे लागतात. त्यामुळे सामाजिक जीवन विस्कळीत होते.

सामाजिक समस्या प्रत्येक समाजात अस्तित्वात असतात. समाजातील लोक सामुदायिक पातळीवर त्या समस्यांचे निवारण करण्याचे प्रयत्न करतात. प्रत्येक काळात सामाजिक समस्या असतात. प्राचीन काळात सामाजिक समस्या होत्या. त्याचप्रमाणे आधुनिक समाजातसुद्धा सामाजिक समस्या आढळतात. परंतु प्राचीन काळातील समस्या आज असतीलच असे नाही. बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीनुसार नवीन सामाजिक समस्या निर्माण होतात. १९ व्या शतकात बालविवाह, सतीप्रथा, अस्पृश्यता, केशवपन, विधवा विवाह इ. सामाजिक समस्या होत्या. मात्र, अलिकडे या सामाजिक समस्या आढळून येत नाहीत. सामाजिक बदलानुसार कुटुंब विघटन, बालगुन्हेगारी, लोकसंख्येची समस्या, बेकारी, घटस्फोट, काळाबाजार, भ्रष्टाचार, शेतकरी आत्महत्या, नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या इ. नव-नवीन समस्या निर्माण झालेल्या आढळतात. इतके निश्चित की, प्रत्येक कालखंडात सामाजिक समस्या आढळतात. सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन समाजशास्त्रात केले जाते.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ सामाजिक समस्या (डेलळरश्र झीलश्रशाी)

**सामाजिक समस्येचा अर्थ व स्वरूप :**

(Meaning and Nature of Social Problems)

भारतातील सामाजिक समस्यांचा विचार करणे हे आधुनिक काळात अगत्याचे झालेले आहे. कारण भारतातील सामाजिक प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होत आहेत. सामाजिक समस्या या मानवनिर्मित असतात. भारतातील बहुतांशी सामाजिक समस्या भारताच्या गुंतागुंतीच्या समाजरचनेमुळेच निर्माण झालेल्या दिसून येतात. सामाजिक समस्या मानवी समाजाइतक्याच प्राचीन आहेत. मानवी समाजाच्या प्रत्येक कालखंडात सामाजिक समस्यांचे अस्तित्व दिसून येते. या संदर्भात भारतीय समाजव्यवस्थेचा विचार केला तर प्रत्येक कालखंडात निरनिराळ्या स्वरूपाच्या सामाजिक समस्यांचे अस्तित्व दिसून येते. सामान्यपणे समाजातील बहुसंख्य लोकांच्या समस्या म्हणजे सामाजिक समस्या होय. उदा. - गरिबी, बेकारी हे प्रश्न समाजातील बहुसंख्य लोकांना भेडसावत असल्यामुळे या प्रश्नांना सामाजिक समस्या म्हणून ओळखले जाते.

मानवी सामजाच्या गरजा दिवसेंदिवस वाढत आहेत. त्या वाढत्या गरजांशी एखाद्या समाजातील सामाजिक संस्था आणि संस्कृती ज्याप्रसंगी समायोजन करण्यास अयशस्वी ठरतात तेव्हा अशा समाजात विविध स्वरूपाच्या सामाजिक समस्या निर्माण होतात. त्याचप्रमाणे सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेच्या माध्यमातून समाजव्यवस्थेत सामाजिक विघटन घडून येते. आणि त्या विघटनाच्या प्रक्रियेमुळे किंवा प्रभावामुळे सामाजिक समस्या निर्माण होत असतात.

**सामाजिक समस्येचा अर्थ (**Meaning of Social Problems) **:**

सामाजिक समस्यांचे अध्ययन करीत असताना सर्वप्रथम सामाजिक समस्या म्हणजे काय? हे लक्षात घेणे आवश्यक आहे. कोणतीही समस्या ही सामाजिक असेलच असे नाही. सामाजिक समस्येचा वैज्ञानिकदृष्ट्या अर्थ कोणता आहे? हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

आपण दैनंदिन जीवनात 'समस्या' हा शब्द नेहमी वापरतो. परंतु कोणतीही समस्या ही सामाजिक समस्या होऊ शकत नाही. म्हणून सामाजिक समस्यांचा अभ्यास करीत असताना सामाजिक समस्या म्हणजे काय? हे लक्षात घेणे आवश्यक आहे. निरनिराळ्या समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक समस्यांच्या व्याख्या स्पष्ट केलेल्या आहेत. त्या व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर सामाजिक समस्येचा अर्थ स्पष्ट होऊ शकतो.

**१) मर्टन आणि निस्बेट :** (Merton and Nisbet)

''सामाजिक समस्या म्हणजे एखाद्या समाजातील लक्षणीय संख्येच्या व्यक्तीच्या सामाजिक वर्तनातील बिघाड किंवा पथभ्रष्टता, जी त्या समाजातील इतर अनेक सदस्यांना गंभीर परिणाम भोगावयास लावते. मुलत: सामाजिक समस्या या नैतिक समस्या होत.''

(Breakdowns or deviations in social behaviour involving a considerable number of people, which are of serious concern to many members of the society in which the aberrations occur. At bottom social problems are problems of moral Value.- R.K. Merton and R. A. Nisbet)

**२) फुल्लर आणि मेयर्स :** (Fuller and Myers)

''एखाद्या समाजातील बहुसंख्य सदस्य जेव्हा व्यवहाराच्या पद्धतीला किंवा परिस्थितीला आपत्तीकारक अथवा अयोग्य मानतात, तेव्हा त्या सामाजिक समस्या होत तसेच त्या समस्येचे निराकरण करण्यासाठी आणि त्यांची व्याप्ती कमी करण्यासाठी सुधारात्मक धोरणे, योजना व प्रत्यक्ष सेवाकार्याची आवश्यकता आहे. अशी त्या सदस्यांची मान्यता असते.''

(Social problems are behaviour patterns or conditions that are considered objectionable or undesirable by many members of a society. There members recognise that the corrective policies, programmes and services are necessary to cope with and reduce the scope of these problems. - R.C. Fuller & Myers)

**३) हर्टन आणि लेस्ली :** (Horton and Leslie)

''समाजातील लक्षात घेण्यायोग्य बहुसंख्य व्यक्तीवर परिणाम करणारी अवांछनीय

अशी परिस्थिती की, ज्या संदर्भात सामुहिक सामाजिक क्रियेद्वारे काही तरी उपाययोजना करण्याची आवश्यकता वाटू लागते. अशा परिस्थितीला सामाजिक समस्या म्हणतात.''

(A Social problems is a conditions affecting a significant number of people in ways considered undesirable, about which it is felt something can be done through collective social action. --- Horton and Lislie)

**४) केस :** (Case)

''समाजातील लक्षात घेण्यायोग्य क्रियाशील विचारवतांचे लक्ष ज्या सामाजिक परिस्थितीकडे वेधल्या जाते आणि त्या संदर्भात सामूहिक किंवा इतर कोणतीही क्रिया वा उपाय करण्याची आवश्यकता असते.''

(Any Social situation that attracts the attention of a considerable number of competent observers within a society & appeals to them as calling for readjustment or remedy by social i.e.collective action of some kind or another. - (Case)

**५) रुबिंग्टन आणि वेईनबर्ग :** (Rubington and Weinberg)

''सामाजिक समस्या म्हणजे लक्षात घेण्यायोग्य लोकांच्या मूल्यांशी विसंगत अशी आरोपित परिस्थिती की ज्या परिस्थितीत बदल करण्यासाठी सामूहिक क्रियेची गरज आहे, अशी सर्वांची मान्यता असते.''

(A social problems is an alleged situation that is incompatible with the values of a significant number of people, who agree that action is necessary to alter the situation. -- Rubington and weinberg)

**६) विल्यम स्कॉट :** (Willam Scott)

''अशी कोणतीही अनिष्ट परिस्थिती की जी समुदायातील बहुसंख्य लोकांना असह्य वाटते आणि तिच्या पुनर्रचनेसाठी सामूहिक कृतीची आवश्यकता असते.''

**७) टापन :**

''समाजातील एखाद्या भागात एकोपा टिकवून ठेवण्याच्याबाबतीत समाजव्यवस्थेला आलेल्या अपयशामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीस सामाजिक समस्या म्हणतात.''

**८) वॅलेस वीव्हर :**

''उद्दिष्टपूर्तीच्या मार्गात निर्माण होणारे अडथळे, संघर्ष, तणाव अथवा नैराश्य निर्माण करणारी कोणतीही परिस्थिती म्हणजे सामाजिक समस्या होय.''

**९) पॉल लॅन्डीस :**

''व्यक्तीच्या कल्याणासंबंधी अपूर्ण इच्छा असणे म्हणजेच सामाजिक समस्या होय.''

वरील व्याख्येवरून सामाजिक समस्या म्हणजे समाज जीवनात निर्माण झालेली एक अनिष्ट परिस्थिती आहे हे सहज लक्षात येईल. ही परिस्थिती निर्माण होण्याचे प्रमुख कारण म्हणजे बहुसंख्य लोकांचे सामाजिक मूल्यांना धक्का देणारे वर्तन हेच असून हे संकट दूर करण्यासाठी सामूहिक उपाययोजनेची आवश्यकता निर्माण होते.

**सामाजिक समस्येचे स्वरूप –** (Nature of Social Problems)

**१) बहुसंख्य लोकांची स्वीकृती –**

एखाद्या व्यक्तीचे वर्तन अयोग्य आहे असे दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला वाटल्याने ते वर्तन अयोग्य आहे किंवा ती सामाजिक समस्या आहे असे समजणे बरोबर होणार नाही.

म्हणून ते ठरविण्यासाठी त्या प्रकारचे वर्तन अयोग्य आहे असे समाजातील बहुसंख्य लोकांना स्वीकारावे लागेल तरच त्या वर्तनास सामाजिक समस्या म्हणता येईल.

**२) सामाजिक मूल्यांशी विसंगती –**

समाजातील सभासदांचे कोणते वर्तन योग्य आहे किंवा अयोग्य आहे याचे निर्धारण समाजाने मान्य केलेल्या सामाजिक मूल्यांच्या आधारे निश्चित केले जाते. त्यामुळे लोकांनी सामाजिक प्रमाणके व मूल्य यांना लक्षात ठेवून आपले वर्तन करावे अशी अपेक्षा समाजाची असते. समाजातील काही व्यक्ती मुद्दामहून सामाजिक मूल्यांच्या विरुद्ध वर्तन करतात. त्यामुळे समाजात अनेक प्रश्न निर्माण होतात. थोडक्यात असे स्पष्ट करता येईल की, सामाजिक मूल्यांशी विसंगत वर्तन केल्यामुळे जी परिस्थिती निर्माण होते, ती निर्माण झालेली परिस्थिती म्हणजे सामाजिक समस्या होय.

**३) उपाययोजनांची जाणीव –**

सामाजिक समस्येचे स्वरूप ठरवीत असताना त्या परिस्थितीवर कोणती उपाययोजना करता येईल हे ठरविणे आवश्यक असते. म्हणजे जोपर्यंत उपायाची  योग्यवेळी जाणीव होत नाही किंवा बहुसंख्य लोकांना त्याची गरज वाटत नाही तोपर्यंत त्या विशिष्ट सामाजिक परिस्थितीस सामाजिक समस्या म्हणता येणार नाही. समाजात विविध प्रकारच्या सामाजिक समस्या निर्माण झालेल्या असतात. परंतु त्या समस्या आपोआप नष्ट होत नाहीत. समस्यांचे निवारण करण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या उपाय योजनांची गरज भासते. उदा. वाढती लोकसंख्या ही एक सामाजिक समस्या आहे, आणि ही समस्या सोडविण्यासाठी विविध स्वरूपाच्या उपाययोजना कराव्या लागतात.

**४) सामाजिक सापेक्षता –**

समाजा-समाजानुसार सामाजिक समस्यांचे स्वरूप भिन्न-भिन्न असते. निती आणि अनितीच्या कल्पना वेगवेगळ्या असतात. उदा. भारतातील काही राज्यांमध्ये मद्यपान करणे हा गुन्हा समजला जातो. परंतु अमेरिकेसारख्या देशातील समाजामध्ये मद्यपान करणे ही समाजमान्य गोष्ट आहे. म्हणून सामाजिक समस्यांचे स्वरूप समाजसापेक्ष असते.

**५) सामाजिक व नैसर्गिक समस्या –**

काही विचारवंतांच्यामते गुन्हेगारी, मद्यपान, भिक्षावृत्ती, लोकसंख्यावाढ, बेरोजगारी यासारख्या समस्या मानवनिर्मित आहेत. तर दुष्काळ, महापूर, चक्रीवादळ, भूकंप यातून निर्माण होणाऱ्या समस्या या नैसर्गिक स्वरूपाच्या आहेत. त्यांना सामाजिक समस्या म्हणता येणार नाही. परंतु काही विचारवंतांच्या मते नैसर्गिक समस्यातूनच सामाजिक समस्यांची निर्मिती होत असते व त्यातून समाजामध्ये पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होतो. म्हणून त्याला सामाजिक समस्या संबोधिता येईल.

**६) समाजावर अनिष्ट परिणाम –**

प्रमाणाकांचे उल्लंघन करणारे वर्तन हे सामाजिक समस्येच्या निर्मितीला कारणीभूत ठरते. समाजाची व्यवस्था सुरळीत असावी याकरिता विविध प्रकारची प्रमाणके असतात.

या प्रमाणकानुसार समाजातील सभासदांनी वर्तन केल्यास समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण होते. परंतु जेव्हा या मूल्यांच्या विरोधात वर्तन केले जाते त्याचा अनिष्ट परिणाम समाजातील बहुसंख्य लोकांवर पडतो. म्हणूनच निर्माण झालेली ही परिस्थिती समाजातील सभासदांना अयोग्य वाटते. निर्माण झालेली ही परिस्थिती नष्ट कशी करता येईल याचा विचार केला जातो. सामाजिक  समस्येचा अनिष्ट परिणाम हा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या समाजावर पडतो.

**७) सामूहिक सामाजिक क्रिया –**

समाजातील विविध सामाजिक समस्या या व्यक्तिगत पातळीवर सोडवता येत नाहीत. सामाजिक समस्या या सामाजिक कारणांमुळे निर्माण झालेल्या असतात. त्यामुळे त्या समस्या सोडविण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक असते. सामूहिक क्रियेच्या माध्यमातून समस्या सोडविण्यासंदर्भात प्रयत्न झाल्यास ती समस्या सोडविणे सहज शक्य होते. उदा. बालगुन्हेगारी, वाढती लोकसंख्या, मद्यपान, भ्रष्टाचार इत्यादी सामाजिक समस्या या व्यक्तिगत पातळीवर सोडवणे अशक्य आहे. त्यासाठी सामूहिक सामाजिक क्रियेची आवश्यकता भासते.

**२. सामाजिक समस्येची कारणे –** (Causes of Social Problems)

सामाजिक समस्या या समाजातूनच निर्माण झालेल्या असतात. साहजिकच त्यामुळे कोणतीही सामाजिक समस्या निर्माण होण्यामागे त्या समाजातील सामाजिक परिस्थिती जबाबदार असते. कोणत्याही एका विशिष्ट कारणांच्या परिणामातून सामाजिक समस्या निर्माण होत नाही. तर विविध घटकांच्या प्रभावातूनच या समस्यांचा उगम होत असतो. अनेक घटक त्यासाठी जबाबदार असतात. या सर्व घटकांचे विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल.

**१) सामाजिक परिवर्तन –**

सामाजिक परिवर्तन म्हणजेच समाजरचनेत झालेला बदल होय. परिवर्तनशीलता ही प्रत्येक समाजाची प्रवृत्ती असते. कोणत्याही समाजात स्थिरता राहू शकत नाही. म्हणजे समाज हा एकाच अवस्थेत अधिक काळ राहू शकत नाही. किंबहुना परिवर्तन हा निसर्गाचाच एक नियम आहे. समाजव्यवस्था देखील  त्याला अपवाद असू शकत नाही. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचे पडसाद जेव्हा भारतीय समाजात घडून आले, तेव्हा भारती समाजातील हस्त उद्योगावर त्याचा विपरित परिणाम झाला. त्यामुळे लहान कामगार बेकार झाले. सामाजिक परिवर्तनामुळे समाजात व्यवसाय, कुटुंब, मालमत्ता, स्त्रियांचे प्रश्न, घटस्फोट, कामगार समस्या यासारख्या सामाजिक समस्या निर्माण होतात.

**२) सामाजिक विघटन –**

समाज हा संघटन–विघटन यासारख्या प्रक्रियेतून जात असतो. विघटन म्हणजे जे संघटित नाही. जेव्हा समाजाची सुरळीत अशी व्यवस्था विस्कळीत होते त्यावेळी समाजाचे विघटन झाले असे समजावे. नैसर्गिक संकटाबरोबर सामाजिक, आर्थिक या संकटामुळेही विघटनाची प्रक्रिया जोर धरू लागते. राजकीय संकटामुळे १९४७ मध्ये हिंदुस्थानची जी

फाळणी झाली त्यातून भारत आणि पाकिस्तान अशा दोन राष्ट्रांची निर्मिती झाली. राजकीय धोरणांमुळे हिंदू आणि मुस्लिम यांचे भारत आणि पाकिस्तानमध्ये स्थलांतर झाले. या स्थलांतरामुळे भारतात मोठ्या प्रमाणावर पाकिस्तानमधील लोक निर्वासित म्हणून आलेत. अशा लोकांची पुनर्वसनाची समस्या मोठया प्रमाणावर भारतामध्ये निर्माण झाली. याबरोबरच नैसर्गिक कारणांमुळेदेखील सामाजिक समस्येची निर्मिती होते.

३) व्यक्तिगत विघटन –

व्यसनाधीन लोक, मानसिक विकृती असलेले लोक, जुगारी आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा भरणा समाजामध्ये अधिक झाल्यास समाजात विविध प्रकारच्या समस्या उद्‌भवतात. अशा व्यक्ती आपल्या व्यक्तिगत जीवनात वैफल्यांच्या भावनेने पछाडलेले असल्यामुळे त्यांची वर्तणूक समाजविघातक स्वरूपाची बनते. त्यामुळे समाजात सामाजिक समस्या निर्माण होण्यास पोषक वातावरण तयार होते.

४) मूल्यसंघर्ष –

कोणत्याही समाजव्यवस्थेत व्यक्तीने मूल्य प्रमाणाक व्यवस्थेनुसार वर्तन करणे अपेक्षित असते. ही वर्तनप्रणाली सामाजिकरण प्रक्रियेद्वारे व्यक्तीवर बिंबवली जाते. परंतु समाज हा परिवर्तनशील आहे. ज्यावेळेस समाजात परिवर्तन घडून येते त्यावेळेस समाजातील जुनी प्रमाणकव्यवस्था व नवीन प्रमाणक व्यवस्था यात संघर्ष घडून येतो. प्रत्येक समाजामध्ये अनेक प्रकारचे गट आणि उपगट असतात. त्या सर्वांची मूल्ये सारखीच असत नाहीत. त्यामुळे पस्परांमध्ये मूल्यसंघर्ष निर्माण होतो. उदा. धर्म, जात, भाषा, प्रदेश इ. आधारांवर मूल्यसंघर्ष निर्माण होतात. त्यातून समाजात जातीय दंगली, धार्मिक, भाषिक आणि प्रांतीक वाटचाल यासारख्या समस्या निर्माण होतात. त्यातूनच विविध समस्यांची निर्मिती होते. समाजातील बहुसंख्य लोक जुन्या मूल्य-प्रमाणक व्यवस्थेला चिकटून असतात. त्यामुळे समाजात मूल्यसंघर्ष निर्माण होतो.

५) नियमबाह्य वर्तन –

सामाजिक नियमांचे समाजातील सर्वच व्यक्तींकडून काटेकोरपणे पालन होऊ शकते असे नाही. अशा व्यक्ती कायद्याचे उल्लंघन करू शकतात. याचाच अर्थ असा की, ज्या व्यक्ती नियमबाह्य वर्तन करतात त्या शारीरिक व मानसिकदृष्ट्या निरोगी असू शकत नाही. अशा तऱ्हेने रॉबर्ट मर्टन यांनी नियमबाह्य वर्तनाचे समाजशास्त्रीय विवेचन केलेले आहे. काही वेळेस मानसिक अवस्था विचलित असलेल्या व्यक्तीकडून नियमबाह्य वर्तन घडते. कारण त्या व्यक्तीस सामाजिक नियमांचे भान राहत नाही. बऱ्याचदा व्यक्ती नियमबाह्य मार्गाने आपल्या गरजा सोडवत असतात. त्यामुळे समाजव्यवस्था कोलमडते. त्यातून समाजात अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. उदा. गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार ही प्रवृत्ती नियमबाह्य वर्तनातूनच उद्‌भवलेली समस्या आहे.

**६) सांस्कृतिक पश्चायन –**

कोणत्याही समाजात संस्कृतीत परिवर्तन होताना संस्कृतीचे सर्वभाग समान गतीने बदलत नाहीत. संस्कृती जीवनव्यापी असून, जीवनातील सर्व भागामध्ये होणारे परिवर्तन

समान गतीने न झाल्यास काही भाग पुढे जातात किंवा काही भाग तसेच म्हणजे मागे राहतात. यालाच सांस्कृतिक पश्चायन म्हटले जाते. भारतीय समाजात तर सांस्कृतिक पश्चायनाने अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्याचे आढळते. ब्रिटिश राज्य सत्तेत भौतिक संस्कृतीत झपाट्याने बदल झाला. आगगाडी, बस याने वाहतूक सुरू झाली पण त्यासाठी लागणारी शिस्त, नियमपालन, सामाजिकता लोकांनी स्वीकारली नाही. औद्योगिकीकरणाने सर्व तऱ्हेच्या लोकांना काम मिळाले. त्याचबरोबर रिकाम्या वेळेचा उपयोग करण्याची साधने उपलब्ध झाली नाहीत. स्त्रियांना शिकवून नोकरी करण्याच्या बाबतीत समाज बदलला पण अन्य बाबतीत स्त्री-पुरुषांसाठी जुनीच मापे राहिली.

**७) सामाजिक कायदे आणि बंधने –**

सध्याचे राज्य स्वत:ला कल्याणकारी राज्य म्हणवून घेते. सामाजिक सुधारणा, पुनर्रचना, विकास करण्याची जबाबदारी आज राज्यावर आहे. समाजहित डोळ्यासमोर ठेवून राज्य अनेक कायदे करते पण तो कायदा होताच त्यातून नवीन समस्या जन्माला येतात. उदा. मद्यपान बंदी केल्याने दारू पिणाऱ्यांची, दारू गाळणाऱ्यांची, विकणाऱ्यांची संख्या वाढून गुन्हेगारीचे प्रमाण वाढले. सुवर्ण नियंत्रणाच्या कायद्याने सोनारांना बेकार केले व सोन्याचा चोरटा व्यापार सुरू झाला. बेकारी भत्ता दिल्याने लोकांची ऐतखाऊ वृत्ती वाढीस लागेल असेही लोक म्हणू लागले. थोडक्यात जसजसे कायदे करीत जावेत वा बंधने घालीत जावी तसतशा सामाजिक समस्या निर्माण होताना आढळतात.

थोडक्यात असे स्पष्ट करता येईल की, कोणत्याही एका कारणातून सामाजिक समस्या निर्माण होत नाही. तर अनेक कारणांचा परिणाम म्हणून सामाजिक समस्या जन्माला येतात.

## १.२.२ **सामाजिक विघटन** (Social Disorganization)

### १. **सामाजिक विघटनाचा अर्थ व स्वरूप :**
(Meaning & Nature of Social Disorganization)

मानवी समाजाचे अस्तित्व टिकवण्यासाठी संघटन आवश्यक असते. परंतु काही समाजात सामाजिक विघटनाची प्रक्रिया अधिक प्रमाणात दिसून येते. मानवी समाजाची रचना आणि कार्यपद्धती या संदर्भात स्पष्टीकरण करताना सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ रॉबर्ट मर्टन यांनी असे मत व्यक्त केले आहे की, प्रत्येक समूहात एकता असणे महत्त्वाचे आहे. परंतु सर्वच समूहांत ती एकता सारख्याच प्रमाणात दिसून येते असे नाही. कारण काही समूहात सामाजिक आदर्शांना जास्त महत्त्व असते. तर काही समाजात सामाजिक आदर्शांना विशेष महत्त्व दिले जात नाहीत. उदा. ग्रामीण समाजात काही सामाजिक आदर्शांना विशेष महत्त्व दिले जाते तेच आदर्श शहरी समाजात महत्त्वाचे मानले जात नाही. समाज व्यवस्था नेहमी संघटन, विघटन आणि पुनर्घटन या तीन प्रक्रियातून जात असते. कोणताही समाज पूर्णपणे संघटित नसतो. संघटनाची ही प्रक्रिया कमी-अधिक प्रमाणात दिसून येते. ज्या समाजात संघटन प्रक्रियेचा अधिक प्रभाव असतो अशा समाजात सामाजिक प्रश्न निर्माण होत नाहीत. परंतु ज्या समाजव्यवस्थेत विघटन प्रक्रियेचा अधिक प्रभाव असतो अशा समाजव्यवस्थेत निरनिराळे प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात. जे संघटित नाही त्याला विघटन म्हणतात. सामाजिक विघटन म्हणजे समाजाच्या रचनेत किंवा कार्यपद्धतीत

विस्कळितपणा निर्माण होणे होय. सामाजिक विघटन प्रक्रियेमुळे व्यक्ती व समूह यांच्यातील संबंधाची व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत होते. नेहमीच्या समाजव्यवस्थेत ज्या काही कारणास्तव बिघाड निर्माण होतो अशा परिस्थितीत सामाजिक विघटन घडून येते. त्याचप्रमाणे समाजात एखादी समस्या निर्माण झाली तर समाज विघटित होतो. समाजात विघटनाची ही प्रक्रिया सतत सुरू असते. समाज व्यवस्थेतील परंपरागत चालत आलेले रितिरिवाज व आधुनिक बदलती परिस्थिती यांच्यामध्ये समायोजन प्रक्रिया पूर्ण झाली नाही तर अशा प्रसंगी सामाजिक विघटनाची प्रक्रिया कार्यरत होते. सामाजिक विघटनाची प्रक्रिया ही स्थिर स्वरूपाची प्रक्रिया नसून ती एक मूलभूत प्रक्रिया आहे. किंवा असंख्य प्रक्रियांची मालिका आहे.

**सामाजिक विघटनाचा अर्थ –** (Meaning of Social Disorganization)

**१) इलियट आणि मेरिल –** (Elliott and Merrill)

''सामाजिक विघटन म्हणजे सामाजिक संतुलनात बिघाड होणे व त्याचे जुने सामाजिक स्वरूप नष्ट होणे होय.''

**२) डॉ. मॉवरर –** (Dr. Mowrer)

''संस्कृतीमधील जे परिवर्तन समाजाच्या कार्यात किंवा सहयोगात बाधा निर्माण करते अशा प्रकारच्या सामाजिक परिस्थितीस सामाजिक विघटन असे म्हणतात.''

**३) फॅरिस –** (Faris)

''समूहाच्या स्वीकृत कार्यात अडथळा निर्माण करणारी व्यक्ती आणि स्वाभाविक संबंधातील असंतुलन म्हणजे सामाजिक विघटन होय.''

**४) थॉमस आणि झेनेकी –** (Thomas and Zaniecki)

''अस्तित्वात असलेल्या सामूहिक नियमांचा समूहातील व्यक्तीवरील प्रभाव नष्ट होणे म्हणजे सामाजिक विघटन होय.''

**५) गिलिन आणि गिलीन –** (Gillin and Gillin)

'' सामाजिक विघटन म्हणजे संपूर्ण सांस्कृतिक संघटनेमध्ये निर्माण होणारी जोरदार सामाजिक दुरावस्था किंवा अपसमायोजन होय.''

**६) न्यूमेयर –**

''सामाजिक विघटन ही एक असंतुलित अवस्था नाही. कारण की, ही एक मुख्यत: सामाजिक प्रक्रिया आहे आणि या प्रक्रियेमुळे घटना व वृत्ती यांच्यावर परिणाम होत असतो. त्यामुळे व्यक्ती आणि समूह यांच्या कार्यात बाधा निर्माण होते.''

**२. सामाजिक विघटनाची कारणे –**
(Causes of Social Disorganization)

सामाजिक विघटनाला कोणतेही एक कारण जबाबदार असत नाही. समाजामध्ये विघटन घडवून आणण्यास विविध घटक किंवा कारणे जबाबदार असतात. अनेकविध कारणांच्या एकत्रीकरणामुळे समाजात विघटनाची प्रक्रिया सुरू असते. नेमक्या कोणत्या

कारणांमुळे समाजात विघटन झाले हे सांगता येणे कठीण आहे. परंतु ज्या कारणांचा जोर प्रभावी असेल त्यामुळे विघटन होते असे म्हणता येईल. उदा. भारतीय समाजामध्ये लाखो लोक बेरोजगार आहेत त्यामुळे समाजाचे विघटन होते असे सांगता येईल.

सामाजिक विघटनाची खालील महत्त्वाची कारणे स्पष्ट करता येतील.

**१) व्यक्तिगत विघटन –**

ज्यामुळे व्यक्तीच्या दैनंदिन जीवनात किंवा कार्यपद्धतीत अडथळा निर्माण होतो अशा परिस्थितीत व्यक्तिगत विघटनाचा जन्म होतो. समाज हा अनेक व्यक्ती मिळून बनलेला आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीचे सहकार्य त्या व्यक्तीच्या सुखाकरिता महत्त्वाचे मानले जाते. परंतु समाजातील सर्वच व्यक्ती शारीरिक व मानसिकदृष्ट्या निरोगी असतीलच असे नाही. अशा व्यक्ती समाजाला अपेक्षित असलेले वर्तन किंवा कार्य करत नाहीत. त्यामुळे समाजात व्यक्ति-व्यक्तींचे संबंध दुरावतात आणि अशा समाजात व्यक्ती विघटनाची प्रक्रिया कार्यरत होते. त्यातून बालगुन्हेगारी, आत्महत्या, जीवनाविषयी उदासीनता इ. समस्या निर्माण होतात.

**२) नैसर्गिक वातावरण –**

व्यक्तीच्या सभोवताली जे नैसर्गिक पर्यावरणाचे  वलय आहे की जे मानवाने निर्माण केलेले नसून निसर्गानेच निर्माण केलेले आहे. त्यालाच नैसर्गिक वातावरण आपण म्हणतो. मानवी जीवनावर नैसर्गिक वातावरणाचा फार मोठा परिणाम झालेला दिसून येतो. समाजातील प्रत्येक व्यक्तीला नैसर्गिक वातावरणाशी जुळवून घ्यावे लागते. स्वत:ची आवड-निवड, राहणीमान, इ. गोष्टी परिस्थितीनुसार निश्चित कराव्या लागतात. नैसर्गिक वातावरणाचा सामाजिक संघटन व सामाजिक विघटन या दोन्ही प्रक्रियांवर परिणाम होत असतो. उदा. अतिवृष्टी, महापूर, वादळे, भूकंप, साथीचे रोग, दूषित हवामान इ. नैसर्गिक आपत्तीमुळे संपूर्ण समाज जीवन विस्कळीत होते. वित्तहानी, प्राणहानी होऊन मानवी जीवन उद्ध्वस्त होते. अनेक व्यक्तींची घरेदारे, संपत्ती व जीवनाला आवश्यक असलेल्या सर्व गोष्टींचा नाश होतो. लहान मुले अनाथ होतात. घरातील कर्तापुरुष या संकटात बळी ठरला तर संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होते. अशा परिस्थितीत सामाजिक विघटन प्रक्रियेचा प्रभाव अधिक तीव्र होतो आणि समाजात निरनिराळ्या समस्या निर्माण होतात.

**३) औद्योगिकरण –**

एखाद्या शहरात किंवा महानगरात निर्माण होणारी कारखानदारी म्हणजे औदयोगिकरण होय.  औदयोगिकरण हे विकासाचे किंवा प्रगतीचे पाऊल मानले जाते. परंतु या प्रगतीबरोबरच या प्रक्रियेच्या प्रभावामुळे समाजात अनेक प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात. औदयोगिकरणमुळे शहरात झोपडपट्ट्या, गुन्हेगारीप्रवृत्ती, अनैतिक वर्तन असे विविध प्रश्न जन्माला येतात. सर्व प्रश्नांचा परिणाम सामाजिक जीवनावर होऊन समाजाचे विघटन होत जाते. औदयोगिकरणमुळे

आजच्या समाजात श्रमसमस्या मोठ्याप्रमाणात आढळून येतात. सत्ता, संपत्तीच्या विषम वाटपातून अनेक कामगारांच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. शेवटी कामगारही समाजाचाच एक भाग असल्यामुळे पर्यायाने त्याचा परिणाम समाजावर होतो व समाजात विघटन निर्माण होते.

**४) सामाजिक संघर्ष –**

सामाजिक विघटनाचे व्यापक स्वरूप जेव्हा निर्माण होते तेव्हा समाजात सामाजिक अपसमायोजन निर्माण होते. म्हणूनच या संघर्षाला विशेष महत्त्व दिले जाते. समाजात संघर्ष किंवा युद्धमय परिस्थिती या मानवनिर्मित गोष्टी आहेत. सामाजिक संघर्ष प्रामुख्याने सत्ता व संपत्ती प्राप्त करण्यासाठी किंवा इतर घटकांवर आपला अधिकार गाजवण्यासाठी करण्यात येतो. म्हणूनच सामाजिक विघटनासाठी समाजातील संघर्ष हे एक महत्त्वाचे कारण मानले जाते. या संघर्षातून दारिद्र्य, महागाई, भ्रष्टाचार असे अनेक प्रश्न निर्माण होतात.

**५) सामाजिक मूल्यांचा ऱ्हास –**

सांस्कृतिक क्षेत्रातील किंवा सामाजिक क्षेत्रातील मूल्यांचा ऱ्हास होणे हे सामाजिक विघटनाचे प्रमुख कारण आहे. समाजामध्ये सामाजिक मूल्यांचा ऱ्हास झाल्यास सामाजिक समस्या निर्माण होतात. मूल्यव्यवस्था ही व्यक्ती वर्तनावर नियंत्रण ठेवत असते. परंतु जेव्हा समाजाची मूल्यव्यवस्था  विस्कळीत होते अथवा सामाजिक मूल्यांचा ऱ्हास होतो तेव्हा समाज व्यक्तीच्या वर्तनावर प्रभावीपणे नियंत्रण ठेवू शकत नाही आणि त्यातून विविध प्रकारचे प्रश्न निर्माण होतात व त्यामुळे समाज विघटित होतो. उदा. – परंपरागत समाजातील जुन्या मूल्यांचा ऱ्हास होऊन त्यांची जागा नवीन मूल्य घेतात तेव्हा दोन मूल्यांमध्ये जुन्या पिढीतील व नव्या पिढीतील सामाजिक मूल्यांमध्ये अशा प्रकारचा संघर्ष उद्‌भवत राहिल्यास समाज विघटित होतो.

**६) सांस्कृतिक पश्चायन –**

संस्कृतीशिवाय कोणताही समाज नसतो. प्रत्येक समाजाला संस्कृती असल्यामुळे व्यक्तिगत पातळीवरून सामाजिक पातळीपर्यंतच्या संबंधांना एक विशिष्ट प्रकारची दिशा लाभलेली असते. कोणतेही वर्तन करीत असताना ज्याला संस्कृतीचा आधार असतो, ज्याची सांस्कृतिक मूल्ये स्थिर असतात तो समाज संघटित असतो. परंतु सांस्कृतिक मूल्यात फरक झाला तर मात्र असंघटित स्वरूपाची समाजव्यवस्था बनत असते. विशेषत: संस्कृतीच्या कमी–अधिक गतिशीलतेमुळे सामाजिक विघटन घडून येत असते. समाजव्यवस्थेत संस्कृतीच्या सर्व अंगाची  परिवर्तनाची गती समान नसते. एखाद्या संस्कृतीतील भौतिक घटकांमध्ये लवकर बदल होतो. तर अभौतिक घटकांमध्ये मंद गतीने बदल होतो. अशा प्रकारे संस्कृतीचा एखादा भाग इतर भागांपेक्षा मागे राहतो. या प्रक्रियेला ‘सांस्कृतिक पश्चायन’ म्हणतात. विज्ञानाच्या प्रगतामुळे समाजातील भौतिक वातावरण अधिक वेगाने बदल होत जातो. परंतु त्याच प्रमाणात समाजात असलेल्या परंपरागत सामाजिक मूल्यांमध्ये बदल होत

नाही. अशावेळी भौतिक व अभौतिक संस्कृतीमध्ये संघर्ष निर्माण होतो. आणि या संघर्षाचा परिणाम अशा समाजव्यवस्थेत सामाजिक विघटनाची प्रक्रिया कार्यरत होते.

**७) सामाजिक तणाव –**

सामाजिक विघटन ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे. सामाजिक विघटनाची प्रक्रिया समाजात एकदम निर्माण होत नाही, किंवा एकाचवेळी नष्टदेखील होऊ शकत नाही. या परिस्थितीस आधुनिक स्वरूप प्राप्त झाले म्हणजे त्यावर उपाययोजना कराव्या लागतात. समाजव्यवस्थेत अनेक प्रकारचे ताण व तणाव निर्माण होतात. या सामाजिक तणावातूनच जातीय दंगली, धार्मिक दंगली किंवा तणाव, भाषावाद निर्माण होतात. म्हणून एकप्रकारे त्यातून समाजाचे विघटन घडून येते.

**८) शिक्षणातील उणीवा –**

भारतातील सदोष शिक्षणपद्धती सामाजिक विघटनास कारणीभूत ठरलेली आहे. ही शिक्षणपद्धती ब्रिटिशकाळापासून सुरू आहे. या शिक्षणपद्धतीत अनेक दोष आपल्याला दिसून येतात. या शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून फक्त पुस्तकी ज्ञान मिळते. दैनंदिन जीवनात पुस्तकी ज्ञानाचा फारसा उपयोग होत नाही. या शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून व्यावहारिक स्वरूपाचे ज्ञान प्राप्त होत नाही. म्हणून व्यक्तीच्या अंगी व्यवसाय करण्याची क्षमता निर्माण होत नाही. हजारो पदवीधर युवक कामगार बाजारात प्रवेश करतात, परंतु त्यांच्या रिकाम्या हातांना काम मिळत नाही. सदोष शिक्षण पद्धतीमुळे भारतीय समाजात निरनिराळे प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात.

अशी अनेक महत्त्वाची कारणे किंवा घटक सामाजिक विघटनाच्या प्रक्रियेला जबाबदार आहेत.

## १.२.३ भारतीय समाजातील ज्वलंत समस्या – शेतकरी आत्महत्या

(Current Issues in Indian Society Farmers Suicide)

### १. शेतकरी आत्महत्येची कारणे –

(Causes of Farmers Suicide)

**१) कर्जबाजारीपणा –**

एकदा बँकेकडून कर्ज घेतलेला शेतकरी जोपर्यंत कर्ज परत करत नाही तोपर्यंत त्याला दुसऱ्या बँका कर्ज देत नाहीत. अशा वेळेस पूर्वीचे कर्ज फेडायला पैसा नसलेला शेतकरी नवीन पीक घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पैशासाठी खासगी सावकाराकडे वळतो. खासगी सावकार हे अव्वाच्या सव्वा व्याजदराने कर्ज देतात. शेतकऱ्याला हे व्याजदर परवडणारे नसतात. अनेक वर्षे हे कर्ज फेडूनसुद्धा शेतकरी हा त्या कर्जाचे व्याजच फेडतो, मुद्दल तर तशीच राहते. एकदा कर्ज थकले की त्या शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा वाढत जातो. या कर्जातून सुटका होणे शक्य नसते. शेवटी कर्ज फेडायच्या पलीकडे जाते तेव्हा सावकार जमीन ताब्यात घेतात आणि शेतकऱ्याला एकतर मोलमजुरी करणे भाग पाडते. यातूनच नैराश्य निर्माण होऊन शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करतात. अनेक शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे मुख्य कारण हे कर्जबाजारीपणा हेच आहे, असे निदर्शनास येते.

**२) बाजारपेठेत मिळणारी मालाची किंमत –**

अनेक समस्यांना तोंड देत जेव्हा शेतातील माल तयार होतो आणि बाजारपेठेत येतो तेव्हा त्याला योग्य ती किंमत मिळत नाही. कधी चांगल्या हवामानामुळे प्रचंड पिके आली तर बाजारपेठेत माल जास्त झाल्याने भाव पडतात. शेतीमाल महाग पडला तरी जास्तीचा पैसा शेतकऱ्यांच्या हातात पडत नाही. भारतात अद्यापही शेतमालाचा व्यापार मोठ्या प्रमाणात मध्यस्थांच्या हातात आहे. हंगामात ते शेतकऱ्याकडून कमी किंमतीत माल खरेदी करतात त्याचे साठे करतात. हंगाम संपल्यावर तो अधिक किंमतीला विकतात. दलालीमुळे ग्राहकाला शेतीमाल महाग पडला तरी जास्तीचा पैसा शेतकऱ्याच्या हातात पडत नाही. शेतकऱ्याचे आत्महत्येचे हे एक महत्त्वाचे कारण ठरले आहे.

**३) खासगी सावकारांचा कर्जपुरवठ्यातील वाढता प्रभाव –**

शेतकऱ्यांना भांडवलासाठी खासगी सावकारांवर अवलंबून रहावे लागते. सावकारांचे व्याजांचे दर विचारात घेता हे दर सहकारी बँकांच्या व्याजदरापेक्षा कितीतरी पटीने जास्त असल्यामुळे शेतकरी आपोआपच सावकारांच्या कर्जाच्या सापळ्यात अडकत आहेत.

**४) पावसावरील अवलंबित्व –**

भारतीय शेती पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असल्यामुळे आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतीतून उत्पादनाची हमी देता येत नाही. काही प्रमाणात शेतीत सिंचनाचा वापर करण्यासाठी लागणारे भांडवल त्यांच्याजवळ नाही.

**५) वाढता उत्पादन खर्च –**

शेती उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या बि-बियाणांचा, रासायनिक खतांचा, मशागतीचा खर्च दिवसेंदिवस वाढत असून, सर्वसामान्य शेतकऱ्यांना हा उत्पादन खर्च परवडणारा नाही. उत्पादन खर्चात होणाऱ्या वाढीबरोबर शेतीमालाच्या किंमतीत वाढ होत नाही. ही एक चिंतेची बाब आहे.

**६) वाढत्या कौटुंबिक जबाबदाऱ्या –**

मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न, घर बांधणे, गाडी घेणे यासारख्या अनेक कौटुंबिक जबाबदाऱ्या शेतकऱ्यांना पार पाडाव्या लागतात. यासाठी समाजातील काही घटकांकडून शेतकऱ्यांना खासगी सावकारी कर्जासाठी प्रवृत्त केले जाते.

**७) शेतकऱ्यांचा अज्ञानपणा –**

शासन ज्या योजना राबवते, त्या योजनाचे शेतकऱ्याला परिपूर्ण ज्ञान नसते. म्हणून त्याचा फायदा सावकार, व्यापारी, आडत, दुकानदार, भोंदू लोक अज्ञानाचा फायदा घेतात. ग्रामीण भागातील शेतकरी त्यास बळी पडतो. पण या सर्वांचा परिणाम शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढवण्यात होत आहे.

**८) शेतीविषयक राष्ट्रीय धोरणाचा अभाव –**

शेतीसाठी राष्ट्रीय धोरण नाही. उलट निर्यातीवर मर्यादा व आयातीला प्रोत्साहन आहे. शेतीविषयक कायदे, पीक विमा, सवलती, वीजविषयक धोरण, कर्जपुरवठा यामध्ये नव्या

सुधारणा घडवून आणाव्यात असे सरकारला वाटत नाही. 'सरकारचे धोरण व शेतकऱ्यांचे मरण' अशी स्थिती निर्माण झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या करतो आहे.

**९) इतर कारणे –**

वाढती व्यसनाधीनता, दारिद्र्य, गंभीर आजारपण, संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास, असंघटितपणा, गावपतळीवरील राजकारण, अकार्यक्षम कृषी उत्पन्न बाजार समित्या, शेतकऱ्यांचे परावलंबित्व, कृषीपूरक व्यवसायाचा अभाव, सिंचनाचा अभाव हेदेखील शेतकरी आत्महत्येस कारणीभूत घटक आहेत.

**२. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना –**

(Measures of farmer's Suicide)

**१) शेतकरी समूहाला धैर्य देणे –**

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना कर्जबाजारीपणाबरोबरच कौटुंबिक कलहदेखील जबाबदार आहेत. मानसिक संतुलन ढळल्याने आत्महत्या केल्या जातात. त्यामुळे शेतकऱ्यांना धीर देणे व त्यांचे मानसिक पुनर्वसन करणे महत्त्वाचे आहे. सेवाभावी संस्था यांनी शेतकऱ्यांना जगण्यासाठी धीर देणे आवश्यक आहे.

**२) शासकीय अर्थसहाय्य व व्याजासहित कर्जमाफी –**

आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना अर्थसहाय्याची गरज असते. राज्य व केंद्र सरकारांनी दोन प्रकारचे निधी सहाय्य जाहीर करून ते अंमालात आणले जात आहेत. परंतु सरकारने दिलेला सहाय्य निधी शेतकऱ्यांपर्यंत पूर्णपणे पोहोचला पाहिजे. अवर्षणग्रस्त तसेच पुरांमुळे पीक वाहून गेल्यास तसेच जमीन नापीक झाल्यास जिल्ह्यांना केंद्राने खास शेतकऱ्यांसाठी तात्काळ मदत करावयास हवी. तसेच राज्य सरकारकडून सहाय्य उपलब्ध करायला हवे. शेतकऱ्यांवर असलेल्या कर्जाचे व त्यांच्या व्याजाचे प्रचंड ओझे पाहता सरकारला कर्ज व व्याजमाफी जाहीर करणे हा एकमेव मार्ग आहे.

**इतर उपाययोजना –**

- सिंचन प्रकल्प लवकर पूर्ण करणे.
- दर्जेदार बियाणे निर्मितीस प्रयत्न करणे.
- कृषिपूरक उद्योगांना चालना देणे.
- ठिबक सिंचन योजनेत सबससिडी वाढविणे.
- फळ उत्पादनास सहाय्य करणे.
- शासनाच्या ध्येयधोरणांची अंमलबजावणी वेळेत होणे महत्त्वाचे आहे.
- शेतीत आलेल्या उत्पादन मालास योग्य तो भाव देऊन तो दलालाच्या हाती न पडता तो फक्त शेतकऱ्यांच्या हाती कसा पडेल यासाठी उपाययोजना आखाव्यात.

* शेतकऱ्यांना मोठ्या बाजारपेठेत कोणत्याही अडथळ्याशिवाय प्रवेश देण्यात यावा.
* शेतमालास ठेवण्यासाठी चांगल्या प्रकारच्या गोदामाची व्यवस्था करण्यात यावी.
* विना परवानाधारक सावकारांचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करून सरकारने सावकारी या पद्धतीवर बंदी आणावी.
* हंगामात उत्पादक व विक्रेते कृत्रिम टंचाई निर्माण करतात, तेव्हा सरकारने त्यांच्यावर कडक कारवाई करावी.
* शेतकरी कर्जबाजारी झाला असेल तर समाजाने त्याला आर्थिक सहकार्य, सामाजिक आपुलकी द्यावी. जेणेकरून तो आत्महत्या करणार नाही.
* शेतीपूरक व्यवसायाची प्राधान्याने अंमलबजावणी करायला पाहिजे.उदा – दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळ्या/मेंढ्या पालन, वराह पालन, मत्सव्यवसाय, मधुमक्षिका इ.
* विजेचे भारनियमन कमी करून शेतीसाठी मोफत वीजपुरवठा करण्यात यावा.
* शेती व्यवसायावर अचानक येणाऱ्या संकटांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक ती माहिती गोळा करून तिचे नियोजन करणे गरजेचे आहे.
* नैसर्गिक आपत्ती, चोरी, खते, बी–बियाणांतील फसवणूक या सर्वांची भरपाई शेतकऱ्याला मिळाली पाहिजे.
* विविध योजनेतील भ्रष्टाचार व वशिलेबाजी नष्ट करणे.
* दर्जेदार कीटकनाशकांचा पुरवठा करणे.
* शेतकरी संघटना यशस्वी कराव्यात.
* सर्वंकष शेती विकास योजनांवर भर देणे.

वरील सर्व उपाय करून त्यांची काटेकोरपणे, विनाविलंब व प्रामाणिकपणे अंमलबजावणी केल्यास निश्चितच शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होण्यास मदत होईल.

## १.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न –

**प्रश्न – १– खालील विधाने चूक (X) की बरोबर (✓) त्याप्रमाणे खूण करा.**

१) कोणतीही समस्या ही सामाजिक समस्या होऊ शकत नाही. ( )

२) समाज हा संघटन – विघटन यासारख्या प्रक्रियेतून जात नसतो. ( )

३) विघटन म्हणजे सामाजिक संतुलनातील बिघाड. ( )

४) अनेक शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे मुख्य कारण कर्जबाजारीपणा हेच आहे. ( )

५) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाकडे समाजाने तसेच शासनाने सहानुभूतिपूर्वक पाहू नये. ()

✓✓✓

**प्रश्न – २ थोडक्यात उत्तरे लिहा. / टीपा लिहा**

१) सामाजिक समस्या म्हणजे काय?

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

२) सामाजिक विघटनाचा अर्थ सांगा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

३) सामाजिक समस्येचे स्वरूप

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

**प्रश्न ३ – दिर्घोत्तरी प्रश्न**

१) सामाजिक समस्यांची कारणे सांगा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

२) सामाजिक विघटनांची कारणे स्पष्ट करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

३) शेतकरी आत्महत्येच्या कारणांची चर्चा करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

## १.४ सारांश –

समाजातील प्रत्येक व्यक्ती ही समस्याग्रस्त असते. जगातील कोणतीही व्यक्ती समस्यांपासून मुक्त नाही. सामाजिक समस्या प्रत्येक समाजात अस्तित्वात असतात. समाजातील लोक त्या समस्यांचे निवारण करण्याचे प्रयत्न करत असतात. प्रत्येक काळात सामाजिक समस्या असतात. प्राचीन काळात सामाजिक समस्या होत्या. त्याचप्रमाणे आधुनिक समाजातसुद्धा सामाजिक समस्या आढळतात. परंतु प्राचीन काळातील समस्या आज असतीलच असे नाही. काळानुरूप समस्यांचे स्वरूप बदलते.

भारतातील सामाजिक समस्यांचा विचार करणे हे आधुनिक काळात अगत्याचे झालेले आहे. कारण भारतातील सामाजिक प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होत आहेत. सामाजिक समस्या या मानवनिर्मित असतात. भारतातील बहुतांशी सामाजिक समस्या भारताच्या गुंतागुंतीच्या समाजरचनेमुळेच निर्माण झालेल्या दिसून येतात. सामान्यपणे समाजातील बहुसंख्य लोकांच्या समस्या म्हणजे सामाजिक समस्या होय.

सामाजिक संघटन व सामाजिक विघटन या दोन्ही प्रक्रिया महत्त्वाच्या आहेत. या दोन्ही प्रक्रियांचा समाजव्यवस्थेवर प्रभाव असतो. व्यक्तीच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आणि परस्पर संबंध सुनिश्चित, सुव्यवस्थित व नियंत्रित करण्यासाठी जी व्यवस्था किंवा पद्धती प्रचलित असते त्या संपूर्ण प्रक्रियेला सामाजिक संघटन म्हणतात. मानवी समाजाचे अस्तित्व टिकविण्यासाठी संघटन आवश्यक असते. परंतु काही समाजात सामाजिक विघटनाची प्रक्रिया  अधिक प्रमाणात दिसून येते. समाजव्यवस्था ही संघटन आणि विघटन या प्रक्रियेमधून जात असते. नेहमीच्या समाजव्यवस्थेमध्ये जेव्हा बिघाड निर्माण होतो तेव्हा समाजात सामाजिक विघटन घडून येते. सामाजिक विघटनाची ही प्रक्रिया समाजात एखादी समस्या निर्माण झाली असता उद्‌भवते. सामाजिक विघटन ही समाजातील एक गतिशील प्रक्रिया आहे. एका समस्येतून अनेक दुसऱ्या समस्या निर्माण होतात. त्यामुळेच समाज विघटनाच्या अवस्थेमध्ये जात असतो. म्हणून सामाजिक विघटनाची प्रक्रिया कधीही न थांबणारी प्रक्रिया आहे.

अत्यंत प्राचीन काळापासून भारत हा शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. अद्यापही ७०टक्के भारतीय लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. शेती भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. राष्ट्रीय उत्पन्नात भर टाकणारा प्रमुख स्रोत आहे. सुरुवातीपासून शेतीच्या बाबतीत अनेक समस्या पहावयास मिळतात. दारिद्र्य, विषमता, नैसर्गिक आपत्ती इ. समस्यांना तोंड द्यावे लागते. पण अलीकडच्या काळात शेतीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शेती क्षेत्राच्या विकासाची प्रक्रिया मंदावली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. यातून तो कंटाळून आत्महत्येचा मार्ग स्वीकारू लागला आहे. देशात होणाऱ्या शेतकरी आत्महत्या लक्षात घेता शासकीय पातळीवर विविध पॅकेजच्या माध्यमातून तरतुदी करण्यात आल्या आहेत. तरीदेखील शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबवायला तयार नाही. याचा विचार करता समाजातील सर्वच घटकांना हे लावून सोडणारा हा प्रश्न सर्वच स्तरांवर कळीचा ठरत आहे. ही परिस्थिती का आली आणि यातून बाहेर पडण्याचा शाश्वत

मार्ग काढणे आता क्रमप्राप्त झाले आहे. २१ व्या शतकाच्या सुरुवातीस आत्महत्या करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आल्याने समाज व शासन व्यवस्थेसाठी ती एक चिंतनीय बाब आहे.

## १.५ पारिभाषिक शब्द शब्दार्थ –

सामाजिक समस्या – समाज जीवनात निर्माण झालेली एक अनिष्ट/ अयोग्य परिस्थिती.

सामाजिक संघटन – सामाजिक संबंधातील संतुलन.

सामाजिक विघटन – सामाजिक संबंधातील बिघाड.

आत्महत्या – स्वत:चा आत्मघात. व्यक्तिकडून घडणारी जाणीवपूर्वक अशी कृती जीचा शेवट व्यक्तीच्या मृत्यूमध्ये होत असतो.

## १.६ संदर्भ सूची ( Bibliography)


१. सौ. पाटे, सुमन (१९९१) भारतीय सामाजिक समस्या, नागपूर : विद्या प्रकाशन, पृष्ठ क्र. १ ते ६, ८ ते ९, १४ ते २१.

२. काचोळे, दा. धों. (२०००), भारताच्या विघटनात्मक समस्या, औरंगाबाद : कैलाश पब्लिकेशन्स, पृष्ठ क्र. ६ ते ९, १२ ते १९, २६ ते ३१.

३. काचोळे, दा. धों. (२००५), भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या औरंगाबाद : कैलाश पब्लिकेशन्स, पृ. ३० ते ३६

४. तोरवणे, डी. एल., सौ. महाजन, जयश्री (२००८), भारतीय समाज (प्रश्न आणि सामाजिक समस्या), जळगाव : प्रशांत पब्लिकेशन्स, पृ. ७ ते १०, १४ ते २१, २४ ते २६,

५. आगलावे, प्रदीप (२००९), भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन , पृ. १ ते ४.

६. काळे सं. भा. खंदारे वि. भि. (२०१२), शेतकऱ्यांची आत्महत्या (वास्तव आणि उपाय), जळगाव : अथर्व पब्लिकेशन्स, पृ. ४४ ते ४८, ५४ ते ५६, ६५ ते ६६, ७१, ८१, १०१, ११५ ते ११६, १३९ ते १४०, १४४ ते १४५, १५९, १६२.

**अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके –**

१) खडसे, भा. कि. – भारतीय समाज आणि भारतीय समस्या.

२) आगलावे, प्र. ना. – आधुनिक भारतातील सामाजिक समस्या.

३) माने, माणिक – भारतातील समकालीन सामाजिक समस्या.

४) कुलकर्णी, पी. के. – भारतातील सामाजिक समस्या.

५) काळदाते, सुधा – भारतीय समाज (प्रश्न आणि समस्या).

६) संगवे, विलास - भारतातील सामाजिक समस्या.

७) भांडारकर, शब्बीर, पालकर - भारतीय सामाजिक समस्या.

८) खडसे, भा. कि. - भारतीय सामाजिक समस्या.

९) पाटे, सुमन - सामाजिक विघटन व समस्या.

१०) पराडकर, मो. श. - भारतीय सामाजिक समस्या.

## १.७ सरावासाठी प्रश्न –

१) सामाजिक समस्या म्हणजे काय? सामाजिक समस्येची कारणे स्पष्ट करा.

२) सामाजिक समस्येचे स्वरूप स्पष्ट करा.

३) सामाजिक विघटनाचा अर्थ सांगून सामाजिक विघटनाच्या कारणांची चर्चा करा.

४) शेतकरी आत्महत्येची कारणे विशद करा.

५) शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उपाय सांगा.

# घटक २

## रचनात्मक समस्या

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

- २.२.१ दारिद्र्याचा अर्थ
- २.२.२ दारिद्र्याचे स्वरूप
- २.२.३ दारिद्र्याची कारणे
- २.२.४ दारिद्र्याचे परिणाम
- २.२.५ दारिद्र्यावर उपाय
- २.२.६ लैंगिक शोषण आणि पिळवणूक – अर्थ व स्वरूप
- २.२.७ लैंगिक शोषण आणि पिळवणुकीची कारणे
- २.२.८ लैंगिक शोषण आणि पिळवणुकीचे परिणाम

२.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

२.४ सारांश

२.५ पारिभाषिक शब्द

२.६ संदर्भसूची

२.७ सरावासाठी प्रश्न


## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासातून आपल्याला......

१. दारिद्र्याचा अर्थ समजून घेता येईल.

२. दारिद्र्याचे स्वरूप स्पष्ट करता येईल.

३. दारिद्र्याची कारणे समजून घेण्यास मदत होईल.

४. दारिद्र्याचे परिणाम स्पष्ट करता येतील.

५. दारिद्र्यावर उपाय सांगता येतील.

६. लैंगिक शोषण आणि पिळवणुकीचा अर्थ व स्वरूप समजून घेता येईल.

७. लैंगिक शोषण आणि पिळवणुकीची कारणे स्पष्ट करता येतील.

८. लैंगिक शोषण आणि पिळवणुकीचे परिणाम विशद करता येतील.

## २.१ प्रस्तावना –

दारिद्र्य ही समस्या अर्थशास्त्रात अभ्यासली जाणारी असली तरी व्यापक प्रमाणात तिचे समाजावरील वाईट परिणाम लक्षात घेतले तर दारिद्र्याचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे आवश्यक ठरते. समाजात दारिद्र्याचे प्रमाण वाढल्यास संपूर्ण सामाजिक स्वास्थ्य, आरोग्य, शांतता व सुव्यवस्था धोक्यात येऊन अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतात. समाजात त्यामुळे असमानता निर्माण होऊन बहुसंख्य लोकांना आपल्या मूलभूत गरजा भागविताना अडचणी निर्माण होतात. दारिद्र्य या समस्येतून गुन्हेगारी, आत्महत्या, घटस्फोट, भिक्षावृत्ती, वेश्यावृत्ती, बालगुन्हेगारी इत्यादी अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. म्हणून समाजशास्त्रज्ञांच्या मते, दारिद्र्य ही केवळ आर्थिक समस्या नाही तर ती एक सामाजिक समस्यादेखील आहे. दारिद्र्य ही वास्तविक अर्थशास्त्रात अभ्यासली जाणारी आर्थिक समस्या आहे; पण तिचे सामाजिक दुष्परिणाम लक्षात घेऊन ती समाजशास्त्रातही अभ्यासली जाते.

दारिद्र्य ही संकल्पना तशी वेगवेगळ्या दृष्टीकोनातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो. दारिद्र्यालाच गरिबी असे म्हटले जाते. ज्याच्याजवळ पैसा नाही त्याला कोणी दरिद्री म्हणतात तर कोणी गरीब म्हणतात. दोन्हीचा अर्थ एकच आहे. म्हणजे दारिद्र्याचा संबंध हा तसा पैशाच्या अभावाशी आहे. ज्याच्याकडे जीवन जगण्यापुरताही पैसा नसतो तो दरिद्री. कारण अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागविण्यासाठी माणसाजवळ पैसा असावा लागतो. तर जर नसेल तर पैशा अभावी भीक मागावी लागते. भारतात दारिद्र्यात जीवन जगणाऱ्यांची संख्या कमी नाही. अनेकांना पैसा नसल्याने एका वेळचे जेवणसुद्धा मिळत नाही. निवाऱ्यासाठी छप्पर नसणाऱ्या लोकांची संख्या या देशात कमी नाही. अंगभर कपडा नसणाऱ्या लोकांची संख्या किती असेल याची कल्पनाही करवत नाही. दारिद्र्य ही जागतिक समस्या असून, ती संरचनात्मक समस्या मानली जाते.

## २.२ विषय विवेचन –

### २.२.१ दारिद्र्याचा अर्थ – (Meaning of Poverty)

प्रत्येक व्यक्तीला जीवंत राहण्यासाठी किंवा जीवन जगण्यासाठी काही आवश्यक गरजांची पूर्तता होणे महत्त्वाचे आहे. मोटार, स्कूटर, फ्रीज, टी. व्ही. या गोष्टी आवश्यक आहेत. परंतु या वस्तू जीवनावश्यक नाहीत. आपल्या जीवनाचा एक न्यूनतम स्तर टिकवून ठेवण्यासाठी व्यक्तीला अन्न, वस्त्र आणि घर या गोष्टी आवश्यक असतात.

दारिद्र्याच्या संदर्भात आर्थिक दृष्टिकोनातून अर्थशास्त्रज्ञांनी व्याख्या दिल्या आहेत. त्याचप्रमाणे गिलीन व गोडार्ड यांनी समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून व्याख्या दिल्या आहेत. सामाजिक समस्या यादृष्टीने दारिद्र्याचा अभ्यास करीत असताना या व्याख्या लक्षात घेणे आवश्यक आहे.

**व्याख्या – (definition)**

**१) गिलीन आणि गिलीन – (Gillin and Gillin)**

''दारिद्र्य ही एक अशी परिस्थिती आहे की, ज्यामुळे कोणतीही व्यक्ती अपुरे उत्पन्न किंवा गैरवाजवी खर्चामुळे स्वत:चा जीवन स्तर हा उंचावू शकत नाही. व्यक्ती स्वत:ची मानसिक तंदुरुस्ती टिकवून ठेवू शकत नाही. तसेच ते ज्या समाजाचे सदस्य आहेत, त्या समाजाच्या जीवनमूल्याप्रमाणे योग्य प्रकारे ते कार्य करू शकत नाही.''

(Poverty is that condition in which a person, either because of inadequate income or unwise expendiatures, does not maintain a scale of living high enough to provide for his physical and mental efficiency and to enable him and his natural dependents to function usefully according to the standards of society of which be is a member." Gillin and Gillin)

**२) गोडार्ड – (Godard)**

''एक व्यक्ती आणि तिच्यावर अवलंबून असणारे इतर लोक यांचे स्वास्थ्य, आरोग्य व त्यांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचा अभाव किंवा अपर्याप्त पुरवठा म्हणजे दारिद्र्य होय.''

("Poverty is an insufficianent supply of those things which are requisite for an individual to maintain himself and those dependent upon him in health and Vigour." - J. G. Godard)

**३) ॲडम स्मिथ – (Adom Smith)**

''व्यक्तींना जीवनावश्यक गोष्टी आणि मनोरंजनात्मक साधने याचा किती प्रमाणात उपभोग घेता येतो, यावर ती किती दरिद्री आहे किंवा नाही हे ठरविता येते.''

वरील व्याख्यांवरून व्यक्तीला आवश्यक व इतर गरजा पूर्ण करून समाजाच्या अपेक्षेप्रमाणे इतर सर्व व्यक्तींप्रमाणे जगता न येण्यासारखी परिस्थिती म्हणजे दारिद्र्य होय. स्वत:च्या असमर्थतेमुळे किंवा इतर अन्य कारणांमुळे व्यक्ती आपले जीवन समाधानकारक जगू शकत नाही.

### २.२.२ दारिद्र्याचे स्वरूप : (Nature of Poverty)

भारतीय समाजातील इतर अनेक समस्यांप्रमाणे दारिद्र्य किंवा गरिबी ही एक महत्त्वाची समस्या मानली जाते. दारिद्र्य म्हणजे काय हे सर्वसामान्य व्यक्तीला समजते. परंतु दारिद्र्याची संकल्पना स्पष्ट करणे किंवा शास्त्रीय दृष्टिकोनातून तिची व्याख्या करणे ही गोष्ट अवघड आहे. सामान्यपणे ज्या व्यक्तींना मूलभूत गरजांची पूर्तता करता येत नाही अशा व्यक्तींचा समावेश गरिबी या सदरात केला जातो. गरिबी/दारिद्र्य ही एक सामाजिक परिस्थिती आहे. अनेक सामाजिक समस्येचे मूळ उगमस्थान म्हणून गरिबीचा उल्लेख केला जातो.

दारिद्र्याची समस्या ही मूलत: आर्थिक व सामाजिक स्वरूपाची आहे. किंबहुना गरिबी हा मानवी समाजाच्या प्रगतीतील एक अडसर/ अडथळा आहे. आर्थिक परिस्थितीचा परिणाम म्हणून ही सामाजिक स्वरूपाची समस्या भारतीय समाजात महत्त्वपूर्ण ठरली आहे.

''समाजातील बहुसंख्य लोकांना किमान पातळीचे जीवन जगता येत नाही अशांचा अंतर्भाव दरिद्री म्हणून होत असतो.''

भारतीय समाजात दारिद्र्याची समस्या ही इतर देशांच्या मानाने प्रखरतेने जाणवणारी समस्या आहे. किंबहुना भारतातील गरीब लोकांचे राहणीमान हे अमेरिकेतील अथवा प्रगत राष्ट्रातील गरीब लोकांच्या राहणीमानापेक्षा अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे. देशातील गरीबाच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

प्राचीन काळी खाण्यापिण्यास न मिळणे म्हणजे त्या व्यक्तीला गरीब समजले जात होते. परंतु आधुनिक काळात समाजातील काही व्यक्ती स्वत:च्या काही मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाहीत. मूलभूत गरजा भागविण्याची अपूर्णता म्हणजे गरीबी होय. भारतात विकासाची साधने आणि विकासाची गती मंद असल्याकारणाने दारिद्र्याची समस्या निर्माण झालेली दिसून येते.

## २.२.३. दारिद्र्याची कारणे (Causes of Poverty)

दारिद्र्य ही एक जटिल अशी सामाजिक समस्या आहे. एका विशिष्ट कारणामुळे ही समस्या निर्माण झाली असे सांगता येत नाही. विविध कारणामुळे दारिद्र्याची समस्या उद्‌भवली आहे. दारिद्र्याची पुढील कारणे विशद करता येतील.

### १) आर्थिक मागासलेपण –

आर्थिक मागासलेपण हे भारतातील दारिद्र्याचे एक महत्त्वाचे कारण मानले जाते. समाजातील गरीब लोकांना भांडवल अभावी कोणताही व्यवसाय करता येत नाही. आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे गरीब लोकांना शिक्षणाचा लाभ मिळू शकत नाही आणि शिक्षण नसल्यामुळे चांगल्या प्रकारची नोकरी मिळू शकत नाही. म्हणूनच आर्थिक मागसलेपण हे दारिद्र्याचे एक महत्त्वाचे कारण मानले जाते.

### २) वाढती लोकसंख्या –

दारिद्र्याचे मुख्य कारण वाढती लोकसंख्या आहे असे म्हटले जाते. भारतीय लोकसंख्या ही बेसुमार वाढत चालली आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे प्रत्येक व्यक्तीला आपल्या गरजा पूर्ण करणे शक्य होत नाही. लोकसंख्यावाढीचा दर अधिक असल्यामुळे व्यक्तीचे व्यवस्थितरीत्या पालन-पाषण करणे अशक्य झाले आहेत. त्यामुळे लोकसंख्यावाढ व दारिद्र्य यांचा जवळचा संबंध आहे. लोकसंख्यावाढीचा परिणाम म्हणून समाजामध्ये विविध प्रकारच्या समस्या निर्माण होतात. त्यापैकी दारिद्र्य ही एक समस्या आहे.

### ३) ग्रामीण उद्योगधंद्याचा ऱ्हास –

पूर्वी भारतीय समाजात लघु व कुटीर उद्योगधंदे, विविध कलाकुसरीची कामे केली जात असत. परंतु आधुनिक समाजात वस्तूंचे उत्पादन यंत्राच्या सहाय्याने होऊ लागले. त्यामुळे ग्रामीण भागातील लघु व कुटीर उद्योग किंवा हस्त उद्योग बंद पडले. त्यामुळे साहजिकच ग्रामीण समाजातील असंख्य लोकांना चरितार्थाचे दुसरे कोणतेच साधन उपलब्ध नसल्यामुळे गरिबीसारख्या समस्येला बळी पडावे लागते.

**४) बेरोजगारी –**

लोकसंख्या सातत्याने वाढत असली तरी त्या प्रमाणात देशाचा आर्थिक विकास घडून आला नाही. त्यामुळे कोट्यावधी लोकांना बेकारीच्या समस्यांना सामोरे जावे लागते आहे. बेकारीच्या काळात कोणत्याही प्रकारचे अन्य साधन उपलब्ध नसले की दारिद्र्याचे प्रमाण वाढत असते.

**५) व्यसनाधीनता –**

व्यसनाधीनता हे दारिद्र्याचे महत्त्वाचे कारण आहे. कारण बऱ्याचदा व्यक्ती मद्यपान, सट्टा, जुगार यासारख्या घातक व्यसनांच्यामागे लागून आले सर्वस्व गमावून बसते व दरिद्री होते. त्यातूनच दारिद्र्याची समस्या निर्माण होते.

**६) नैसर्गिक आपत्ती –**

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा हा शेती आहे. ती निसर्गावर आधारित आहे. नैसर्गिक आपत्ती आल्यास त्याचा मुकाबला करण्यासाठी आपल्याकडे कोणतेच साधन नाही. याच कारणामुळे अतिवृष्टी, पावसाचा अभाव नैसर्गिक कोप, अशा नैसर्गिक आपत्तीमुळे मोठे नुकसान होऊन दारिद्र्यात भर पडते. देशातील काही भागात नैसर्गिक आपत्तीचे संकट नेहमी येत असते. यात प्रामुख्याने साथीचे रोग, अतिवृष्टी, भूकंप, दुष्काळ, चक्रीवादळे, महापूर, त्सुनामी लाटा, तापमानात बदल, ज्वालामुखी या स्वरूपाचे अनिष्ट परिणाम घडून येतात. या नैसर्गिक संकटामुळे त्या भूभागावर वसलेल्या लोकांचे जीवन उद्ध्वस्त, होते. वित्तहानी व जीवितहानी घडून येते. पिढ्यान्पिढ्या जमवलेली संपत्ती, घरे–दारे क्षणार्धात नष्ट होतात. संपूर्ण कुटुंबाची वाताहत होते. पुढील आयुष्य त्यांना दारिद्र्यातच घालवावे लागते.

**७) अपघात –**

भारतात अपघाताचे प्रमाण वाढत आहे. रेल्वे, मोटार अपघात इत्यादी विविध प्रकारचे अपघात होतात. कारखान्यात मजूर हे जुन्या यंत्रावर काम करतात. त्यामुळे कारखान्यात अनेक अपघात होतात. या अपघातामुळे लोक अपंग होतात किंवा मरतात. त्याचा परिणाम त्या व्यक्तीच्या कुटुंबावर होतो. पर्यायाने त्या व्यक्तीच्या कुटुंबाला दारिद्र्यात जीवन जगावे लागते.

**८) अन्य कारणे –**

रोगराई, दुर्घटना, वेश्याव्यवसाय, निष्क्रियता, भ्रष्टाचार, आळशीपणा व ऐतखाऊवृत्ती, मोठेपणाच्या खोट्या कल्पना, शिक्षणाचा व योग्यसंधीचा अभाव, वृद्धत्व, सतत आजारी पडणे ही व इतर अशीच कारण दारिद्र्याच्या मुळाशी दिसून येतात.

## २. २. ४ दारिद्र्याचे परिणाम (Consequences or Poverty)

दारिद्र्य ही एक सामाजिक समस्या आहे. त्याचप्रमाणे दारिद्र्याचा समाज जीवनावर वाईट प्रभाव पडून अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे या समस्येचे दुष्परिणाम सर्वत्र जाणवतात. दारिद्र्याचे दुष्परिणाम हे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) भ्रष्टाचार –**

दारिद्र्यामुळे समाजात भ्रष्टाचार निर्माण होतो. दारिद्र्यात असणाऱ्या लोकांना आर्थिक परिस्थिती सुधारावी असे वाटते. परंतु समाजमान्य मार्गाद्वारे आर्थिक परिस्थिती सुधारणे

शक्य होत नाही. त्यामुळे लोक भ्रष्टाचाराचा अवलंब करून आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात.

**२) शिक्षणापासून वंचित –**

दारिद्र्यामुळे बहुसंख्य कुटुंबातील मुले-मुली शिक्षणापासून वंचित राहतात. तर बऱ्याचवेळा कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी लहान वयातच त्यांना काम करावे लागते. त्यातूनच बालकामगारांची समस्या निर्माण होते. शिक्षणा अभावी व्यक्तीची सर्वांगीण प्रगती होऊ शकत नाही. पर्यायाने समाजाचे आणि राष्ट्राचे नुकसान होते.

**३) आत्महत्या –**

अनेक लोक दारिद्र्याला कंटाळून आत्महत्या करतात. व्यक्ती ज्यावेळेस कुटुंबाचे पालन-पोषण समाधानकारकरित्या करू शकत नाही, त्यावेळेस व्यक्तीला नैराश्य येते. मुलाबाळांची होणारी उपासमार पाहून बऱ्याचवेळा व्यक्ती आत्महत्या करण्यास प्रवृत्त होते. निर्माण झालेल्या परिस्थितीशी व्यक्ती समायोजना करू न शकल्यामुळे व्यक्ती आत्महत्या करते. अलिकडे शेतकऱ्यांनी गरीबीला कंटाळून आत्महत्या केल्याच्या घटना महाराष्ट्रात वारंवार घडत आहेत.

**४) भिक्षावृत्ती –**

भिक्षावृत्तीचे एकमेव कारण म्हणजे दारिद्र्य होय. दारिद्र्यामुळे व्यक्तीची उपासमार होते. कुणाची मदत नसते. आपल्या बायका मुलांना उपाशी मारण्यापेक्षा भिक्षा मागणे वाईट नाही, असा विचार करून लोक भिक्षावृत्ती पत्करतात.

**५) वेश्यावृत्ती –**

कुटुंबाची वाईट परिस्थिती बघून स्त्रिया वेश्यावृत्ती मार्गाचा अवलंब करून पैसा मिळवितात. अनेक कुटुंबातील मुलींचा गरिबीमुळे विवाह होत नाही. घरातील तरुण मुली स्वत:च्या आणि कुटुंबातील व्यक्तीच्या आवश्यक गरजा भागविण्यासाठी वेश्या व्यवसाय करतात. कारण त्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा कोणताच उपाय नसतो. दारिद्र्यामुळे अनेक स्त्रियांनी वेश्याव्यवसाय स्वीकारला असल्याचे आढळून येते.

**६) गलिच्छ वस्त्यांची निर्मिती –**

दारिद्र्यामुळे व्यक्तीची निवाऱ्याची गरज भागू शकत नाही. त्यामुळे व्यक्ती शेवटी झोपडपट्टीचा आश्रय घेते. या गलिच्छ वस्त्यांमध्ये कोणत्याही सोयी-सुविधा नसतात. अनेक अवैध व्यवसाय चालू असतात व व्यक्ती अपिरहार्यपणे या वाईट गोष्टींना बळी पडते. दिवसेंदिवस घराच्या टंचाईमुळे गलिच्छ वस्त्यांमध्ये वाढ होताना दिसते. निश्चित उत्पन्नाच्या अभावी लोक आवश्यक गरजा भागवू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना निवासासाठी गलिच्छ वस्त्यांचा आश्रय घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे दारिद्र्यामुळे लोक चांगली प्रशस्त, हवेशीर आणि सुखसोयींनी युक्त अशी घरे घेऊ शकत नाहीत. त्या कारणानेसुद्धा गलिच्छ वस्त्यांचा प्रश्न अधिकच भेडसावतो.

**२.२.५ दारिद्र्यावर उपाय – (Measures in Poverty)**

देशामध्ये पसरलेले भयंकर दारिद्र्य हे अनेक उपाययोजना करूनसुद्धा समाप्त होऊ शकले नाही. दारिद्र्य नाहीसे करण्यासाठी खालील उपाययोजनांची मदत होऊ शकते.

**१) लोकसंख्या नियंत्रित करणे –**

वाढती लोकसंख्या हे दारिद्र्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रित करणे आवश्यक आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारी, महागाई इ. समस्या निर्माण होतात. म्हणून कोणत्याही परिस्थितीत लोकसंख्या नियंत्रित करणे आवश्यक आहे. त्याकरिता शासनाने लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने कडक उपाययोजनांची अंमलबजावणी करावी. सर्व राजकीय पक्षाच्या सहकार्याने एका व्यापक कार्यक्रमाची आखणी करावी.

**२) कृषी क्षेत्राचा विकास –**

भारतातील बहुतांश लोक हे शेती आणि शेती संबंधित व्यवसायाशी संबंधित आहेत. त्यामुळे कृषिक्षेत्राचा विकास करण्याची आवश्यकता आहे. सिंचनाच्या सोयी, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादीचा उपयोग करून शेतीचे उत्पादन वाढविता येते. शेतीचा विकास झाल्यास शेतीसंबंधित व्यवसायांना प्रोत्साहन मिळेल. देशात मुबलक प्रमाणात अन्न–धान्य उपलब्ध होईल. त्यामुळे लोकांना स्वस्त धान्य मिळेल.

**३) आर्थिक विकास –**

भारतामध्ये आर्थिक विकासाची गती ही फार मंद आहे ती वाढविण्यासाठी आपल्याला अधिकाधिक औद्योगिकरण आणि ग्रामीण उद्योगाच्या विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**४) साधनसंपत्तीचे वितरण –**

केवळ उद्योगांना प्रोत्साहन, ग्रामीण कुटिरोद्योग, आर्थिक प्रगती एवढे करून चालणार नाही. त्यासाठी उत्पादनाचे साधन आणि संपत्तीचे वितरण समाजातील सर्व लोकांमध्ये होणे गरजेचे आहे.

**५) शिक्षणाचा प्रसार –**

औद्योगिक शिक्षण, त्याचा प्रसार यामुळे एकीकडे रोजगाराच्या संधी वाढतील तर दुसरीकडे अज्ञानामुळे असे होणार नाही हे लक्षात घेऊन शिक्षणाचा प्रसार करून त्यातून सामाजिक वाईट कृत्यातून लोकांची सुटका होईल. लोकांच्या कार्यक्षमतेत वाढ होईल अशा पद्धतीने शिक्षणाला व्यवसाय आणि आर्थिक विकासाशी जोडावे.

**६) भ्रष्टाचाराचे निर्मूलन –**

भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी प्रशासनाद्वारे कडक नियम वा कायदे करणे गरजेचे आहे. तरच गरिबीचे निर्मूलन करणे शक्य आहे.

**७) अन्य उपाय –** (Other Measures)

उपरोक्त उपायाव्यतिरिक्त अन्य उपायदेखील आहेत. ज्याद्वारे दारिद्र्याच्या समस्येचे निवारण होऊ शकेल.

* अनावश्यक सरकारी खर्च कमी करण्यासाठी अर्थसंकल्पात परिवर्तन करणे.
* वेळेनुसार परिणामकारक योजना बनविणे.

* युवकांना कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक, व्यापार आणि लहान उद्योगांचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण केंद्राची स्थापना करणे.
* नियोजित कार्यक्रमाद्वारे महिलांना आत्मनिर्भर बनविणे.
* प्रत्येक राज्यात अधिकारी आणि तज्ज्ञांची अशी टीम तयार करावी की, जी रोजगाराभिमुख कार्यक्रमाचे नियोजन करील.
* ग्रामीण आणि शहरी विकासाच्या योजना कार्यान्वित करण्यासाठी गैर सरकारी संस्थांची मदत घेणे.

अशा प्रकारच्या उपाययोजना कार्यान्वित केल्यास दारिद्र्याची समस्या सोडविणे कठीण नाही. अशा विविध योजना सरकारने सुरू केल्या आहेत परंतु या योजना पूर्णपणे यशस्वी होऊ शकल्या नाहीत. ही देखील एक वास्तविकता आहे.

### २.२.६ लैंगिक छळ व शोषण / पिळवणूक (Sex Abuses & Exploitation)

**अर्थ व स्वरूप – (Meaning & Nature)**

भारतीय समाजातील एक महत्त्वाची समस्या म्हणजे लैंगिक छळ किंवा लैंगिक शोषण किंवा स्त्रियांवरील अत्याचार होय. भारतीय समाज पुरुषप्रधान समाज आहे. या समाजात स्त्री वर्गाला दुय्यम स्थान आहे. या समाजातील एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ४९ टक्के लोकसंख्या स्त्री वर्गाची आहे. समाजातील हा समूह अनेक बाबतीत दुर्लक्षित किंवा शोषित राहिलेला आहे. पत्नीला मारहाण करणे, हुंड्यासाठी शारीरिक व मानसिक छळ करणे, सार्वजनिक ठिकाणी तिला टोमणे मारणे, बलात्कारासारख्या घटना घडून येणे इ. समस्यांना स्त्री वर्गाला सामोरे जावे लागते. आधुनिक काळात शिक्षणाचा प्रसार, स्त्रियांमधील आर्थिक स्वयंपूर्णता आणि स्त्री वर्गाला संरक्षण देणारे नवनवीन कायदे अस्तित्वात येत आहेत. परंतु आधुनिक समाजात लैंगिक छळाचे प्रमाण कमी झालेले दिसून येत नाही. भारतीय स्त्री वर्गावर सातत्याने ज्या प्रमाणात लैंगिक छळाच्या घटना घडत आहेत. किंबहुना भारतीय स्त्रियांचे जन्मापासून ते अखेरपर्यंत अत्याचाराचे चक्र आयुष्यभर सुरू असते. लैंगिक छळ किंवा अत्यात ही एक अशी सामाजिक घटना आहे की तिला एका चौकटीमध्ये व्याख्येच्या रूपाने स्पष्ट करणे कठीण आहे. लैंगिक छळामध्ये प्रामुख्याने शारीरिक व मानसिक छळ करणे, स्त्रीचे अपहरण करणे, सक्तीने वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडणे, तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे अशा विविध अर्थाने लैंगिक छळ किंवा अत्याचार केला जातो. हा छळ शारीरिक  व मानसिक असेल किंवा सामाजिक स्वरूपाचा असेल परंतु अत्याचाराचे मुख्य लक्ष्य हे फक्त स्त्रीच असते. त्याला उद्देशून लैंगिक शोषण किंवा अत्याचार असे म्हणता येईल. आधुनिक समाजामध्ये स्त्री वर्गाला समानतेचा अधिकार प्राप्त झालेला आहे. तिला सुखाने आणि निर्भयपणे जीवन जगता यावे म्हणून भारत सरकारने अनेक महत्त्वाचे कायदे केले आहेत. परंतु या कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्यामुळे स्त्री वर्गावर अन्याय, अत्याचार किंवा लैंगिक शोषण होत असते. २१ व्या शतकात आपण प्रवेश केलेला आहे. परंतु स्त्री वर्गाचे प्रश्न अजूनही सुटलेले नाहीत. याउलट स्त्री वर्गावर अन्याय, अत्याचाराचे व लैंगिक छळाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत

आहे. स्त्री वर्गाला पावलोपावली वेगवेगळ्या पातळीवर अन्याय, अत्याचार व लैंगिक छळाला तोंड द्यावे लागते. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे शेवटचे टोक म्हणजे बलात्कार होय. आणि या भीतीमुळे स्त्रियांना मनमोकळेपणाने फिरता येत नाही. तिच्या सभोवताली असुरक्षिततेचे वातावरण पसरलेले आहे असे तिला वाटू लागते. समाजात वावरताना तिला वेळोवेळी अपमानीत व्हावे लागते. पुरुष वर्गाला असे वाटते की, आपल्या इच्छेनुसार स्त्रियांनी वागावे. आपल्या गरजा पूर्ण कराव्यात अशी अपेक्षा तो करीत असतो. परंतु स्त्रीलादेखील एक मन असते आणि या मानाच्या विरोधात अनेक गोष्टी घडत असतात. आणि त्या सर्व गोष्टी किंवा घटना ती मुकाट्याने सहन करीत असते. लैंगिक छळ म्हणजे तिच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित करणे होय. स्त्रीची मानसिक तयारी नसतानादेखील तिच्यावर जबरदस्ती करणे या गोष्टी अन्यायकारक असतात. बलात्काराची समस्या असो किंवा लैंगिक छळाची समस्या असो ही प्राचीन काळापासून तर आजच्या आधुनिक काळापर्यंत याचे अस्तित्व दिसून येते.

## २.२.७ लैंगिक छळाची आणि शोषणाची कारणे – (Causes of Sex Abuses & Exploitation)

श्रीमती श्रीदेवी गोयर यांनी अत्याचारग्रस्त महिलांचा अभ्यास केला आणि लैंगिक छळाची पुढील महत्त्वाची  कारणे सांगितलेली आहेत.

### १) विवाहपूर्व आर्थिक ठराव –

भारतीय ग्रामीण समाजामध्ये आजही मोठ्याप्रमाणावर नियोजित विवाह होत असतात. यामध्ये वधू-वराकडील ज्येष्ठ नातेवाईक परस्पर विचारविनिमय करून देवाण-घेवाण, मानपान, हुंड्याची रक्कम इ. प्रकारची बोलणी व ठराव करतात. या प्रक्रियेमध्ये वधू-वराला सहभागी करून घेतले जात नाही. या ठरावाच्या प्रंसगी हुंड्याची रक्कम, दागदागीने, कपडे, इतर साहित्य इत्यादी गोष्टी निश्चित केल्या जातात. विवाहापर्यंत या ठरावाची अंमलबजावणी करणे हे वधू पक्षाकडील व्यक्तीची जबाबदारी असते. परंतु वधू पक्षाकडून या सर्व गोष्टींची पूर्तता होऊ शकत नाही. आणि पूर्तता केली तरी वर पक्षाच्या व्यक्तीचे पूर्ण समाधान होईलच असे नाही. याचा परिणाम म्हणून त्या नववधूला त्रास देणे, तिला मारहाण करणे, तिला उपाशी ठेवणे, काही कारण नसताना माहेरी पाठवून देणे, अंगावरील दागदागिने काढून घेणे अशा पद्धतीने शारीरिक व मानसिक छळ केला जातो.

### २) विवाहानंतर आर्थिक मागणी –

भारतीय समाजामध्ये विवाहाच्या संदर्भात काही अनिष्ट रूढी प्रचलित असून, त्यांना समाजात प्रतिष्ठा किंवा मान्यता मिळालेली आहे. विवाहानंतर प्रथम वर्षामध्ये वेळोवेळी नवीन कपडे, दागदागिने, वाहनासाठी पैसा इ. गोष्टींची मागणी केली जाते आणि जर ही अपेक्षा पूर्ण केली नाही तर त्या नववधूचा शारीरिक व मानसिक छळ केला जातो.

### ३) अपसमायोजन –

भारतीय समाजातील रूढी, परंपरा, सामाजिक घटना इ. गोष्टींच्या बाबतीत व्यक्तीचे व्यक्तीमतत्त्व घडविण्यात महत्त्वाचा वाटा असतो. वधूवरांचा परस्परांचा स्वभाव, आवड-

निवड या गोष्टींपेक्षा हुंड्याची रक्कम, आर्थिक देवाण-घेवाण, मान-सन्मान या गोष्टी महत्त्वाच्या मानल्या जातात. विवाहापूर्वी एका सुरक्षित कुटुंबात वाढलेली मुलगी विवाहानंतर अपरिचित कुटुंबात प्रवेश करते. पत्नी, सून अशा विविध भूमिका तिला पार पाडाव्या लागतात. नवे कुटुंब, नवीन व्यक्ती त्यांची, आवड-निवड, त्यांच्या सवयी, प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव या सर्व गोष्टींशी तिला समायोजन करावे लागते. अशा प्रसंगी जर समायोजन झाले नाही तर अशा कुटुंबात तणावाची परिस्थिती निर्माण होते. आणि स्त्रीचा शारीरिक व मानसिक छळ केला जातो किंवा तिला त्रास दिला जातो.

**४) वधू-वर निवडीच्या निर्बंधाचे उल्लंघन –**

भारतात आजही विवाहसंस्थेवर जाती व्यवस्थेचा प्रभाव दिसून येतो. व्यक्तीने आपल्या स्वत:च्या धर्म, जात, जमात किंवा पोटजातीमध्ये विवाह करावा असा जातीव्यवस्थेचा निर्बंध आहे. परंतु आधुनिक समाजामध्ये मोठमोठ्या शहरांमध्ये भिन्न-भिन्न जातीचे लोक एकत्र येतात. एकत्र काम करतात. अशा व्यक्तींमध्ये साहजिकच प्रेमविवाह होतात. अशा व्यक्ती नातेवाईक आणि घरच्या रूढी प्रिय व्यक्तींपासून दुरावतात. अशा सूनेला सासर आणि माहेरची दारे बंद होतात. याचा परिणाम म्हणून कुटुंबातील सर्व सदस्य नातेवाईक आणि त्यांच्या विरोधात ती एकटी असा विचित्र प्रसंग निर्माण होतो. कालांतराने अशा कुटुंबामध्ये संघर्ष निर्माण होतो. त्याचा परिणाम म्हणून त्या स्त्रिचा शारीरिक व मानसिक छळ केला जातो.

**५) मूल न होणे किंवा मुलीच होणे –**

भारतीय समाजामध्ये एखाद्या स्त्रीला मूल न होणे हे तिच्यावरील अत्याचाराचे एक महत्त्वाचे कारण असू शकते. तसेच एखाद्या स्त्रीला फक्त मुलीच होणे हे कारणदेखील अत्याचाराला पुरेसे असते. कारण भारतीय समाजात पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व दिसते. धार्मिक विधी कार्यक्रमांमध्ये पुरुषाचा समावेश आवश्यक व महत्त्वाचा मानला जातो. वंश टिकविण्यासाठी आणि मोक्ष प्राप्तीसाठी मुलगाच व्हावा अशी मानसिकता निर्माण झालेली दिसून येते. आणि एखाद्या स्त्रीला जर मुलीच होत असतील तर त्यास फक्त स्त्रीच जबाबदार आहे अशी भावना निर्माण होते. त्यामुळे अशा स्त्रीचा शारीरिक व मानसिक छळ केला जातो.

**६) चारित्र्यावरील संशय –**

भारतीय समाजामध्ये स्त्रीच्या पावित्र्याला विशेष महत्त्व आहे. भारतीय समाजामध्ये स्त्रियांवरील होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळाला किंवा त्रासाला चारित्र्यावरील संशय एक महत्त्वाचे कारण मानले जाते. आधुनिक समाजामध्ये शिक्षण, नोकरी इ. घटकांमुळेच स्त्रियांना घराबाहेर रहावे लागते. एकत्र प्रवास, कार्यालयीन कामकाज, सार्वजनिक समारंभ, एकत्र जेवण इ. कारणांमुळे पुरुषांच्या सहवासात अनेक स्त्रिया सहभागी होतात. अशा वर्तनाकडे कुटुंबातील काही व्यक्ती संशयाने पाहतात. ती शेजारी असलेल्या व्यक्तींशी बोलते, हसते या क्षुल्लक गोष्टी तिच्या चारित्र्यावर संशय घेण्यास पुरेशा ठरतात. या संशयामुळे भारतीय समाजातील अनेक स्त्रियांना अन्याय, अत्याचार सहन करावा लागतो आणि अशा स्त्रियांचा शारीरिक व मानसिक छळ केला जातो.

अशी विविध कारणे लैंगिक छळाच्या किंवा शोषणासंबंधी स्पष्ट करता येतील.

## २.२.८ लैंगिक शोषण आणि पिळवणुकीचे परिणाम

(Consequences of Sex Abuses and Exploitation)

**१) मानसिक अनारोग्य –**

मनाचा समतोल विकास होणे हे महत्त्वाचे आहे. लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या व्यक्तीचे मानसिक संतुलन ढासळते. त्यामुळे मानसिक अनारोग्याच्या समस्येला पीडित व्यक्तीला तोंड द्यावे लागते.

**२) चिंता व भय –**

लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या व्यक्तीचे मानसिक संतुलन ठीक नसते. त्यामुळे पीडीत व्यक्ती सतत चिंताग्रस्त व भीतीच्या छायेतच वावरत असते. त्यामुळे चिंता व भय हा लैंगिक शोषण आणि पिळवणुकीचा परिणाम सांगता येईल.

**३) शारीरिक इजा –**

लैंगिक शोषण करण्याच्या प्रयत्नात महिलांना अनेक वेळा शारीरिक इजा होते. जखमा होतात. काहीवेळा शस्त्रांचा धाक दाखवून इजा केली जाते. त्यामुळे शारीरिक त्रास होतात. अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांना मारहाण, खरचटणे, ओरबटणे, वगैरेसारखे प्रकार होतात. त्यामुळे शारीरिक इजा होते. काही वेळा मृत्यू होतो.

**४) आत्महत्या –**

लैंगिक शोषणास बळी पडलेल्या महिलांकडे समाज वेगळ्या नजरेने पाहतो. अशा महिलांना सहानुभूतीची व सुरक्षिततेची गरज असते. पण त्यांना सहानुभूती तर मिळतच नाही. उलट लोकांच्या टीका, टोमण्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे अशा लैंगिक अत्याचारास बळी पडलेल्यांना आत्महत्या करण्यास पर्याय राहत नाही.

**५) जीवितहानी / हिंसाचार –**

लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये बऱ्याचवेळा संबंधित महिलेने कुणाकडे तक्रार करू नये यासाठी तिची हत्या केली जाते. तसेच अशा घटनांचे साक्षीदार असलेल्या व्यक्तींनासुद्धा काहीवेळा ठार मारण्यात आल्याच्या घटना वृत्तपत्रात वाचण्यात येतात. अशा घटनांमुळे दोन गटात मारामाऱ्या, दंगली असे प्रकार होतात. त्यात जीवितहानी होण्याची भीती असते.

**६) नैतिक अध:पतन –**

लैंगिक अत्याचार करणाऱ्या पुरुषांचे नैतिक अध:पतन होत असते. त्याचे मन अपराधीपणाच्या व पश्चातापाच्या भावनेने भरून जाते. अशा अन्याय करणाऱ्यांच्या मनातसुद्धा भीतीची भावना निर्माण होते. त्याचे नैतिक पतन झाल्यामुळे समाज अशा व्यक्तीकडे हीन भावनेने पाहत असतो.

**७) अभ्यासावर दुष्परिणाम –**

लैंगिक अत्याचारास बळी पडलेल्या शालेय व महाविद्यालयीन मुलींच्या मनात एक असुरक्षिततेची आणि भयानक भीतीची भावना असते. त्यामुळे त्यांचे शाळेत, महाविद्यालयात उपस्थितीचे प्रमाण घटत जाते. शिक्षक शिकवतात तेव्हा त्यांचे मन एकाग्र होत नाही.

अभ्यासात लक्ष लागत नाही. अशा तक्रारी सुरू होतात. अशा मुलींच्या मनातून भीतीची भावना काढण्याची, त्यांना समुपदेशन करण्याची खूपच गरज असते. पण त्यांना मानसिक समुपदेशनाचे उपचार मिळत नाहीत. त्यामुळे त्यांच्या अभ्यासावर दुष्परिणाम होत असतो.

असे विविध परिणाम सांगता येतील.

## २.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :

**प्रश्न १) खालील विधाने चूक (X) की बरोबर (✓) त्याप्रमाणे खूण करा.**

१) दारिद्र्य या समस्येतून अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. (  )

२) दारिद्र्यातून व्यक्तिगत आणि सामाजिक विघटन घडून येत नाही. (  )

३) अत्यल्प उत्पन्नात आवश्यक गरजांची पूर्ती करणे शक्य नसते. (  )

४) आधुनिक समाजामध्ये स्त्री वर्गाला समानतेचा अधिकार प्राप्त झालेला आहे. (  )

५) स्त्री वर्गावर अन्याय, अत्याचार किंवा लैंगिक शोषण होत असते. (  )

**प्रश्न २ – थोडक्यात उत्तरे लिहा/ टीपा लिहा.**

१) दारिद्र्य म्हणजे काय?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२) दारिद्र्याचे स्वरूप

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३) लैंगिक छळ आणि पिळवणुकीचा अर्थ सांगा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**प्रश्न ३ – दीर्घोत्तरी प्रश्न**

१) दारिद्र्याची कारणे स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२) दारिद्र्याचे परिणाम सांगा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३) लैंगिक छळाची कारणे स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## २.४ सारांश

दारिद्र्य ही जागतिक समस्या असून, ती संरचनात्मक समस्या मानली जाते. अर्थशास्त्रज्ञांच्या मते, दारिद्र्य ही एक आर्थिक समस्या आहे. ही समस्या व्यक्तीला मिळणाऱ्या अत्यल्प उत्पन्नामुळे निर्माण होते. उत्पन्न कमी असल्यामुळे व्यक्ती आपल्या आवश्यक गरजांची पूर्तता करू शकत नाही. त्यामुळे समाजात असमानता निर्माण होते. कमी उत्पन्न असणाऱ्या व्यक्तींच्या जीवनमानाचा स्तर हा निम्न दर्जाचा असतो. दारिद्र्य या समस्येतून गुन्हेगारी, स्वहत्या, घटस्फोट, भिक्षावृत्ती, वेश्यावृत्ती, बालगुन्हेगारी इ. अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. म्हणून समाजशास्त्रज्ञांच्या मते, दारिद्र्य ही केवळ आर्थिक समस्या नाही तर एक सामाजिक समस्यादेखील आहे. दारिद्र्यातून व्यक्तिगत आणि सामाजिक विघटन घडून येते.

व्यक्तीच्या आवश्यक गरजांची पूर्तता न होणे म्हणजे दारिद्र्य होय. म्हणून आवश्यक गरजांची पूर्ती व्हायला पाहिजे. आवश्यकतांचे निर्धारण हे वेगवेगळ्या समाज आणि काळातील रूढी, परंपरा तसेच राहणीमानाच्या स्तराच्या आधारावरून केले जाते. याचाच अर्थ समाजानुरूप आवश्यकतांमध्ये फरक आढळतो. तरीदेखील व्यक्तीच्या काही सर्वसामान्य अशा आवश्यकता असतात. अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत आणि सर्वसामान्य आवश्यकता आहेत. या मूलभूत आवश्यकतांची पूर्तता न होणे म्हणजे दारिद्र्य होय.

भारतीय समाजातील एक महत्त्वाची समस्या म्हणजे लैंगिक छळ किंवा लैंगिक शोषण किंवा स्त्रियांवरील अत्याचार होय. पत्नीला मारहाण करणे, हुंड्यासाठी शारीरिक व मानसिक छळ करणे, सार्वजनिक ठिकाणी तिला टोमणे मारणे, बलात्कारासारख्या घटना घडून येणे इ. समस्यांना स्त्रियांना सामोरे जावे लागते. आधुनिक काळात शिक्षणाचा प्रसार, स्त्रियांमधील आर्थिक स्वयंपूर्णता आणि स्त्रियांना संरक्षण देणारे नवनवीन कायदे अस्तित्वात येत आहेत. परंतु आधुनिक समाजात लैंगिक छळाचे प्रमाण कमी झालेले दिसून येत नाही. आधुनिक समाजामध्ये स्त्रियांना समानतेचा अधिकार प्राप्त झालेला आहे. तिला सुखाने आणि निर्भयपणे जीवन जगता यावे म्हणून भारत सरकारने अनेक महत्त्वाचे कायदे केले आहेत. परंतु या कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्यामुळे स्त्रियांवर अन्याय,

अत्याचार किंवा लैंगिक शोषण होत असते. लैंगिक छळाच्या समस्येचे अस्तित्व हे प्राचीन काळापासून तर आजच्या आधुनिक काळापर्यंत दिसून येते.

## २.५ पारिभाषिक शब्द –

| | | |
|---|---|---|
| दारिद्र्य | – | मूलभूत गरजा भागविण्याची अपूर्णता. |
| लैंगिक छळ /शोषण | – | स्त्रीच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित करणे. |

## २.६ संदर्भ सूची (Bibliography)


१) सौ. पाटे, सुमन (१९९१), भारतीय सामाजिक समस्या, नागपूर : विद्या प्रकाशन, पृष्ठ क्र. ४९ ते ५२.

२) काचोळ, दा. धों. (२०००), भारताच्या विघटनात्मक समस्या, औरंगाबाद : कैलाश पब्लिकेशन्स, पृष्ठ क्रं. २०३ ते २०९, ४१५, ४२५ ते ४३२.

३) काचोळे, दा. धों. (२००५), भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या औरंगाबाद : कैलाश पब्लिकेशन्स, पृष्ठ क्र. ३६ ते ५२, १२३ ते १२५.

४) तोरवणे, डी. एल. सौ. महाजन, जयश्री (२००८), भारतीय समाज (प्रश्न आणि सामाजिक समस्या), जळगाव : प्रशांत पब्लिकेशन्स, पृ. क्र. ३२ ते ३९

५) आगलावे, प्रदीप (२००९), भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन, पृ. क्रं. २७ ते ४२

६) आगलावे, प्रदीप (२००३), भारतीय समाज संरचना आणि समस्या, नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन, पृ. क्रं. १३६ ते १५०.


**अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके –**


१) खडसे, भा. कि. – भारतीय समाज आणि भारतीय समस्या.

२) आगलावे, प्र. ना. – आधुनिक भारतातील सामाजिक समस्या.

३) माने, माणिक – भारतातील समकालीन सामाजिक समस्या.

४) कुलकर्णी, पी. के. – भारतातील सामाजिक समस्या.

५) काळदाते, सुधा – भारतीय समाज (प्रश्न आणि समस्या)

६) संगवे, विलास – भारतातील सामाजिक समस्या.

७) भांडारकर, शब्बीर, पालकर – भारतीय सामाजिक समस्या.

८) खडसे, भा. कि. – भारतीय सामाजिक समस्या.

९) पाटे, सुमन – सामाजिक विघटन व समस्या.

१०) पराडकर, मो. श. – भारतीय सामाजिक समस्या.

## २.७ सरावासाठी प्रश्न –

१) दारिद्र्य म्हणजे काय ? दारिद्र्याची कारणे सांगा.

२) दारिद्र्याचे परिणाम स्पष्ट करा.

३) दारिद्र्याच्या समस्येवर उपाय सांगा.

४) दारिद्र्याचे स्वरूप स्पष्ट करा.

५) लैंगिक छळ आणि पिळवणुकीचे स्वरूप स्पष्ट करा.

६) लैंगिक छळाची कारणे विशद करा.

७) लैंगिक छळ आणि पिळवणुकीचे परिणाम सांगा.

# घटक ३

# कौटुंबिक समस्या

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्टे

**३.१ प्रस्तावना**

**३.२ विषय विवेचन**

**३.२.१ हुंडा**

**३.२.२ कौटुंबिक हिंसाचार**

**३.२.३ वृद्धांच्या समस्या**

**३.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न**

**३.४ सारांश**

**३.५ पारिभाषिक शब्द शब्दार्थ**

**३.६ संदर्भ सूची**

**३.७ सरावासाठी प्रश्न**

## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासातून आपल्याला

१. हुंड्याचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करता येईल.

२. हुंडा पद्धतीची कारणे समजून घेता येतील.

३. हुंडा पद्धतीचे परिणाम विशद करता येतील.

४. हुंडा समस्येवर उपाययोजना सांगता येतील.

५. कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करता येईल.

६. कौटुंबिक हिंसाचाराची कारणे विशद करता येतील.

७. वृद्धांचा समस्येच्या अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करता येईल.

८. वृद्धावस्थेतील समस्या समजून घेता येतील.

९. वृद्धांच्या समस्येची कारणे सांगता येतील.

१०. वृद्धांच्या समस्येवर उपाययोजना विशद करता येतील.

## ३.१ प्रस्तावना –

हिंदू विवाहपद्धतीमुळे निर्माण झालेल्या अनेक सामाजिक समस्यात हुंडापद्धती ही एक महत्त्वाची समस्या आहे. आधुनिक काळात भारतीय समाजात हुंड्याची अतिशय गंभीर समस्या निर्माण झाली आहे. भारतीय समाजाला लागलेली एक कीड म्हणून 'हुंडा पद्धती'चा उल्लेख केला जातो. हुंडा पद्धती ही एक सामाजिक प्रथा असल्यामुळे वरपक्षाकडून किंवा वधूपक्षाकडूनही तिचे तार्किक समर्थन केले जाते. वधूपित्यानेसुद्धा मुलीच्या विवाहप्रसंगी हुंडा द्यावा लागणार हे गृहीतच धरलेले असते. परंतु हुंड्याची गोष्ट इथेच संपत नाही. काही प्रसंगी सातत्याने वरपक्षाकडून आर्थिक मागण्या केल्या जातात. त्यांची पूर्तता करण्यासाठी सासरची मंडळी नववविवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ करतात. त्या छळाला घाबरून नवविाहिता आत्महत्या करण्यास प्रवृत्त होते. तर कधी कधी तिचा जीवही घेतला जातो. तिला जाळून मारले जाते. समाजशास्त्रज्ञांच्या मते, भारतात हुंडाबळीची संख्या वाढतच आहे. हुंड्याच्या या अनिष्ट प्रथेला आळा घालण्यासाठी व स्त्रियांवरील अत्याचार दूर करण्यासाठी १९६१ साली 'हुंडा प्रतिबंधक कायदा' अस्तित्वात आला. परंतु कायदा करूनही हुंड्याची अनिष्ठ प्रथा कमी झाली नाही. म्हणून १९८६ साली या कायद्यात सुधारणा करण्यात आली. भारतीय राज्यघटनेच्या ३०४ (ब) कलमानुसार आरोपीला कडक शिक्षेची तरतूद करण्यात आली.

हुंडा देणे आणि हुंडा घेणे हे कायद्याने गुन्हा असले तरी राजरोसपणे समाजात हुंडा दिलाही जातो आणि घेतलाही जातो. व अप्रत्यक्षपणे समाजाची याला मान्यता असते. हुंडा पद्धतीच्या बरोबरीनेच कौटुंबिक हिंसाचार व वृद्धांच्या समस्या यासुद्धा भारतीय समाजात निर्माण झालेल्या दिसून येतात.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ हुंडा (Dowry)

**१) हुंड्याचा अर्थ व स्वरूप –**

(Meaning & Nature Of Dowry)

हिंदू विवाहपद्धतीमुळे भारतीय समाजात विविध प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. त्यापैकी हुंडा पद्धती ही एक महत्त्वाची सामाजिक समस्या आहे. स्त्रियांना समानतेने आणि प्रतिष्ठेने वागवले पाहिजे असे भारतीय तत्त्वज्ञानात स्पष्ट केले आहे. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी' असे म्हटले जाते. एकीकडे अशी वैचारिक परिस्थिती असताना भारतीय समाजात सर्वत्र हुंड्याची प्रथा दिसून येते. विवाहाच्या प्रसंगी वधू–पक्षाकडून वरपक्षाला जी संपत्ती दिली जाते, तिला उद्देशून 'हुंडा' हा शब्द वापरला जातो.

**हुंड्याची व्याख्या** (Definition of Dowry)

**१) मॅक्स रॅडिन –** (Max Radin)

''वरास त्याच्या लग्नाच्यावेळी त्याच्या पत्नीकडून किंवा तिच्या नातेवाइकांकडून

मिळणारे धन किंवा संपत्ती म्हणजे हुंडा होय.''

**२) १९६१च्या हुंडा प्रतिबंधक कायद्यानुसार –**

(Dowry Prohibition Act, 1961)

''विवाहापूर्वी किंवा विवाहानंतर विवाहातील कोणत्याही एका पक्षाने दुसऱ्या पक्षास प्रत्यक्षरीत्या किंवा अप्रत्यक्षरीत्या कबूल केलेली किंवा दिलेली संपत्ती अथवा मौल्यवान वस्तू म्हणजे हुंडा होय.''

**३) सामाजिकशास्त्राच्या शब्दकोशातील व्याख्येनुसार –**

''विवाहप्रसंगी वराने वधूपक्षाकडून घेतलेली संपत्ती म्हणजे हुंडा होय.''

वास्तविक पाहता 'हुंडा' या शब्दाचा अर्थ वधूकडील लोकांनी विवाहाच्या प्रसंगी किंवा विवाहाच्या निमित्ताने दिलेली संपत्ती होयी. यालाच 'स्त्रीधन' असे म्हणतात. परंतु आधुनिक काळात याचा अर्थ बदललेला आहे. ''हुंडा म्हणजे वर पक्षाने वधू पक्षाकडून जबरदस्तीने वसूल केलेली रक्कम होय.'' त्यामुळे आधुनिक समाजात हुंड्याला वरमूल्य असे देखील म्हणतात.

हुंड्याची प्रथा ही भारतीय समाजामध्ये फार पूर्वीपासून अस्तित्वात आलेली दिसून येते. परंतु प्राचीन काळातील हुंडापद्धती व आधुनिक काळातील हुंडापद्धती यामध्ये फार मोठा फरक दिसून येतो. प्राचीन काळात हुंड्याचे व्यापारी स्वरूप नव्हते. हुंडा देणे ही गोष्ट वधूपक्षाच्या इच्छेवर अवलंबून होती. परंतु आधुनिक काळात या प्रथेला भयानक स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते. आधुनिक समाजात हिंदू विवाह पद्धतीत हुंडा हा समाजाला लागलेला कलंक आहे असा उल्लेख केला जातो. आधुनिक समाजात हुंडा म्हणजे आपल्या मुलीसाठी मुलगा खरेदी करणे होय. त्यामुळे मुलगा जितका उच्च कुळातील, उच्च पदावर किंवा चांगली नोकरी असेल तर त्या प्रमाणात हुंड्याची रक्कम ठरवली जाते. त्यामुळे आधुनिक समाजात हुंड्याच्या प्रथेला बाजाराचे स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते.

## २. **हुंडा पद्धतीची कारणे** (Causes of Dowry System)

भारतात हुंड्याच्या प्रथेला प्रामुख्याने सामाजिक, आर्थिक व धार्मिक घटक जबाबदार आहेत. हुंडा पद्धतीची कारणे खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) सामाजिक प्रथा –**

भारतीय समाजात हुंडा देण्याची सामाजिक प्रथा आहे. ही प्रथा प्राचीन काळापासून सुरू आहे. त्यामुळे हुंड्याची प्रथा एकदम बंद करणे कठीण आहे. पूर्वीपासूनच हुंडा द्यायची आणि घ्यायची प्रथा असल्यामुळे लोक या प्रथेचे पालन करतात. हुंडा पद्धत ही भारतीय समाजाला लागलेली एक कीड आहे. किंवा रोग आहे. वास्तविक पाहता ही समस्या अतिप्राचीन आहे. या समस्येने आजच्या समाजात विकृत स्वरूप धारण केले आहे. हिंदू समाजात विवाह पद्धतीत आजही कन्यादानाला विशेष महत्त्व दिले जाते. म्हणून वधूपिता दानाच्या किंवा देणगीच्या स्वरूपात वधूकन्येस विवाहात जे अलंकार देत असतो ते स्वखुषीने देत असतो. त्याचा उद्देश एवढाच की, पतीच्या कुटुंबात अडीअडचणीच्या वेळी कन्येला उपयोगी पडावे म्हणून तिच्या सोबत काही दागिने किंवा संपत्ती देण्याची प्रथा

होती. परंतु आज मात्र या हुंड्याच्या प्रथेला विकृत स्वरूप प्राप्त झाले आहे. सामाजिक रीतिरिवाजातून हुंडा पद्धतीचा जन्म झाला.

**२) जातीव्यवस्था –**

भारतीय हिंदू समाज रचनेत जाती व्यवस्थेचे प्राबल्य असल्यामुळे अंतर्विवाहाचे नियम कठोरपणे अंमलात आणले जातात. अंतर्विवाहाच्या नियमाद्वारे समाजात वधू-वर निवडीवर बंधन असते. भारतीय समाजात आज तीन हजारापेक्षा जास्त जाती व उपजाती आहेत. यालाच समाजशास्त्रात अंतर्विवाहाचा नियम असे म्हणतात. अंतर्विवाहाच्या नियमानुसार व्यक्तीला आपल्या जातीतून अथवा उपजातीतूनच जोडीदार निवडावा लागतो. अंतर्विवाहाच्या नियमामुळे जोडीदाराची निवड करताना अनेक मर्यादा येत असत. आपल्या मुलीला योग्य सुसंस्कृत किंवा अनुरूप व योग्य वर मिळावा म्हणून पैशाच्या रूपाने हुंडयाचे आमिष दाखवले जाते. त्यामुळे हिंदू समाजात हुंड्याच्या प्रथेला गती मिळाली असे अभ्यासकांना वाटते.

**३) सामाजिक प्रतिष्ठा –**

भारतीय समाजात जास्तीत-जास्त हुंडा देणे आणि घेणे हे सामाजिक प्रतिष्ठेचे किंवा मोठेपणाचे लक्षण मानले जाते. मुलीच्या विवाहात हुंडा म्हणून किती रक्कम दिली किंवा मुलाच्या विवाहात किती रक्कम हुंडा म्हणून घेतली हे भारतीय समाजात हुंडा देणे अथवा घेणे यावरून सामाजिक प्रतिष्ठेचे लक्षण बनले. 'घरात नाही दाणा आणि मला बाजीराव म्हणा' अशा प्रकारची कल्पना करणारे लोक जास्तीत -जास्त हुंडा देणे व घेणे हे मोठेपणाचे लक्षण समजतात. त्याबरोबरच हुंड्याची रक्कम जेवढी जास्त असेल तेवढी दोन्ही पक्षांची समाजात असलेली प्रतिष्ठा उच्च असते असे समजले जाऊ लागले. या खोट्या प्रतिष्ठेमुळेच हुंडा पद्धतीने उग्र स्वरूप धारण केलेले आहे. याबरोबरच वरपक्षाला वैभव संपन्न असा विवाह सोहळा आवश्यक वाटतो. त्यासाठी लागणारा खर्च वधू पित्याकडून हुंड्याच्या रूपाने घेतला जाऊ लागला. म्हणून सामाजिक प्रतिष्ठा हे हुंडा पद्धतीचे आजच्या काळातील महत्त्वाचे कारण मानले जाते.

**४) दुष्टचक्र –**

पालक असा विचार करतात की, माझ्या मुलीच्या लग्नात मी हुंडा दिला होता. तो हुंडा वसूल करण्यासाठी मी माझ्या मुलाच्या लग्नात हुंडा घेतला तर काय बिघडले? माझ्या मुलीचे लग्न हुंड्याशिवाय झाले असते, तर मी सुद्धा माझ्या मुलाच्या लग्नात हुंडा घेतला नसता, असा युक्तिवाद करणारे अनेक पालक आहेत. अनेकदा पालक प्रथम मुलांचे लग्न निश्चित करतात. वधूपित्याकडून हुंडा घेतला जातो. त्यानंतर आपल्या मुलीचे लग्न निश्चित ठरविण्यासाठी त्या हुंड्याचा उपयोग करतात. मुलीच्या लग्नात हुंडा दिला म्हणून मुलाच्या लग्नात हुंडा घ्यायचा किंवा मुलीच्या लग्नात हुंडा द्यायचा आणि मुलीच्या लग्नासाठी तो हुंडा वापरायचा. अशाप्रकारे हुंड्याबाबत एक दुष्टचक्र असल्याचे आढळून येते.

**५) कुरूप मुलीशी लग्न करण्याचा मोबदला –**

कुटुंबातील मुलींचे लग्न करणे हा आई-वडिलांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असतो. जन्मल्यापासून ज्या मुली कुरूप असतात, अशा कुरूप मुलींचा विवाह लवकर होत

नाही. आणि मुलगी लग्नाशिवाय राहू देणे हे सामाजिकदृष्ट्या अयोग्य मानले जाते. त्यामुळे अधिक पैशांची लालसा दाखवून मुलीचा विवाह केला जातो. लोभी असणारे वरपक्ष केवळ जास्त हुंडा मिळतो म्हणून थोडीफार कुरूप असलेल्या मुलीशी विवाह करायला तयार होतात. यातूनच हुंड्याच्या प्रथेला अधिक चालना मिळाली.

**६) नवीन संसाराला मदत –**

विवाहानंतर मुलीचा नवीन संसार मांडण्यासाठी मदत व्हावी म्हणून हुंडा दिला जातो. मुलीचा संसार सुखाचा व्हावा, तिला कोणतीही उणीव भासू नये अशी आई–वडिलांची इच्छा असते. मुलीचा नवीन संसार उभारण्यास मदत व्हावी, या हेतूने हुंडा दिला जातो. हुंडा देण्यामागे केवळ अपत्यप्रेम असते. आपल्या मुलीला कोणताही त्रास होऊ नये या दृष्टीकोनातून हुंडा दिला जातो.

अशाप्रकारे हुंड्याची अनेक कारणे आहेत. या विविध कारणांमुळे हुंड्याची प्रथा टिकून आहे. वधूपिता आपल्या मुलीचे भले व्हावे यासाठी हुंडा देतो. हुंडा देण्याच्या पाठीमागे काही लोकांचा निश्चितच स्वार्थ आहे. त्यामुळे हुंडा देण्याघेण्याचा व्यवहार हुंडा प्रतिबंधक कायद्याने गुन्हा ठरविला असतानादेखील सर्वत्र हुंडा दिला जातो. थोडक्यात, काही असो; परंतु भारतीय समाजात हुंडा पद्धत ही सर्वच ठिकाणी दिसून येते.

## ३. हुंडा पद्धतीचे परिणाम – (Consequences of Dowry System)

हुंडा पद्धती ही सार्वत्रिक स्वरूपाची आहे. हुंडा देण्याची सामाजिक प्रथा असली तरी आधुनिक काळात या प्रथेला अतिशय वाईट स्वरूप प्राप्त झाले आहे. हुंडा पद्धतीमुळे हुंडाबळीची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. हुंड्याचा समाजावर अतिशय वाईट परिणाम पडला आहे. त्यामुळे हुंड्याची सामाजिक समस्या निर्माण झाली आहे. हिंदू समाजाला लागलेला कलंक आहे असा उल्लेख हुंडा पद्धतीचा केला जातो. या समस्येमुळे भारतीय समाजातील अनेक व्यक्तींचे जीवन उद्ध्वस्थ झालेले आहे. हुंडा पद्धतीचे परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

**१) कौटुंबिक संघर्ष –**

हिंदू समाजात वधू पक्षाकडून वर पक्षाला हुंड्याची रक्कम दिली जाते. वधूच्या पालकाची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असली तरी मुलीच्या योग्यतेनुसार शिक्षणानुसार वर पक्षाला हुंडा द्यावाच लागतो. बऱ्याचदा पालकांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे कर्ज काढून किंवा कुटुंबातील मालमत्ता विकून हुंड्याची रक्कम दिली जाते. त्यामुळे कुटुंबाची दुर्दशा होते. कुटुंबात संघर्ष निर्माण होतात. तसेच हुंडा देऊन मुलीचे लग्न करून देणे शक्य नसते, अशा कुटुंबात त्या मुलीस कुटुंबावरचा बोजा मानले जाते. बहिणीचे लग्न न झाल्यामुळे भावाला लग्न करता येत नाही. भावाच्या आशा–आकांक्षाच्या पूर्तीमधील बहीण अडचण ठरते. अशावेळी त्या मुलीला आई–वडील आणि भावाकडून चांगली वागणूक मिळत नाही. अशा कुटुंबात क्षुल्लक कारणावरून भांडणे होतात. कुटुंबाची शांतता भंग पावते. अशाप्रकारे कुटुंबात हुंड्याच्या प्रश्नामुळे कौटुंबिक संघर्ष निर्माण होतो.

**२) मुलीच्या विकासामध्ये अडथळा –**

हुंडा पद्धतीमुळे मुलीच्या सर्वांगीण विकासात अडथळा निर्माण झाला आहे. मुलीचे विवाहाचे वय वाढले तर लग्नात जास्त हुंडा द्यावा लागेल असा विचार करून अनेक पालक आपल्या मुलीचे लवकर लग्न लावून देतात. लवकर लग्न झाल्यामुळे मुलीचे शिक्षण पूर्ण होऊ शकत नाही. लवकर लग्न झाल्यामुळे आपल्या कला–गुणांचा ती विकास करू शकत नाही. पर्यायाने तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत नाही.

**३) कर्जबाजारीपणा –**

मुलीचा विवाह योग्य मुलाशी व्यवस्थितरीत्या करून देणे हे प्रत्येक पालकाचे कर्तव्य असते. कारण त्या मुलीचे पुढचे आयुष्य त्यावरच अवलंबून असते. हुंडा दिल्याशिवाय मुलीचे लग्न होत नाही. परंतु गरिबीमुळे हुंडा देण्याची मुलीच्या पालकांची ऐपत नसते. कोणत्याही परिस्थितीत मुलीचे लग्न लावून देणे आवश्यक असते. अशावेळी गरीब पालक मुलीच्या लग्नात हुंडा देण्यासाठी कर्ज काढतात. कर्ज काढून मुलीचे लग्न थाटात लावतो. परंतु वधूपिता मात्र कर्जबाजारी होतो. कर्ज वेळेवर न फेडल्यामुळे वधूपित्याला अनेक आर्थिक आणि कौटुंबिक समस्यांना तोंड द्यावे लागते. भारतीय समाजात असे दिसून येते की, स्वत:ची आर्थिक परिस्थिती नसतानादेखील कर्जाच्या रूपाने हुंड्याची रक्कम जमा केली जाते, आणि मुलीचा योग्य वराशी  विवाह केला जातो. परंतु अशा पालकांना आयुष्यभर कर्जाच्या ओझ्याखाली जीवन जगावे लागते.

**४) आत्महत्या –**

मुली स्वभावाने भावनाशील असतात. आपल्या विवाहासाठी जो त्रास सहन करावा लागतो त्या यातना पाहून त्यांना वाईट वाटते. अशा परिस्थितीतून सुटका करून घेण्यासाठी आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. सर्वांनाच हुंडा देणे शक्य नसते. हुंडा देणे वा घेणे याला सामाजिक प्रतिष्ठेचा मुलामा दिला गेला असल्याने अनेकांना मुलीचे लग्न जुळविताना कमालीचा त्रास होत असतो. पदोपदी त्यांचा अपमान होतो. माता–पित्याची होणारी ही दमछाक अनेक मुलीच्या मनावर विपरीत परिणाम करण्यास कारणीभूत ठरते. आपल्यामुळे आई–वडिलांना होणारा छळ थांबविण्यासाठी त्या स्वत: आत्महत्या करून जीवनाचा शेवट करतात. काहीप्रसंगी हुंड्याची रक्कम कमी मिळाली म्हणून सासरच्या व्यक्तींकडून त्रास दिला जातो. दैनंदिन त्रासाला कंटाळून लग्नानंतर काही दिवसातच आत्महत्या केल्याच्या घटना दिसून येतात.

**५) मुलींच्या संख्येत झालेली घट –**

हुंडा पद्धतीचा सर्वात महत्त्वाचा दुष्परिणाम म्हणजे आज पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची झालेली घट हा होय. निसर्ग नियमानुसार स्त्री–पुरुष प्रमाणसारखे असायला हवे, तरच समाजाचे संतुलन टिकून राहील. परंतु दिवसेंदिवस या प्रमाणात घट झालेली दिसते. भारतात १००० पुरुषांच्या तुलनेत ९३३ स्त्रीया आहेत. महाराष्ट्रात हे प्रमाण ९२२ इतके आहे. मुलगी जन्माला आली म्हणजे तिच्या विवाहात हुंडा द्यावा लागतो. म्हणून आज जन्माला येण्याआधीच गर्भजल परीक्षा करून गर्भातच तिची हत्या केली जाते. पूर्वीच्या

काळी मुलगी जन्माला आल्यानंतर तिची हत्या केली जाई. तर आज वैज्ञानिक प्रगतीमुळे गर्भातच तिची हत्या केली जाते. हे कृत्य माणुसकीला काळीमा फासणारे असून, त्यामुळे अनेक सामाजिक प्रश्नांची निर्मिती होते.

### ६) विजोड विवाह –

हिंदू समाजात हुंड्याच्या प्रथेमुळे सौंदर्यापेक्षा हुंड्याच्या रकमेला अधिक महत्त्व दिले जाते. हुंडा पद्धतीमुळे अनुरूपते ऐवजी हुंड्याला जास्त महत्त्व दिले जाते. जोडीदाराची निवड करताना शिक्षण, नोकरी, वय, कुटुंब या बाबी पाहिल्या जातात. परंतु गरीबीमुळे मुलीच्या पित्याची हुंडा देण्याची ऐपत नसते. त्यामुळे मुलींना विजोड मुलांशी विवाह करावा लागतो. तरुण मुलींचा विवाह बऱ्याच वेळा हुंड्याच्या अभावी जास्त वयाच्या माणसाबरोबर करून दिला जातो. विजोड विवाहात विधूर, अपंग, व्यंग असलेल्या व्यक्तींचा समावेश होतो.

### ७) अनैतिक संबंध व गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ –

हुंडा देण्याची ऐपत नसल्यामुळे समाजातील अनेक मुलींचे विवाह होत नाही. अशा मुली समाज कंटकाच्या जाळ्यात सापडतात आणि अनैतिक मार्गाचा स्वीकार करतात. यातूनच वेश्या व्यवसायाच्या वाढीला प्रोत्साहन मिळते. त्याचप्रमाणे हुंडापद्धतीमुळे एक प्रकारे गुन्हेगारीस उत्तेजन मिळते. योग्य मार्गाने पैसा मिळवून मुलींची लग्ने करणे अशक्य झाल्यास वाम मार्गाने पैसा मिळवण्याकडे लोक प्रवृत्त होतात. हुंड्याची रक्कम जमविण्यासाठी भ्रष्टाचार, लाच घेण्याच प्रवृत्ती वाढीस लागते. अनैतिक मार्गाचा अवलंब करून हुंड्यासाठी पैसा जमविला जातो.

## ४. हुंड्याची समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना
(Solutions to Dowry Problem)

हुंड्याची समस्या ही भारतीय समाजातील अत्यंत वाईट अशी प्रथा आहे. या प्रथेचे लवकरात लवकर उच्चाटन करणे समाजहिताच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. हुंड्याची समस्या नष्ट करण्यासाठी सामाजिक, आर्थिक व राजकीय पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. हुंड्याच्या समस्येला आळा घालण्यासाठी सरकारने कायदे केले असले तरी अजूनही ही समस्या कायम आहे. कडक कायदे असतानासुद्धा बहुतांश लग्नात हुंडा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे दिला जातो. इतकेच नव्हे तर हुंडाबळीच्या संख्येत फार मोठी वाढ झाली आहे. केवळ कायदा करून हुंड्याची समस्या सुटणार नाही. त्याकरिता इतर उपाययोजना करणे आवश्यक आहे. काही महत्त्वाच्या उपाययोजना या पुढीलप्रमाणे आहेत.

### १) हुंडाविरोधी जनमत निर्माण करणे –

जेव्हा समाजात एखादी समस्या सोडविण्यासाठी इतर सर्व मार्ग कुचकामी ठरतात, तेव्हा समाजातील लोकांना प्रबोधनाच्या माध्यमातून जागृत करणे महत्त्वाचे असते. समाजात हुंड्याची समस्या निर्माण झाल्यामुळे जोपर्यंत हुंड्याविरोधी जनमन निर्माण होत नाही, तोपर्यंत हुंड्याची समस्या नष्ट होणार नाही. कायदे करूनसुद्धा हुंड्याची समस्या सुटली नाही. कायद्यांचे यश हे नेहमीच सर्वसामान्य लोकांच्या सहकार्यावर अवलंबून असते.

म्हणून हुंड्याच्या विरोधात जनमत निर्माण करणे आवश्यक आहे. सभा, संमेलने, चर्चासत्र इत्यादी माध्यमातून हुंड्याच्या विरोधात जनमत निर्माण केले पाहिजे.

**२) कायदेशीर उपाय –**

हुंड्याची समस्या कायद्याने बंद करण्यात यावी म्हणून भारत सरकारद्वारे १ जुलै १९६१ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा पास करण्यात आला. परंतु या कायद्याचा समाज जीवनावर प्रभाव पडलेला दिसून येत नाही. हुंडा देणारे व घेणारे यांना आपण बेकायदेशीर कृत्य करीत आहोत असे वाटत नाही. त्यामुळे समाजातील बहुसंख्य लोकांना हुंडा विरोधी कायद्याची जाणीव करून दिली पाहिजे. १ ऑक्टोबर १९८७मध्ये सुधारित हुंडा प्रतिबंधक कायदा पास करण्यात आला. हुंडा देणाऱ्या व घेणाऱ्या व्यक्तीस पाच वर्षे तुरुंगवास व पंधरा हजार रुपये दंड अशी तरतूद करण्यात आली. वेळोवेळी केलेल्या या कायद्याची जाणीव लोकांना करून दिली पाहिजे. तरच काही प्रमाणात हुंड्याच्या समस्येचे प्रमाण कमी होईल.

**३) स्त्रियांची आर्थिक स्वयंपूर्णता –**

भारतीय समाजातील स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्या तर हुंड्याच्या प्रथेला बराच पायबंद बसेल. भारतात पुरुषांच्या तुलनेने स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी दिसून येते. मुलगी जर आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण असेल तर साहजिकच या प्रथेला ती विरोध करू शकते. आर्थिक स्वयंपूर्णतेबरोबरच वैचारिक स्वयंपूर्ण होणेही, अत्यंत महत्त्वाचे आहे. आर्थिक स्वयंपूर्ण असलेल्या मुलीने हुंडा मागणाऱ्या मुलाशी विवाह करणार नाही, असे ठामपणे सांगितले पाहिजे. यातूनच हुंडाविरोधी वातावरण निर्माण होईल.

**४) जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य देणे –**

आजही बहुतांश कुटुंबात मुला–मुलींना आपला जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य नाही. मुलांना थोडेफार स्वातंत्र्य आहे. परंतु मुलींना मात्र आपला जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य नाही. त्यामुळे आई–वडील म्हणतील त्या मुलांशी निमूटपणे मुलींना विवाह करावा लागतो. मुलेदेखील आपल्या आईवडीलांनी ठरवून दिलेल्या मुलींशी विवाह करतात. परंतु जेव्हा मुला–मुलींना आपला जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य मिळेल, तेव्हा ते आपल्या भविष्याचा विचार करून हुंडा न घेता योग्य जीवनसाथीची निवड करून विवाह करतील.

**५) पैशांपेक्षा गुणाला प्राधान्य द्यावे –**

विवाहामध्ये मुलांनी हुंड्याची अपेक्षा करू नये. मुलीच्या गुणाला किंवा चारित्र्याला अधिक प्राधान्य द्यावे. नववधूला सासरच्या व्यक्तींनी आपल्या मुलीप्रमाणे वागवावे. आपल्या मुलीप्रमाणेच सर्व अधिकार तिला द्यावे. त्याचप्रमाणे विवाहसंबंध जुळविताना वधूपित्याने मुलाकडील मालमत्तेपेक्षा मुलगा कसा आहे? तो निर्व्यसनी आहे की नाही? चारित्र्यवान आहे की नाही? या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे. साहजिकच हुंड्याच्या प्रथेला आळा बसेल.

**६) आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन –**

जातीव्यवस्थेमुळे हुंड्याच्या प्रथेला चालना मिळाली आहे. भारतीय समाजात आंतर्विवाह

पद्धतीला विशेष महत्त्व दिले जाते. प्रत्येक वधूपित्याची अशी इच्छा असते की, आपल्या मुलीला उच्च कुळातील वर मिळावा आणि या दृष्टीकोनामुळे जास्तीत-जास्त हुंड्याची रक्कम दिली जाते. म्हणून ही प्रथा नष्ट करण्यासाठी प्रथचे मूळ कारण असलेल्या हिंदू विवाह पद्धतीत बदल करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातून भारतीय समाजात आंतरजातीय विवाहपद्धतीला प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यातूनच हुंड्याच्या प्रथेचे प्रमाण कमी करता येईल.

**७) हुंडा विरोधी चळवळ –**

समाजात हुंडाविरोधी वातावरण निर्माण करण्यासाठी हुंडाविरोधी चळवळ मोठ्याप्रमाणात निर्माण व्हायला पाहिजे. आज देशात हुंडाविरोधी चळवळ आहे. परंतु या चळवळीत अगदी थोडे लोक आहेत. हुंडाविरोधी चळवळीत सर्वसामान्य लोकांचा अभाव आहे. याकरिता शिकलेल्या स्त्रियांनी आणि हुंडाविरोधी असलेल्या पुरुषांनी हुंडाविरोधी चळवळ अधिक व्यापक करण्याची आवश्यकता आहे. 'हुंडा न घेणाऱ्या तरुणांशी आम्ही विवाह करू' असा निर्धार देशातील तरुणींनी केला तर हुंडा मागणाऱ्या कुटुंबातील तरुणांचे विवाह होणार नाही. अशावेळी हुंडा मागणाऱ्या तरुणांवर अविवाहित राहण्याची वेळ येईल. त्यामुळे हे तरुण आपल्या आई-वडिलांना विरोध करून हुंडा न घेता विवाह करण्यास तयार होतील.

हुंड्याची समस्या कमी करण्यासाठी वरील महत्त्वाचे उपाय स्पष्ट केले तरी प्रत्यक्षात कोणत्याही एका उपायामुळे हुंड्याची प्रथा नष्ट होणे शक्य नाही. कारण भारतीय समाजात कुटुंब आणि विवाहसंस्थेला अधिक महत्त्व देणारा समाज आहे आणि विवाह हा एक कौटुंबिक प्रश्न आहे. विवाहाच्या प्रसंगी हुंड्याची रक्कम देणे आणि घेणे सामाजिक प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. हुंड्याच्या प्रथेला हुंडा घेणारे जितके जबाबदार आहेत त्याचप्रमाणात हुंडा देणारेसुद्धा जबाबदार आहेत. भारतीय समाजातील हुंड्याची प्रथा नष्ट व्हावी म्हणून सामाजिक संघटना व महिला संघटनांनी आवाज उठविला पाहिजे. कारण या समस्येमुळे अनेक नववधूंचा बळी गेला आहे. दिवसेंदिवस ही समस्या अधिक उग्ररूप धारण करीत आहे. सामाजिक संघटना व महिला संघटना यांनी एकत्र येऊन हुंडाविरोधी वातावरण निर्माण केले पाहिजे. तरच भविष्याकाळात या ज्वलंत समस्येला आळा बसू शकेल.

## ३.२.२ कौटुंबिक हिंसाचार – (Domestic Violence)

### १. कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ व स्वरूप –

(Meaning & Nature of Domestic Violence)

आधुनिक काळात कौटुंबिक हिंसेच्या घटना वारंवार घडत आहेत. एकाच कुटुंबात राहणाऱ्या आणि नातेवाईक असलेल्या सदस्यांवर त्याच कुटुंबातील लोक अन्याय – अत्याचार करतात. घरगुती हिंसा ही प्रामुख्याने महिलांच्या संदर्भात होत असल्याचे आढळून येते. कौटुंबिक हिंसेच्या संदर्भात महत्त्वाची बाब म्हणजे हिंसेतील पिडीतव्यक्ती ही हिंसा करणाऱ्या व्यक्तीची नातेवाईक असते. आज सर्वत्र घरगुती हिंसेच्या घटना घडत आहेत. घरगुती हिंसा ही एक फार मोठी सामाजिक समस्या बनली आहे. स्त्रीविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढतच आहे. केवळ समाजातच नव्हे तर कुटुंबात सुद्धा स्त्रियांना हिंसाचाराला सामोरे लागते.अनेक अत्याचार मुकाटपणे सोसावे लागतात.

**कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ –**

(Meaning of Domestic Violence)

१) गेलेस (Gellus) या शास्त्रज्ञाच्या मते, –

''हिंसाचार म्हणजे पुरुषी व्यक्तीची अशी कृती की, जी स्त्रीला त्रास देईल, ती जखमी होईल हा हेतू डोळ्यासमोर ठेवून केली जाते.''

२) स्ट्रास (Strauss) या शास्त्रज्ञाच्या मते,–

''अत्याचार म्हणजे अशी क्रिया की ज्यात 'स्त्री'ला जखमी करण्याची पुरुषाची उच्च प्रतिची क्षमता होय.''

३) कॅम्पे (Kempe) या शास्त्रज्ञाच्या मते, –

''अत्याचार म्हणजे एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीवर शारीरिक हल्ला करून तिला जखमी करणे होय.''

एकंदरीत याठिकाणी 'अत्याचार' आणि 'हिंसाचार' हा शब्द एकाच अर्थाने वापरलेला दिसतो. या क्रियेत, प्रामुख्याने धमकी देणे, जखमी करणे, शारीरिक हल्ला करणे, दुसऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करणे अशा बाबींचा समावेश होतो.

कौटुंबिक हिंसाचारात मारहाण, शारीरिक इजा करणे, लैंगिक छळ, भावनात्मक पिळवणूक करणे, गलिच्छ भाषेचा वापर करणे, शिवीगाळ करणे, शारीरिक व मानसिक छळ करणे, वैयक्तिक खर्चासाठी पैसे न देणे या बाबींचा समावेश होतो.

**कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप –**

**(Nature of Domestic Violence)**

या अत्याचाराचे स्वरूप 'घरगुती' प्रकारचे असते. त्याचे विश्लेषण खालीलप्रकारे करता येईल.

**१) मानसिक छळ –**

कुटुंबातून स्त्रीचा जाणीवपूर्वक शारीरिक व मानसिक छळ केला जातो. तिला सतत खोचकपणे, माहेरचा उद्धार करून  घालून–पाडून बोलले जाते. घृणास्पद व लाजिरवाण्या शिव्या देऊन तिचा अपमान केला जातो. कौटुंबिक घरकामातसुद्धा सतत चूक काढून तिचा आत्मविश्वास कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. आपल्या वर्तनातून स्त्रीचा कनिष्ठ दर्जा दर्शविण्याचे काम कुटुंबातील पुरुष करीत असतात.

**२) शारीरिक छळ –**

शारीरिक छळामध्ये अतिश्रम, मारझोड व दुखापत या बाबींचा समावेश होतो. कुटुंबातील कामे स्त्रियांची मक्तेदारी समजून स्त्रीला अतिशारीरिक श्रम करावे लागतात. अतिश्रमाबरोबरच कधी–कधी तिला मारहाणही केली जाते. आजही समाजाचा दृष्टिकोन फारसा बदलला नाही. सुशिक्षित कुटुंबातूनसुद्धा बऱ्याचवेळा पत्नीला मारहाण केली जाते. परंतु लोकलाजेस्तव स्त्रिया याची वाच्यता करीत नाहीत. अर्थार्जन करणाऱ्या स्त्रियांच्या चारित्र्यावर संशय घेऊन त्यांचा छळ केला जातो.

**३) उपासमार –**

केवळ शारीरिक व मानसिक छळ करून तिचे अत्याचार थांबत नाहीत. प्रसंगी तिची उपासमारही केली जाते. एखाद्या चुकीचे प्रायश्चित म्हणून तिला उपाशी ठेवले जाते. तर काही कुटुंबातून सुनेला शिळे व उष्टे अन्नही दिले जाते. स्त्रियांच्या बाबतीत कुटुंबातून तिला परिपूर्ण पोषण क्वचितच मिळताना दिसते.

**४) हुंडाबळी –**

स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसाचाराचा कळस म्हणजे हुंडाबळी होय. स्वार्थापोटी मुलाच्या विवाहात हुंडा दिला नाही किंवा कमी दिला तर त्या नवविवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केला जातो. तिला जाळले जाते. किंवा ती स्वत:च या छळाला कंटाळून आत्महत्या करते. भारतातील सर्वच राज्यांमधून हुंडाबळीच्या घटना दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.

## २. **कौटुंबिक हिंसाचाराची कारणे –** (Causes of Domestic Violence)

स्त्रियांचे प्रश्न हे निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहेत. कौटुंबिक हिंसा ही आपोआप घडून येत नाही. कौटुंबिक हिंसा घडून येण्याची विशिष्ट कारणे आहेत. त्या कारणांमुळे कुटुंबात हिंसा केली जाते. कौटुंबिक हिंसा निर्माण होण्याची काही महत्त्वाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

**(१) दुष्ट स्वभावाच्या व्यक्ती :**

प्रत्येक कुटुंबात आपसात मतभेद होतात. कधी भांडणेदेखील होतात. पुन्हा मतभेद विसरून एकोप्याने राहतात. परंतु काही लोक दुष्ट प्रवृत्तीचे असतात. त्यांना आपल्या कुटुंबातील लोकांचे चांगले बघवत नाही. म्हणून ते आपल्याच घरातील लोकांशी अतिशय वाईट व्यवहार करतात. दुष्ट स्वभावाचे लोक क्षुल्लक कारणांवरून पत्नीचा छळ करतात. ते आपल्या मुला-मुलींचादेखील छळ करतात. कौटुंबिक हिंसा या प्रामुख्याने दुष्ट स्वभावाच्या लोकांमुळेच घडून येत असल्याचे आढळून येते.

**(२) विकृत व्यक्ती :**

काही लोक हे विकृत स्वभावाचे असतात. इतरांना मारहाण करणे, छळणे, त्रास देणे इत्यादी गोष्टी करण्यामध्येच त्यांना आनंद मिळत असतो. म्हणून ते सतत भांडण करतात. घराबाहेरील लोकांशी ते विकृत वर्तन करू शकत नाहीत. कारण त्यांनी तसे विकृत वर्तन केले तर इतर लोक त्यांना मारतील म्हणून विकृत व्यक्ती आपल्या कुटुंबातील लोकांशी विकृत व्यवहार करतात. अशा विकृत व्यक्ती साधारणत: आपल्या पत्नीचा मानसिक व शारीरिक छळ करतात. विशेष म्हणजे पत्नीचा असा छळ करताना त्यांना समाधान लाभते. अशा प्रकारच्या हिंसा या केवळ पतीच्या विकृत स्वभावामुळेच घडत असतात.

**(३) हुंडापद्धती :**

घरगुती हिंसाचारामध्ये प्रामुख्याने महिलांचा बळी जातो. या महिलांमध्ये नवविवाहीत स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक आहे. सासरच्या लोकांनी पैसे द्यावे किंवा कोणती वस्तू द्यावी म्हणून, अनेक पती आपल्या पत्नीचा छळ करतात. पैसे किंवा हुंड्यासाठी इतका त्रास

पत्नीला दिला जातो की, ती शेवटी आत्महत्या करते. केवळ पैशाच्या लोभापायी अनेक पती घरगुती हिंसा करतात. केवळ पैशासाठी घरगुती हिंसेच्या घटना वारंवार घडत आहेत.

**(४) मद्यपान :**

मद्यपान करणाऱ्या व्यक्तीच्या कुटुंबात शांतता नसते. संध्याकाळी पती बाहेरून दारू पिऊन येतो आणि रात्री तो पत्नी, मुलं आणि म्हाताऱ्या आई-वडिलांशी भांडण करतो. दारूच्या नशेत आपण काय करतो, याचे भान व्यक्तीला नसते. पत्नीला मारहाण करणे, मुलांना शिव्या देणे या घटना मद्यपान करणाऱ्या कुटुंबात सतत घडत असतात.

**(५) पुरुषप्रधान संस्कार :**

लहान मुलावर संस्कार करण्याचे कार्य कुटुंबातून होत असते व मुख्यत: आईचा सहभाग त्यात जास्त असतो. परंतु मुलावर संस्कार करणारी माताच पुरुषप्रधान संस्कृतीचा एक भाग असते. तिचे व्यक्तीमत्त्व व मानसिकता पूर्णपणे पुरुषप्रधान असल्यामुळे आपोआपच त्या पद्धतीने मुलांवर व मुलींवर संस्कार केले जातात. लहानपणापासूनच मुलांवर पुरुष असल्याचा अहं जोपासला जातो तर मुलींवर स्त्री, असल्याने सहनशीलतेचे संस्कार जोपासले जातात. त्यामुळे स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचारात वाढच होते.

**(६) मुलगी - परक्याचे धन :**

मुळातच कुटुंबातून मुला-मुलींच्या संगोपनात असमानता असते. जन्मापासूनच मुलगी परक्याचे धन मानली जाते. पतीचे घर हेच तिचे घर मानलले जाते. त्यामुळे जरी पतीच्या घरी अत्याचार झाले तरी त्या अत्याचाराबाबत ती पोलिसात तक्रार करू शकत नाही. कारण जर त्यामुळे वैवाहिक संबंध भंगले तर तिचे माता-पिता त्यांच्या घरी आश्रय देणार नाही याची भिती तिला वाटत असते. त्यामुळे ती कुटुंबातून होणारा अपमान निमूटपणे, शांततेने सहन करते.

**(७) लोकांचे घरगुती हिंसेकडे दुर्लक्ष :**

एखाद्या कुटुंबात घरगुती हिंसा होत असेल तर शेजारी राहणारे आणि इतर लोक अशा घरगुती हिंसेकडे दुर्लक्ष करतात. अशा प्रकारच्या हिंसा ही त्या कुटुंबाची वैयक्तिक बाब मानली जाते. त्यामुळे घरगुती हिंसा करणाऱ्या व्यक्तीला कुणी प्रतिबधं करीत नाही किंवा कुणी त्यांच्याविरुद्ध तक्रार करीत नाही. पर्यायाने कौटुंबिक हिंसा करणाऱ्या व्यक्तीस प्रोत्साहन मिळते.

अशाप्रकारे कौटुंबीक हिंसेची कारणे आहेत. या कारणामुळे कौटुंबिक हिंसा घडून येते. परंतु ही जरी कौटुंबिक हिंसा असली तरी त्याचे अत्यंत वाईट दुष्परिणाम समाजावर होतात. तसेच कौटुंबिक हिंसेतन पत्नीला मारहाण करण्याची समस्या, वधूला जाळण्याची समस्या इत्यदी अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत.

**३.२.३ वृद्धांच्या समस्या - (**Problem of Elderly**)**

**१. वृद्धांच्या समस्येचा अर्थ आणि स्वरूप :**

(Meaning and Nature of Old Age Problems)

वृद्धावस्था ही एक जैविक प्रक्रिया आहे. जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला

बालपण, तरुणपण आणि म्हातारपण या तीन अवस्थांतून जावेच लागते. शेवट हा मृत्यूद्वारे होत असतो. वय हे  वृद्धावस्थेचा प्रमुख आधार आहे. वयाच्या आधारावरूनच जी मानवी जीवनाची शेवटची अवस्था आहे. तिलाच वृद्धावस्था असे म्हटले जाते. समाजजीवनाच्या प्रक्रियेचा एक घटक म्हणून व्यक्तीला बाल्यावस्थेपासून तर वृद्धावस्थेपर्यंत अनेक टप्पयांतून जावे लागते. भारतातील सामाजिक समस्यांचा विचार करीत असताना वृद्ध व्यक्तींच्या जीवनासंबंधी विविध प्रश्नांचा विचार करणे आवश्यक आहे. भारतीय समाजात संयुक्त कुटुंबाचे विघटन, व्यक्तीवादी विचारसरणी, अर्थव्यवस्थेतील बदल इ. घटकांच्या प्रभावातून निरनिराळ्या सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्या समस्यांपैकी वृांची समस्या ही एक महत्त्वाची समस्या होय.

*** वृद्धांचा पारंपारिक दर्जा :**

भारतीय समाजजीवनाचे शहरी समुदाय, ग्रामीण समुदाय आणि आदिवासी समुदाय अशा तीन समुदायात विभाजन केले जाते. आदिवासी व ग्रामीण समुदायात एकूण लोकसंख्येच्या ७२.२२% लोकसंख्या राहते, तर शहरी समुदायात २७.७८% लोकसंख्या राहते. याचाच अर्थ असा की, ग्रामीण समाजात राहणाऱ्या लोकांची संख्या अधिक दिसून येते. भारतीय ग्रामीण समाजात, जातीप्रथा, संयुक्त कुटुंबपद्धती, बलुतेदारी प्रथा, शती व्यवसाय, लघु उद्योगधंदे इ, पारंपरीक संस्थांचे प्राबल्य होते. या पारंपरिक संस्थांमध्ये वृद्धांची  स्थिती आणि भूमिका वैशिष्ट्यपूर्ण होती. 'वय' या घटकाच्या आाधारे सभासदांचा दर्जा निश्चित केला जात हात. ज्यांचे वय जास्त त्यांना समाजात अधिक मान दिला जात होता. वृद्धांचा आदर कला पाहिजे असा संकेत होता, वृद्धांचे मार्गदर्शन महत्त्वाचे आहे. त्यांचे अनुभव महत्त्वाचे आहेत. अशा विचारांमुळे विविध पारंपारिक संस्थांमधील वृद्धांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. जातीसंस्थेमध्ये वृद्धांना विशेष महत्वाचे स्थान होते. जातीपंचायतीत सभासद म्हणून वृद्ध व्यक्तीची निवड केली जात होती. वृद्ध व्यक्त न्यायदानाचे कार्य करीत असत. वृद्धांनी दिलेला निर्णय बंधनकारक मानन्यात येत होत. गावाचा कारभारदेखील वृद्धांच्या मार्गदर्शनाखाली केला जात होता. समाजातील धार्मिक कार्यक्रमाच्या प्रसंगी वृद्धांची भूमिका महत्त्वाची  होती. ग्रामीण लघुउद्योग, शती, नैसर्गिक संकटे यासंदर्भात वृद्धांच्या अनुभवाचा फायदा होत असे म्हणूनच प्राचीन काळापासून भारतीय समाजात वृद्धांना 'वंदनीय' मानल जात होते.

*** वृद्धांचे बदलते स्थान :**

आधुनिक काळात शहरीकरण, संयुक्त कुटुंबाचे विघटन, पाश्चात्यिकरण, औद्योगिकरण, शिक्षणाचा प्रसार, व्यक्तीवादी विचारसरणी इ. घटकांच्या प्रभावामुळे भारतीय समाजजीवात परिवर्तन झालेले दिसून येते. ग्रामीण समुदायातून शहरी समुदायात व्यक्ती स्थलांतरीत होऊ लागल्या. शेती उद्योगातील पारंपरीक ज्ञान, गृहउद्योग, त्यासंबंधी साधने अविकसित ठरू लागली. संयुक्त कुटुंबाच्या जाती विभक्त किंवा केंद्र कुटुंब निर्माण झाली. जाती पंचायती संस्था कालबाह्य झाल्या. शिक्षणाच्या प्रसरामुळे नवीन ज्ञानाची माहिती मिळू लागली. दिवसेंदिवस व्यक्तीवादी विचारसरणीचा प्रभाव निर्माण होत गेला. शिक्षणाच्या प्रसारामुळे पारंपारिक दर्जापेक्षा गुणवत्ता किंवा पात्रता महत्त्वाची मानली जाऊ लागली. या सर्व घटकांच्या

प्रभावामुळे वृद्धांचे महत्त्व आणि कार्य व त्यांची भूमिका यांच्यात बदल होऊ लागला. अशा विपरित परिस्थितीमुळे भारतीय समजात वृद्धांची समस्या निर्माण झालेली दिसून येते.

*** वृद्ध कोणाला म्हणावे?**

मावी जीवनात जैविकदृष्ट्या वृद्धावस्था अपरिहार्य आहे. कारण मावी जीवन स्थिर नसते. त्याच्यात सतत बदल होत असतो. वृद्धावस्था ही प्राणी जीवनाची शेवटची दशा आहे. मानवी जीवनाची सुरुवात जन्मापासून होते, जन्म, बाल्यावस्था, तारुण्य, प्रौढत्व, वृद्धावस्था अशा अवस्थांमधून मानवी, जीवन मृत्यूच्या सामोरे जात असते. साधारणपणे जेव्हा एखाद्या व्यक्तीची शाारीरिक, मानसिक व बौद्धीक क्षमता कमी कमी होत जाते त्या व्यक्ती वृद्ध असे म्हणतात. वयाचा ६० वर्षांचा कालावधी वृद्धावस्थेचा कालावधी म्हणून ओळखला जातो.

वृद्धांच्या समस्यांचा अभ्यास करीत असतां वृद्ध कोण आहेत? याचा विचार करणे आवश्यक आहे. वृद्धांच्या संदर्भात काही विचारवंतांनी व्याख्या केल्या आहेत.

*** व्याख्या –** (Definition)

**(१) हेन्री आणि क्यूमिंग :**

(Henry and Cumming)

''जीवनातील महत्त्वपूर्ण तसेच पूर्णपणे उपयोगी आणि ज्याविषयी अभिलाषा असते अशा आरंभीच्या काळापासून दूर जाण्याच्या प्रक्रियेला वृद्धावस्था असे म्हणतात.''

(It is a period of moving away from some previous and jor desirable period the prime of life or the years of usefulness. - Henry and Cumming)

**(२) एलिझाबेथ हरलॉक**

(Elizabeth Hurlock)

''वृद्धावस्था म्हणजे जीवनातील शेवटचा मावळणारा कालखंड होय.''

(Old is the closing period in the life span - Elizabeth Hurlock)

**(३) ॲरिस्टॉटल**

(Elizabeth Hurlock)

''प्राण्याच्या शरीरात एक प्रकारची उष्णता असते व वाढत्या वयाबरोबर ती कमी होऊन वृद्धत्व होते.''

**(४) सामाजिक कार्य ज्ञानकोशानुसार**

''व्यक्तीच्या जीवनकाळातील शेवटचा कालखंड म्हणजे वृद्धावस्था.''

**(५) डॉ. के. एस. सुडान**

(Dr. K. S. Sudan)

''ज्या व्यक्तीने आपल्या वयाची ५५ वर्षे ओलांडली आहेत ते वृद्ध या संज्ञेला पात्र ठरतात.''

अमेरिकतील विचारवंत जेरेमी स्टनस्टॉल आणि भारतातील विचारवंत डॉ. डी. पी. चौधरी यांनी आपल्या अध्ययनात असे प्रतिपादन कले आहे की, ''६५ वर्षे वयावरील व्यक्ती वृद्ध समजली जावी. १९९१ च्या जनगणना अहवालानुसार ६० किंवा ६० पेक्षा जास्त वय असलेली लोकसंख्या म्हणजे वृद्धांची लोकसंख्या होय.''

अशाप्रकारे वृद्धावस्थेचा आरंभ वयाच्या कोणत्या वर्षापासून होतो याबाबत वेगवेगळी मते आहेत. एकंदरीत वृद्ध कोणाला म्हणावे याबाबत एकवाक्यता नसली, तरी प्राधान्याने ६० वर्षे ही वयोमर्यादा वृद्ध म्हणून मान्य करण्यात येते. वृद्धावस्थेत शक्ती आणि उत्साह यांचे प्रमाण कमी कमी होत जाते. त्वचेला सुरकुत्या पडतात. ती सैल होते. केस गळू लागतात. पांढरे होतात, श्वास घ्यायला त्रास पडतो. जुन्या इमारतीची पडझड व्हावी तशी मानवी शरीराची या अवस्थेत होते.

आधुनिक युगात वृद्ध लोकांना 'ज्येष्ठ नागरीक' म्हणून संबोधिले जाते, तर ग्रामीण भागात त्यांना 'म्हातारे' म्हणून संबोधले जाते.

## २. **वृद्धावस्थेतील समस्या** (Problems of Old Age)

मानवी किंवा कोणत्याही प्राण्यामध्ये ही अवस्था अपरिहार्य असते. वृद्धावस्था ही व्याधी नसली तरी वृद्धावस्थेच्या काळात अनेक शारीरिक आणि मानसिक व्याधी निर्माण होतात. वृद्धावस्था ही आयुष्याची संध्याकाळ असते. त्यामुळे वृद्ध व्यक्तीची योग्य काळजी घेणे, सेवा करणे, मानसिक आणि कौटुंबिक शांतता लाभणे इ. गोष्टी आवश्यक असतात. परंतु या गोष्टींची काळजी घतली जात नाही. उलट वृद्धाकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे त्यांच्या वृद्धावस्थेत अनेक समस्या निर्माण होतात. त्यांचा खालीलप्रमाणे विचार करता येईल.

### (१) शारीरिक समस्या –

वृद्धावस्था ही जैविक प्रक्रिया असल्यामुळे या अवस्थेत मानवी शरीरावर असंख्य परिणाम दिसून येतात. साधारणत: ५० वर्षांच्या वयानंतर हे बदल दिसून येतात. शारीरिक बदल हे अंतर्गत आणि बाह्य स्वरुपाचे असतात. बाह्य स्वरूपाच्या बदलावरून एखादी व्यक्ती वृद्ध आहे की नाही हे लवकरच ओळखता येते. केस पांढरे होणे, चेहऱ्यावर व त्वचेवर सुरकुत्या पडणे, चेहऱ्यात बदल होणे, दात पडणे, हाता-पायांना कंप सुटणे इत्यादी प्रकारचे बाह्य बदल झालेले दिसून येतात. त्याचप्रमाणे अंतर्गत स्वरूपाच्या बदलात शारीरिक क्षमता कमी होणे, रोगप्रतिबंधक क्षमतेचा ऱ्हास होणे, मनोनियंत्रणाचा अभाव होणे, पचनसंस्थेअभावी विविध समस्या निर्माण होणे. इ. अंतर्गत बदल शरीरात घडून येतात. या अवस्थेमध्ये व्यक्तीच्या कार्यशक्तीचा ऱ्हास होतो, व्यक्तीला कमी दिसते, व्यक्तीला ऐकू येत नाही, रक्तदाब कमी-अधिक होतो. इ. शारीरिक दोष निर्माण होतात. अशा अवस्थेत निर्माण झालेल्या शारीरिक समस्यांमुळे वृद्ध व्यक्तींना आरोग्यविषयक सोयी व सवलती मिळणे आवश्यक असते.

### (२) मानसिक समस्या :

वृद्धावस्थेत शारीरिक बदलांबरोबरच मानसिक बदलही घडून येतात. वयोमानाप्रमाणे मानसिक बदल होणे अपरिहार्य असते. वृद्धावस्थेत विचारशक्तीचा ऱ्हास होतो, नवीन गोष्टी

शिकण्याची क्षमता कमी होते, विसराळूपणा वाढतो, न्यूनगंडाची भावना वाढीस लागते, आत्मविश्वासाचा अभाव दिसून येतो. या बदलाच्या परिणामामुळे वृद्ध व्यक्ती भांडखोर बनतात. घरातील व्यक्ती आपल्याला विचारीत नाही, त्यांना आमची गरज राहिली नाही, कुणी मान देत नाही, अशा गोष्टींचाच ते जास्त विचार करतात. या सर्व गोष्टींचा परिणाम त्यांच्या वर्तनावर होतो. त्यामुळे कौटुंबीक कलह निर्माण होण्याची शक्यता असते. वृद्धावस्थेत निर्माण होणाऱ्या मानसिक समस्यांच्या वेळी त्यांच्याशी प्रेमाने वागणे, स्नेह देणे, आदर करणे, त्यांना समजून घेणे या गोष्टी महत्त्वाच्या असतात.

**(३) आर्थिक समस्या :**

वृद्धावस्थेत आर्थिक समस्या ही महत्त्वाची आहे. कारण या अवस्थेत व्यक्तीची कार्यक्षमता कमी होते. आर्थिक उत्पादनाच्या प्रक्रियेत व्यक्ती सहभागी होऊ शकत नाही. नोकरी करणाऱ्या व्यक्ती ५८ किंवा ६० वर्षानंतर निवृत्त होतात. निवृत्त झाल्यानंतर अनेक महत्वाच्या कामाकरिता खर्च करावा लागतो. निवृत्त वेतनात कुटुंबाचा खर्च भागत नाही. या काळात औषधांचा खर्चसुद्धा वाढतो. त्यामुळे कमी उत्पन्नात खर्च भागविणे शक्य होत नाही. ज्या व्यक्तींना निवृत्ती वेतन मिळते त्यांना आर्थिक प्रश्नांची जाणीव होत नाही; परंतु ज्या व्यक्ती मजुरी करून आपला उदरनिर्वाह करतात अशा वृद्धा व्यक्तींना आर्थिक समस्येचा प्रश्न अधिक भेडसावत असतो. अशा वृद्ध व्यक्ती आपली उपजिवीका भागविण्यासाठी काही वेळेस भिक्षा मागतात.

**(४) सामाजिक समस्या :**

वृद्धांची समस्या ही व्यक्तीगत स्वरुपाची असली तरी हे प्रश्न विशिष्ट वृद्ध व्यक्तींपुरते मर्यादित नाहीत. देशातील बहुसंख्य वुद्ध व्यक्तींच्या संदर्भात हे प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यामुळे वृद्धांची  समस्या ही वर्तमानकाळातील एक ज्वलंत सामाजिक समस्या ठरलेली आहे. वृद्धांच्या समस्यांचा परिणाम समाजजीवनावर देखील झालेला दिसून येतो. त्यामुळे वृद्धांचे प्रश्न सोडविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सरकारनेदेखील वृद्धांच्या कल्याणाकरिता विविध कायदे केलेले आहेत. विविध योजनांच्या माध्यमातून सहकार्य करण्याचा प्रयत्न केलला आहे. थोडक्यात असे स्पष्ट करता येईल की, वृद्धांना समाजात सामाजिक सुरक्षा उपलब्ध करून दिली नाही तर भिक्षावृत्ती, आत्महत्या, गुन्हेगारी असे कितीतरी प्रश्न निर्माण होतील.

**(५) परावलंबनाची समस्या :**

वृद्धावस्था म्हणजे परावलंबनाची अवस्था होय. व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक समस्यांमुळे वृद्ध व्यक्ती परावलंबी असते. ज्याप्रमाणे लहान मूल आपल्या आई-वडीलांवर अवलंबून असते. त्याचप्रमाणे वृद्ध लोक हे तरुणांवर किंवा कर्त्या मंडळीवर अवलंबून असतात. आपल्या छोट्या-मोठ्या गरजांसाठी त्यांना कुटुंबातील कर्त्या सभासदावर अवंबून रहावे लागते. आपल्या छोट्या-मोठ्या कार्यातसुद्धा इतरांची मदत घेणे अपरिहार्य असते. वृद्धावस्थेमुळे ते समाजापासून अलग झालेले असतात. त्यामुळे त्यांना याच काळात भावनिक आधाराची गरज असत. त्यांचा सांभाळ करणे, आवश्यक गोष्टींची पूर्तता करणे, त्यांची भावनिक व मासिक गरज पूर्ण करणे गरजचे असते. वृद्ध व्यक्ती शारीरिक आजाराने

ग्रस्त असेल तर त्याला सेवेची गरज असते. परंतु आधुनिक कुटुंबात वृद्धांकडे लक्ष द्यायला कुटुंबातील तरुण सदस्यांना वेळ नसतो. त्यामुळे वुद्धांना परावलंबी जीवनाचा कंटाळा येतो. त्यामुळे अनेक वृद्ध घर सोडून जातात. या परावलंबनाच्या काळात वृद्धांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. आज कायद्याने वृद्धांना त्यांच्या मुलांकडून पोटगीचा हक्क मिळाला आहे. सरकारनेसुद्धा वृद्धांना एस. टी. भाड्यात ५०% ची सवलत दिली आहे. आयकरात विशिष्ट सवलत दिली आहे. काही दवाखान्यात वृद्धांना मोफत औषधोपचार केला जातो; परंतु या सर्व बाबी पुरेशा नाहीत.

वृद्धावस्थेत व्यक्तीचे जीवन परावलंबी असल्यामुळे त्यांचा कुटुंबातील व्यक्तिंना योग्य प्रकारे सांभाळ करणे आवश्यक असते. त्यांच्या आवश्यक गोष्टींची पूर्तता करणे, त्यांना प्रेम, स्नेह देणे आवश्यक असते. परंतु आधुनिक काळात वृद्धांची कुटुंबातील इतर सदस्यांना अडचण भासू लागते. त्यामुळे वृद्धांना त्यांच्या परावलंबनाच्या काळात मदत करण्याची प्रवृत्ती कमी होत असलेली आढळून येते.

## ३. वृद्धांच्या समस्येची कारणे (Causes of Old Age Problems)

वृद्धांची समस्या ही आधुनिक काळातील एक महत्त्वाची सामाजिक समस्या आहे. वृद्धांचे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. वृद्धावस्था ही प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात येणारी अवस्था आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला या अवस्थेचा सामना करावाच लागते. ही जाणीव असतांनादेखील प्रत्यक्ष आपल्या आई-वडिलांकडे लक्ष दिले जात नाही. हीदेखील एक वास्तविकता आहे. प्राचीन समाजव्यवस्थेत वृद्धांची समस्या नव्हती; परंतु आधुनिक काळात ही समस्या निर्माण झालेली दिसून येते. ही समस्या अचानक निर्माण झाली नाही. वृद्धांची समस्या निर्माण होण्यास काही महत्त्वाचे घटक कारणीभूत आहेत. वृद्धांच्या समस्यांची कारणे खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील

### (१) संयुक्त कुटूंबपद्धतीचा ऱ्हास :

भारतीय समाजजीवनाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून संयुक्त कुटुंब पद्धतीचा उल्लेख केला जातो. ग्रामीण भागात आणि शहरी समुदायात आजही काही प्रमाणात संयुक्त कुटुंब पद्धतीचे अस्तित्व दिसून येते; परंतु या कुटुंबाच्या स्वरूपात बदल झालेला दिसतो. संयुक्त कुटुंबात दोन किंवा दोनपेक्षा जास्त पिढ्यांचा समावेश होतो. सामान्य निवासस्थान, एकत्रित भोजन, एकत्रित धार्मिक पूजा, एकत्रित संपत्ती आणि कर्त्या पुरुषाच्या नियंत्रणाखाली कुटुंबाचा व्यवहार चालत असे. कुटूंबात कर्त्या व्यक्तीचा मान वयाने ज्येष्ठ असलेल्या पुरुषाला आणि स्त्रीला मिळत असे. अशा कुटुंबात अपंग, विधवा, वृद्ध व्यक्तीला मानाचे स्थान होते. वृद्ध व्यक्तीच्या मार्गदर्शनानुसार कुटुंबातील कोणतेही कार्य पूर्ण व्हायचे. त्यामुळे वृद्ध व्यक्तीच्या अनुभवाचा फायदा कुटूंबातील सर्व सभासदांना होत असे; परंतु औद्योगिकीकरण, शहरीकरण, व्यक्तीवादी विचारसरणी इ. कारणांच्या प्रभावामुळे संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन विभक्त कुटुंब निर्माण झाले. अशा विभक्त कुटुंबात सभासदांची संख्या मर्यादित असते. अशा कुटुंबात वृद्धांची अडचण भासू लागली. विभक्त कुटुंबात कर्त्या व्यक्तीला विशेष महत्त्व प्राप्त झाले. औद्योगिकीकरण, नागरीकरण, व्यक्तीवाद, भौतिकवाद, व्यक्ती स्वातंत्र्य, लहान घरे, निवासस्थानांची कमतरता, वाढती महागाई इ.

अनेक कारणांमुळे संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास होऊ लागला म्हणून वृद्धांची समस्या निर्माण झालेली दिसून येते.

**(२) जातीव्यवस्थेचा ऱ्हास :**

भारतीय समाजाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून जाती संस्थेचा उल्लेख केला जातो. भारतीय समाजावर जाती व्यवस्थेचा फार मोठा प्रभाव होता. जातीव्यवस्था हा भारतीय समाजात सामाजिक स्तरीकरणाचा आधार होता. व्यक्तीच्या दैनंदिन, व्यक्तीगत आणि सामाजिक व्यवहारांवर जातीचा प्रभाव होता. व्यक्ती व समाजजीवनाचे नियंत्रण जातीव्यवस्थेच्या माध्यमातून होत असे. एखाद्या व्यक्तीने जाती व्यवस्थेच्या नियमांचे उल्लंघन केले तर जाती पंचायतीच्या माध्यमातून त्या व्यक्तीला शिक्षा केली जात असे. जातीपंचायतीत वृद्ध व्यक्तींचा समावेश होता. न्यायदानाचे कार्य वृद्ध व्यक्ती करत असत. त्यामुळे प्रत्येक जातीमध्ये वृद्ध व्यक्तींचे स्थान अत्यंत महत्त्वाचे होते. औद्योगिकीरण, शहरीकरण, आधुनिकीकरण, शिक्षण दळणवळणाची साधने, सामाजिक व व्यावसायिक गतीशिलता इ. घटकांच्या प्रभावामुळे परंपरागत जातीव्यवस्थेचा ऱ्हास होत आहे. जातीव्यवस्थेचा ऱ्हास होत असतां वृद्धांचे महत्त्वदेखील कमी होत आहे. वृद्धांच्या पारंपारिक दर्जा आणि भूमिकेवर आघात झालेला दिसून येतो. त्यामुळे वृद्धांकडे दुर्लक्ष होऊन त्यांचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत,

**(३) ग्रामीण समुदायातील बदल :**

२००१च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण लोकसंख्येच्या ७२.२२ लोकसंख्या ही ग्रामीण भागात वास्तव्य करते. त्यामुळे वृद्धांचे सर्वात जास्त प्रमाण ग्रामीण समुदायात आढळते. परंपरागत ग्रामीण समुदायामध्ये वृद्धांना महत्त्वाचे स्थान होते. ग्रमपंचायत आणि न्यायपंचायतीमध्ये वृद्धांची भूमिका महत्त्वाची होती. कोणताही न्यायनिवाडा हा पंचाद्वारे व्हायचा आणि जन्मापासून तर मृत्यूपर्यंतच्या संस्कारामध्ये वृद्धच मार्गदर्शन करत असत. सामाजिक संकटाबरोबर नैसर्गिक संकटांचे निवारण करण्यासठी वृद्ध मदत करायचे. पारंपारिक समुदायात वृद्धांना विशेष महत्त्वाचे स्थान होत.

परंतु आधुनिक काळात शेती, उद्योग इ. क्षेत्रात आधुनिक ज्ञानाचे महत्त्व वाढलेले दिसून येते. नव्या पिढीने हे आधुनिक ज्ञान आत्मसात केलेले आहे. त्यामुळे परंपरावादी विचारसरणीला विशेष महत्त्व दिले जात नाही. यातूनच वृद्ध व्यक्ती आणि नवीन पिढी यांच्यात संघर्ष निर्माण झाला. ग्रामपंचायतीमध्ये वृद्धांना बाजूला करून त्यांची जागा युवकांनी घेतली आहे त्यामुळे वृद्धांचे महत्व कमी झालेले दिसून येते. वृद्धांचा स्वाभिमान दुखावला गेला. 'आम्हाला कोणीही विचारीत नाही. मानमर्यादा राहिलेली नाही' अशा शब्दातून आपले दु:ख वृद्ध व्यक्ती स्पष्ट करतात. बदलत्या परिस्थितीशी वृद्ध व्यक्ती जुळवून घेत नाहीत. त्यामुळे वृद्धांचा प्रश्न अधिक बिकट झालेला दिसून येतो.

**(४) औद्योगिकीकरण व शहरीकरण :**

भारतात १९व्या शतकापासून औद्योगिक अर्थव्यवस्थेची पायाभरणी झाली. पारंपरिक उत्पादन पद्धतीत अमूलाग्र बदल घडून आला. उत्पादनात नवीन तंत्र आणि यंत्राचा उपयोग

करण्यात येऊ लागला. कारखान्यातून मोठ्या प्रमाणात वस्तूंचे उत्पादन होऊ लागले. त्यामुळे देशातील लघुउद्योग, कुटीर उद्योग आणि हस्तकलांचा ऱ्हास होऊ लागला. औद्योगिकरणामुळे खेड्यातील लोक फार मोठ्या प्रमाणात शहरात जाऊ लागले. म्हणजे औद्योगिकीरणाबरोबरच नागरीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. शहरात पारंपरिक व्यवसायापेक्षा आधुनिक व्यवसाय स्विकारण्यात आला. परंतु त्याचबरोबर शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक प्रश्न निर्माण झालेत.अपुरे उत्पन्न, अधिक खर्च, घरांचा प्रश्न, व्यक्तीवादी विचारसरणी, गलिच्छ वस्त्यांची निर्मिती अशा अनेक समस्या निर्माण झालया. या समस्यांच्या प्रभावामुळे वद्ध व्यक्तींचा सांभाळ करणे कठीण झाले. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे औद्योगिकीकरण आणि शहरीकरण या प्रक्रियेमुळे वृद्धांचे महत्त्वच संपुष्टात आले. त्यामुळे वृद्धांचा प्रश्न अधिकच गंभीर झालेला दिसतो.

**(५) नवीन सामाजिक मूल्ये :**

१९व्या शतकाच्या सुरुवातीपासून भारतीय समाजात मूल्यव्यवस्थेत बदल झालेला दिसून येतो. भारतात आधुनिकीकरणाची सुरुवात झाल्याने पारंपरिक मूल्यांचे महत्त्व कमी होऊ लागले आहे. पारंपरिक समाजव्यवस्थेत जात, धर्म, वंश, व्यक्तीचे वय इ. घटकाच्या आधारे व्यक्तीचा दर्जा आणि भूमिका निश्चित होत असे. परंतु परिवर्तनाच्या प्रक्रियेमुळे परंपरागत मूल्य व्यवस्थेत बदल घडून आला. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव इ. नवीन मूल्यांना मान्यता मिळाली. शिक्षण, कर्तृत्व व्यक्तीची पात्रता या घटकांच्या आधारावर दर्जा आणि भूमिका निश्चित होऊ लागल्या. अशाप्रकारे नवीन मूल्यांच्या प्रभावामुळे पारंपरीक मूल्यव्यवस्थेत वृद्धांना जो महत्त्वाचा दर्जा आणि भूमिका प्राप्त होत्या त्यांच्यावर आघात झालेला दिसून येतो. साहजिकच नवीन मूल्यांच्या परिवर्तनामुळे भारतीय समाज व्यवस्थेत वृद्धांचा प्रश्न निर्माण झालेला दिसून येतो.

**(६) नोकरी करणाऱ्या महिलांचे वाढते प्रमाण :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्त्रियांच्या विकासासाठी अनेक कायदेशीर व सामाजिक प्रयत्न केले गेलेत. स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण वाढले. पुरुषांच्या बरोबरीने त्या आर्थिक क्षेत्रातसुद्धा कार्य करू लागल्या. पूर्वीच्या काळी केवळ 'चूल आणि मूल' एवढेच स्त्रीचे कार्यक्षेत्र होते. त्यामुळे कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीची काळजी व्यवस्थितरित्या घेतली जाई. परंतु आज नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. शहरातील स्त्रीयादेखील नोकरी किंवा इतर व्यवसायात काम करतात. शहरांमध्ये नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या स्त्रीयांचे प्रमाण हे दिवसेंदिवस वाढत आहे. पती-पत्नी दोघेही नोकरी करणारे असल्यामुळे त्यांना वृद्धांकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. त्यामुळे कुटुंबात आजारी असलेल्या वृद्धांची देखभाल करण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. आपल्या वृद्ध सासू-सासऱ्यांशी सून त्रयस्थपणे वागते. मुलगादेखील आई-वडिलांची सेवा करू शकत नाहीत. त्यामुळे वृद्धांची मानसिक कुचंबणा होते. बदलत्या परिस्थितीशी ते जुळवून घेऊ शकत नाहीत. घरच्या कामकाजात सासू-सासऱ्यांनी मदत करावी असे सुनेला वाटते. त्यामुळे त्यांच्यातील संबंध चांगले राहत नाहीत. कौटुंबीक संघर्ष निर्माण होतो. त्यांना वृद्धांची अडचण भासू लागते. यातून वृद्धांचे अनेक प्रश्न निर्माण होतात.

अशाप्रकारे वरील कारणांमुळे वृद्धांची समस्या निर्माण झाली आहे. वृद्धांच्या समस्या कोणत्याही एका कारणामुळे निर्माण होत नाहीत. तर अनेक कारणांचा परिणाम म्हणून त्या निर्माण होतात. या सर्व अपरिहार्य कारणांमुळे वृद्धांचे प्रश्न निर्माण होतात.

## ४. वृद्धांच्या समस्येवर उपाययोजना
## (Measures to Problem of Old Age)

वृद्धांची समस्या सोडविण्यासाठी समाजाने सर्व तऱ्हेचे प्रयत्न करणे मानवाचे आद्य कर्तव्य आहे. जन्मभर व्यक्ती स्वत:साठी कष्ट करीत असली तरी त्यातूनच सामाजिक जीवन विकसित होत असते हे आपण विसरता कामा नये. वृद्धांकडे दुर्लक्ष करणे, त्यांना भिक्षा मागून लाचारीचे जीवन जगण्यास भाग पाडणे हे योग्य नाही. म्हणून व्यक्ती, समाज, राज्य व अन्य सामाजिक संस्थांनी वृद्धांचा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य ठरते. वृद्धांचा प्रश्न सोडविण्यासाठी साधारणत: पुढील उपाय सांगता येतील.

### (१) वृद्धाश्रम

आपल्या देशात वृद्धाश्रमाची कल्पना ही आता सर्वमान्य होत आहे. वर्तमानकाळात एक गरज म्हणून वृद्धाश्रमाचा विचार केला जातो. कौटुंबिक ताणतणवामुळे कुटुंबात होणारा वृद्धांचा कोंडमारा आणि वृद्धांची एकाकीपणाची भावना समाप्त करण्याच्या दृष्टीने वृद्धाश्रम हा एक चांगला उपाय आहे. सरकारी, खासगी, धार्मिक व सामाजिक संस्थाद्वारा निराधार वृद्धांसाठी आश्रम काढून त्यांना सर्व सोयी उपलब्ध करून देणे व सन्मानाने जीवन जगण्याची सोय करण्यात यावी. आश्रम हे विनाशुल्क पण वृद्धांची सोय करणारे असावेत.

### (२) वृद्धांसाठी दिनकेंद्रे :

वृद्धांसाठी दिनकेंद्रे हादेखील एक चांगला उपक्रम आहे. वृद्धाश्रमात वृद्धांची चांगली काळजी घेतली जाते. तेथे त्यांना सामाजिक सुरक्षा लाभते. असे असले तरी वृद्धाश्रमातील वृद्ध हे कौटुंबिक वातावरणापासून वंचित राहता. वृद्धांना सामाजिक सुरक्षा मिळाली पाहिजे तसेच त्यांनी कौटुंबिक वातावरणाला पारखे होऊ नये. या दृष्टीने दिनकेंद्रे ही अतिशय महत्त्वाची आहेत. नोकरी करणारे आई-वडील लहान मुलांना ज्याप्रमाणे पाळणा घरात ठेवतात त्याचप्रमाणे दिनकेंद्रे वृद्धांचे विश्रांतीघर म्हणून जास्त उपयुक्त ठरेल यात शंका नाही. वृद्धांच्या दृष्टीने जसे भारतात वृद्धाश्रम निघाले आहेत तशीच दिनकेंद्रे सुरू करण्याचे प्रयत्न करावेत.

### (३) मनोरंजन केंद्रे :

वृद्धांना रिकामा वेळ घालवण्याच्या दृष्टीने विविध बैठे खेळ खेळता, येतील किंवा समवयस्क व्यक्तीबरोबर गप्पागोष्टी करता येतील अशी सार्वजनिक जागा निर्माण करणे आवश्यक आहे. सध्या आपल्याकडे मंदिरे, पार्क, थोड्याफार प्रमाणात वृद्धांची ही गरज भागवतात.

### (४) वृद्धांसाठी सेवा केंद्र :

जी वृद्ध मंडळी स्वत:च्या कुटुंबात राहणे पसंत करतात त्यांनाही आवश्यकता भासल्यास

वैद्यकीय मदत, वाचनाची सोय, वाचून दाखविणे किंवा त्यांचे लिखाण करून देणे, त्यांना थोडावेळ सोबत करणे इत्यादी सेवा करण्याची सोय उपलब्ध केली पाहिजे.

**(५) कौटुंबिक समस्या निवारण :**

वृद्धांशी जसे इतरांनी जुळवून घेणे जरुरीचे आहे तसेच वृद्धांनीही इतरांशी जुळवून घेणे आवश्यक आहे. त्यांनीही नवीन परिस्थिती, विचार, कल्पनाशी जुळते घेतले पाहिजे. कुटुंबातील सर्व व्यवहार नवीन पिढीवर सोपवून विचारल्यास सल्ला देण्याचे कार्य त्यांनी करावे. आपण करीत होतो तसेच सर्व व्यवहार कुटुंबात झाले पाहिजेत असा हट्ट न करता नवीन पिढीस तिच्या सोयीने काही गोष्टी करू दिल्या पाहिजेत. नवीन पिढीवर जाहीर टीका करीत रहिल्याने कटुता येते. प्रत्येक पिढीत नवीन व जुने हा संघर्ष कायम स्वरूपाचा आढळतो. तेव्हा आपण तो सूज्ञपणे कमी केला पाहिजे. त्यादृष्टीने वृद्धांचीही मने तयार करण्याचे व कौटुंबिक समस्या कमी करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन व मदत करण्याची सोय असावी.

अशाप्रकारे वृद्धांच्या समस्या कमी करण्यासठी वरील उपाय सुचविता येतील.

## ३.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :

**प्रश्न १ – खालील विधाने चूक (X) की बरोबर (✓) त्याप्रमाणे करा.**

(१) हिंदू समाजात वरपक्षाकडून वधू पक्षाला हुंडा दिला जातो. (  )

(२) हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ मध्ये करण्यात आला. (  )

(३) कौटुंबिक हिंसाचारामध्ये प्रामुख्याने महिलांचा बळी जातो. (  )

(४) कौटुंबिक हिंसाचार ही एक सामाजिक समस्या नाही. (  )

(५) सर्वसाधारणपणे वयाच्या ६० वर्षानंतरचा कालावधी वृद्धावस्थेचा कालावधी मानला जातो. (  )

(६) वृद्धावस्था ही आयुष्याची संध्याकाळ असते. (  )

**प्रश्न २ – थोडक्यात उत्तरे लिहा/टिपा लिहा.**

(१) हुंड्याचा अर्थ सांगा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(२) कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(३) वृद्धाची शारीरिक समस्या

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

**प्रश्न ३ – दिर्घोत्तरी प्रश्न**

(१) हुंडा पद्धतीच्या कारणांची चर्चा करा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

(२) कौटुंबीक हिंसाचाराची कारणे स्पष्ट करा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

(३) वृद्धांच्या समस्या स्पष्ट करा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

## ३.४ सारांश :

आधुनिक काळात भारतीय समाजात हुंड्याची समस्या ही अतिशय गंभीर स्वरूपाची निर्माण झाली आहे. भारतीय समाजात एक प्राचीन समस्या म्हणून हुंडा पद्धतीचा उल्लेख केला जातो. हिंदू विवाहपद्धतीमुळे भारतीय समाजात विविध प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. त्यापैकी हुंडापद्धती ही एक महत्त्वाची सामाजिक समस्या आहे. हुंड्याची प्रथा ही भारतीय समाजामध्ये फार पूर्वीपासून अस्तित्वात आलेली दिसून येते. परंतु प्राचीन काळातील हुंडा पद्धतीचे स्वरूप आणि आधुनिक काळातील हुंडा पद्धतीचे स्वरूप यात बराच फरक आढळून येतो. आधुनिक समाजात हुंडा प्रथेने विकृत स्वरूप धारण केलेले आहे. हिंदू विवाह पद्धतीला आज हुंडा पद्धती एक कलंक आहे, असे मानले जाऊ लागले आहे. त्याचप्रमाणे आधुनिक समाजात हुंड्याच्या प्रथेला बाजाराचे स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते.

आधुनिक काळात कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना वारंवार घडत आहेत. कौटुंबिक हिंसाचार हे प्रामुख्याने महिलांच्या संदर्भात केले जातात. भारतीय समाजात स्त्रियांवर अत्याचार होणे हे परंपरागत चालू आहे. स्त्रीच्या जन्मापासून हा अत्याचार या ना त्या रूपाने

सतत चालू असतो. प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे कुटुंबातून स्त्रियांवर अत्याचार होत असतात. भारतीय समाजात समाजाच्या सर्व स्तरातील स्त्रीयांवर अत्याचार होतात. त्यात गरीब–श्रीमंत, निरक्षर, उच्चशिक्षित, शहरी–ग्रामीण, बालिकेपासून वृद्धा स्त्रीयांपर्यंतचा समावेश होतो. कौटुंबिक हिंसाचारात मारहाण, शारीरिक इजा करणे, लैंगिक छळ, भावनात्मक पिळवणूक करणे, गलिच्छ भाषेचा वापर करणे, शिवीगाळ करणे, शारीरिक व मानसिक छळ करणे या बाबींचा समावेश होतो.

भारतातील सामाजिक समस्यांचा विचार करीत असताना वृद्ध व्यक्तींच्या जीवनासंबंधी विविध प्रश्नांचा विचार करणे आवश्यक आहे. जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला बालपण, तरुणपण आणि म्हातारपण या तीन अवस्थांमधून जावेच लागते. मानवी किंवा कोणत्याही प्राण्यामध्ये वृद्धावस्था ही अपरिहार्य असते. वृद्धावस्था ही आयुष्याची संध्याकाळ असते. वय हे वृद्धावस्थेचा प्रमुख आधार आहे. वयाच्या आधारावरूनच जी मानवी जीवनाची शेवटची अवस्था असते ती म्हणजे वृद्धावस्था होय. त्यामुळे वृद्ध व्यक्तीची योग्य काळजी घेणे, सेवाशुश्रुषा करणे, मानसिक आणि कौटुंबिक शांतता लाभणे इ. गोष्टी आवश्यक असतात. वृद्धांची समस्या ही आधुनिक काळातील एक महत्त्वाची सामाजिक समस्या आहे. भारताच्या संदर्भात संयक्त कुटूंब नष्ट झाल्याने ज्या अनेक समस्या निर्माण झाल्या त्यात वृद्धांची समस्या महत्त्वाची आहे.

## ३.५ पारिभाषिक शब्द शब्दार्थ :

* हुंडा – विवाहप्रसंगी वराने वधूकडून घेतलेली संपत्ती
* कौटुंबिक हिंसाचार – कुटुंबात स्त्रीयांवर होणारा जुलूम व अत्याचार
* वृद्ध – सर्वसाधारणपणे ६० वर्षे वयाची व्यक्ती.
* वृद्धावस्था – व्यक्तीच्या जीवनकाळातील शेवटचा कालखंड

## ३.६ संदर्भसूची


१. काचोळे दा. धों. (२००५) भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, औरंगाबाद : कैलाश पब्लिकेशन्स, पृष्ठ क्र. ११५ ते १२३, १३२ ते १४३.

२. काचोळे दा. धों. (२०००) भारताच्या विघटनात्मक समस्या, औरंगाबाद : कैलाश पब्लिकेशन्स, पृष्ठ क्र. १७५ ते १८१, १७९ ते २०५, ३८४ ते ३९५

३. आगलावे प्र. ना. (२००३) भारतीय समाज संरचना आणि समस्या, नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन, पृष्ठ क्र. १३५ ते १८५, २०९ ते २२४

४. आगलावे प्र. ना. (२००९) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन, पृष्ठ क्र. १३५ ते १४५, १६५ ते १९२

५. तोरवणे डी. एल., सौ. महाजन, जयश्री (२००८) भारतीय समाज (प्रश्न आणि सामाजिक समस्या), जळगांव : प्रशांत पब्लिकेशन्स, पृष्ठ क्र. ५८ ते ८६.

६. सौ. पाटे, सुमन (१९९१) भारतीय सामाजिक समस्या, नागपूर : विद्या प्रकाशन, पृष्ठ क्र. १४१ ते १४४, १४६ ते १५०

* **अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके**


१. खडसे भा. कि. – भारतीय समाज आणि भारतीय समस्या

२. आगलावे प्र. ना. – आधुनिक भारतातील सामाजिक समस्या

३. माने, माणिक – भारतातील समकालीन सामाजिक समस्या

४. कुलकर्णी पी. के. – भारतातील सामाजिक समस्या

५. काळदाते सुधा – भारतीय सामाज (प्रश्न आणि समस्या)

६. संगवे, विलास – भारतातील सामाजिक समस्या

७. भांडारकर शब्बीर, पालकर – भारतातील सामाजिक समस्या

८. खडसे भा. कि. – भारतातील सामाजिक समस्या

९. पाटे, सुमन – सामाजिक विघटन व समस्या

१०. पराडकर मो. श. – भारतातील सामाजिक समस्या


## ३.७ सरावासाठी प्रश्न

१. हुंडा पद्धतीच्या कारणांची चर्चा करा.

२. हुंडा पद्धतीचे परिणाम सांगा.

३. हुंडा पद्धतीवर उपाय सुचवा

४. कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ सांगून कारणे विशद करा.

५. वृद्धावस्था म्हणजे काय?

६. वृद्धांच्या समस्येची कारणे स्पष्ट करा.

७. वृद्धांच्या समस्येवर एक लघुनिंबध लिहा

८. वृद्धांच्या समस्येवर उपाय सांगा.

# घटक ४

# विकसनशील समस्या

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२. विषय विवेचन

४.२.१ प्रादेशिक असमतोल

४.२.२ मूल्य शिक्षण आणि मूल्य शिक्षणाच्या समस्या / संघर्ष

४.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

४.४ सारांश

४.५ पारिभाषिक शब्द

४.६ संदर्भ सूची

४.७ सरावासाठी प्रश्न

## ४.० उद्दिष्टे

१. या प्रकरणात विकासाचा अर्थ समजून घेता येईल.

२. प्रादेशिक असमतोलाचा अर्थ समजण्यास मदत होईल.

३. महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता समजेल

४. प्रादेशिक असमतोलाची कारणे समजण्यास मदत होईल.

५. प्रादेशिक असमतोलपणावर केलेल्या उपाययोजना जाणून घेता येईल.

६. या घटकामध्ये आपण मूल्यशिक्षणाचे अर्थ व उद्दिष्टे समजण्यास मदत होईल.

७. मूल्यशिक्षणाचे जीवनातील महत्त्व जाणून घेण्यास मदत होईल.

८. मूल्यशिक्षणाचे प्रकार समजण्यास मदत होईल.

९. मूल्यसंघर्षाचे कारणे व परिणाम जाणून घेता येतील.

१०. मूल्यसंघर्षाकरीता उपाय समजून घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना

आधुनिक काळात प्रत्येकाला विकास हवा आहे. म्हणून जगामधील सर्व देशांमध्ये विकासाची प्रक्रिया सुरू यासाठी प्रयत्न करीत आहे. जगातील सर्वच देश सारखे असावेत ही आदर्श व्यवस्था समजली पाहिजे, परंतु आजची परिस्थिती तशी दिसून येत नाही. म्हणजे जगातील सर्व प्रदेशांचा विकास सारख्याच प्रमाणात दिसून येत नाही.

यावरून असे दिसते की विकसित आणि अविकसित असे दोन प्रकार पडत असतात. इंग्लंड, जपान, अमेरिका, फ्रान्स हे देश विकसित आहेत तर भारत आणि पाकिस्तान हे विकासनशील देश आहेत, म्हणून आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी या देशामध्ये स्पर्धा लागलेली आहे.

आपला आर्थिक विकास व्हावा यासाठी प्रत्येकच देशाने उद्योगधंदे, औद्योगिक प्रकल्प सुरू करून मोठमोठी धरणे बांधून आपले आर्थिक उत्पन्न वाढवून विकास करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु देशाचा आर्थिक विकास होणे महणजे देशाच्या सर्वांगीण विकास झाला असे म्हणता येत नाही. तर आर्थिक प्रगतीबरोबर देशाचा सामाजिक विकास झाला पाहिजे. म्हणून विकास म्हणजे केवळ राष्ट्रीय उत्पन्नात वाढ नसून गरीब व श्रीमंत राष्ट्रातील वंचित वर्गाची सर्वांगिण प्रगती म्हणजे विकास होय.

## ४.२ विषय विवेचन :

विकास म्हणजे नुसताच आर्थिक विकास नसून समाजाचा सर्वांगाने विकास होणे होय. जगात तीन प्रकारच्या विकासाच्या विभागात विविध देशांची विभागणी करता येईल.

विकसीत, विकसनशील, अविकसनशील असे विकासाचे टप्पे दिसून येतात. भारतात असे अनेक राज्ये आहेत की, ज्यांचा विकास वेगाने झाला आहे. पण असे ही राज्य आहेत की ज्यांचा अजूनही विकास झाला नाही. ते आर्थिक, राजकीयदृष्ट्या मागासलेले आहेत. तो विकासाचा अनुशेष दूर करण्यासाठी शासन विविध योजना राबविते आहे. ज्याद्वारे मागास भागाचा विकास घडून आणता येईल.

### ४.२.१ प्रादेशिक असमतोल :

विकास ही प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचा सामाजिक आणि आर्थिक अशा दोन्ही घटकांशी त्याचा संबंध येतो. म्हणून विकासाचा शास्त्रीय अर्थ पुढील व्याख्यामधून स्पष्ट होतो.

**(i)** गुन्नार मिर्डाल – यांनी विकासाचा अर्थ स्पष्ट करतांना असे म्हटले आहे, तांत्रिक मूल्याचा विकास आणि प्रामुख्याने आर्थिक सामाजिक व राजकीय स्तरावर त्याचा उपयोग करणे होय.

**(ii)** जान ड्रेण्नोव्स्की – विकास ही सामाजिक आणि आर्थिक वास्तविकतेच्या संख्यात्मक आणि गुणात्मक वृद्धी व परिवर्तनाची एक प्रक्रिया असून, त्या प्रक्रियेस सामाजिक व आर्थिक विकास प्रक्रिया म्हणता येईल.

**(iii)** यू. एन. ओ. –

अशा देशास विकसनशील देश म्हणता येईल की ज्यामध्ये प्रतिव्यक्ती वास्तविक उत्पन्न हे संयुक्त राज्य अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, पश्चिम युरोपच्या प्रतिव्यक्ती वास्तविक उत्पन्नाच्या तुलनेत कमी आहे.

अशाप्रकारे विकास म्हणजे केवळ आर्थिक विकास नाही. तर सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रातील विकास अभिप्रेत आहे. म्हणून सर्वांगीण क्षेत्रात विकास घडून येणे म्हणजेच विकास होय.

**विकासाची वैशिष्ट्ये –**

विकासाचा अर्थ आणि व्याख्या लक्षात घेता विकासाची काही वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.

**(१) दीर्घकालीन प्रक्रिया –**

कोणत्याही प्रकारचा विकास किंवा बदल अतिशय कमी काळात होत नाही. तर विकासाच्या बाबतीत हे सत्य आहे. विकास ही दीर्घ म्हणजे जास्त काळापर्यंत चालणारी प्रक्रिया आहे. म्हणून विकास हा क्रमाक्रमाने घडत असतो.

**(२) क्रांतिकारी प्रक्रिया –**

विकास ही क्रांतिकारी प्रक्रिया आहे. म्हणजे एका अवस्थेतून प्रगत अशा अवस्थेत तिचा प्रवास असतो.

**(३) व्यापक प्रक्रिया –**

विकास सर्व अंगाना व्यापणारी प्रक्रिया आहे. तिचे गुणात्मक आणि गणनात्मक असे दोन भाग केले जातात. या दोन भागात परस्पर संबंध प्रत्ययास येतात.

**(४) विकासात विविध पायऱ्यांचा समोवश –**

विकासात एकापेक्षा अनेक पायऱ्या असतात. त्या पायऱ्यामध्ये एक विशिष्ट क्रम बसतो. प्रथम, द्वितीय, तृतीय असा एक विशिष्ट क्रम विकासात दिसतो.

**(५) बहुमितीय प्रक्रिया –**

विकास प्रक्रियेत समाजाच्या विविध अंगामध्ये परिवर्तन घडते. ती एक प्रकारे संज्ञात्मक व्यवहारवादी आणि संस्थागत वरच्या श्रेणीकडे जाणारी प्रक्रिया आहे.

**(६) उन्नत प्रक्रिया –**

उत्क्रांती आणि प्रगती प्रमाणेच विकास ही उन्नत म्हणजे उर्ध्वगामी प्रक्रिया असते. या प्रक्रियेत सातत्य असावे अशी अपेक्षा केली जाते. परंतु बऱ्याचवेळा चढउतारांचा प्रत्यय येतो. इतके मात्र निश्चित असते की वरच्या टप्प्याकडे जाणारे परिवर्तन घावे अशी आखणी केलेली असते.

**(७) प्रगतिशिल प्रक्रिया –**

विकास प्रक्रिया ही निव्वळ उन्नत प्रक्रिया नसते तर त्या प्रक्रियेतून समाजाचे भौतिक आणि सांस्कृतिक जीवनाचे समृद्धीकरण होते म्हणजे विकासातून प्रगतीकडे वाटचाल अपेक्षित असते.

## प्रादेशिक असमतोल

### (१) ऐतिहासिक पार्श्वभूमी –

प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न ही विकासात्मक समस्या आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच भारतात प्रादेशिक असमतोलाचे प्रश्न निर्माण झालेले होते. ते म्हणजे ब्रिटीश राजवटीत रेल्वेमार्गाची निर्मिती झाली. ब्रिटीशांनी भारतात रेल्वेमार्ग विकासाच्या हेतूने निर्माण केलेले नाहीत तर त्यांनी त्यांच्या व्यापार व उद्योगात वाढ करण्याच्या हेतूने रेल्वेमार्ग निर्माण केले. विमानतळ, रस्ते, समुद्रक्रिनावरील बंदरे याबाबतही असेच म्हणता येईल. ब्रिटीशांनी व्यापार–उद्योगाच्या दृष्टीने पायाभूत सुविधा काही मोजक्या शहरामध्येच निर्माण केल्या. परिणामत: भारतात काही भाग विकसीत व काही भाग अविकसित अशी स्थिती निर्माण झाली म्हणून प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न हा ब्रिटीश राजवटीचा वारसा आहे असे म्हटले जाते.

भारताने स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक नियोजनाचा मार्ग स्विकारला नियोजनबद्ध विकास कार्यक्रमातून असमतोलाच्या प्रश्नाचे निराकरण होईल किंवा या प्रश्नांची तीव्रता कमी होईल अशी अपेक्षा होती. स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या दोन व तीन दशकामध्ये प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न फारसा समोर आला नाही. कारण तो कालखंड विकासाच्या प्रक्रियेने मूळ धरण्याचा चौथी, पाचवी, सहावी अशा एकेक पंचवार्षिक योजना पूर्ण होत गेल्या तसतसा प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न अधिकाधिक तीव्रतेने समोर येऊ लागला. या दृष्टीने प्रादेशिक असमतोल ही विकासात्मक समस्या मागील दोन दशकामधील आहे.

### (२) प्रादेशिक असमतोलाचा अर्थ –

विकासाचा विचार करीत असताना जसा विकास सर्वांगीण पाहिजे. त्याचप्रमाणे विकासात प्रादेशिक असमतोल साधला गेला पाहिजे. अविकसीत भागाच्या विकासाकरीता अग्ररूप दिला पाहिजे. परंतु प्रत्यक्षात तसे दिसत नाही. याउलट विकसित भागाचाच अधिक विकास होतो व अविकसित देश मागे राहतात. म्हणून प्रादेशिक असमतोल हा केवळ एका राज्यापुरता मर्यादित प्रश्न नसून आंतरराष्ट्रीय राष्ट्र व राज्य पातळीवरही त्याचे स्वरूप दिसते.

प्रादेशिक असमतोल निर्माण होण्यासाठी तेथील नैसर्गिक साधनसंपत्ती, भूमी, पर्जन्य, नद्या, भांडवल, उद्योगधंद्यासाठी लागणारी मानसिकता इत्यादी घटकांचा प्रभाव दिसतो. कारण देशाचा जलद आर्थिक विकास करण्यासाठी मोठमोठे उद्योगधंदे स्थापन करण्यात आले. नागरी क्षेत्रात विविध उद्योगधंदे आणि विविध प्रकल्प सुरू करण्यात आले. परिणामी कलकत्ता, दिल्ली, मुंबई, अहमदाबाद इ. नगरामध्ये उद्योगाचे केंद्रीकरण झाले. त्यामुळे व्यवसाय, रोजगार इ. उद्योगांसाठी लोक शहराकडे स्थलांतरीत झाले. मोठमोठ्या शहरामध्ये बाजारपेठा, वाहतुकीच्या सोयी, रोजगार इ. बाबी उपलब्ध असल्यामुळे आर्थिक विकासाच्या योजना येथे सुरू करण्यात आल्या. त्याचा परिणाम म्हणून शहराचा व त्याच्या सभोवतालच्या परिसराचा विकास झाला; परंतु त्या तुलनत इतर क्षेत्राचा विकास झाला नाही. त्यामुळे प्रादेशिक विषमता निर्माण झाली.

प्रादेशिक विषमता एखाद्या प्रदेशापुरती मर्यादित न राहता त्यांचे अस्तित्व सर्वच

स्तरावर दिसून येते. प्रादेशिक विषमतेमुळे लोकामध्ये असंतोष निर्माण होतो. त्यातून प्रादेशिक वादाची समस्या निर्माण होते. विकासात्मक प्रक्रियेतून ज्या अनेक समस्यांची निर्मिती झाली, त्यापैकी प्रादेशिक वाद एक प्रश्न आहे.

**भारतातील प्रादेशिक विषमता**

विकासाच्या बाबतीत अभ्यास करताना असे दिसते की जेव्हा विकास हा एका राज्याच्या एका क्षेत्रातच दिसतो आणि त्याच राज्यातील दुसऱ्या हिस्साचा विकास होत नाही याला प्रादेशिकवाद मानले जाते. काही घटकांच्या आधारे प्रादेशिक विषमता स्पष्ट करता येईल.

**(१) लोकसंख्येची घनता –**

भारतीय समाजाची सरासरी घनता ३२५ व्यक्ती प्रती चौरस किलोमीटर आहे; परंतु या दृष्टीने विचार केल्यास आपणास प्रादेशिक विषमता दिसून येते. ज्याप्रमाणे दिल्ली आणि चंदीगडमध्ये घनता ६,३०० व ७,९०० व्यक्ती आहे की जी सर्वात जासत आहे. सर्वात कमी घनता अरुणाचल प्रदेशात असून, ती केवळ १३ व्यक्ती आहे. म्हणजेच एक चौ. कि. मी. मध्ये १३ व्यक्ती निवास करतात. इतर काही राज्यांची घनता पुढीलप्रमाणे – केरळ – ८१९, पश्चिम बंगाल – ९०३, बिहार – ८८१, उत्तरप्रदेश – ६९०, आसाम – ३४०, पंजाब – ४८३, आंध्र – २७७, मध्यप्रदेश – १९६, राजस्थान – १६५ इत्यादी.

**(२) उद्योग –**

आधुनिक काळात भौतिक विकासाच्या दृष्टीने औद्योगिक विकासाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. म्हणून उद्योगधंद्यांच्या दृष्टीने विशेष संपन्न राज्य आहेत की जे देशाच्या एकूण औद्योगिक उत्पादनाच्या २५ टक्के उत्पादन करते. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, गुजरात, उत्तरप्रदेश, बिहार, झारखंड, मध्यप्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक व आंध्रप्रदेश मिळून एकूण औद्योगिक उत्पादनाच्या ८३.५२ टक्के उत्पादन करतात तर शिल्लक असलेली राज्य, केंद्रशासित प्रदेश मिळून केवळ १६.५ टक्के उत्पादन करतात. अशाप्रकारे १२ राज्य औद्योगिकदृष्ट्या संपन्न असून बाकी मागासलेली आहेत.

**(३) साक्षरता –**

भारतात साक्षरतेच्या दृष्टीने प्रादेशिक विषमता दिसून येते. ज्याप्रमाणे केरळ राज्यात साक्षरतेचे प्रमाण ९०.९ टक्के आहे म्हणजेच देशात सर्वात जास्त आहे. सर्वात कमी प्रमाण बिहारमध्ये ४७.०० टक्के आहे. बाकी राज्यांचे प्रमाण त्याच्या दरम्यान आहे. ज्याप्रमाणे दिल्ली ८३% महाराष्ट्र ७७%, तामिळनाडू ७४%, त्रिपुरा ७३%, मणिपूर ६९%, पश्चिम बंगाल ६९%, कर्नाटक ६७%, मध्यप्रदेश ६४%, उत्तरप्रदेश ५६%, इतके आहे.

**(४) दारिद्र्य रेषा –**

दारिद्र्याच्या दृष्टीने काही राज्य व विभाग संपन्न तर काही मागासलेले आहेत. राज्यात लोकसंख्येच्या प्रमणावर सर्वात जास्त दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांचे राज्य ओरीसा – ४७.१५%, त्यानंतर बिहार – ४२.६०%, मध्यप्रदेश ३७.४३%, सिक्कीम ३६.५५%, आहे. दारिद्र्याच्या टक्केवारीच्या आधारावर जम्मू-काश्मिर, गोवा, पंजाब हे

राज्य संपन्न आहेत. यावरून प्रादेशिक विषमता दिसते.

**(५) दरडोई उत्पन्न –**

भारतात सर्वच क्षेत्रात दरडोई उत्पन्न सारखे दिवसून येत नाही. गोव्यात दरडोई उत्पन्न सर्वात जास्त आहे. जे २००२-०२ मध्ये चालू मूल्यावर आधारित ४९.६७६ रुपये होते. चंदीगढ – ४८,६७४ रुपये, दिल्ली – ४३,७५१, पौंडेचरी – ३६,६६३, पंजाब – २५,६५२, हरियाणा – २४,८२०, महाराष्ट – ‸ २४,७३६, गुजरात – २१,२७६, मध्यप्रदेश – १२,०२७, बिहार – ५४४५ रुपये अशाप्रकारे दरडोई उत्पन्नात विषमता आहे.

**(६) सिंचन सुविधा –**

सिंचन सुविधेच्या बाबतीतही प्रादेशिक विषमता दिसून येते. पंजाब, हरियाणा, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, या राज्यात सिंचन सुविधा चांगली असून गुजरात, कर्नाटक, ओरिसा, राजस्थान, महाराष्ट्र व छत्तीसगडमध्ये सिंचनाच्या सोयी कमी आहेत. महाराष्ट्राचा विचार केला असता पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भ मराठवाड्यात सिंचन सोयी कमी प्रमाणात आहेत.

**महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता**

महाराष्ट्रातील सर्व विभागात सारख्याच प्रमाणात विकास झालेला दिसत नाही. म्हणून प्रादेशिक असमतोल कमी करून सर्वच विभागाचा योग्य विकास व्हाया या उद्देशाने १९५६ मध्ये भारतीय संविधानात दुरुस्ती करून कलम ३७१ (२) अन्वये वैधानिक मंडळाची स्थापना करण्याचा प्रबंध करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात राज्याच्या ४ महसूली विभागात विकासाची पातळी कशी होती, हे दर्शविले आहे. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करण्यासाठी शासनाने १९८३ मध्ये सुप्रसिद्ध अर्थशास्त्र प्रा. वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समिती नियुक्त केली. या समितीने आपला अहवाल १९८४ला शासनाला सादर केला. या समितीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील (कोकण व पश्चिम महाराष्ट्र) असमतोल निश्चित करण्यासाठी ९ आर्थिक क्षेत्राची निवड केली या अहवालावरून असे स्पष्ट झाले की मराठवाडा, विदर्भ कोकण हे मागासलेले प्रदेश म्हणून मान्य करण्यात आले.

प्रा. सीता प्रभू व श्री सरकर यांनी महाराष्ट्रातील जिल्ह्याचा विकास स्तराच्या अभ्यासावरून असे स्पष्ट होते. त्यात महाराष्ट्रातील ११ जिल्हे उच्च विकास पातळीवर, ०३ जिल्हे मध्यम पातळीवर, व १५ जिल्हे न्यूनपातळी विकासावर असल्याचे दिसते. म्हणून विकासातील असतोल संपविण्याच्या उद्देशाने १ मे १९९४ रोजी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक मंडळाची स्थापना करण्याचा प्रबंध करण्यात आली. ही मंडळे राज्यपालांना जबाबदार रातील आणि त्या प्रदेशाचे मागासलेपण दूर करून एकूण महाराष्ट्र विकासाचा प्रादेशिक समतोल साधतील हे निश्चित करण्यात आले. यासंदर्भात शासनाने प्रादेशिक अनुशेष कमी करण्याचा प्रयत्न केला, परंतु ते प्रयत्न अपुरे होते. त्यामुळे प्रादेशिक असमतोल कायम राहीला.

महाराष्ट्र शासनाने मानव विकास अहवाल २००२ मध्य प्रसिद्ध केला. या अहवालाच्या

आरंभी विकासाचा लाभ समप्रमाणात मिळाला नसल्याचे नमूद केले आहे. रस्ते, सिंचन, शिक्षण, आरोग्याच्या सोयी, कुपोषण, पौष्टीक अन्न, अन्य क्षेत्रात विदर्भ मराठवाडा कोकण मागासलेला आहे असे दिसते.

थोडक्यात भारतीय स्तरावर झालेल्या अभ्यासातून आणि महाराष्ट्र राज्यातील उत्तरप्रदेशाचा विचार करता प्रादेशिक असमतोलाचे चित्र सहजपणे दिसते. त्याची कारणे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

प्रादेशिक असमतोलाची कारणे

प्रादेशिक असमतोल आपोआप निर्माण होत नाही. तर प्रादेशिक असमतोल निर्माण होण्यासाठी काही कारणे जबाबदार आहेत ती पुढीलप्रमाणे –

**(१) भौगोलिक घटक –**

कोणत्याही प्रदेशाच्या विकासासाठी भौगोलिक घटकांचे योगदान महत्त्वपूर्ण असते. त्यात काही प्रदेशातील जमीन, पाणी, खनिज, दळण, दळणाची साधने या सर्व बाबी समृद्ध असतात. त्यामुळे त्या भागाचा विकास होतो. परंतु ज्या प्रदेशामध्ये नैसर्गिक साधनांचा अभाव आहे त्या प्रदेशाचा विकास होत नाही. म्हणजे ज्या ठिकाणी डोंगराळ जमिन, पाण्याची कमतरता असेल असे प्रदेश विकासाबाबत मागे राहतात. उदा. पंजाब व राजस्थान प्रदेशातील भौगोलिक घटकात भिन्नता आहे. महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विदर्भातील भौगोलिक घटकातील वेगळेपणा प्रादेशिक असमतोलाचे एक कारण आहे.

**२) ऐतिहासिक घटक –**

विकसनशील देशात असलेली प्रादेशिक विषमता ही ऐतिहासिक घटकामुळे निर्माण झलोली आहे. कारण शासनकर्त्यांनी ज्या भूभागावर राजधान्य व व्यापारी केंद्रे सुरू केली त्या क्षेत्राचा विकास जलदगतीने झालेला आढळतो. अशा क्षेत्रामध्ये कलकत्ता, दिल्ली, मुंबई, नागपूर, मद्रास या शहरांचा उल्लेख करता येईल. शासनकर्त्यांनी सोयीच्या भागाकडे जास्त लक्ष पुरवून इतर विभागाकडे दुर्लक्ष केले. म्हणून महानगरांचा विकास झाला. त्यास ऐतिहासिक घटक कारणीभूत आहेत. म्हणून ऐतिहासिक स्थळे किंवा घटकामुळे काही भागाचा विकास झाला व काही अविकसित राहिले.

**३) उद्योगधंद्याचे केंद्रीकरण –**

ज्या भागात उद्योगाचे केंद्रीकरण झालेले असते त्या भागाचा विकास सहज होतो. कारण त्या ठिकाणी रोजगारांच्या संधी शिक्षणाविषयी सोयी–सुविधा, उच्च पातळीवरील जीवनमान, लहान–मोठे उद्योगधंदे अशा ठिकाणी सुरू असतात. अशा ठिकाणी कच्चा माल, वीज, पाणी, श्रमिक व भांडवलाची गरज असते. अशा सर्व गोष्टी काही प्रदेशात उपलब्ध असतत. त्या प्रदेशाचा विकास होतो. याउलट ज्या विभागात उद्योगधंद्याचा अभाव असतो असे विभाग मागे पडतात. उदा. महाराष्ट्रात मुंबई. ठाणे, पुणे या विभागाचा औद्योगिकीरणामुळे विकास झाला व विदर्भातील काही जिल्ह्यात उद्योगधंद्याचा अभाव असल्यामुळे त्याचा विकास झालेला दिसत नाही. यातून प्रादेशिक असमतोल दिसतो.

**(४) उदासिनता –**

आपल्या प्रदेशाचा किंवा उपप्रदेशाच्या विकासासंबंधी राजकीय नेतेमंडळी उदासीन असतात म्हणून राजकीय मंडळी, उद्योजक उदासिन असले म्हणजे विकासाला गती येणार नाही. कारण प्रादेशिक विकास हा बाह्य घटकावर अवलंबून असतो. विकासासंबंधीच्या विविध योजना असतात या योजनासंबंधीच्या व्यक्ती उदासिन राहून कार्य करीत असतील तर अंदाजपत्रकात त्याची तरतूद होत नाही. परिणामता ज्या विभागातील लोक याबाबतीत सक्रिय असतील त्यांचा विकास होतो व निष्क्रिय आणि उदासिन व्यक्तीचा विकास होत नसून त्याच्यात असमतोल दिसतो.

**(५) नियोजनातील दोष –**

प्रादेशिक असमतालाचे महत्त्वपूर्ण कारण म्हणजे नियोजनातील दोष होय. नियोजनकर्त्यांनी विकासाचा समतोल साधणे, असा उद्देश ठेवला व त्यासंबंधी योजनांची आखणी केली व आवश्यक  तो आराखडा तयार केला तर त्या देशाचा विकास होतो; परंतु मागासलेल्या भागांचा विकास करण्याच्या संदर्भात नियोजनकर्ते लक्ष देत नाहीत. त्या भागात नवीन प्रकल्प सुरू केले जात नाही. म्हणून केंद्र सरकारने मागासलेल्या प्रदेशांचा विचार करून पंचवार्षिक योजनांचे नियोजन केले तर विकासाबाबत प्रादेशिक विषमता निर्माण होणार नाही. परंतु नियोजनातील दोषामुळे प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

**(६) राजकीय इच्छाशक्तीचा अभाव**

आपल्या देशात लोकशाही शासनप्रणाली स्विकारलेली आहे. लोकसभा आणि विधानसभा यात त्या त्या भागाचे आमदार व खासदार त्या भागाचे प्रतिनिधीत्व करतात म्हणून त्यांच्यामागे आपल्या प्रदेशाचा विकास घडवून आणण्याची इच्छाशक्ती असते. ते स्वत: पुढाकार घेऊन आपल्या प्रदेशाचा विकास करतात. उदा. पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांमध्ये इच्छाशक्ती मोठी असल्यामळे पश्चिम महाराष्ट्राचा विकास झाला. तर विदर्भातील नेते मंडळीमध्ये इच्छाशक्तीचा अभाव दिसतो म्हणून विदर्भ विकासापासून वंचित आहे. म्हणून राजकीय इच्छाशक्ती अभावामुळे प्रादेशिक विषमता दिसते.

**(७) प्रयत्नांचा अभाव –**

एखादा प्रदेश नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असला तरी तेथे विकासाच्या प्रयत्नांच्या जाणिवांचा अभाव असेल तर त्या प्रदेशाचा विकास होत नाही. उपक्रमशिलतेचा अभाव, कुशलता संपादन करण्याचा अभाव, प्रेरणा आणि प्रयत्नांचा अभाव यामुळे प्रादेशिक विषमता निर्माण होते काही मानवी प्रयत्नाच्या अभावामुळे काही प्रदेश मागासलेले दिसतात.

**(८) सामाजिक घटक –**

भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र असले तरी भारतात विविध जाती, धर्म, पंथ, प्रांताचे लोक विविध भाषा बोलणारे लोक येथे राहतात. त्यांच्यात सर्व बाबतीत भिन्नता आहे. त्यांच्यात जातीवाद, भाषावाद, धर्मवाद जोपासला जातो. आपला धर्म किंवा भाषा श्रेष्ठ या जातीवादाच्या भावनेतून विकासात अडथळे निर्माण झाले.

**(९) इहवादी प्रेरणाचा अभाव**

विकासाकरीता लोकांच्या मनात इहवादी प्रेरणा प्रभावी असल्या पाहिजेत. मॅक्स पेपरने म्हटल्याप्रमाणे, इहवादी प्रेरणेतून उन्नती साध्य होते परंतु अशा प्रेरणांचा अभाव असेल तर विकासाला महत्त्व दिले जात नाही म्हणून या अभावातून प्रादेशिक असमतोल प्रत्ययास येतो.

**प्रादेशिक असमतोलाचे दुष्परिणाम**

प्रादेशिक विषमतेमुळे व्यक्ती, कुटुंब आणि समाज व देशावर वाईट परिणाम होत असून, या विषमतेमुळे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक समस्या निर्माण होत आहेत.

**(१) राष्ट्रीय एकात्मतेत अडथळा –**

प्रादेशिक असमतोलामुळे लोकांच्या मनात परस्पराविषयी द्वेषभावना व असंतोषाची भावना वाढीस लागते. आपल्या प्रदेशामध्ये इतर लोक अडथळे आणत आहेत अशा भावनमुळे ताण–तणाव आणि अशांतता निर्माण होऊन राष्ट्रीय एकात्मतेस अडथळा निर्माण होतो.

**(२) सामाजिक समस्याची तीव्रता –**

प्रादेशिक विषमतेचा आणखी एक वाईट परिणाम दिसून येतो तो म्हणजे आपल्या प्रदेशाच्या भाषेला वाजवीपेक्षा अधिक महत्त्व दिले जाते. त्यामुळे इतर भाषेच्या लोकाबद्दल दुरावा निर्माण होतो. असमतोलामुळे काही क्षेत्राचा विकास मोठ्या प्रमाणात होतो व काही क्षेत्र अविकसित राहतात. अशा ठिकाणी बेरोजगारी, निकृष्ट, जीवनमान, दारिद्य्र, कुपोषण यासारखे जटील प्रश्न निर्माण होतात. अशाा विभागात रूढी, परंपरा, अंधविश्वास मोठ्या प्रमाणात असल्यामुळे तेथे विकासांच्या सोयी सुविधांचा अभाव असतो. त्यातून सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात.

**(३) सामाजिक असंतोष**

प्रादेशिक असमतोलामुळे विशिष्ट भागाचा विकास होतो आणि काही प्रदेशाचा विकास होत नाही. त्यामुळे मागसलेल्या भागातील लोकामध्ये असंतोषाची भावना वाढीस लागते. राजकीय लोक जाणीवपूर्वक आपल्या भागाचा विकास करीत नाहीत. अशाप्रकारची भावना या लोकांमध्ये निर्माण झाल्यामुळे अशा विभागातील व आंदोलन करतात. निवडणूकप्रसंगी आपला असंतोष व्यक्त करतात. त्यातून संघर्ष वाढीस लागतात.

**(४) लोकसंख्येचे स्थलांतर –**

विकसित प्रदेशामध्ये लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध असतात. यांच्या तुलनेत अविकसित प्रदेशामध्ये बेरोजगारी असल्यामुळे साहजीक अशा प्रादेशातील लोक रोजगार, शिक्षण, उद्योग, व्यवसाय व उपजिविकेसाठी अशा व्यक्ती आपला प्रदेश सोडून इतर प्रदेशामध्ये स्थलांतर करतात. उदा. मुंबई, पुणे, अहमदाबाद अशा ठिकाणी स्थलांतर अधिक असल्यामुळे झोपडपट्टी, गलिच्छवस्ती, प्रदूषण, गुन्हेगारीसारखे प्रश्न वाढत आहेत.

**(५) आर्थिक मागासलेपणा –**

प्रादेशिक असमतोलाचा वाईट परिणाम त्या प्रदेशातील लोकांच्या आर्थिक परिस्थितीवर होतो. मागासलेल्या प्रदेशाचा विकास न झाल्यामुळे तेथील लोकांना रोजगाराच्या संधी

उपलब्ध होत नाहीत म्हणून अशा प्रदेशामध्ये दारिद्र्य, गरीबी, बेकारी, कुपोषण, आरोग्यासंबंधी प्रश्न निर्माण झाल्यामुळे त्या भागातील लोकांची आर्थिक परिस्थिती हलाखीची होते. अशा असमतोलामुळे येथील लोक आर्थिकदृष्ट्या मागासलेले दिसून येतात.

**(६) विभाजनाच्या चळवळी –**

प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी शासन आपल्यासाठी काहीही करीत नाही. राज्यकर्ते व शासन आपले केवळ शोषण करते याची जाणीव लोकांना झाल्यास लोक आपला प्रादेशिक स्वतंत्र करण्यासाठी चळवळी करतात. मध्यप्रदेशातील छत्तीसगड हा प्रदेश नैसर्गिक संसाधनांनी समृद्ध असून मागासलेला होता. म्हणून तेथील लोकांनी स्वतंत्र राज्याची मागणी केली. झारखंडाच्या लोकांनी झारखंड स्वतंत्र राज्य निर्माण केले. महाराष्ट्रात विदर्भ हे स्वतंत्र राज्य निर्माण व्हावे यासाठी तेथील लोक प्रयत्न करीत आहेत. म्हणजे या विषमतेमुळे राज्याचे विभाजन होत असून, विघटनाची प्रक्रिया सुरू झालेली आहे.

**(७) केंद्र व राज्यशासन संबंधात कटूता –**

प्रादेशिक विषमतेमुळे केंद्र व राज्यसरकारमधील संबंधात कटुतेची भावना वाढीस लागते. कारण प्रत्येक प्रदेशामध्ये स्वार्थी समूह असतत. म्हणून त्या ठिकाणची नेते मंडळी, उद्योगपती व राजकीय पुढारी आपल्या प्रदेशाच्या स्वार्थासाठी प्रयत्न करतात. राज्य आणि केंद्र सरकारचे लक्ष आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात. अशा परिस्थितीत केंद्र सरकार एखाद्या प्रदेशाच्या विकासासाठी जर अधिक प्रयत्न करत असेल तर तेथे वाद निर्माण होतात. म्हणून अशा गोष्टीमुळे केंद्र व राज्य सरकारच्या संबंधात सौजन्य राहात नाही.

प्रादेशिक असमतोल कमी करण्याचे उपाय

प्रादेशिक असमतोलाचे समाज आणि देशावर होणारे परिणाम लक्षात घेऊन प्रादेशिक असमतोल कसा कमी करता येईल यासठी काही उपाययोजना सुचविलेल्या आहेत.

**(१) खासगी उद्योजकांना परवानगी व सहकार्य –**

ज्या प्रदेशात उद्योगधंद्याचे केंद्रीकरण झालेले आहे, त्यापेक्षा जे विभाग याबाबतीत मागे आहेत त्या भागात उद्योगधंदे सुरू करण्यासाठी शासनाने प्रोत्साहन दिले पाहिजे. मागासलेल्या भागाच्या विकासासाठी खासगी उद्योजकांना आकर्षित करून अशा उद्योजकांना वीज, पाणी, भांडवल इ. गोष्टी सवलतीच्या दराने उपलब्ध करून दिले पाहिजे. त्या उद्योगधंद्यासाठी परवानगी दिली पाहिजे. करसवलत, अनुदान, कर्जे इत्यादी प्रलोभन देऊन त्यांना सहकार्य केले तर त्यांना प्रोत्साहन मिळेल.

**(२) संस्कारक्षम शिक्षणप्रणालीचा विकास –**

शाळा, महाविद्यालयातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनावर राष्ट्रनिष्ठा रुजविण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. अभ्यासक्रमात संकुचित निष्ठा, जाती, असमानता, राष्ट्रीय एकात्मतेस अडथळा आणणाऱ्या अशा गोष्टी अभ्यासक्रमात न ठेवता, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, बुद्धीचा विकास कसा होईल असे संस्कार करणारे शिक्षण दिले गेले पाहिजे.

**(३) आर्थिक तरतूद –**

प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी अविकसित प्रदेशासाठी आर्थिक तरतूद केली पाहिजे. विविध योजनांची आखणी करताना उपलब्ध साधनसामग्रीचा विकचार करून विकसित प्रदेशापेक्षा अविकसित प्रदेशाकडे पैसा वळविला तर त्या प्रदेशाच्या विकासासाठी मदत होईल.

**(४) निकोप प्रादेशिक भावनेची जपणूक –**

भारत हा खंडप्राय देश आहे. त्यात विविध राज्याचा सहभाग आहे. म्हणून प्रत्येक राज्याला आपला व्हावा असे वाटणे स्वाभाविक आहे. परंतु संकुचित दृष्टीकोन आणि द्वेषभावना वाढणार याची काळजी घेऊन सर्व राज्याप्रति आपलेपणाची भावना वाढीस लाउन स्वयंप्रेरीत व आत्मनिर्भय व्हावे अशी भावना वाढीस लावली पाहिजे.

**(५) शासनाचे वित्तीय धोरण –**

प्रादेशिक विकासाकरिता वित्तीय मदत करणे हे शासनाचे प्रथम कर्तव्य आहे. म्हणून वित्तीय संस्थांच्या धोरणाद्वारे मागासलेल्या क्षेत्रांना वित्तीय संशोधने पुरविली जातात. व्यावसायिक बँका, सहकारी संस्था, एलआयसी, औद्योगिक विकास बँक या संस्थांच्या माध्यमातून मागासलेल्या भागांना मदत करण्यात यावी.

**(६) नियोजन –**

प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी नियोजन अतिशय महत्त्वाचे आहे. आपल्या विभागाच्या विकासाकरिता सामाजिक व आर्थिकदृष्ट्या नियोजनाची गरज असते. म्हणून मागासलेल्या भागाच्या विकासाकरिता लाभदायक ठरते. या नियोजनात स्थानिक लोकांचा सहभाग असला पाहिजे.

**(७) वंचितेची भावना जगविणे –**

प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी त्या विभागातील लोकांमध्ये वंचिततेची भावना निर्माण झाली पहिजे. काही गोष्टींच्या अभावामुळे आपण मागासलेले राहिलो. अशा प्रकारची जाणीव त्या विभागातील प्रत्येक घटकापर्यंत झाली पहिजे. त्यासाठी सभा, संमेलन, चर्चासत्र, वृत्तपत्रामधून लेख, निवेदन दिली तर एकाप्रकारे दबावगट निर्माण होऊन अशा विभागांना शासनाकडून मदत मिळेल.

**(८) राजकीय इच्छाशक्ती –**

प्रत्येक विभागचा विकास घडवून आणावा लागतो. तो सहजासहजी होत नाही म्हणून त्या त्या विभागाच्या विकासाकरिता त्या त्या विभागातील शासनकर्त्यांची विकास करायची इच्छाशक्ती असली पहिजे. अशा विभागात दप्तर दिरंगाई, उदासिनता, सोयीसुविधा आणि योजना नियोजनाचा अभाव असेल तर त्या प्रदेशाच्या विकासात अडथळे येतात. म्हणून अशा प्रदेशाच्या विकासाकरिता राजकीय, लोकांची इच्छाशक्ती वाढली पाहिजे.

## ४.२.२ मैल्यशिक्षण आणि मूल्यशिक्षणाच्या समस्या / संघर्ष

जीवन जगण्याचा सर्वसामान्य नियम म्हणून मूल्यांची व्याख्या सांगता येईल. कारण

मानवाचे वर्तन कसे असावे याविषयीचे आदर्श समाजाने निर्माण केलेले असतात. याच आदर्शांना मूल्य असे म्हणता येईल. प्रत्येक समाजात विविध प्रकारची मूल्य असतात. समाजातील मूल्यांचा व्यक्तीवर विशेष प्रभाव असतो.

सामाजिक मूल्य ही समाजाला मार्गदर्शन करतात आणि व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवतात. म्हणून सामाजिक मूल्य ही समाजातील मापदंड आहेत की ज्या मूल्यांच्या आधारे कोणती गोष्ट योग्य कोणती अयोग्य किंवा चांगले वाईट हे मूल्यांच्या आधारे ठरविले जाते. काय करावे किंवा काय करू नये याचे याबाबत मूलय व्यक्तीला मार्गदर्शन करतात. समाजातील मूल्यांना सामाजिक मान्यता असते. म्हणून लोकांनी प्रचलित मूल्यानुसार वर्तन केले पाहिजे. अशी समाजाची अपेक्षा असते.

सर्वच समाजातील मूल्य एकसारखी नसतात. प्रत्येक समाजाचे सण, समारंभ, रूढी, परंपरा आणि संस्कृतीनुसार वेगवेगळ्या समाजात वेगवेगळी मूल्य असतात. मूल्याच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

प्रत्येक समाजात काही आदर्श असतात. त्या आदर्शावर समाजातील काही गोष्टीचे मूल्यमापन केले जाते. याचा अर्थ योग्य अयोग्य, चांगले वाईट, यातील फरक प्रचलीत मूल्यावरून केला जातो. असे आदर्श प्रत्येक समाजात असतात. या आदर्शांना मूल्य असे म्हटले जाते.

समाजात जीवन जगताना व्यक्ती व्यक्तीमध्ये परस्परसंबंध दर्शविणारी व सामाजिक संस्थांना पायाभूत ठरविणारी जी तत्त्व असतात त्यांना नीतीमूल्ये म्हणतात. या मूल्याचे काही प्रकार आहेत. व्यक्तीगत मूल्ये, सामाजिक मूल्ये, आर्थिक मूल्ये, राजकीय मूल्ये, धार्मिक मूल्ये इत्यादी मूल्ये सांगता येतील. या मूल्यामुळे समाजाला मार्गदर्शन मिळते म्हणून मूल्यांचे आचरण केले पाहिजे. मूल्यांच्या आचरणाशिवाय समाज टिकू शकत नाही. या दृष्टीकोनातून मूल्य शिक्षणाची गरज वाटते.

समाज जीवनामध्ये मूल्यांना विशेष महत्त्व दिलेले आहे. मूल्ये ही सामाजिक संबंधांना संतुलित करून सामाजिक व्यवहारामध्ये एकरूपता निर्माण करण्यास मदत करतात. मूल्ये ही व्यवहाराचे प्रमाण किंवा मापदंड आहे असे समजले जाते. म्हणून समाजातील सदस्यांनी व्यवहाराचे प्रतिमान कायम ठेवावे. कारण त्यातूनच सामाजिक जीवनात एक्ता निर्माण होते.

आधुनिक काळात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार, औद्योगिककरण, शहरीकरण, आधुनिकीकरण, यामुळे समाजात नवीन विचार निर्माण होतात या नवीन विचारांचा नवीन पिढीवर विशेष प्रभाव असतो. त्यामुळे जे आपल्या समाजातील प्रचलीत मूल्यांचा विचार नवीन विचारांच्या संदर्भात करतात. वरील सर्व गोष्टींमुळे भारतीय समाजातील समूहवादी दृष्टीकोन कमी होऊन व्यक्तीचाही दृष्टीकोन वाढत आहे. आज समूहापेक्षा व्यक्ती महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे व्यक्तिगत स्वार्थ वाढीस लागलेला आहे. त्यामुळे भारतीय समाजात विविध समस्या वाढील लागल्या. एकंदरीत मानवी जीवनाचा पाया ढासळत चालला त्यातून सूटका करावयाची असेल तर मूल्यशिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही.

गुण, तत्त्व, विचार, नियम, प्रेरणा, संकेत या गुणामुळे व्यक्ती आणि समाज यामध्ये परस्पर संवाद साधला जाऊन सर्वांचा विकास होतो. ती तत्त्वे म्हणजे मूल्य होत. सर्व समाज किंवा धर्मातील मानवी कल्याणाचा विचार ही मूल्येच आहेत म्हणून संताच्या शिकवणुकीतून मूल्यांचे संस्कार होतात. आपल्या भारतीय संविधानात न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही श्रेष्ठ मानवी मूल्य आहेत.

समाजातील सर्व घटकाकरिता श्रेष्ठ आणि उदात्त कारणासाठी कल्याण बुद्धीने व स्वार्थविरहीत वृत्तीने ते त्यागाची प्रेरणा देते . त्यांना अध्यात्मिक मूल्ये म्हणता येईल. इतरांशी योग्य रितीने वर्गात करण्यास मदत करतात. त्यांना नैतिक मूल्य म्हणता येईल.

मूल्य म्हणजे माणसाच्या अंगी असलेल्या सद्गुणांची जोपासना करणे यासाठी ज्या शिक्षणाचा उपयोग केला जातो ते शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण होय. संस्कारक्षम वर्तन म्हणजे मूल्यशिक्षण होय. संस्कृतीची जोपासना करण्यासाठी ज्या संस्काराची गरज लागते ते संस्कारमय शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण होय.

**१ मूल्यांच्या व्याख्या**

### (१) डॉ. राधाकमल मुखर्जी –

''मूल्ये ही समाजास मान्यताप्राप्त अशी इच्छा आणि उद्दिष्टे की ज्यांचे अंतरीकरण हे शिकणे आणि समाजीकरणाच्या प्रक्रियेच्या माध्यमातून होते आणि जे विषयनिष्ठ अधिमान्यता मानक आणि उपेक्षा बनतात.''

### (२) हॅरी जॉन्सन आणि मुखर्जी –

''मूल्ये म्हणजे अशी मापदंड की ज्याच्या आधारे कोणती गोष्ट योग्य वा अयोग्य, चांगली किंवा वाईट याबाबतचा निर्णय घेतला जातो.''

मूल्याचा अर्थ

मूल्यशिक्षणाची उद्दिष्टे

व्यक्तीमध्ये योग्य बदल घडवून आणणारी एक प्रक्रिया म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. म्हणून कुटुंब, शाळा, समाज यांच्या माध्यमातून नवीन पिढीवर मूल्याविषयीचे संस्कार रुजविले जातात.

१) समाजाचा एक घटक म्हणून सामाजिक बांधिलकी मानणे, समाजऋण मानने, त्यांची परतफेड ठेवण्याचे भान ठेवणे, सामाजिक एकसंघटता, सर्वधर्म सहिष्णुता यासाठी आवश्यक त्या मूल्यांचा संस्कार करणे.

२) शाळा, महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना मूल्यांचे ज्ञान देणे. योग्य वृत्ती अंगी बाणविणे. योग्य वर्तन घडवून आणणे. शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करणे त्यातून संस्कार घडविणे.

३) स्वतंत्र राष्ट्राचा नागरीक म्हणून राष्ट्रभक्ती अंगी बाणणे. राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय विकास यासाठी पोषक अशा मूल्यांचा संस्कार करणे.

४) आपण ज्या परिसरात राहतो, त्या परिसरातील कलाकृती, निसर्ग, प्राणीमात्र यांचे

संरक्षण, त्यांची जोपासना करणे, त्यांच्याबद्दल प्रेम वाढीस लावणे यासाठी आवश्यक त्या मूल्यांचा संस्कार करणे.

५) कुटूंबातील एक घटक म्हणून इतर व्यक्तीशी आदरयुक्त व जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक त्या मूल्यांचा स्विकार करणे.

६) समाजाचा एक घटक म्हणून सामाजिक बांधिलकी निर्माण करणे, समाजऋण मानणे.

७) व्यक्तीच्या सामाजिक, व्यावसायिक आणि सांस्कृतिक कार्यक्षमता क्षमता वाढविणे व त्यासाठी कार्यक्षम बनविणे.

८) आपल्या मातृभूमिविषयी स्वाभिमान वाटेल अशा मूल्यांचे शिक्षण देणे.

९) सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, ऐतिहासिक वारसा जोपासण्याचे मूल्य शिक्षण देणे.

१०) सत्यप्रियता, परस्पर सहकार्य, प्रेम शांतता, अहिंसा, समता, न्याय, प्रतिष्ठा, बंधुभाव हे सदगुण निर्माण करणे.

११) धर्म, भाषा, जात, लिंग याविषयीच्या अपसमजातून बाहेर पडून विचार व आचार यात समजूतदारपणा व उदारता आणण्याचा प्रयत्न करणे.

१२) सर्वधर्म समभाव लक्षात घेऊन सवगड्याबरोबर काम करणे, खेळणे, एकमेकांच्या वस्तूंची, सामोपचाराने देवाण-घेवाण करणे. सामाजिक गुण संपादन करण्यासाठी मूलावर संस्कार करणे.

१३) स्वत:विषयी व स्वकियाबद्दल स्वत:च्या देशाबद्दल, इतर देशातील व्यक्तीबद्दल, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सामंजस्याकरिता अन्य जीवाबद्दल, सृष्टीविषयी व सर्वधर्माबद्दल अनुरूप अभिवृत्ती निर्माण करण्यास मदत करणे.

**मूल्यशिक्षणाचे महत्त्व –**

मूल्यशिक्षण हे प्राचिन काळापासून परंपरागत पद्धतीतून आलेले शिक्षण आहे. कारण पूर्वीच्या काळी समाजात आश्रमपद्धती होती. गुरुकुल पद्धतीतून विद्यार्थ्यांना धार्मिक आणि व्यावसायिक शिक्षण दिले जाई. या शिक्षणातून व्यक्तीवर संस्कार केले जात असत. म्हणून व्यक्तीच्या चरित्र्याची घडण करताना संस्काराचे विशेष महत्व आहे.

मानवामध्ये सदगुणांचा विकास होण्यासाठी जी क्रिया घडते तिला संस्कार म्हणतात. म्हणून संस्कार म्हणजे जीवनमूल्ये जोपासणे होय. या जीवनमूल्यांच्या शिक्षणाला नैतिक शिक्षण म्हटले जाते. व्यक्तीच्या जीवनाला दिशा देण्याचे काम नैतिक शिक्षण करते. काळानुसार या शिक्षणात बदल होऊन त्याचा विस्तार झाला. या शिक्षणाला मूल्यशिक्षण असे म्हणता येईल.

आधुनिक समाजात लोकसंख्या, भ्रष्टाचार, दहशतवाद, गुन्हेगारी, बेकारी अशा अनेक समस्यांमुळे जनजीवन त्रस्त झालेले आहे. समाजव्यवस्थेत बिघाड झालेला आहे. त्यामुळे नैतिक, सामाजिक , आध्यात्मिक मूल्याचा ऱ्हास झालेला आहे. म्हणून भविष्यातील नागरिकांना घडविण्यासाठी नैतिक शिक्षणाची गरज आहे.

नैतिकता हाच शिक्षणाचा आत्मा आहे. कुटुंब, शाळा. समाज व व्यक्तीमत्वाच्या

विकासासाठी मूल्यशिक्षण महत्त्वाचे आहे. आनंद प्राप्तीकरिता मूल्यशिक्षण महत्त्वाचे आहे. सहनशीलता, त्याग, परोपकार, अहिंसा, दया, समाजसेवा, आसक्ती, कर्तव्यपरायणता या ऋणांच्या संचयासाठी मूल्यशिक्षणाची गरज आहे.

आचरणाने संस्कार बनतात. संस्कारांनी चारित्र्य बनते. सामाजिक चारित्र्यासाठी मूल्यशिक्षण महत्त्वाचे ठरते. मनुष्याला आदर्श नागरिक बनविण्यास मदत करते ते मूल्यशिक्षण होय. मानवास नम्र, सज्जन, इमानदार बनविण्यासाठी त्याची योग्य व्यक्तिमत्त्वात घडण करण्यासाठी मूल्यशिक्षण महत्त्वाचे आहे.

न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता याला पोशक कार्य करून सर्वजण हिताय सर्वजन सुखाय कार्य करेल. त्याचे आदर्श नागरिकात रूपांतर होईल म्हणून आदर्श नागरीक निर्माण करण्यासाठी मूल्यशिक्षण महत्त्वाचे आहे.

**मूल्यांचे प्रकार**

समाजातील व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असतात. त्याप्रमाणे प्रत्येक समाजाची मूल्य वेगवेगळी असतात.

**(१) वैयक्तिक मूल्ये –**

व्यक्तीमत्त्वाचा विकास करण्यासाठी व्यक्ती स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करते. समजातील प्रत्येक व्यक्ती ही आजन्म शिक्षण घेते. समाजातील एक जबाबदार घटक होण्यासाठी त्याला विविध मूल्यांची जोपासना करावी लागते. म्हणून महत्वाकांक्षा, स्वच्छता, धैर्य, सर्जनशिलता, उत्कृष्टता, प्रामाणिकपणा, आत्मविश्वास, आत्मप्रेरणा, साधेपणा ही वैयक्तिक मूल्य आहेत.

**(२) सामाजिक मूल्ये –**

समाजाशी संबंधित असलेल्या मूल्यांना सामाजिक मूल्य म्हणतात. सामाजिक मूल्यही समाजाला मार्गदर्शन करतात आणि व्यक्ती वर्तनावर नियंत्रण ठेवतात. म्हणून सर्वधर्मभाव राष्ट्रीय एकात्मता, समता, बंधुता ही सामाजिक मूल्ये आहेत.

**(३) नैतिक मूल्ये –**

नैतिक मूल्यांचा संबंध व्यक्तीच्या चारित्र्याशी येतो किंवा त्याच्या आचरणाशी त्याचा संबंध. या मूल्यामधून व्यक्ती स्वत:त्यावर नियंत्रण ठेवते. म्हणून प्रामाणिकपणा, एकता, जबाबदारीची जाणीव या मूल्याचा समावेश करता येईल.

**(४) धार्मिक मूल्ये –**

आपल्या देशात विविध धर्म आहेत. म्हणून देशातील सर्वच लोकांनी सर्वधर्माप्रती समान भावना, सहिष्णुता, आदर ठेवणे आवश्यक आहे. राष्ट्राबद्दलची भावना निर्माण करण्यासाठी धार्मिक मूल्य रुजविली पाहिजेत. सर्व धर्माबद्दल आदर, परधर्म, सहिष्णुता, धर्मनिरपेक्षता, ध्यानधारणा, धर्मसेवा ही धार्मिक मूल्य आहेत.

**(५) आर्थिक मूल्ये –**

आपल्या मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी प्रत्येकालाच आर्थोत्पादन करावे लागते. म्हणून आर्थिक परिस्थितीची जाणीव प्रत्येकाला असणे आवश्यक आहे. स्वत:च्या गरजा पूर्ण

करून एक सक्षम नागरिक होण्यासाठी आर्थिक कर्तव्य पार पाडावी लागतात.

**(६) राष्ट्रीय मूल्ये –**

भारताची संस्कृती अलौकीक आहे. विविधतेत एकता हे भारतीय समाजाचे वैशिष्टय आहे. समाजाला एकत्र आणणाऱ्या व राष्ट्रीय भावना निर्माण करणाऱ्या वृत्तीला राष्ट्रीय वृत्ती म्हणतात. संस्कृतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयता निर्माण करणे गरजेचे वाटते म्हणून राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय विकास, राष्ट्रीय ऐक्य, राष्ट्रीय एकात्मता ही सर्व राष्ट्रीय मूल्ये आहेत.

**(७) व्यावसायिक मूल्ये –**

विद्यार्थ्यांच्या विद्यार्थी दशेपासूनच व्यावसायिक मूल्यांचे संवर्धन होणे आवश्यक आहे. त्यामुळे निष्ठा, श्रद्धा, प्रामाणिकपणा ही मूल्ये विकसित होतात. कोणताही व्यवयाय निष्ठेने केला पाहिजे. प्रत्येक कार्य जबाबदारीने पार पाडावयास पाहिजे. आपले कार्य व्यावसायिक मूल्ये पाळून केले तर राष्ट्रीय उत्पन्नाचा दर्जा पाहून राष्ट्रीय कार्याचा दर्जा उंचावण्यास मदत होते.

**(८) पर्यावरण मूल्ये –**

आपण ज्या ठिकाणी राहतो त्या आजूबाजूला असणारे वातावरण म्हणजे पर्यावरण होय. या पर्यावरणातून मानवाला विविध गोष्टी शिकायला मिळतात. त्यात नीटनेटकेपणा व प्रेरणा मिळते. त्यात निसर्गावर प्रेम, वृक्ष लागवड, संवर्धन, पशूपक्ष्यांवर प्रेम, प्राण्यांचे संरक्षण इ. मूल्ये सांगता येतात.

**(९) राजकीय मूल्ये –**

लोकशाही प्रधान देशात प्रत्येक नागरीकाने जबाबदारीने वागणे आवश्यक असते. कारण आपण आपल्या स्वार्थासाठी हक्क सांगतो. कर्तव्यात मात्र मागे राहतो. म्हणून हक्क, कर्तव्य, राजकीय जबाबदरिची जाणीव, स्त्री–पुरुष समानता, लोकशाही मूल्यांची जपणूक ही राजकीय मूल्ये आहेत.

**(१०) मानवतावादी मूल्ये**

जीवन जगताना शेजारी, व्यापारी, कार्यालय, कुटुंब, शाळा इ. ठिकाणी आपले व्यावहारीक संबंध असतात. हे मानवतेचे व्यवहार असतात. आज समाजात मानवतावादी मूल्यांचा ऱ्हास होत आहे. विविध प्रकारचे संघर्ष वाढीस लागून ताणतणाव वाढत आहेत. म्हणून बंधुता, समानता अंगिकारली पाहिजे. निर्भयता, स्वावलंबन, सेवापारायणनता ही मानवतावादी मूल्ये जपली पाहिजेत.

**मूल्ये संघर्ष**

आधुनिक काळात शिक्षणाचा प्रसार व प्रचार विज्ञानाची प्रगती, शहरीकरण, आधुनिकीकरण, व्यक्तीवादी विचारसरणी अशा अनेक कारणामुळे नवीन पिढी नवीन विचाराकडे झुकत आहे. नवीन विचारानुसार आपण वर्तन करावे, असे नव्या पिढीला वाटते; परंतु जुनी मूल्ये त्यांना मान्यता देत नाहीत. म्हणून समाजात रूढ असलेली मूल्ये

जुन्या पिढीला अडचणीची वाटतात. नवीन पिढीने समाजातील रूढ असलेल्या मूल्यानुसार वर्तन करावे अशी अपेक्षा असते. म्हणून नव्या आणि जुन्या पिढीत मतभेद किंवा ताणतणाव निर्माण होतात व संघर्ष वाढीस लागतात त्यातून मूल्यसंघर्ष वाढीस लागतो.

जुनी पिढीत जुन्या मूल्यांना महत्त्व देते तर नवीन पिढी नवीन मूल्यांना महत्त्व दते. जुन्या पिढीत साधे जीवन, काटकसर, त्यागाची वृत्ती, कष्ट या मूल्यांना महत्त्व देते तर नवीन पिढी उच्च राहणीमान, खर्चिक वृत्ती, भडक जीवन, चंगळवादी वृत्ती, सहजसोपा पैसा या जीवनमूल्यांना महत्त्वे देते. म्हणून दोन पिढ्यातील तत्त्वज्ञान मतभेद झाल्यामुळे मूल्यामध्ये संघर्ष निर्माण होतो.

यावरून असे स्पष्ट होते की मूल्यसंघर्ष म्हणजे मूल्याच्या संदर्भात निर्माण झालेले संकट किंवा समस्या होय. पूर्वीच्याकाळी मूल्यसंघर्षाची समस्या एवढ्याप्रमाणात नव्हती. जागतिकीकरणामुळे या समस्येने तीव्र रूप धारण केले आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळे नवीन जीवनशैली निर्माण झाली. म्हणून तरुण वर्ग या जीवन शैलीचा स्वीकार करीत आहे. त्यामुळे परंपरागत मूल्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. अशीच परिस्थिती राहिली तर त्यामधून मूल्यसंघर्ष वाढीस लागतो.

**मूल्यसंघर्षाची कारणे**

मूल्यसंघर्ष आपोआप निर्माण होत नसून त्यासाठी काही कारणे जबाबदार आहेत. ती पुढीलप्रमाणे –

**(१) पश्चिमात्य समाजाचा प्रभाव –**

पूर्वीच्या काळी संयुक्त कुटुंबामधून व्यक्तीला दैनंदिन, व्यावसायिक शिक्षण दिले जात असे; परंतु ब्रिटीश काळापासून भारताच्या औद्योगिकीकरणाला सुरुवात झाली. औद्योगिकीकरण, शहरीकरण यामुळे ग्रामीण व परंपरागत उद्योगधंद्याचा ऱ्हास झाल्यामुळे त्यातील व्यक्ती बेरोजगार झाल्या म्हणून असे लोक शिक्षण कंवा नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने विदेशात जात आहेत. पाश्चात्य जीवनाशी त्यांचा जवहचा संबंध येतो. तेथील समाजजीवन व जीवनशैलीचा प्रभाव त्यांच्यावर पडल्यामुळे समाजातील प्रचलीत मूल्ये त्यांना अयोग्य वाटू लागली त्यातून मूलसंघर्ष वाढीस लागला.

**(२) विज्ञानाची प्रगती**

आधुनिक युग हे विज्ञानाचे युग आहे, असे म्हटले जाते. जगात सतत नवनवीन प्रयोग केले जातात. त्यामुळे नवनवीन शोध लागलेले आहेत. या शोधामुळे विज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड प्रगती झाली. विज्ञानाच्या प्रगतीमुळे समाजात परिवर्तनाची प्रक्रिया घडून येत आहे. नव्या पिढीमध्ये या प्रगतीचा फार मोठा परिणाम झाला असू, समाजातील परंपरागत रूढी, परंपरा, प्रथा, मूल्ये ही अयोग्य वाटत आहेत. म्हणून नवीन पिढी या मूल्यांना झुगारून देत आहे. अशाप्रकारे मूल्यामध्ये संघर्ष वाढीस लागत आहे.

**(३) शिक्षणाचा प्रभाव –**

पूर्वीच्या काळी शिक्षण घेण्याचा अधिकार एका विशिष्ट वर्गाला होता. परंतु

ब्रिटीशकाळानंतर समाजातील सर्व जातीधर्मातील लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकार प्राप्त झाला. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार आणि प्रसार झाला. बहुसंख्य लोक शिक्षण घेऊ लागले. समाजातील उच्चशिक्षित लोकांना परंपरागत समाजातील मूल्ये ही जुनी आणि कालबाह्य वाटू लागली. ती मूल्ये आपल्या प्रगतीच्या आड येतात, असे त्यांना वाटते. म्हणून अशा व्यक्ती त्या मूल्यांचे उल्लंघन करतात. जुनी मूल्य नाकारणे, त्यानुसार वत्य न करणे ही त्यांना प्रतिष्ठा वाटते. याहून मूल्यसंघर्ष वाढीस लागतो.

**(४) प्रसारमाध्यमांचा प्रभाव –**

आधुनिक काळात माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात फार मोठी क्रांती झाली. इलेक्ट्रॉनिक माध्यमे व त्यांचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला. आजची पिढी या माध्यमातून संगणक व इंटरनेटचा उपयोग करून जगात घडणाऱ्या घडामोडीची माहिती त्वरीत प्राप्त होते. त्यामुळे या माहितीचा प्रभाव पडतो. म्हणून नवीन पिढी जुन्या रूढी, परंपरा व मूल्य ही जुनी वाटतात. जगातील बदलत्या परिस्थितीनुसार ते वागतात. म्हणून जुनी मूल्ये नवीन पिढीला अडचणीची वाटतात. त्यामुळे त्या मूल्यामध्ये संघर्ष वाढीस लागतो.

**(५) नवीन जीवनशैलीला महत्त्व –**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आजच्या नवीन पिढीला नव्या जीवनशैलीचे आकर्षण वाटत आहे. नवीन पिढीला आपल्या मतानुसार वागावे आपल्यावर समाजाचे कोणतेही बंधन नसावे. स्वातंत्र्याच्या नावावर मुक्तपणे वर्तन करावे, असेच वर्तन नव्या पिढीला आवडते. अशाप्रकारे नवीन पिढी नवीन जीवनशेलीचा स्वीकार करीत असल्यामुळे जुन्या मूल्यांचे महत्व संपुष्टात येत असून, नव्या आणि जुन्या मूल्यांकडे संघर्ष वाढीस लागत आहे.

**(६) जागतिकीकरणाचा प्रभाव –**

जागतिकीकरणाचा प्रभाव कमी अधिक प्रमाणात दिसतो. कारण जागतिकीकरणाच्या माध्यमातून एक नवीन संस्कृती निर्माण होत आहे. या संस्कृतीचे नव्या पिढीला विशेष आकर्षण आहे. या संस्कृतीतून आपली आर्थिक प्रगती हीच खरी प्रगती आहे असे या पिढीला वाटत असल्यामुळे आर्थिक प्रगतीच्या आड येणाऱ्या मूल्यांना ते विरोध करतात व जागतिकीकरणाच्या माध्यमातून उदयास येत असलेल्या नवीन मूल्यांचा स्विकार करतात. यातून मूल्यसंघर्ष वाढीस लागतो.

वरील सर्व कारणामुळे भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून येत आहे. म्हणून परंपागत मूल्ये गैरसोयीची वाटतात व या मूल्यांच्या विरोधात वर्तन करतात. म्हणून मूल्यसंघर्षाची समस्या निर्माण झाली.

**मूल्यसंघर्षाचे परिणाम**

मूल्यसंघर्षाचा समाजावर वाईट परिणाम होते. हा परिणाम अनुकूल आणि प्रतिकूल अशा दोनही स्वरूपाचा आहे.

**(१) सामाजिक नियंत्रणाचा अभाव –**

मूल्य हे सामाजिक नियंत्रणाचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. कारण चांगले, वाईट,

योग्य-अयोग्य हे मूल्यानुसारच ठरविले आहे. म्हणूनच लोक मूल्यानुसार वर्तन करतात. त्यामुळे समाजातील घटकांचे नियंत्रण होते. परंतु मूल्य संघर्षामुळे लोक नियमाचे उल्लंघन करतात. त्यामुळे सामाजिक नियंणाचा अभाव निर्माण होतो.

**(२) रूढी-परंपराचे महत्व कमी -**

मूलससंघर्षामुळे नवीन पिढी समाजात प्रचलीत असलेल्या रूढी-परंपरा चालीरीती, आचारविचार यांना महत्व देत नाहीत. बऱ्याचवेळा या प्रचलीत रूढी-परंपरेच्या विरुद्ध वर्तन करतात. त्यामुळे समाजातील रूढी-परंपराचे महत्त्व कमी होते.

**(३) अराजकता -**

मूल्यसंघर्षामुळे लोक मूल्ये नाकारतात. आपल्या मताला वाटेल त्याप्रमाणे वर्तन करतात. आपल्यावर आपल्या वर्तनावर कुणाचेही नियंत्रण नसावे असे नवीन पिढीच्या लोकांना वाटते. त्यामुळे समाजात अराजकता किंवा स्वैराचार वाढतो. यातून समाजाच्या स्वास्थ्याला धोका पोहोचतो व समाजात विविध समस्या निर्माण होऊन समाज विघटनाला सुरुवात होते.

**(४) मूल्यसंघर्ष -**

मूल्यांच्या संघर्षामुळे प्रत्येक पिढीला आपली मूल्य योग्य आहेत असे वाटते. उदा. जुन्या पिढीला व नव्या पिढीला एकमेकांची मूल्य मान्य नसतात म्हणून या दोन पिढ्यामधील मूल्यसंघर्षाची समस्या निर्माण होते.

**(५) परिवर्तन -**

मूल्यसंघर्षाचा समाजावर केवळ वाईटच परिणाम होत नाही तर नव्या पिढीतील लोक समाजातील नव्या विचारांचा स्विकार करतात त्यामुळे समाजात नवीन विचारप्रवाह निर्माण होतो. समाजातील जुन्या मूल्यामध्ये परिवर्तन होणे समाजाच्या दृष्टीने हिताचे असते. कारण नवीन पिढीतील लोक जुन्या मूल्यांना विरोध करतात. त्यामुळे काळबाह्य मूल्यामध्ये परिवर्तन घडून येते.

**(६) प्रगती -**

समाजाच्या विकासासाठी परंपरागत मूल्यव्यवस्था बदलणे आवश्यक आहे. कारण नवीन मूल्यामुळे नवीन विचारामुळे मूल्यामध्ये संघर्ष निर्माण होतात. परंतु विकासाच्या दृष्टीने ही मूल्ये अनुकूल नसतात म्हणून जुन्या मूल्यांमध्ये बदल होणे ही काळाची गरज असते म्हणून समाजाचा विकास घडवून आणण्यासाठी त्यासाठी आवश्यक असणारी मूल्यव्यवस्था निर्माण होणे आवश्यक असते.

**मूल्यसंघर्षावरील उपाय**

मूल्यसंघर्षामुळे समाजात विविध प्रश्न निर्माण होतात. त्याचा समाजजीवनावर वाईट परिणाम होतो. म्हणून ही समस्या निर्माण होऊ नये म्हणून काही प्रतिबंधात्मक उपाय सूचविता येतील.

### (१) नवीन कायद्यांची निर्मिती –

समाजातील काही मूल्ये खरोखरच चांगली असतात. त्या मूल्यांमुळे समाजातील व्यक्ती मूल्याला अनुसरून वागतात. त्यामुळे समाजाचे स्वास्थ टिकून राहते. परंतु काही लोक या मूल्यांना विरोध करतात. म्हणून समाजाचे स्वास्थ्य संघटन, सातत्यासाठी नवीन कायद्याची निर्मिती झाली पाहिजे म्हणून शासनाकडून कायद्याची निर्मिती करून त्याची कडक अंमलबजावणी झाली पाहिजे.

### (२) मूल्याविषयी सहिष्णूता –

भारतीय समाजात हजारो वर्षापासून परंपरागत पद्धतीने रूढी, परंपरा चालत आहेत. यापैकी काही रूढी, परंपरा या जुन्या आहेत. परंतु त्या प्रथ परंपराचा आदर करणारे काही लोक समाजात आहेत.

## ४.३ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

### (अ) दोन वाक्यात उत्तरे द्या

(१) विकास म्हणजे काय?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(२) प्रादेशिक असमतोल म्हणजे काय?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(३) विकास म्हणजे काय?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(४) असमतोलाची व्याख्या द्या.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

### (इ) टीपा लिहा

(१) प्रादेशिक असमतोल ऐतिहासिक पार्श्वभूमी

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(२) प्रादेशिक असमतोल अर्थ

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(३) भारतातील प्रादेशिक विषमता

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(४) महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

**(उ) दिर्घोत्तरी प्रश्न**

(१) प्रादेशिक असमतोलाची कारणे स्पष्ट करा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(२) प्रादेशिक असमतोलाच्या परिणामाविषयी वर्णन करा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(३) प्रादेशिक असमतोलावर निबंध लिहा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

**४.ब.३ स्वयंअध्ययन प्रश्न**

(अ) दोन वाक्यात उत्तरे द्या

(१) मूल्य म्हणजे काय?

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(२) मूल्य शिक्षण म्हणजे काय?

.........................................................................................

.........................................................................................

.........................................................................................

(३) मूल्य संघर्ष म्हणजे काय?

.........................................................................................

.........................................................................................

.........................................................................................

(४) मूल्याचे प्रकार कोणते?

.........................................................................................

.........................................................................................

.........................................................................................

(५) मूल्यशिक्षणाची व्याख्या द्या

.........................................................................................

.........................................................................................

.........................................................................................

**(इ) टीपा लिहा**

(१) मूल्यांचा अर्थ

.........................................................................................

.........................................................................................

.........................................................................................

(२) मूल्यशिक्षणाची उद्दिष्टे

.........................................................................................

.........................................................................................

.........................................................................................

(३) मूल्यसंघर्षावरील उपाय

.........................................................................................

.........................................................................................

.........................................................................................

(४) मूल्यसंघर्ष

.........................................................................................

.........................................................................................

.........................................................................................

**(उ) दिर्घोत्तरी प्रश्न**

(१) मूल्यशिक्षणाचे महत्व स्पष्ट करा.

.........................................................................................

.........................................................................................

.........................................................................................

(२) मूल्यांच्या विविध प्रकारावर चर्चा करा.

.........................................................................................

.........................................................................................

.........................................................................................

(३) मूल्यसंघर्षाची करणे सांगा

.........................................................................................

.........................................................................................

.........................................................................................

(४) मूल्यसंघर्षाचे परिणाम विशद करा

.........................................................................................

.........................................................................................

.........................................................................................

(५) मूल्यशिक्षणावर निबंध लिहा.

.........................................................................................

.........................................................................................

.........................................................................................

## ४.४ सारांश

(१) नियोजन प्रक्रिया आणि विकास कार्याक्रमांच्या अंमलबजावणीमधील सत्तचे विकेंद्रीकरण.

(२) प्रादेशिक स्तरावर सक्षम वा कार्यक्षम नेतृत्वाचा अभाव केवळ राजकीय नेतृत्वाला

दोष देणे हे काहीसे एकांगी ठरते. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रातील नेतृत्वादेखील घडवून आणण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते.

(३) प्रदेशामधील जनतेची विकासाबाबतची उदासिनता किंवा निष्क्रियता

प्रादेशिक असंतुलनाच्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी लहान आकार असणाऱ्या घटक राज्याची निर्मिती आवश्यक वाटते. तसेच प्रदेशाच्या विकासाबाबत लोकामध्ये जाणीव जागृती करणेही आवश्यक वाटते.

- मूल्यशिक्षण हे मानवाच्या उन्नतीचा आधार समजले जाते.
- विद्यार्थ्यांमध्ये सदाचार कर्तव्यपरायणता आणि सामाजिकता भावनेचा विकास करणे.
- सामाजिक आणि नैतिक मूल्यांच्या विकासासाठी योग्य वातावरण निर्मिती
- भारतीय संस्कृतीची जोपासना करण्यासाठी.
- समाजातील दूराचार थांबविण्यासाठी
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाठी
- चारित्र्यवान नागरीक निर्माण करण्यासाठी
- जीवनातील महत्त्वाची कर्तव्ये समजण्यासाठी
- विद्यार्थ्यांच्या जीवन यशस्वीतेसाठी
- व्यक्ती, समाज किंवा राष्ट्रामध्ये, ईर्ष्या, द्वेष, घृणा इत्यादी निंदनीय भावना नष्ट करून राष्ट्राच्या जीवनवृद्धीसाठी मूल्यशिक्षणाची आवश्यकता.

## ४.५ पारिभाषिक शब्द

(१) मूल्ये – जीवन जगण्याचे सर्वसामान्य नियम

(२) मूल्यशिक्षण – माणसाला माणुसकीचे धडे देऊन माणुसकीचा योग्य मार्ग दाखविण्यासाठी शिक्षण या साधनाचा उपयोग केला जातो तो साधना मूल्य शिक्षण

(३) मूल्य संघर्ष – नवी आणि जुनी पिढीमधील विचारांचा मतभेद

## ४.६ संदर्भग्रंथ

(१) खडसे भा. कि. (२००४) भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, हिमालय पब्लिशिंग हाऊस, गिरगाव, मुंबई, पृष्ठ – १५५

(२) लोटे रा. ज. (२००५) भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, पिंपळापुरे, प्रकाशन, नागपूर, पृष्ठ – २१४

(३) आगळावे प्रदीप (२००३) भारतीय समाज संरचना आणि समस्या, साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृष्ठ – २२५

(४) कऱ्हाडे बी. एम. (२०१०) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर, पृष्ठ – २६९

(५) गंदेवार एस. एन. भारतीय समाज वादातील विषय आणि समस्या, विद्याभारती प्रकाशन, लातूर. पृष्ठ – १४४

(६) माजन जयश्री/तोरवणे डी. एल. (२००८) भारतीय समाज प्रस्त आणि समस्या, प्रशांत पब्लीकेशन, जळगाव, पृष्ठ - १६०

(७) माने माणिक (१९९७) भारतातील समकालीन समस्या, विद्या प्रकाशन, नागपूर

(८) काळदाते सुधा (२००५) भारतीय समाज प्रसत आणि समस्या, विद्या बुक पब्लीशर्स, औरंगाबाद.

(११) खैरनार दिलीप (२००७) आधुनिक भारतातील सामाजिक समस्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

(१०) काचोळे दा. घो. (२००५) कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या

# घटक ५
# असंघटीत समस्या

**अनुक्रमणिका**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ विषय–विवेचन

 ५.२.१ बालगुन्हेगारी

 ५.२.२ मद्यपान

 ५.२.३ भ्रष्टाचार

५.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

५.४ सारांश

५.५ पारिभाषिक शब्द शब्दार्थ

५.६ संदर्भसूची

५.७ सरावासाठी प्रश्न/क्षेत्रिय कार्य

## ५.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

१. बालगुन्हेगारीचा अर्थ व स्वरुप सांगता येईल.

२. बालगुन्हेगारीची कारणे सांगता येईल

३. बालगुन्हेगारीसाठी राबवण्यात येणारे सुधार कार्यक्रमाची माहिती स्पष्ट करता येईल.

४. मद्यपानाबाबत माहिती सांगता येईल.

५. भ्रष्टाचाराबाबत सविस्तर माहिती घेता येईल.

## ५.१ प्रस्तावना

भारतीय समाजव्यवस्थेत बालगुन्हेगारी समस्या दिसून येते. ही फार मोठी सामाजिक समस्या निर्माण झाली आहे. औद्योगिकीकरण व नागरिकीकरणातून विकसित झालेल्या समाजव्यवस्थेत कुटुंब परिवर्तन, नियंत्रणांचा अभाव, गलिच्छ वस्त्या, कुटुंब विघटनाच्या संदर्भात अनुकूल वातावरण, ग्रामीण भागातील शेकडो लोक शहरी क्षेत्रात वास्तव्यास हे ठिकाण झोपडपट्टी गलिच्छ वस्ती अशा ठिकाणी असल्यामुळे स्वाभाविकरित्या बालकावर

योग्य संस्कार होत नाहीत. कारण व्यक्ति जीवनाच्या सुरुवातीचा काळ हा बालपणाचा असल्यामुळे या वयात बालकांवर योग्य संस्कार, सवयी, त्यांची पुढील जीवनाची दिशा ठरवू शकतात त्यामुळे बालकांवर योग्य संस्कार होणे आवश्यक असते. व्यक्ती, मुलंतः ही जन्मताच गुन्हेगार नसतात. त्याला समाज व कुटुंबातून मिळविले. संस्कार व परिस्थिती बालगुन्हेगारी निर्माण होत असते.

## ५.२ विषय – विवेचन

### ५.२.१ बालगुन्हेगारी

साधारणत: १६ ते १८ वर्षापर्यंत मुलं प्रचलित सामाजिक नियमांच्या बाबतीत अज्ञानी असतात. ते करीत असलेल्या वर्तनाच्या परिणामांचे गांभीर्य त्यांना माहीत नसते. असे वर्तन हे भवनेच्या आहारी जाऊन किंवा इतरांच्या वर्तनाचे अनुकरण करून बालक समाजविरोधी वर्तन करण्यास प्रवृत्त होतो असे वर्तन समाजमान्य जरी नसले किंवा कायद्याच्या विरोधी असले असे आपण म्हटले तरी प्रत्यक्षात बालकांना वर्तन व कायदे यांची जाणीव नसते. अशावेळी असे वर्तन हेतू पुरस्कर म्हटले जात नाही.

गुन्हेगारी शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विचारवंताच्या मते कोणीही जन्मताच गुन्हेगार नसतो. तर त्याला सवंगडी, समाजातील भौतिक सुविधा, चित्रपट, ढ. त. मालिका अशा गोष्टीतून तो शिकत असतो. तरीसुद्धा बालगुन्हेगार कोणाला मानावे याबाबत गुन्हेगार शास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांच्यात एकमत दिसून येत नाही. तरीसुद्धा प्रत्येक राष्ट्राने बालगुन्हेगारी ठरविण्याचे वय निश्‍चित केलेले दिसते. अलिकडे या विधेयकावर चर्चा होत आहे तरीसुद्धा १६ ते १८ अलीकडील म्हणजे १६व्या वर्षाखालील मुलगी व १८ वर्षाखालील मुलगा कायद्यान्वये बालगुन्हेगार मान्य केले आहे.

**बालगुन्हेगारीचा अर्थ व स्वरूप**

बालगुन्हेगारी समाजशास्त्रीय अध्ययन करीत असताना बालगुन्हेगारीचा अर्थ लक्षात घ्यावे लागेल. या समस्येबाबतीत अनेक समाजशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत. याविषयी व्याख्या बघितल्यावर आपणासही स्पष्ट होईल.

* डॉ. एम. जे. सेढना : ''विशिष्ट प्रदेशातील कायद्याने निश्‍चित केलेल्या वयापेक्षा कमी वय असलेल्या बालकाने या तरुणाने केलेले कायद्याविरोधी वर्तन म्हणजे बाल अपचारीत किंवा बालगुन्हेगारी होय.''

* फ्रेंडलॅन्डर (Friend lander) : ''बाल अपचारीता म्हणजे बालकांचे असे वर्तन की जे कायदेशीर कारवाईस पात्र आहे.''

* विल्यम शेल्डन (William Sheldon) : ''बाल अपचारीता म्हणजे विशिष्ट वयापेक्षा आतील मुलांचे समाजाच्या योग्य अपेक्षाचा भंग करणारे वर्तन होय.''

* मार्शल बी ब्लिनार्ड : ''प्रचलित कायद्यानुसार म्हणजे १६ ते १८ वर्षाखालील बालकांनी समाजाला घातक ठरेल असे, समाजविरोधी कृत्य म्हणजे बालगुन्हेगारी होय.''

* न्यूमेयर (New Meyer) : बाल गुन्हेगारी म्हणजे कायद्याने निर्धारीत केलेल्या

वयापेक्षा कमी वय असलेल्या बालकाने व युवकाने केलेले कायद्याविरोधी वर्तन म्हणजे बालगुन्हे होय.

* इलिएट आणि मेरिल : विशिष्ट प्रदेशात प्रचलित कायद्याविरोधी वर्तन करणाऱ्या परंतु ज्यांचे वय १६ वर्षापेक्षा आणि १८ वर्षापेक्षा कमी आहे अशा बालकास व युवकास बालगुन्हेगार म्हणतात.

**भारतातील बालगुन्हेगारीचे स्वरूप :**

बालगुन्हेगारी समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पाश्चात्त्य देशाच्या तुलनेत भारतात बालगुन्हेगारीचे प्रमाण कमी आहे. अमेरिका, चीन यासारख्या प्रगत देशात शालेय विद्यार्थी बंदुकीचा सहजपणे वापर करतात. ज्या वयात ज्यांच्या हातात वही, पेन पकडायला पाहिजे ते बंदूक हातात घेतात. त्यामुळे त्यांच्यात संस्कार देण्यासाठी आई-वडिलांकडे वेळ नसल्यामुळे मुलं एकलकोंडी किंवा ''स्व'' विचारी बनतात. त्यामुळे त्यांच्याकडून हिंसक कृत्ये, समाजविरोधी वर्तन घडत असते. भारताच्या दृष्टीने विचार केला असता भारतात कुटुंब (वाक्य अपूर्ण आहे)

**बालगुन्हेगारीची कारणे :**

बालगुन्हेगारी ही एक सामाजिक समस्या असल्यामुळे समस्येचा अभ्यास करताना बालक हा जन्मताच गुन्हेगार नसतो तर त्याला सभोवतालच्या वतावरणात संस्कार कुठल्या स्वरूपात रुजले गेलेत याच्यावर त्याचे भावी जीवन अवलंबून असते. बालकाने समाजविरोधी वर्तन केले तर त्यास बालगुनहेगार ठरवितात परंतु दुसरा वर्ग त्यास शेवटी मुलेच आहेत असे म्हणून सोडवितात परंतु त्याला बालगुन्हेगारी प्रवृत्ती वाढविण्यास कुठल्या जबाबदार घटकांचा त्याच्यावर लगेच प्रभाव पडतो या कारणांचा शोध घेणे महत्त्वाचे आहे. अनेक समाजशास्त्रीय अभ्यासकांनी अभ्यास करून, बालगुन्हेगरीचे कारण मिमांसा करताना लॉम्ब्रोसो, गोडिंग, क्रेशमर यांनी अनुवंशीकतेला महत्त्व देऊन बालकांच्या शारीरिक लक्षणांचे निर्धारण करतात तर काही सामाजिक परिचितीला समोर ठेउन सामाजिक धार्मिक आणि आर्थिक प्रवाहानुसार समाजामध्ये आपले जिवन घालवित असतो. मग बालक समाजविरोधी वर्तन करण्यास प्रमाणवजा मूल्य, संस्कारांना लांब करून बालगुन्हेगारीकडे वळतो. मग असे गुनहे बालकांकडून कसे घडतात. त्यास कुठली कारणे जबाबदार आहेत. याचा विचार करणे आवश्यक आहे.

व्यवस्था भक्कम असून ती प्रभावी कार्य करीत होती म्हणून १९६० पर्यंत भारतात बालगुन्हेगारीचे प्रमाण फारच कमी प्रमाणात होते. त्यानंतर मात्र बालगुन्हेगारीच्या संख्येत सतत वाढ होत गेली. शहराच्या वाढत्या प्रमाणाबरोबर बालगुन्हेगारी प्रवृत्तीत सतत वाढ होत आहे. शहरी संस्कृती, शहरातील कुटुंबातील जबाबदारी सामाजिकरणाचा अभाव अशा घटकातून मुलांच्या समाजविरोधी वर्तनाची समस्या वाढली आहे. परंतु प्रत्यक्षात लहान मूल आहे. त्यांच्यात सुधारणा होईल अशी अशा ठेवून मुलांना कुटूंब, आई-वडील समाज यांच्याकडून समज दिली जाते. त्यामुळे भारतात मुलांकडून गुन्हे घडतात. त्यापैकी फक्त २% बालगुन्हेगारी यांची पोलीस, न्यायालय यांच्यात लात येते. या कारणाने तिचे स्वरूप मात्र गंभीर बनले आहे.

भारतात बालगुन्हेगारीचे स्वरूप लक्षात घेता गरिबी, गलिच्छ वस्त्या, स्थलांतर, आई-वडील, नोकरीनिमित्त जास्त वेळ बाहेर रहाणे, कुटुंब व्यवस्थेतील मूल्यांमध्ये शिथिलता, औद्योगिकीकरण व नागरिकरणाचा वाढता प्रभाव, आर्थिक परिस्थिती, वाढते घटस्फोट, मनोरंजन, मद्यपान, कुचकामी शिक्षणप्रणाली. इत्यादी घटकामुळे बालगुन्हेगारी प्रवृत्ती निर्माण होण्यास सहाय ठरत आहे. त्यामुळे मुलांमध्ये हिंसात्मक वृत्ती निर्माण होते त्यामुळे बालगुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ होत आहे.

**बालगुन्हेगारीची कारणे :**

(१) कुटुंब : बालकाच्या जीवनातील पहिली शाळा म्हणजे त्याचे कुटुंब होय. कुटुंब ही व्यक्ती जीवनाला एक आकार देणारी संस्था म्हणून गौरविली जाते. याचा विचार केला तर कुटुंबात आई-वडील, भावंड, काका, काकू, आजी-आजोबा, आत्या यांच्या संपर्कातून त्यांच्यावर संस्कार होतात. त्यानुसार बालक वर्तन करीत असतो. म्हणूनच सामाजिकरणाच्या प्रक्रियेत कुटुंब संस्थेला विशेष महत्त्व असल्याचे आढळून येते. मुळातच कुटुंबातील वातावरण, संस्कार, आचार-विचार हे योग्य प्रकारे रुजविले गेले नाहीत तर त्याचे परिणाम त्या बालकांवर होतात. या मिमांसेतून कुटुंबाचा आकार, गुन्हेगार कुटुंब, सावत्र आई-वडील, भग्न कुटुंब, नियंत्रणाचा अभाव इत्यादी. अशा कुटुंब संस्थेत तो तर त्याच्यावर कुणाचा प्रभाव रहात नाही त्यातून बालक युवकांकडून गुन्हा घडतो.

(अ) कुटुंबाचा आकार : कुटुंबाचा आकार सदस्यांवरून ठरतो. ज्या कुटुंबात सदस्यसंख्या जास्तीची असेल त्या कुटुंबाचा आकार मोठा असतो. अशा कुटुंब संस्थेत बालकांवर योग्य संगोपन होत नाही. त्याच्या गरजा पूर्ण केल्या जात नाहीत. त्यातूनच त्याच्याकडे दुर्लक्ष होते. जास्तीची मुलं असल्यामुळे आई-वडील मुलांकडे दुर्लक्ष करतात. त्यातून बालक याच्याविरुद्ध भावना व्यक्त करून तो समाजविरोधी वर्तन करण्याची प्रवृत्ती वाढते.

(ब) सावत्र आई-वडील : सावत्र आई-वडील असलेल्या कुटुंब संस्थेत सावत्र मुलांना मायेचा हात, प्रेमाचा आशिर्वाद मिळत नाही. उलट त्यांच्याशी क्रुरपणे वागणूक दिली जाते. मुलांना मारझोड करणे, घरातून बाहेर काढणे, उपाशी ठेवणे, जबरदस्तीने काम करून घेणे, टोमणे मारणे, अशा वागणुकीमुळे ही मुले बेचैन होतात. त्यामुळे समाजविरोधी कृत्य करण्यास प्रवृत्त होतात.

(क) भग्न कुटुंब : पति-पत्नीच्या संबंधात भंग होणे किंवा दोघांपैकी एकाचा मृत्यू होणे अशा कुटुंब संस्थेत मुलांच्या सामाजिकीरणाचा प्रश्न निर्माण होतो. अशा कुटुंब संस्थेत समायोजन होत नाही. आई-वडिलांचे प्रेम, मार्गदर्शन मिळत नसल्यामुळे व नातेवाईक मंडळी त्यांचा सांभाळ करण्यास तयार नसतात. त्यामुळे मुलांवर कुणाचेच दडपण नियंत्रण राहात नाही. मग आपले पोट भरण्यासाठी बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करतात. मुंबई-पुणे, अहमदाबाद येथील केलेल्या अध्ययनावरून ५०% मुलं भग्न कुटूंबातील बालगुन्हेगार असतात.

**(ड) नियंत्रणाचा अभाव व अतिरेक शिस्त :**

बर्टनने केलेल्या अध्ययनावरून नियंत्रण व अतिरेक शिस्त हे मुलास बालगुन्हेगारीस

प्रवृत्त करते. अलिकडे कुटुंबातील आई-वडील नोकरीला असल्यामुळे आपल्या कामात मग्न असतात अशा वेळेस कुटुंबातील बालकांकडे नियंत्रण करण्यास वेळ नसतो. त्यामुळे मुलं उपेक्षित राहातात. तर काही कुटुंबात आई-वडीलांना असे वाटते की आपल्या बालकाने आज्ञेत राहून शिस्तबद्ध राहिले पाहिजे. अशा वेळेस अतिरेक शिस्तही मुलास, युवकांना दबाव वाटते. म्हणून नियंणाचा अभाव व अतिरेक शिस्त हे मुलास बालगुन्हेगारीकडे वाळवितात.

**(२) वाईट संगत :**

लहान वयात मुले घराबाहेर समवयस्क मित्रांच्या सहवासात असतात. त्यामुळे या मित्राचे वर्तन बालकांना प्रभावित करते. चांगले मित्र असतील तर मुलंही चांगले गुण आत्मसात करतात तर त्यांचा आचार-विचारांची देवाणघेवाण होते; परंतु वाई मित्र असतील ते समाजविरोधी वर्तन त्यांच्याकडून घडत असेल तर त्यांच्या सगमीत असणारी चांगली मुलं अनुकरणातून समाज विघातक कृत्य वर्तन करू शकतात. टॅफ्टच्या मताप्रमाणे वाईट संगतीमुळे बालगुन्हेगारी करतात. हिलेच्या मते ३४% बालगुन्हेगारीतून समाजविघतक वर्तन करण्यास तयार होतात. वाईट संगतीच्या मिमांसेतून तरुणामधील व्यसनाधितनता धुम्रपान, तांबाखू यासारख्या गोष्टी मित्रांबरोबर गेल्याने जडतात. ही सवय कायमस्वरूपी लागली तर त्यात तो गुंफला जातो. यामुळे समाज असंमत वर्तन करण्यास प्रवृत्त होतो.

**(३) चित्रपट, वाईट मनोरंजन, मोबाईल :**

चित्रपट, मोबाईलमध्ये इंटरनेट सुविधा अशा माध्यमातून मुले चांगल्या गोष्ट न घेता वाईट गोष्टीकडे लवकर आकर्षिली जातात. ज्या वयात योग्य संस्कार व्हायला पाहिजे ते मात्र होताना दिसत नाही. आई-वडील दोघेही नोकरी, व्यवसायानिमित्ताने दिवसभर बाहेर रहातात अशा वेळेस मुलं एकटे घरी रहात असल्यामुळे देशी, विदेशी चॅनेलवरचे चित्रपट, मालिका, म्युझिक चॅनेल, गुन्हेगाराचा शोध घेणाऱ्या मालिका ते पहातात त्यातील वेशभूषा, केशभूषा, मारामारी, चोरी करणे, अपरहरण, वस्तू पळविणे, दरोडा टाकणे, खिसे कापणे, धुम्रपान करणारे अशा वेगवेगळ्या कलाकारांनी भूमिका केलेल्यांचे ते स्वत: अनुकरण करून तसे कृत्य करतात तर इंटरनेट हे अद्ययावत माहिती मिळविण्याचे माध्यम असून, या माध्यमातून वाईट गोष्टी मुलं सर्चिंग करतात व अलिकडे मुलांकडे महागडे मोबाईल असल्यामुळे या सर्व सुविधा त्यांच्यात असतात. याद्वारे पहात असतात. ब्लुमर यांनी अमेरिकेत केलेल्या अभ्यासातून पुरुष १०% तर २५% स्त्रियां गुन्हेगार हे चित्रपटामुळे होतात. त्यात लैंगिक गुन्हेगारीचे प्रमाण जास्त असते. याचे कारण अश्लिल चित्रपट पहातत हे पाहील्यावर वास्तवात आणण्यास परावृत्त होतो. म्हणून त्याच्याकडून गुन्हे घडून बालगुन्हेगारीचा प्रश्न निर्माण होतो.

**(४) बेकारी :**

आई-वडील घरतील इतर सदस्यांना रोजगार उपलब्ध नसल्यामुळे उदरनिर्वाहासाठी लागणारा पैसा उपलब्ध होत नाही. अशा कुटुंबातील व्यक्तीच्या गरजा पूर्ण करणे शक्य होत नाही. मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी पूर्ण करणे त्यांना जिवावर जाते. मुलांकडे त्यांचे दुर्लक्ष होते. आर्थिक कारणावरून घरात नियमित कलह (भांडणे) निर्माण होत

रहातात. त्याचा परिणाम मुलांवर होऊन मुलं घराबाहेर जाऊन गरजा पूर्ण करतात. परंतु अशा गरजा पूर्ण करण्यासाठी ते जास्तीचे गुन्हेगारी मार्गाचा अवलंब करतात.

**(५) दारिद्रय:**

अनेक सामाजिक समस्या या दारिद्रयामुळे निर्माण होतात. बालगुन्हेगारी हेसुद्धा दारिद्र्याचे एक कारण आहे. मुलांच्या प्राथमिक गरजा व गरजेनुसार भागविले जात नसतील तर मुलांच्या मनात असंतोषाची भावना निर्माण होते. द्वेष, मत्सर, हेवेदावे गरीब श्रीमंतामधील दरी अशा गोष्टी त्यांना समाजविरोधी वर्तन करण्यास भाग पाडते. कारण गरीबीमुळे त्यांच्या गरजांची पूर्ती होत नाही तेव्हा त्यांच्या हातून छोटीमोठी चोरी करून गरजा पूर्ण करीत असतात. अशा गरीब कुटूंबातील मुलांकडून बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढते.

**(६) गलिच्छ वस्त्या :**

वाढती लोकसंख्या, स्थलांतर, औद्योगिकीकरण, नागरिकरणामुळे शहरामध्ये गलिच्छ वस्त्यांचे प्रमाण वाढू लागले आहे. मुंबई, दिल्ली, मद्रास, कलकत्ता इत्यादी शहरामध्ये गलिच्छ वस्त्यांचे प्रमाण जास्तीचे आहे. कारण या ठिकाणी जागेची टंचाई, जागेच्या वाढती किंमत, घरे बांधण्यासाठी पैसे, कमीत कमी उत्पन्न अशा घटकामुळे त्यांना चांगल्या वसतिस्थानात जीवन जगणे शक्य नाही. अशावेळेस मिळेल त्या ठिकाणी रहिवास करून झोपडीसारखी घरे बांधून घेतात. मग या ठिकाणी त्यांना पिण्याचे पाणी, रस्ते, दिवाबत्ती, दवाखाने, आरोग्य या मुलभूत सुविधांचा अभाव असतो. यांना शासनाच्या योजना लागू होत नाही. अशा वेळेस त्यांच्या गरजा लक्षात घेता तेवढे यांचे उत्पन्न नसते. हे अकुशल कामगार वर्ग असल्याने त्यातून कमविणे व गलिच्छ वस्तीत रहाणे एवढेच समिकरण बनते अशा वसतिस्थानात बरेच कुटुंबे स्थलांतरीत होऊन आलेली असतात. त्याच्या उदरनिर्वाहापासून ते रहिवाशांपर्यंत समस्या समान असतात. अशा परिस्थितीत त्यांना मुलांवर शिस्त, संस्कार, शिक्षण, दबाव, मूल्ये देता येत नाही. पर्यायाने अशी सर्व मुले एकत्र येऊन गुंडागर्दी करून त्यातून जुगार, मद्यपान, मटका, वेश्यावृत्ती, चोऱ्यामाऱ्या इ. समाजविरोधी वर्तन त्यांच्याकडून लहान वयात घडते. म्हणून गलिच्छ वस्त्या बालगुन्हेगारीस कारणीभूत ठरते.

**(७) गुन्हेगारी :**

बालकांवर केवळ कुटुंब संस्थेच्या माध्यमातून त्यांचे सामाजिकीकरण घडवून येत नाही तर सभोवताल कोणत्या परिसरात वावरतात, त्या परिसराचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष स्वरूपात प्रभाव पडत असतो. जर आजुबाजूचा परिसर संस्कारक्षम असेल तर त्या मुलांवर प्रभावी विचार रुजतात. विरुद्ध विचार केला तर आजूबाजूचा परिसर गुन्हेगारी प्रवृत्तीचा असेल तर मुलांना आपोआप या परिसरातील वाईट गोष्ट, संगत करून ते स्विकारतात या गोष्टी करायला वेळ लागत नाही. कारण मुलं, युवक वाईट लवकर स्विकारतात. त्यामुळे त्यांच्यात गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते. बालवयातच ते गुन्हेगार बनतात.

**(८) औद्योगिकीकरण व शहरीकरण :**

आज देश २१व्या शतकाकडे जात असून, यांच्या बरोबरीने औद्योगिकीकरण व शहरीकरण हे दोघी हातात हात घालून भरभराटीला येत आहे. परंतु याच्याबरोबरीने शहरात

गलिच्छ वस्त्या, झोपडपट्टी, गुन्हेगारी, मद्यपान, इत्यादी समस्यां वाढ होत चालली कारण उद्योगधंद्याच्या निमित्ताने हजारो श्रमिक शहरांकडे आकर्षित होत आहे. याच्यामुळे शहारातील लोकसंख्या खूपच वाढली. यांना सामावून घेण्यासाठी जागा कमी पडू लागली. या जागेच्या अभावी झोपडपट्टीसारख्या भागात रहिवास कसाबसा उदरनिर्वाह करतात. असे अनेक विजातीय गरीब श्रमिक अकुशल कारागिर, भिकारी, गुन्हेगार हे राहतात. परंतु यांच्याकडे वेळ नाही त्यांच्या मुलांकडे आपोआप दुर्लक्ष होतं. यामुळे मुलांमध्ये सामाजिकीकरण, संस्कार, दबाव या गोष्टी रुजत नसल्यामुळे त्यांच्याकडून समाजविराधी वर्तन, मद्यपान, स्वैराचार, गुन्हेगारी, करण्याकडे प्रवृत्ती वाढते त्यातून बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढते. डॉ. व्हिक्टोराव यांच्यामते शहरातील कुटुंब व इतर समूहातील शिथिल नियंत्रणामुळे बालगुन्हेगारीचे प्रश्न जटील बनतात. तर न्यूमेयर म्हणतो की, शहरीकरणाने सर्व समूहाना प्रभावित केले आणि मोठ्या प्रमाणात मुले विचलीत वर्तन करू लागली.

आपण आतापर्यंत बालगुन्हेगारीसाठी समाज, कुटुंब, शेजार, वास्तव्यात असलेला परिसरातील वाईट संगत, गलिच्छ वस्त्या, गुन्हेगारी, शहरीकरण असे ठोस घटक गुन्हेगारीसाठी मुलांना प्रोत्साहीत करतात तर या कारणा व्यतिरिक्त अंधविश्वास, शिक्षणातील व शिक्षण पद्धतीतील दोष, विलासी जीवन, नैसर्गिक संकट, अशा कारणापासून मुलांना लांब ठेवून बालगुन्हेगारी सामाजिक समस्या समाज निर्माण होणार नाहीत अशा कारणांकडे प्रकर्षाने लक्ष दिले पाहिजे.

**बालसुधार कायदे :**

भारतात १८५० पासून बालगुन्हेगार व गुन्हेगार यांच्यात भेद करण्यात आला असून, त्यानुसार बालगुन्हेगारासाठी आळा घालण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अशा बालकांना गुन्हेगार म्हणावे किंवा नाही त्याची वयोमर्यादा निश्चित केली. कायद्यांतर्गत मुलांना योग्य सहाय्य करावे, त्याची स्वतंत्र व्यवस्था करावी. असे विविधस्वरूप कायद्याची अंमलबजावणी १८६४ पासून करण्यात येऊ लागली म्हणून तेव्हापासून भारतात बालगुन्हेगारी रोखण्यासाठी विविध कायदे बनवून राबविले जाऊ लागले आहेत.

**(१) सुधारगृह कायदा १८९७ :** Reformatry school Act, **१८९७ –**

हा कायदा १८९७ साली पास करण्यात आला. या कायद्यामुळे न्यायालयाना अधिकार मिळवून बालगुन्हेगारांना कारागृहात न पाठविता सुधारगृहात पाठवावे यात विशेष तो मुलगा १५ वर्षापुढील व १८ वर्षाखालील वर्षापर्यंतचा असावा. त्याला त्याने केलेल्या गुन्ह्याची शिक्षा देऊन त्याला सुधरगृहात ठेवले पाहिजे या सुधारगृहाची मान्यता शासनाने देऊन अनुदान द्यावे अशा संस्थेतच त्याला दाखल करावे.

या संस्थेची कार्यप्रणाली व त्याची व्यवस्था

(१) रात्री बालगुन्हेगारी केलेल्या बालकांची स्वतंत्र राहाण्याची व्यवस्था करावी.

(२) जेवण, कपडे, सफाई, गादी, इत्यादी असले पाहिजे

(३) औद्योगिक प्रशिक्षणाची सोय असावी.

(४) वैद्यकीय सुविधा द्याव्यात

**(२) बालरोजगार कायदा – १९३८**

पंधरा वर्षाखालील बालकांना नोकरीवर ठेवू नये हा बालश्रमिक कायदा १९३३ ला कायदा पास करण्यात आला. म्हणून या वयात असलेल्या बालकांना, युवकांना नोकरी देणे योग्य नाही.

**(३) मुंबई बाल अधिनियम – १९४८**

या कायद्यान्वये मुलास कैद करता येणार नाही. अशा बालगुन्हेगारांना मृत्यू, जन्मठेपेची शिक्षा ठोठवण्यात येऊ नये. उलट माता-पिता याची जामिन घेऊन शिस्तबद्धतेच्या आश्वासनांवर सोडणे.

**(४) बालधुम्रपान कायदा –**

यात १८ वर्षाखालील मुलांना बियरबार मध्ये प्रवेश देता येणार नाही. विडी, सिगारेट तत्सम धुम्रपान व मद्यपान सारखे पदार्थ विकण्यास, घेण्यास मनाई करण्यात आली. अशा वस्तू सापडल्यास शिक्षक, पोलीस, सरपंच, नगरपालिका सभासद, वडील, डॉक्टर, न्यायाधीश इतर अन्य अधिकारी यांना अधिकार देण्यात आले आहेत.

वरील कायद्यांचे पालन योग्य प्रकारे भारतात केले गेले तर बालगुन्हेगारीसारखे प्रश्न निर्माण होणार नाहीत. योग्यवेळी योग्य कायद्याचा आधार घेतला तर कायद्यांतर्गत तो वर्तन बाह्य वर्तन करणार नाही.

**बालगुन्हेगार सुधार कार्यक्रम :**

वाढत्या बालगुन्हेगारीचे प्रमाण लक्षात घेता १९२४ मध्ये जिन्हेवा येथे भरलेल्या जागतिक परिषदेत जगातील बहुतेक राष्ट्रांनी बालकाचा हक्काचा जाहीरनामा मान्य केला. त्यानुसार बालकाचे संगोपन, शिक्षण, खानावळ, वस्त्र, आरोग्य इत्यादीबाबतीत मुलांबाबत व्यापक दृष्टीकोनाचा स्विकार केला गेला; परंतु बालगुन्हेगारी ही प्रत्येक जगाची सामाजिक समस्या बनत चालली आहे. याचा व्यापक दृष्टीकोनातून विचार केला असता त्याला भारतसुद्धा अपवाद नाही म्हणून भारतातील बालगुन्हेगारीचे प्रमाण पाहता प्रतिबंध करण्यासाठी कोणकोणते उपाय योजना करता येतील याचा विचार करावा लागेल.

**(१) बाल न्यायालय :**

बाल न्यायालय भारतात सर्वप्रथम १९२२ मध्ये कलकत्ता येथे सुरू करण्यात आले. त्यापाठोपाठ मुंबई मद्रास येथे बालन्यायालय उघडण्यात आले. या बालन्यायालयात १६ वर्षाखालील मुले व १८ वर्षाखालील मुलीचे खटले चालतात. समाजविघातक कृत्य व कायद्याचे उल्लंघन करण्यास बालन्यायालयासमोर उभे करावे. वडील, पोलिसांना प्रवेश नसतो. पोलीस यांनी त्यांच्या वर्दीत न रहाता साध्या पोषाखात रहावे त्याचप्रमाणे बालमानस शास्त्राचे विशेष प्रशिक्षण घेतलेल्या न्यायाधिशामार्फत निर्णय दिला जातो. यात विशेषतः बालकाच्या सुधारण्यावर भर दिला जातो. त्यानंतर बालकास आई वडिलांकडे सुपूर्त करणे किंवा सुधारगृहात पाठविणे इत्यादी निर्णय घेतले जातात यासाठी महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी बाल न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे.

## (२) सुधारगृह :

याला ठशारपव क्रेश असा शब्दप्रयोग केला जातो. मुलाने केलेल्या गुन्ह्याचा तपास पूर्ण होईपर्यंत मुलाला सुधारगृहात ठेवले जाते. जर मुलगा गुन्हेगार आहे हे सिद्ध झाले. तर त्या मुलाच्या कल्याणासाठी तरतूद करावयाच्या असतील तर त्याला सुधारगृहात पाठविले जाते. तिथे गेल्यावर परिविक्षा अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, तज्ज्ञ कर्मचारी इत्यादीकडून त्या मुलाच्या वर्तनाचे निरीक्षण केले जाते. याच्या शिफारशीनुसार मुलाचा अंतिम निर्णय होतो.

## (३) प्रमाणित शाळा –

राज्यात १९४८च्या अधिनियमानुसार प्रमाणित शाळा महाराष्ट्रात सुरू करण्यात आल्या आहेत. यात बालकांकडून झालेल्या गुन्हेगारीतून मुक्त होण्यासाठी दीर्घकाळपर्यंत प्रमाणित शाळामध्ये ठेवून त्यांना निवास, भोजन, वस्त्र यांची व्यवस्था करण्यात येते. त्याबरोबरीने शिवणकाम, सुतारकाम, हातमाग, चित्रकला, टी. व्ही. दुरुस्ती, नळ फिटींग इत्यादीचे प्रशिक्षण दिले जाते. तर काही मुलांना नियंत्रित शाळेत पाठविण्याची देखील सुविधा केली जाते. त्यानंतर केंद्रातून मुक्त झालेल्या मुलांना कोणत्या प्रकारची मदत आवश्यक आहे, ती कुठल्या माध्यमाने प्राप्त होईल यासाठी दक्षता बालकल्याण अधिकारी घेतात.

## (४) परिविक्षा वसतिगृह –

ज्या लहान मुलांकडून गुन्हेगारी घडून येते त्यांना परिविक्षावर सोडून देण्यात येते; परंतु यात जे अनाथ निराश्रित किंवा त्यांच्या आई-वडिलांची माहिती नसते अशा बालकांना परिविक्षा वसतिगृहामध्ये ठेवण्यात येते. यात त्यांच्याकडून सामाजिकीरणाबाबत वर्तन चांगले घडावे, कायद्याविरोधी वर्तन करू नये, व्यसनाधिनतेकडे जाऊ नये, भावी जीवन चांगले जगता यावे म्हणून व्यवसाय, नोकरी इत्यादी शोधण्यासाठी परिविक्षा अधिकारी बालगुन्हेगारांना मदत करतात. तद्नंतर त्यांच्या वर्तनासंबंधी माहिती उपलब्ध करून वर्तनासंबंधीत परिविक्षा अधिकारी यांनी माहिती घेत रहावी.

## (५) बालग्राम योजना –

सामाजिक दृष्टीकोनातून मुलं हे भविष्यकाळाचे नागरिक आहेत; परंतु योग्यवेळी योग्य लक्ष घातले नाही, तर तो बालगुन्हेगार बनतो. पुढे वय वाढल्यानंतर प्रौढ गुन्हेगार बनतात. म्हणून अशा मुलांना वाचविण्यासाठी डॉ. हरमन मायनर यांनी ऑस्ट्रीया येथे बालग्राम योजना काढली. या योजनेत 'मुलांना वाचवा' 'डरींश ेीी उहळश्रवीशप' हे सूत्र होते. याच स्वरूपात भारतात पहिलं बालग्राम १९६७ साली हरियाणा प्रदेशात सुरू करण्यात आले. या बालग्राम योजनेत २० कुटुंबात प्रत्येकी १० प्रमाणे २८० मुले रहातात. प्रत्येक कुटुंबाचा सांभाळ करणाऱ्या २० मातांची नियुक्ती करण्यात आली आहे. याचा उद्देश बालगुन्हेगारांना कौटुंबिक स्वरूपात जीवन जगता यावे, योग्य संस्कार रुजावेत, त्या मुलांना आईचे प्रेम मिळावे, या धर्तीवर बालग्राम योजना स्थापन केली गेली. आज कमीअधिक प्रमाणात महाराष्ट्र, गुजरात, आसाम, राजस्थान येथे लागू केले आहेत.

## (६) प्रतिबंधात्मक कार्यक्रम –

या समस्या सोडविण्यासाठी कायदे शासन स्वतंत्र वसतिगृह, व्यावसायिक शिक्षण

याबरोबरीने समाजाकडून व इतर संस्थाकडून प्रतिबंधात्मक, सुधारात्मक, कार्यक्रमांना विशेष सहकार्य करून बालगुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळणाऱ्या मुलांना वाचविता येऊ शकेल. यासाठी कार्यशाळा, चर्चासत्र, स्वयंसेवी संस्था, बालकांसाठी कृतिशील कार्यक्रम अशा गोष्टींवर भर देण्यात यावा यात विशेष घटक खालीलप्रमाणे -

(१) चरित्र संवर्धन, सुदृढ शरीर, स्वयं संपादीत कौशल्य प्राप्त करावे, पुरेशी कार्यक्षमता, शिक्षण इ.

(२) कुटुंब, शेजार, समुदायात योग्य सामाजिकरण, संस्कार रुजवावे व या माध्यमातून काळजी घेतली पाहिजे.

(३) अश्लिल व गुन्हेगारीचे समर्थन करणारे चित्रपट, नको त्या जाहिराती, इंटरनेट विशेष खास वेबसाईट, पोस्टर, अश्लिल सी. डी. त्याच्या क्लिप्स, अश्लिल साहित्य अशा गोष्टीपासून मुलांना लांब ठेवले पाहिजे.

(४) गरीब, अनाथ, निराश्रित यांच्यासाठी जीवन सुरक्षिततेची व्यवस्था केली पाहिजे.

(५) जीवनातील भावी उद्दिष्टे यांची पूर्तता केली गेली तर त्याचे जीवनमार्ग निवडीसाठी अडचणी येणार नाही. यासाठी शासन, समाज, कुटुंब यांना योग्य सुविधा सहकार्य केले पाहिजे.

(६) बालमार्गदर्शन, चिकित्सालय, बालकाच्या विशेष वाढीसाठीपर्यंत शैक्षणिक बाबतीत योग्य आराखडा बालकांसाठी विशेष चित्रपटांची निर्मिती, नैतिक,सामाजिक प्रकारचे शिक्षण इ. गोष्टी केल्या गेल्या पाहिजे.

### ५.२.२ मद्यपान

मादक पदार्थांचे सेवन करणे हे कुठल्या काळापासून आहे याचा इतिहासात कुठेच पुरावा नाही. परंतु जगात सर्व देशामध्ये कोणत्या तरी स्वरूपात मादक पदार्थाचे सेवन होते. याचे प्रचलन आपल्याला समाज व्यवस्थेत दिसून येते. तरीसुद्धा मानवाला गुंगी आणणारे पदार्थ म्हणजे मद्यपान होय.

पुराण काळात कथांच्या आधारे मद्यपान करत असावेत, या कथांच्या दंतकथेतून देव देवतांनी समुद्र मंथनातून चौदा रत्ने बाहेर काढली त्यात अमृत-मदिरा ही दोन रत्नेही होती. त्यातून अमृत हे माणसाला अमरत्वाकडे नेणारे ठरे तर मदिरा हे विनाशकडे नेणारे होते. तात्त्वीक आधारे मानवी जीवनाला जे पोषक होते ते अमृत समस्त देवतांनी प्राशन केले व मदिरा हे समस्त राक्षसांनी प्रान केले त्यामुळे राक्षसांचे जीवन हे दिशाहीन झाले तर संपूर्ण भू-तलावर देवदेवतांचे अस्तित्व राहिले.

मद्यपान हा शब्द जरी अलिकडचा असला तरी मादक पेयांचे सेवन प्राचीन काळापासून सोमरस म्हणून प्रचलित होते. वैदिक काळात आर्यलोक गांजा, चरस, अफूचे सेवन करीत; परंतु नंतरच्या काळात मद्यपान घेत नव्हते. असे विदेशी प्रवाशांनी म्हटले आहे. मग मध्ययुगीन कालखंडात राजदरबारी मद्यपान करणे शिष्टाचार म्हणून घेत असत. भारतात मुसलमान राजवट आली या राजवटीत मोगल काळात राजेरजवाडे दरबारात व इतर

लोकांच्या पुरतेच मर्यादीत ठेवले. परंतु ब्रिटिशांच्या आगमनानंतर त्यांच्या राजवटीत 'अबकारी कर' मिळावा या कारणामुळे भारतात मद्यपानाचे व्यसन वाढले. पुढे ब्रिटीशांनी इतर ज्वलंत समस्या यांच्यावर आळा घालण्यासाठी कायदे केलेत; परंतु मद्यपान समाज विचलनासाठी सहाय्यभूत ठरते हे जाणून होते तरी त्याला ब्रिटीशांनी अबकारी कराची निती जोडली आणि उत्पन्नाचे ते साधन बनविले. मद्य निर्मितीचे परवाने दिले. त्यासोबत अवैधरित्या मद्यनिर्मिती होऊ लागली म्हणजे इंग्रजी राजवटीत ती एक व्यवस्था बनली.

स्वातंत्र्यानंतर भारतात साधरण आजपावेतो १० ते १२ टक्के लोक मद्यपान करतात. आकडेवारीचा अंदाज घेता दहा ते बारा कोटी लोक मद्यप्राशन करतात. यामागे भारतीयांच्या प्रथा, संकेत, परकियांचे आचार, चालिरीती, काही जातीत मद्यपानास संमती, काही देवतेस नेवैद्य दारूचा दिला जातो. अशा प्रचलनामुळे मद्यपानाचे प्रमाण वाढलेले दिवसून येते. तर आधुनिक काळात उच्चभ्रू समाज पाश्चात्य समाज व्यवस्थेचे अनुकरण करीत आहेत. त्यामुळे फॅशन, गंमत म्हणून स्त्री, पुरुष, तरुण वर्ग हे मद्यपान करू लागले आहेत. तर हॉटेल्स, वाइन्स शॉप, चित्रपटगृह, नाईट क्लब, डान्सबार, वेश्यालय अशा ठिकाणी मद्यपान सहज उपलब्ध होते त्यामुळे समाजातील सर्व स्तरातील लोक मद्यपानाकडे आकर्षिले जातात.

मद्यपान करणे काही वाईट नाही परंतु ती एक सामाजिक समस्या बनत असून, तिचे स्वरूप वाढत चालले आहे. मद्यमपान आज सऱ्हासपणे श्रमिक, नोकर, शिक्षक, व्यापारी, कारागीर, पुढारलेली स्त्री, दु:ख व मानसिक ताण कमी करण्यासाठी, आनंदप्रसंगी इत्यादी वेळेस मद्यपान करतात परंतु अतिमद्य प्रकृतीला, कुटुंब व्यवस्थेला, समाजाला, शरीराला घातक ठरते म्हणून या समस्येची समाजात तीव्रता वाढत चालली आहे.

**मद्यपानाचा अर्थ/व्याख्या**

मद्य व मादक हे दोघेही सेवन लोक/व्यक्ती करतात म्हणून सगळेच व्यसनाधिन आहेत असे म्हणता येणार नाही. परंतु मधूनमधून मद्यपान करीत राहीले तर मद्य व मादक पदार्थांची सवय लागण्याची शक्यता असते. याचे अतिरेके सेवनामुळे त्यांच्या जीवनात मद्यपान करणे हे एक अविभाज्य अंग बनते. यामुळे व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे व्यक्ती अधिक प्रमाणात मद्य व मादकतेचे सेवन करतात. हे अतिमद्यपान मनुष्याच्या शरीरावर परिणाम करते. सततच्या मद्यपानामुळे शरीर, मन, वर्तन, सामाजिक दर्जा इ. प्रभाव पडतो. यामुळे मद्यमापानाचा प्रश्न कठीण होतो.

विविध विचारवंतांनी मद्यपान या संकल्पनेवर केलेल्या व्याख्यांचा विचार करून

**(१) जे. एल. गिलिन –**

''मद्यपान ही एक सवय असते की, ज्यात मद्याच्या सेवनाची सदैव इच्छा असते आणि तिचे व्यक्तीच्या शरीर व मनावर गंभीर परिणाम होतात.''

**(२) क्लाईन बेल –**

''मद्यपी मनुष्य तो की ज्याच्या मद्यपानामुळे अधूनमधून किंवा सातत्याने त्याच्या जीवनात अथवा वैयक्ति संबंधात अडथळे येतात.''

**(३) सेल्डन बेकन –**

यांच्यामते, ''मद्यपान ही अशी सवय आहे की ज्यामुळे व्यक्ती जीवनातील सामान्य प्रश्नांना तोंड देण्यासाठी सतत मद्यप्राशन करते.''

**(४) जॉन्सन –**

''मद्यपान ही एक स्थिती आहे की मद्य पिणारी व्यक्ती एकदा मद्य घ्यावयास सुरुवात केल्यानंतर स्वत:वरचे नियंत्रण घालवते आणि सवय लागली की मद्यपान प्रवृत्तीपासून व्यक्ती दूर जाऊ शकत नाही.''

**(५) डॉ. डरफी –**

''मद्यपान ही अशी सवय असते की, त्यामुळे शारीरिक समस्यांनी ग्रस्त होते. कुटुंबातील सौख्याचा लोप होतो आणि विभिन्न सामाजिक प्रश्न निर्माण होतात.''

**(६) जागतिक आरोग्य संघटना –**

''मद्यपान करणारे अतिरेक मद्यपान करतात की जे मद्यपानावरच अवलबून असतात. मद्यपानविना त्यांची लक्षणीय मानसिक अस्वस्थता निदर्शनास येते. किंवा त्यांच्या मानसिक आरोग्यात त्यांच्या आंतरसबंधात सुरळीत आर्थिक कार्यात बाधा उत्पन्न होते.''

वरील व्याख्यांच्या आधारे मद्यपान समस्येची काही वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

* मद्यपान ही एक प्रक्रिया असून, सुरुवातीला गंमत म्हणून घेतात नंतर याचे प्रमाण वाढत जाते व व्यक्तीला मद्यपानाची तीव्र इच्छा निर्माण होते.

* प्रथम माणूस मद्य प्रशन करतो नंतर मद्य मणसाला प्राशन करते आणि शेवटी मद्य माणसाचे जीवन प्राशन करते.

* मद्यपान एकदा केल्यानंतर हळूहळू प्रमाण वाढत जाते. त्यामुळे त्याचा परिणाम अंतरसंबंधात होते.

* मद्यपानामुळे आर्थिक प्रश्न निर्माण होतात त्यामुळे त्याचे गंभीर परिणाम कौटुंबिक गरजा भागविण्यावर होतात.

* ताण-तणाव म्हणून घेतलेली मद्य ही कायमची सवय बनते.

– वैद्यकीय दृष्टीने मद्यपानाचे सेवन केल्यास शारीरिक व मानसिकतेवर कोणता परिणाम होतो.

– जर व्यक्तीने मद्यप्राशन केल्यानंतर त्याचे प्रमाण रक्तात २०० चळश्रळसीरा पेक्षा मद्याचे प्रमाण वाढले की भ्रमाची अवस्था सुरू होते. चालताना तोल जाणे, अडखळणे, ऐकू न येणे, बडबड करणे, गुंगी, बेशुद्ध होणे, मनावरचा ताबा सुटणे.

– जर व्यक्तीच्या शरीरात मद्यप्राशन केल्यानंतर त्याचे प्रमाण रक्तात ४०० चळश्रळसीरा पेक्षा जास्तीचे वाढले की बेशुद्धी येते, श्वसन क्रियेत अडथळे निर्माण होतात, शरीराचे तापमान कमी होते या क्रियेत शेवटची अवस्था म्हणजे मृत्यू येण्याची दाट शक्यता असते.

**मद्यपानाची कारणे –**

मद्यपान करणे हे सर्वसामान्य व्यवहार मद्यपान करण्यासाठी समाज व्यवस्थेतील असलेल्या प्रमाणकांमध्ये शिथिलता येऊन मद्यपान सहज करीत असतात. आज पाश्चात्य समाज व्यवस्थे पडलेला प्रभाव, वाढते औद्योगिकीरण व नागरिकरण, गरीब, श्रीमंतामधील दरी, वाढत्या आकांक्षा अशा गोष्टींचे प्राबल्य समाजव्यवस्थेत वाढत चालले आहे. हे पूर्ण न झाल्यास ते एक कारण बनते. त्याच्यामुळे वेगवेगळी कारणे निर्माण होतात. अभ्यासकानी अनेक कारणांचा उल्लेख केलेला दिसतो. ऋश्रोीसश उरश्रींळपस कॅल्टीन यांनी दु:खी जीवन,

व्यवसाय, मनोरंजन, मित्रमंडळी इ. करणामुळे व्यक्ति मद्यपान करतो तर स्टारलिंग यांनी अज्ञानता, फॅशन, व्यवसाय, पिअरी जॅनेज जे सामाजिक अपरिपक्वतेलाच कारण म्हटले तर बोंगर यांनी दु:ख, व्यवसाय, निवासाची गैरसोय, अज्ञान ही मद्यपानाची सर्वसाधारण कारणे असू शकतात. या सर्व कारणांचे स्पष्टीकरण करता येईल ही मद्यपानाची कारणे पुढीलप्रमाणे

(१) अज्ञान व गैरसमज –

मद्यपान संदर्भात अज्ञान व गैरसमज दिसून येतो. मद्यपान केल्यामुळे कोणतेही रोग होत नाहीत उलट मद्यपान हे शक्तीवर्धक आहे, अशा भ्रामक समजूतीतून मद्यपानाच्या आहारी जातात. निरक्षर, गरीबी, अज्ञानता असलेले व्यक्ती कष्टाची व श्रमाची कामे करतात, त्यांना असे वाटते की आपली जी शारीरिक शक्ती खर्च झालेली आहे ती मद्यपान केल्याने परत जोम, उत्साह वाढेल अशी अज्ञानता व गैरसमज मद्यपी यांच्यात आहे. म्हणून अज्ञानतेमुळे लोक मद्यपानाला प्रवृत्त होतात.

**(२) फॅशन व चैन –**

मद्यपान ही व्यक्तीच्या गरजेतून निर्माण होत नसून त्याला अलीकडील पुढारलेली समाजव्यवस्था कारणीभूत ठरते. मित्रमंडळी, चारचौघात पार्टी करणे, गप्पा, सहल, क्लब, मंडळ, अशा माध्यमातून सर्व एकत्रित येत असतात. सार्वजनिक प्रसंगी भोजन समारंभाचे आयोजन काही वेळेस केले जाते. अलिकडे बाहेर जेवण करणे हे फॅशन होत चालले असून, त्यानिमित्त मित्रमंडळी एकत्रित येऊन भोजन घेतात या समवेत मद्यपानाशिवाय भोजन अपूर्ण वाटते. अशा वेळेस मित्रांच्या आग्रहाखातर मद्यपान केले जाते. मग सर्व मित्रांना साथ द्यावी म्हणून मद्यपान करतात. तर काही व्यक्ती चैनीखातर दारू पितात. अलिकडे समाजव्यवस्थेत आर्थिकक्षमता प्रत्येकाची वाढत चालली असून, भौतिक सुविधांचा वापर करून आपण पुढारलेलो आहोत या दर्जानुसार आपल्याला मद्यपान करावे लागेल असा समज निर्माण होतो मग स्वत:च्या दर्जासाठी किंवा चैनीसाठी मद्यपान करतात.

**(३) मानसिक कारण –**

समाज व्यवस्थेत विचार व कृतीमध्ये बदल व्हायला लागले आहेत. प्रत्येक व्यक्ती आज स्पर्धेच्या युगात वावरण्यासाठी त्याला तेवढे सतर्क राहावे लागते त्यातून यश अपयश प्राप्त होते. अशी यशस्वी व्यक्ती आनंद व्यक्त करण्यासाठी मद्यपान करतो. तर अपयशी व्यक्ती निराश, वैफल्य, अपराधीपणा असुरक्षितता या चिंतेतून मुक्त होण्यासाठी तोही मद्यपान करतो म्हणजे काही काळापर्यंत त्याला मद्यपान केल्यामुळे मनावर नियंत्रण ठेवता येते. अशा या मानसिक कारणांसाठी मद्यपान करतात.

**(४) कर्जबाजारीपणा –**

समाजातील प्रत्येक घटकात बदल जाणवायला लागले आहेत. क्षमतेपक्षा जास्तीची अपेक्षा करून भौतिक सुख–सुविधा, चैन, फॅशन, इत्यादी गोष्टी मिळविण्याकरीता तो कर्ज करीत असतो. हे कर्ज फेडण्यासाठी तेवढी आवक नसते अशा वेळेस कर्जबाजारी होतो. कर्ज फेडण्यास असमर्थ ठरतो. त्याच्यातून निराशा, मानसिक अस्वस्थता, समाजामध्ये मानहानी असे प्रसंग निर्माण होतात हा सर्व प्रकार सहन होत नाही. त्यासाठी तो मद्यपानाच्या

आहरी जाऊन आणखीनच कर्जबाजारी होतो. अशा या भौतिक सुविधांसाठी आपले जीवन हरवून बसतो आणि मद्यपान हे व्यसन त्यांना कायमचे लागते/जडते.

**(५) संकटप्रसंगी**

व्यक्ती जीवनात अनेक संकटे येत रहातात त्याचे स्वरूप मात्र भिन्न असते. कष्टकरी श्रमिक वर्गात गलिच्छ वस्त्या, परिसर, रहाणीमान, श्रमाचा मोबदला कमी, श्रमातून थकवा, सुविधांचा अभाव, अशा मानसिक वैफल्यातून जीवन जगणे नकोसे वाटते. अशा संकटांना विसरण्यासाठी संकटग्रस्त व्यक्ती मद्यपान करतात तर एखाद्या कर्मचारी वर्गाकडून काही चूक घडल्यास तो या संकटप्रसंगी मद्यपानाच्या आहारी जातो. तर समाजव्यवस्थेत अनेक असे प्रसंग असतात. मुलीचे लग्न न होणे, मुलांना नोकरी न लागणे, शेतीतून उत्पादन कमी येणे. या संकटांचा सामना करणे त्यांच्याकडून शक्य होत नाही. तर व्यापार वर्गात व्यवसायात अनेक चढउतार हे होत असतात. त्यात मंदीची बाट किंवा डॉलरच्या किमती वाढल्या तर व्यापारात आर्थिक नुकसान होते हे विसरण्यासाठी संकटप्रसंगी मद्यपान करीत असतात.

**(६) दारिद्र्य व बेकारी –**

दारिद्र, बेरोजगारी ही अनेक समस्यांना जन्म देत असते. त्याच्यापुढे सामाजिक मूल्य प्रमाणकांना बाधा निर्माण होते. हे प्रमाण अविकसित व विकसनशील देशात जास्तीचे दिसून येते. रोजागाराच्या संधी या ठिकाणी उपलब्ध नसतात. त्या देशाच्या दृष्टीने ते अवलंबता भार असून, स्वत: रिकामे असल्यामुळे आर्थिक गरजा पूर्ण होत नाही. त्यातून कुटुंबात संघर्ष, ताणतणाव आणि संघर्षाची परिस्थिती निर्माण होते. याच्यातून सुटका व्हावी या हेतूने व्यक्ती मद्यपान करतो. प्रसिद्ध अपराध शास्त्रज्ञ डॉ. डब्ल्यू ए. बोंगर यांनी केलेल्या अध्ययनावरून गरीबी व दारिद्र हे मद्यपान करण्यास परावृत्त करण्याचे एक कारण बनते.

**(७) आजारपण –**

एखादी व्यक्ती दुर्धर व्याधीन पीडीत, डोकेदुखीने त्रस्त असतात कॅन्सर, अस्थमा, सर्दीपडसे, अपचन, डोकेदुखी असे जे आजार आहेत हे मद्यपान केल्याने दूर होतात अशा प्रचलित गैरसमजुतीमुळे मद्यपान केले जाते. आजारपण ही शारीरिक संबंधी बाब असल्यामुळे तिचा मद्यपान या प्रक्रियेशी प्रत्यक्ष संबंध येत नाही तरी व्याधीग्रस्तांना वाटते की आपला आजार बरा होईल; परंतु मद्यपान ही गुंगी आणणारी प्रक्रिया असल्यामुळे ती सेवन केल्यानंतर मेंदू व मज्जातंतू व्यवस्थेवर त्याचा परिणाम होतो. त्याच्यामुळे व्यक्तीच्या मानसिक जीवनावर व निर्णयशक्ती विचाराशक्ति याचा ऱ्हास होतो. म्हणून व्याधीग्रस्तांना असे वाटते की आपण मद्यपान केले तर आजार बरा होतो म्हणून व्याधी ग्रस्त मद्यपान करतात.

**(८) मनोरंजनाचा अभाव –**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. यात बारमाही कामे उपलब्ध होत नसल्यामुळे उरलेले सहा महिने रिकामे असतात. असेल तर त्याचा वेळ कसा जाईल अशी कुठली साधने ग्रामीण भागातील वर्गाकडे उपलब्ध नाही अशा फुरसतीच्या वेळेत मद्यपानाचा आश्रय

घेऊन मद्यपान करतात. तर शहरी समाजव्यवस्थेत तांत्रिक बदल होऊ लागल्याने अकुशल कामगार वर्गामध्ये रिकामपण वाढत आहे. या रिकामपणामुळे वेळ घालविण्यासाठी मद्यपान करतात. यांच्याकडे पुरेशी निवासाची व्यवस्था नसल्यामुळे मनोरंजनसारख्या साधनांचा अभाव दिसतो. जर मनोरंजनाची साधने उपलब्ध झाली तर त्यांचा वेळ कार्यक्रम पहाण्यात जाईल. अभावामुळे मद्यपानाचे व्यसन जडते.

### (९) अंधश्रद्धा व धार्मिक रुढी परंपरा –

भारतीय समाजजीवनात काही धार्मिक विधी केल्या जातात. त्या विशेष करून आदिवासी समाजव्यवस्थेत त्याचे स्वरूप वेगळ्या प्रमाणात दिसते. मद्य, पशुबळी, निसर्गदेवता, प्राणीमात्र यांना नैवेद्य देऊन परमेश्वराला प्रसन्न केले जाते. विशेष करून काही देवताना मद्य (दारू) हे द्यावे लागते ही श्रद्धा त्यांच्या मनात रुजल्यामुळे आपल्या देवाला मद्य चालते तर आपण धर्मजातीचे असल्यामुळे आपणही मद्य घ्यावे अशी आपल्या देवतेची धारणा आहे असे त्यांना वाटते. म्हणून काही जाती जमातीमध्ये धार्मिक विधी जपण्याकरिता मद्यपान करतात. कालांतराने या परंपरामुळे त्यांचे रूपांतर सवयीमध्ये होते आणि व्यक्ती मद्यपानाच्या आहारी जाते.

### (१०) औद्योगिकीकरण व शहरीकरण –

औद्योगिक क्रांतीनंतर मानवी जीवनमान बदलायला लागले. भारतात १९व्या शतकापासून औद्योगिकीरणाबरोबर शहरीकरणातसुद्धा वाढ होऊ लागली. त्यातून समाज जीवनात विजातीय समाजातील समुदाय एकत्रितरित्या येऊ लागलेत. अशावेळेस पारंपारिक नियंत्रणाची मूल्य कार्यक्षम राहू शकली नाहीत. विविध जाती धर्मातील लोकसंख्या, बहुजिनसी समाज, व्यक्तीवादी दृष्टीकोन, पाश्चात्य समाज व्यवस्थेचे अनुकरण, वाढती लोकसंख्या यामुळे निम्नस्तरातील कामगारांचा भरणा गलिच्छ जीवन, वसतीस्थान हे वाढत गेले. त्यामुळे ज्या परिसरात गुन्हेगारीसारखे स्वरूप निर्माण होऊन अनेक अड्डे, वेश्या व्यवसाय, समाजविरोधी वर्तन, इत्यादी घटक वाढत गेल्यामुळे या घटकांचा प्रत्यक्ष संबंध मद्यपानाची जोड दिल्याशिवाय होऊ शकत नाही. म्हणून औद्योगिकरणामुळे व शहरीकरणामुळे काही वस्तीस्थानात मद्यपान करणाचे प्रमाण वाढले आहे.

### ५.२.३ भ्रष्टाचार

भ्रष्टाचार देशाच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक दृष्टीने गंभीर समस्या असून या समस्येतून जोपर्यंत नोकरदारवर्ग, समाज, राजकारणी हे भ्रष्टाचार करणार नाहीत तोपर्यंत समस्या अशीच राहील. ही समस्या अशीच राहिली तर कुठल्याही क्षेत्रात प्रगती होणे शक्य नाही. भ्रष्टाचार हा रोग प्रत्येक विभागात बाधक बनत चालल आहे. यामुळे भारत देश इतर देशाच्या तुलनेने विकसित झाला नसून तो विकसनशील अवस्थेतच आहे. याला जबाबदारकारण भ्रष्टाचार होय. जेव्हा देशाच्या सर्व गरजा पूर्ण होतात त्या देशातील बेरोजगारी, गरिबी, गुन्हेगारी, प्रादेशिक वाद, मद्यपान, इतर महत्त्वाचे प्रश्न नसात तेव्हा त्या देशाा विकास साधला जातो. हा विकास साधण्यासाठी प्रत्येक पंचवार्षिक योजनेत विकासात्मक योजनांची घोषणा समाजातील घटकांसाठी केली जाते तेव्हा स्वार्थी राजकारणी, प्रशासनातील कर्मचारी, अनुदास पात्र समाजहे पद्धतशीरपणे योजनेचा पैसा हडप (घडप) करून ही योजना

कागदावरच कार्यान्वीत करून घेतात मात्र, प्रत्यक्ष परिस्थिती जैसे थे असते. आज सिंचन योजनेत धरणांचे बांधकाम झालेतर त्यामुळे प्रत्यक्ष एवढी शेती ओलिताखाली येईल असे सांगतात. परंतु धरणे मंजूर झालीत, पैसा पाठविला जातो त्याच्यातून कामे मात्र होत नाहीत ही वास्तवता आहे.

भ्रष्टाचार म्हटला म्हणजे कर्तव्याचे पालन केले जात नाही. विशेष जाणीवपूर्वक कर्तव्याचे उल्लंघन केले जाते. यामुळे प्रत्यक्षात त्याचा फायदा होतो. त्यातून प्रत्येक व्यक्ती स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करतो. यातून व्यक्तीगत फायदा करून पैशाच्या जोरावर विलासी व चैनीचे जीवन जगतात. भ्रष्टाचार करणाऱ्याचा भौतिकवादी जीवन जगण्याकडे कल असतो. त्याला इतरांच्या तुलनेत श्रेष्ठ वाटते. हे साध्य करण्यासाठी पद्धतशीरपणे 'स्व' निर्णयातून अर्थ लावून घेतात. अशावेळेस ते नैतिक मूल्यांना थारा न देता वागत राहातात.

भ्रष्टाचारासाठी राजकारणी व नोकरशाही यास जबाबदार आहेत. राजकारणी पुन्हा उमेदवारी मिळावी यासाठी पक्षश्रेष्ठीपासून ते मतदारापर्यंत पैसे खर्च करतात तर नोकरदार वर्ग उच्च पदावर नियुक्ती होण्यासाठी वरिष्ठांना खुश करण्यासाठी पैसे मोजतात मग दोन्ही वर्ग आपल्या स्वार्थासाठी शासनाच्या तिजोरीतून व समाजाच्या हितासाठी असलेल्या पैशातून भ्रष्टाचार करतात. हे सर्व सोयिस्कर कायद्याचे उल्लंघन करून स्वार्थ साधतात. त्यामुळे भ्रष्टाचार हा एका व्यक्तीने केला म्हणून भ्रष्टाचार होतो असे म्हणता येणार नाही तर त्याला प्रत्येक कार्यक्षेत्रातील जबाबदार घटक उदा. समाज, उद्योगपती, पोलीस यंत्रणा, नोकरशाही, न्यायालय, बिल्डर, सिंचन विभाग, बांधकाम क्षेत्र, वेगवेगळे विभाग, महामंडळ, निमशासकीय क्षेत्र, खनिज उत्पादन इत्यादी क्षेत्रात भ्रष्टाचार करता येऊ शकतो.

**भ्रष्टाचाराचा अर्थ –**

भ्रष्टाचार हा संपूर्ण भारतात विविध क्षेत्रात फोफावत चालला आहे. ज्यावेळेस समाज व्यवस्थेत मूल्यांचा प्रभाव कमी कमी होत जातो. तेव्हा लोक भ्रष्टाचार करतात. विशेष म्हणजे जाणीपूर्वक कर्तव्याचे उल्लंघन करून स्वार्थ साधण्याचा प्रयत्न नोकदार व लोकसेवक वर्ग करतात. तर सामान्य माणूस दैनंदिनव्यवहारात आपले काम होण्यासाठी प्रलोभन देऊन आपल्या व्यवहारात उपयोग करून घेतात. भ्रष्टाचाराच्या माध्यमातून अनेक गोष्टी साध्य होऊ शकतात. उदा. पोलिसांबरोबर तोडपाणी करणे, बालकामगारांचे शोषण, शासनाच्या वेगवेगळ्या योजनामध्ये अफरातफेर करणे, शिकवणी घेणे, आदिवासी विकास योजना गडप कणे, रस्त्यांचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे करणे, शिक्षणसंस्थेत डोनेशन देणे, सरकारी पदाचा दुरुपयोग करणे इत्यादी. विभागात अप्रत्यक्ष स्वरूपात, आर्थिक, अन्य भौतिक लाभ मिळण्याकरिता भ्रष्टाचार करतात. भ्रष्टाचाराचा अर्थ स्पष्ट कण्यासाठी व्याख्या करतात येतील.

(१) इलियट आणि मेरिल : यांच्यामते ''प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मतलब साध्य होण्यासाठी जाणीवपूर्वक कर्तव्यांचे उल्लंघन करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.''

(२) भार्गव : यांच्यामते ''कुटुंब, नातेवाईक, मत्र यांच्यासाठी सरकारी कर्मचाऱ्याने अप्रत्यक्ष किंवा प्रत्यक्ष आर्थिक लाभासाठी एखादे कृत्य करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.''

(३) जे. नाम : यांच्यामते, ''भ्रष्टाचार म्हणजे स्वतःच्या लाभासाठी सार्वजनिक स्थितीचा

दुरुपयोग करणे.''

(४) एन्ट्रिस्की : यांच्यामते, ''सार्वजनिक स्थितीचा 'स्व' हितासाठी उपयोग करून पद्धतशीरपणे कायद्याचे उल्लंघन करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.''

(५) भ्रष्टाचार प्रतिबंधक समिती, व्यापक अर्थाने सार्वजनिक पद किंवा समाजात उपलब्ध असलेल्या एका विशेष दर्जाशी सलग्न शक्ती आणि प्रभावाचा अनूचित वा स्वार्थासाठी उपयोग करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.

भ्रष्टाचार सरळ स्वार्थासाठी नैतिक मूल्य विसरून आर्थिक व भौतिक गरजेपोटी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरुपात भ्रष्टाचार करणे होय. भ्रष्टाचारात व्यक्ती स्वार्थ समोर ठेवून सेवेची भावना मनात येत नाही. फक्त आपला स्वार्थ साध्याचा प्रयत्न करतो. यात राजकारणी, सरकारी कर्मचारी, व्यापारी, उद्योगपती यांच्यापर्यंत भ्रष्टाचाराचे कार्यक्षेत्र मानले जाते. भ्रष्टाचार हे सामाजिक पातळी योग्य नाही परंतु आर्थिक स्थिती व भौतिक साधनांसाठी पद्धतशीरपणे कायद्याचे उल्लंघन करून स्वार्थ साधून घेतात. आज व्यक्तिगत संपत्तीला समाजात स्थान दिसते विशेष प्रतिष्ठा प्राप्त केलेल्या व्यक्ति पदाचा गैरवापर करून सार्वजनिक स्थितीचा दुरुपयोग करून पांढरपेशीय गन्हेगारी प्रमाणे कृत्य करणे होय. एकंदरीत भ्रष्टाचाराचा अर्थ लाचलुचपत साधनांच्या आधारे गैरकृत्याला प्रोत्साहन देणे होय.

**भ्रष्टाचाराचे प्रकार**

राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार


- निवडणुकीच्या काळात मतदारांना प्रलोभन
- बहुमतासाठी सत्ताधारी पक्षाला मत देणे
- पक्षाकडून उमेदवारी मिळावी म्हणून पक्षश्रेष्ठ प्रलोभन


**प्रशासकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार**

- सर्वशासकीय अंतर्गत कार्यालातील भ्रष्टाचार
- निमशासकीय कार्यालये व सहकारक्षेत्र
- संरक्षण व्यवस्थेतील (शस्त्रासत्र खरेदी विमान खरेदी

**स्थानिक स्वराज्य संस्था.**

- ग्रामपंचायत पंचायत समिती जिल्हा परिषद
- ग्रामपालिका, नगरपालिका, महानगरपालिका
- स्वतंत्र महामंडळ




**भ्रष्टाचाराची कारणे :**

**(१) स्वार्थी राजकीय वर्ग :**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर भारतात भ्रष्टाचाराचे प्रमाण राजकीय वर्गात नव्हते. तिसऱ्या व चौथ्या पंचवार्षिक निवडणुकीत निवडून आलेल्या रजकारणी उमेदवारांनी खऱ्या अर्थाने भ्रष्टाचार करायला सुरुवात केली. पूर्वीचा राजकीय कार्यकर्ता इमानदार होता; परंतु नंतर या वर्गाने जाती संस्था, कार्यक्षेत्र विभाग, या गोष्टींना महत्त्व देऊन राष्ट्रहित न जोपासता स्वतःच्या हितासाठी प्रशासनाला हातात घेऊन सत्तेचा बउगा दाखवून यांच्याकडून स्वःहित साधून घतले. प्रत्येक योजना विकासाच्या दृष्टीने हितकारक आहेत; परंतु राजकीय वर्ग हा हेतू सफल होऊ देत नाही. उदा. एखाद्या खनिज संपत्तीचा परवाना देताना शासनाच्या तिजोरीत जास्त पैसा न जाऊ देता परवाना धारकाकडून टक्केवारी ठरवून अवैध मार्गाने त्या विभागाचा मंत्री, प्रशासनाचा प्रमुख घेत असतात. असे प्रत्येक क्षेत्रात चाललेले दिसत आहे. म्हणून राजकारणी हा लोकसवेक न रहाता स्वार्थी होत चालला आहे.

**(२) संस्थांचे विस्तृत क्षेत्र -**

पूर्वी समुदाय हा लहान होता. त्यावेळी प्रत्येक नागरिकात एकता होती. त्यामुळे राजकीय समस्यांची व सामाजिक समस्यांची माहिती असायची. त्यामुळे सर्वानुमते कारभार चालत होत. परंतु अलीकडे स्वतंत्र भारताने लोकशाही तंत्राचा स्विकार केला. त्यातून प्रशासकीय शासनप्रणाली अमलात आली. त्याच्यातून राजकीय कार्यकर्त्यांना सांभाळण्यासाठी प्रादेशिक विभाग, महामंडळ, स्वतंत्र विभागाची विभागणी त्यामुळे यांची संख्या वाढली. त्यामुळे मुठभर लोकांकडे सत्ता आली. सत्तेचा वापर स्वार्थासाठी करून त्यात पद्धतशीरपणे भ्रष्टाचार, करतात. त्यात राजकीय मंडळी, वरिष्ठ कर्मचारी, सदस्य, आमदार, खासदार इ. वर्ग पदाच्या आड आपला स्वार्थ साधून घेतात. तसा संस्थांचा हेतू शासनाच्या योजनेत पारदर्शकता व लवकर कार्यवाही व्हावी याच्यासाठी क्षेत्र वाडविणे होत. परंतु ते भ्रष्टाचाराचे माध्यम बनले आहे.

**(३) व्यावसायिक व राजकीय नेत्यांचे गठबंधन :**

जनतेचा विकासाचा संबंध प्रत्यक्ष नेत्याकडे असतो. सोयी, सवलती, परवाने कर लावण्याची पद्धत, व्यावसायिक, उद्योगपती, प्रकल्पास मान्यता, इत्यादी गोष्टी सरकारच्या अधिपत्याखाली (नियंत्रणाखाली) असतात. असे व्यापारी, व्यावसायिक, उद्योगपती, निवडणुकीच्या वेळेस राजकीय पक्ष आणि नेत्यांना प्रचंड आर्थिक मदत देतात. मग सत्तेवर आल्यानंतर वेगवेगळ्या सवलती, करात सूट, प्रकल्पास मान्यता मिळविण्यासाठी यांच्या बाजूने बाजू मांडून मित्रमंडळात व प्रशासनात निर्णय घेण्यास भाग पाडतात. नंतर आणखी पद्धतशीरपणे टक्केवारी घेऊन राजकीय व्यक्तीचे वरदहस्त प्राप्त करून घेतात. म्हणून भ्रष्टाचारा मध्ये व्यावसायिक, उद्योगपती यांचे राजकीय नेत्यांबरोबर गठबंधरन होते.

**(४) भौतिक सुविधांचा हव्यास :**

स्पर्धात्मक युगात नवनवीन तंत्रज्ञान विकासित होत आहे. किचनपासून ते आकाशापर्यंत वेगवेगळे तंत्रज्ञान, वैज्ञानिक साधने बाजारात उपलब्ध झाली आहेत. या साधनांची किंमत वस्तुनुसार आहे. ग्राहकांच्या कुवतीनुसार ग्राहक खरेदी करीत असतो. परंतु कमी वेतन आपली तेवढी आर्थिक क्षमता नसताना महागडी साधने खरेदी करण्याचा प्रयत्न करतो अशा वेळेस त्याला पर्याय असतो तो म्हणजे मिळालेलया पदाचा गैरवापर करून भ्रष्टाचार करतो प्रलोभनास बळी पडतो. मग पद्धतशीरपणे कायद्याचे, नियमांचे उल्लंघन करीत असतो. म्हणजे भौतिक सुविधांच्या हव्यासापोटी भ्रष्टाचार केला जातो. त्यामुळे भ्रष्टाचारास हे कारण प्रभावी ठरते.

**(५) पक्ष कार्यकर्त्यांची मर्जी सांभाळणे :**

लोकशाहीत सत्तेवर आल्यानंतर कार्यकर्त्यांना सांभाळावे लागते त्यासाठी शासनाच्या देखरेखीत महामंडळांची स्थापना केलेल्या मंडळावर अध्यक्ष, त्या मंडळाचा सदस्य हा समाजातील घटकांकडून असावा असा नियम असतो. मग या ठिकाणी सत्तेधारी नेते मंडळी प्रमुखपदी आपल्या पक्षाच्या मर्जितील कार्यकर्त्यांना नेमतात. मग या पदावरील व्यक्ती आपल्या पदाचा वापर स्वत:च्या स्वार्थाकरीता करून आपल्या मर्जिनुसार योग्यवेळी अयोग्य निर्णय घेऊन प्रशासकीय अधिकाऱ्यांवर दडपण आणून, नियम लागू करून घेतात. मग एखाद्या अधिकाऱ्याने विरोध दर्शविला तर त्याला खोट्या आरोपाखाली अटक करतात किवां निलंबीत केले जाते. नाहीतर सरळ त्या पदावरून बदली केली जाते. त्यामुळे निस्वार्थी कर्मचाऱ्याला उगीच अशा कारणांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे प्रशासनातील कर्मचारी व पक्ष कार्यकर्ते हातात हात घालून पद्धतशीरपणे भ्रष्टाचार करतात आणि विविध योजना हडप करून स्वार्थ साधतात. भ्रष्टाचार करण्यासाठी दोघांही पक्षाचे बळ असते.

**(६) मुद्रण अर्थ व्यवस्थेचा स्विकार :**

आधुनिक काळात देवाण-घेवाणीसाठी चलनाचा वापर होऊ लागला आहे. या चलनात कागदी नोट अल्यामुळे भ्रष्टाचार करण्यास सुलभ झाले. अयोग्य मार्गाने प्रचंड पैसा मिळतो. तो सहज लपविता यावा कारण हा काळा पैसा असल्याने बँकेत ठेवू शकत नाहीत. मग भारतीय अर्थव्यवस्थेत कागदाचे मूल्य स्वरूप ५००-१०००चे सुद्धा असून त्या चलनात

आल्यानंतर आणखीनच जास्तीचा भ्रष्टाचार होऊ लागला. चलन मूल्य वाढविल्यामुळे भ्रष्टाचार वाढला.

**(७) बढती मिळविण्यासाठी भ्रष्टाचार :**

प्रशासकीय, निमशासकीय स्तरावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. पुढे या कर्मचाऱ्यांना बढती मिळण्यासाठी

उच्च स्तरावरील अधिकारी, राजकीय कार्यकर्ते, विभागाचे प्रमुख, अध्यक्ष, मंत्री यांना विशेष रक्कम द्यावी लागते. हे दिल्यावर उच्च पदावर नियुक्ती केली जाते. काही विभागात भ्रष्टाचार करण्यासाठी संधी आहे का याचा अंदाज घेऊन त्यासाठी खास रक्कम मोजतात. दिलेल्या पैसे काढण्याकरीता भ्रष्टाचार करतात. त्यामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढते.

**(८) अतिरिक्त व्यसनाधिनता :**

आजच्या पुढारलेल्या समाजव्यवसथेत व्यसन एक फॅशन बनत चालले आहे. या व्यसनाधिनतेमुळे भ्रष्टाचारास चालना मिळते. आलेल्या वेतनातून आपल्या कौटुंबिक गरजा भागवून उरलेल्या रकमेत इतर गरजा भागविल्या जातात. परंतु व्यसनाधिनतेच्या कारणामुळे मिळालेल्या वेतनातून गरज पूर्ण होत नाहीत. मग तो व्यसनाच्या आहारी जातो. यामुळे कर्जबाजारी होतो. कर्जातच बराच पगार खर्च होतो. मग अशा वेळेस आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी पदाचा गैरवापर करून परवाने, मंजूरी, तरीख वाढवून देणे, वाळू माफियाना सहकार्य करणे, ट्रॉफिक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पैसे घेणे, सौम्य गुन्हेगारांकडून पैसे घेऊन सोडून देणे, अशा गैरमार्गाने आलेल्या पैशातून तो वापर व्यसनासाठी करतो. अशा सवयीमुळे त्याला या मार्गाने पैसे  मिळतात आणि हे भ्रष्टाचाराचे कारण बनते.

**भ्रष्टाचार निर्मूलनासाठी व रोखण्यासाठी उपाय :**

आज आपल्या देशात भ्रष्टाचार रोखण्यासाठी कडक कायदे करण्याची वेळ येऊन गेली आहे. कारण भारत देशात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, प्रशासकीय, व्यावसायिक इत्यादी क्षेत्रात प्रचंड भ्रष्टाचार वाढत चालला आहे. हा भ्रष्टाचार समाजातील विकासात्मक कार्यांना आडकाठी होत असून, त्यामुळे देशाचा विकास खुंटला आहे म्हणून भ्रष्टाचारास आळा घालणे अत्यंत गरजेचे असून त्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते आतापर्यंत काही प्रमाणात कायदे व प्रयत्न केले आहेत.

१९४१ मध्ये विशिष्ट पोलीस विभाग (Special police Establishment) नावाचा विभाग स्थापन करण्यात आला. यावेळेस दुसरे महायुद्ध सुरू होते. त्यावेळेचे सनदी अधिकारी व गैर सरकारी  हे जनतेच्या पैशांवर श्रीमंत बनण्याचा प्रयत्न होताना दिसत होता. त्यांना या कायद्याअंतर्गत भ्रष्ट अधिकारी व इतरांना दंड दिला जाऊ लागला; परंतु याचे स्वरूप पाहिजे तेवढे प्रभावी नव्हते. म्हणून १९४७ला भ्रष्टाचार निवारण कायदा (Prevention of Corruption Act) हा पारीत केला गेला; परंतु कायद्याचे स्वरूप व्यापक बनावे या उद्देशाने १९४९ ला बख्शी टेकचंद समिती स्थापन केली गेली. यांनी सूचविलेल्या अहवालावरून सरकारी क्षेत्रात चाललेल्या कामकाजावर कडक लक्ष असावे म्हणून १९५५ला प्रशासन दक्षता विभाग सुरू करण्यात आला. या विभागामार्फत विभिन्न विभागांना प्रेरणा

देणे, सहकार्य करणे इ. कार्य करावे. परंतु पुढे या विभागावर आणखी काही सुधारणा करता येतील का? म्हणून त्यासाठी 'विवियन बोस आयोग तळींळरप ईीश ेाोळींळेप ची नियुक्ती डिसेंबर १९५६ मध्ये करण्यात आली. परंतु १९४७ चा कायदा प्रभावी करण्यासाठी १९६४ मध्ये भ्रष्टाचार निवारण समितीने व्यापक अधिकार असलेल्या केंद्रीय दक्षता आयोगाची स्थापना करण्याचे सुचविले. त्यामुळे असे आयोग भ्रष्टाचारी व्यक्तीच्याबाबतीत कुशलतापूर्वक कार्य करू शकतील. ज्यामुळे शासन प्रणाली सुरळीतता येईल.

केंद्रीय आयोगामार्फत भ्रष्टाचाराच्या आरोपासंदर्भात कारवाई करण्यास राष्ट्रपतीने सूचित केलेल्या पॅनेलमधून निवडलेल्या सदस्यांकडे पाठवावे. या पॅनेलमध्ये एकूण तीन सदस्य राहतात. त्यात एक सदस्य हा न्यायालयाचा असतो या सदस्याव्यतिरिक्त भ्रष्टाचार शोधण्यास काही अडचण येत असेल तर केंद्रीय चौकशी ब्युरोची CBI ची मदत घेऊ शकतात या समितीला दबाव न आणता भ्रष्टाचाराचे मूळ शोधून काढावे व या समितीने निपक्षपातीपणे आपला अहवाल सादर करावा. यात पंतप्रधानापासून ते विधान सभेपर्यंत भ्रष्टाचार, न्यायपालिकेचा भ्रष्टाचार यांच्यावर खटले चालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात एक संघटन स्थापन करावे.

तसेच विविध क्षेत्रात असलेल्या भ्रष्टाचाराबाबत विचार केला तर शासनप्रणालीमध्ये सुटसूटीतपणा आणण्यासाठी गरज आहे. भारत सरकार विविधविभाग यांच्यामार्फत होणाऱ्या कामकाजाची माहिती प्रसारीत करावी. त्यानंतर लोकांकडून प्रतिक्रिया मागाव्यात. अशा गोष्टी जर केल्या तर भ्रष्टाचारास आळा बसू शकेल. परंतु या समस्येसदंर्भात सरकार प्रत्यक्ष कायदेच तयार करण्यास असमर्थ ठरतो आहे. तर भ्रष्टाचार कसा थांबणार? म्हणून या व्यतिरिक्त भ्रष्टाचार निर्मूनासाठी काही मुद्दे लक्षात घेतले तर भ्रष्टाचारास आळा बसेल.

**भ्रष्टाचार निर्मूलनासाठी काही विचारवंतांनी उपाय सुचविले –**

**(१) राजकीय पक्षांची नैतिकता उंचावणे :**

आज संपूर्ण देशात भ्रष्टाचार वाढत चालला आहे. लोकशाही प्रक्रियेतून ग्रामपंचायतीपासून ते लोकसभेपर्यंत मतदाता उमेदवार निवडून पाठवतो. लोकांच्या माताच्या पसंतीस उतरवून सदस्यत्व प्राप्त करून घेतो. परंतु मतदाता उमेदवाराला, पक्षाला पसंती क्रम देतो. परंतु उमदेवार पदावर आल्यानंतर पद्धतशीरपणे भ्रष्टाचार करतो व हा उघडकीस आल्यानंतर त्याला पक्ष अभय देऊन पाठीशी घालतो. भारतात बरेच, सत्ताधारी पक्षांनी मोठमोठे भ्रष्टाचार केलेत उघडकीस आल्यावर त्याच्यावर कारवाई होऊ देत नाही. पुन्हा त्यालाच पद व उमेदवारी दिली जाते. मग अशावेळेस पक्षाची नैतिकता हिच भ्रष्टाचाराची असेल म्हणून संधी दिली जाते. त्याकरिता पक्षांनी राजकीय नैतिकतेला महत्त्व द्यावे.

**(२) कायद्यांची अंमलबजावणी प्रभावी असावी :**

भारतात प्रत्येक गोष्टीसाठी कायदे केले आहेत. परंतु भारतात कायदे प्रभावी राहिलेले नाहीत. कारण कायदे बनविण्याच्या आधी कायद्यातून पळवाट शोधली जाते. त्यामुळे व्यवस्था सौम्य बनते. त्यातून आरोपी निर्दोषपणे मुक्त सुटतो. आज भारतात लाचलुचपत (Anty Corruption) प्रतिबंध अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले जाते. मात्र नंतर कारवाई

झाल्यावर प्रत्यक्ष पुराव्याअभावी किंवा द्वेष भावनेपोटी त्याला पकडले असा निर्वाळा देऊन त्याने केलेल्या भ्रष्टाचारातून निर्दोष सोडले जाते. आजपावेतो महाराष्ट्रातील आठ विभागातून कर्मचाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली अटक करण्यात आली. परंतु पुराव्याअभावी सोडून देण्यात आले आणि अजूनपर्यंत कुठल्याही शासकीय कर्मचाऱ्याला शिक्षा दिली गेली नाही. म्हणून भारतात कायद्याची अंमलबजावणी जोपर्यंत प्रभावी होत नाही तोपर्यंत कायद्यांचे महत्त्व वाढणार नाही.

**(३) शिक्षेमध्ये सुधारणा :**

भ्रष्टाचार, खून, भांडण, भेसळ, पैशाची अफरातफर, काळाबाजार इत्यादी बाबतीत गुन्हा नोंदविला जातो. नंतर न्यायालयीन प्रक्रियेतून केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप सर्व पुराव्यानिशी तपासले जाते. ही सर्व प्रक्रिया कायद्याच्या कचाटीतून निघाल्यानंतर त्याला शिक्षा सुनावली जाते परंतु केलेल्या कृत्याचा विचार केला तर दहाबारा विस वर्षे निकाल द्यायला लागतात. तेव्हा बराच कालावधी लोटला गेलेला असतो. मग पुराव्याअभावी व इतर गोष्टी लक्षात घेऊन त्याला शिक्षा साम्य दिली जाते. मग या आधारे नवीन कोणी भ्रष्टाचार करतो शिक्षा आणि कित्येक दिवसानंतर लागलेला केसचा निकाल मग त्याला काहीच वाटत नाही म्हणून सहजपणे आपले भ्रष्टाचाराचे कम सुरू ठेवतात. म्हणून भ्रष्टाचार केला असे नुसते सिद्धही झाले तर त्याला ताबडतोब फाशीची किंवा उम्रकैद असा दंड करावा तरच या देशात भ्रष्टाचारसारख्या समस्यांना आळा बसेल. परंतु प्रशासनात भ्रष्टाचार केला तर त्याची त्या विभागातून बदली केली जाते किंवा फार झाले तर एक वर्षासाठी बडतर्फ केले जाते. त्याऐवजी त्याला कामावर न घेता कार्यमुक्त करावे व योग्य ती शिक्षा द्यावी.

**(४) मुद्रण अर्थ व्यवस्थेत बदल करावा :**

भारतात मुद्रण व्यवस्था आल्यापसून रु. ५ पासून १०० रुपयांपर्यंत चलनात कागदी नोटा आहेत. आता किमती वाढल्या त्याचा अंदाज घेऊन रु. ५०० व रु. १००० चलनी कागदी नोटा व्यवहारात आणल्या गेल्या. त्यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांना एक मोठे माध्यमच मिळाले असे म्हणावयास काही करत नाही. कारण मुद्रण अगदी नोटांचे मूल्य यांचा अंदाज घेतला तर भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांना सहज पैसे कुठेही लपविता येऊ शकतात किंवा एखाद्या कार्यालयात अधी काम करून घ्यावयाचे असल्यास संबंधीत अधिकाऱ्या सहज पैसे देता येऊ शकतात व हाताळणी करण्यास सोयीस्कर जाते. म्हणून मुद्रण व्यवस्थेमध्ये बदल करत राहावा कारण भ्रष्टाचरातून मिळविलेला पैसा व्यवहारात आणेल तेव्हा आयकर विभागाने कडक लक्ष ठेउन पैसे जमा करावेत.

**(५) शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करावी :**

कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करत राहावी. महागाई भत्ता, प्रोत्साहनपर भत्ते लागू करावेत असे केल्यास कर्मचारी वर्ग हा प्रलोभनास बळी पडणार नाही याच्यापासून लांब राहील. वाढीव पगारामुळे तो अल्पसंतुष्ट न रहाता सक्षम राहील. मग त्याच्या हातून नियमाप्रमाणे कामे होतील याच्यातून विकास साधला जाईल. म्हणून कर्मचाऱ्यांच्या हितासाठी शासनाचे लक्ष द्यावे. योग्यवेळी योग्य वाढ, बक्षिसामध्ये योग्य रक्कम, वाढीव काम केल्याचा मोबदला अशी वेतनात वाढ करावी.

**(६) मूल्य शिक्षणाचा प्रसार :**

भ्रष्टाचार रोखण्यासाठी शैक्षणिक व्यवस्थेत विशेष सुधारणा करावी. शिक्षण हे नैतिक आदर्श, व्यावहारीकदृष्ट्या उपयोगी दिले गेले पाहिजे. हे शिक्षण देत असताना एक विषय असा असावा की स्वत:चा आदर्श कसा निर्माण करावा ते करण्यासाठी कुठल्या नेतिक मूल्यांना धरूनअसावे अशा गोष्टींना प्राधान्य देण्यात यावे तसेच शिक्षकानीसुद्धा विद्यार्थ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला पाहिजे. अशा या शिक्षणाच्या माध्यमातून चांगले मूल्य रुजविण्याचा प्रयत्न केल्यास पुढे भावी नागरीक किंवा एखाद्या पदावर आल्यास योग्य अशा नैतिक मूल्यांना स्थान देण्याचा प्रयत्न करेल.

**(७) भ्रष्टाचार निर्मूलन करणाऱ्या सक्षम संघटनांचा अभाव:**

आपल्या देशात भ्रष्टाचार निर्मूलन करणाऱ्या सक्षम संघटना नाहीत ज्या संघटना आहेत, भ्रष्टाचाराविरोधी आवाज उठवितात त्याच संघटनेतील काही सदस्य भ्रष्टाचार करतात. त्यामुळे हे कार्य योग्य पद्धतीने होत नाही. सबंध भारतात एकट्या व्यक्तीने उपोषण करून हा प्रश्न सुटणाार नाही. तर प्रत्येकाला घरापासून सुरुवात करावी लागेल. तसच या देशातील भ्रष्टाचार कमी होईल व असेच अविरतपणे काय सुरू ठेवावे लागेल, नाहीतर काही प्रामाणिक लोक भ्रष्टाचाराच्या विरुद्ध आवाज उठवितात लक्ष देतात त्यांना भ्रष्टाचारी व्यक्ती त्रास देतात. त्यामुळे त्यांचे जीवन जगणे असह्य होते. मग भ्रष्टाचार निर्मूलन करणारे लोक शांत होतात. त्यांना समाजही पाठिंबा देत नाही. म्हणून असे लढणारे व संघटना उभे करणाऱ्यांना समाजातील घटकांनी त्यांना पुढे केले पाहिजे. त्यांना सहकार्य करावे. त्यांच्या आंदोलनात सहभागी व्हावे तरच या देशतील भ्रष्टाचाराची वास्तवता समाजापुढे येईल म्हणून संघटना सक्षम कराव्यात.

## ५.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –

(१) बालगुन्हेगारीची व्याख्या सांगा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(२) बालगुन्हेगारी म्हणजे काय ते सांगून कारणे सांगा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(३) बालगुन्हेगारी निर्मुलनासाठी कोणते कायदे आहेत?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(४) बालगुन्हेगारी निर्मूलनासाठी कोणते उपाय ते स्पष्ट करा?

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

**टीपा –**

(१) बालगुन्हेगारीची कोणतेही दोन कारणे

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(२) परिविक्षा गृह

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(३) बालगुन्हेगारीसाठी प्रतिबंधात्मक कार्यक्रम

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(४) बालन्यायालय

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

**५.३ ब) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(१) मद्यपान म्हणजे काय? मद्यपानाच्या कारणांची चर्चा करा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(२) मद्यपानाचा अर्थ सांगून ही समस्या दूर करण्याचे उपाय सांगा

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(१) मद्यपानाची कोणतीही दोन कारणे सांगा

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(२) मद्यपान सेवनाने व्यक्ती विघटन

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(३) मद्यपान बंदी

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(४) मद्यपान समस्येसंबंधी उपाययोजना.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

**५.३ क) स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(१) भ्रष्टाचार म्हणजे काय?

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

२) भ्रष्टाचाराचा अर्थ सांगून भ्रष्टाचारास कुठली कारणे जबाबदार आहेत.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(३) भ्रष्टाचाराचा अर्थ सांगून भ्रष्टाचार रोखण्यासाठी उपाय

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(४) भ्रष्टाचाराची कोणती दोन कारणे सांगा.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

(५) भ्रष्टाचार निर्मूलनासाठी दोन उपाय सांगा

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

## ५.४ सारांश

देशात-विदेशात बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यात भारतातसुद्धा वाढती लोकसंख्या, गरीबी, कुटुंब विघटन, औद्योगिकीकरण व शहरीकरण, स्थलांतर, सामाजिककरण, शिथिलता, बेकारी, वाढते मद्यपान, इत्यादीतून बालगुन्हेगारीची प्रमाणवाढ ही समस्या तीव्र समस्या बनत चालली आहे. याच्यावर वेळीची लक्ष घातले गेले पाहिजे अर्थात त्याला सुधारगृहात पाठवून बालगुन्हेगारीपासून लांब ठेवून पुन्हा त्याच्याकडून गुन्हा घडणार नाही, अशा या गुन्हेगार प्रवृत्तीपासून कसा दूर जाईल यासाठी बालकांना योग्य संस्कार, शिक्षण, दबाव, भविष्यकाळाचे महत्त्व, सामाजिकीकरण इत्यादी गोष्टी रुजविल्या पाहिजे.

तसेच ज्या मुलांकडून गुन्हा घडला त्यासाठी भारतात बहुतेक प्रांतात, राज्यात कायदे केले गेले तसेच सुधारगृहे ही स्थापना करण्यात आली आहेत. त्यातून त्याला तुरुंगात न पाठविता बालग्राम योजना, प्रमाणित परिविक्षा गृह या ठिकाणी पाठविले जाते. या ठिकाणी बालगुन्हेगाराला गुन्हेगारी प्रवृत्ती लांब केले जातेच शिवाय त्याला शिक्षण, प्रशिक्षण सन्मानाने जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. तरीसुद्धा भारत सरकार व समाजाने योग्यवेळी योग्य दखल घेऊन बालगुन्हेगारीला आळा बसविण्यासाठी ठोस पावलं उचलली गेली पाहिजे तरच या देशातील बालगुन्हेगारीला आळा बसेल.

व्यसन म्हणजे व्यक्तीला गुंगी येण्याची प्रक्रिया होय. यातून याची मात्रा वाढली तर शारीरिक व मानसिकतेवर त्याचा परिणाम होतो. व्यसन हे समाजमान्य नसून प्रमाणकाच्या विरुद्ध आहे तरी भारतीय समाज व्यवस्थेत अज्ञानता, धार्मिकता, अनुकरण अशा वेगवेगळ्या कारणांमुळे मद्यपान घेण्याची सवय होऊ लागली. या सवयीतून तो मद्यपानाच्या अतिरेक आहारी गेल्यामुळे ती त्याची, समाजाची समस्या बनली. तसेच अलिकडे पाश्चात्त्य समाजव्यवस्थेच्या प्रभावामुळे व आर्थिक क्षमता वाढल्या कारणाने व फॅशन म्हणून मद्यपान घेत आहेत. सहज केलेले मद्यपान सवयीत रूपांतर होऊन व्यक्तीच्या मानसिक, शारीरिक, सामाजिक, आर्थिक जीवनावर गंभीर परिणाम करतात. एका जपानी म्हणीनुसार, ''प्रथम माणूस मद्यप्राशन करतो नंतर मद्य त्याला प्राशन करते आणि शेवटी मद्य माणसाचे जीवन

प्राशन करते. म्हणून मद्यपान ही व्यक्तीगत दृष्टीने अस्थायी आत्महत्या (Temporary Suicide) असे म्हणावे लागेल.''

आज भारतात विविध क्षेत्रात भ्रष्टाचार वाढत चालला आहे. चारा घोटाळापासून ते दूरसंचार विभागापर्यंत कोसळा घोटाळापासून ते शेअर बाजारापर्यंत शस्त्रास्त्र खरेदीपासून ते भूखंडापर्यंत पोलीस यंत्रणेपासून ते न्यायालयीन प्रक्रियेपर्यंत, दिल्लीपासून ते ग्रामपंचायतीपर्यंत, ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या संस्थेपासून ते विभाग, महामंडळापर्यंत घोटाळे, भ्रष्टाचार, अफरातफर, फसवणूक होत असते. याच्यातून देशाचा विकास थांबातो म्हणून जगाच्या तुलनेत लवकर महासत्ता बनू शकणार नाहीत. कारण सर्वसामान्य जनतेच्या विकासासाठी असलेला पैसा हा जनतेसाठी न वापरता सोपीस्कर मार्गाने त्यात भ्रष्टाचार करतात. आज गरजा वाढल्या, महागाई वाढली. व्यसनाधिनता वाढली, पाश्चात्त्य समाजाचे अनुकरण करीत आहेत. श्रीमंत व मध्यम वर्गाच्या परिस्थितीतील दरी कमी करण्यासाठी अशा घटकांच्या प्रभावामुळे कुठलयाही पदावर असलेला वर्ग स्वार्थ लक्षात घेऊन पद्धतशीररित्या कायद्याचे उल्लंघन करून प्रलोभनास बळी पडून भ्रष्टाचार करतात. हा उघडकीस आला तर आपल्या काद्ययांतर्गत शिक्षा होईल किंवा नैतिक प्रमाणकांना बाधा पोहोचेल याचा कधीच विचार करीत नाहीत. तर उलट सर्वसामान्य व्यक्ती आपले आपले मतलब साध्य करण्यासाठी साधकाला प्रोत्साहन देतात त्यातून भ्रष्टाचार होत रहातो.

## ५.५ पारिभाषिक शब्द –

| | | |
|---|---|---|
| भौतिक सुख | – | वैज्ञानिक तंत्राने तंत्र विकसित करून ते वापरणे. |
| इंटरनेट | – | अद्यायावत माहिती व सूचना मिळविण्याचे स्त्रोत. |
| उदरनिर्वाह | – | जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या गरजा |
| लोकसेवक | – | लोकशाही पद्धतीने निवडून दिलेला उमेदवार त्याचा असलेला कार्यकालपर्यंत काम पहाणारा. |
| मुद्रण अर्थव्यवस्था | – | व्यवहारात पैशांचा स्वरूप चलन आणणे. |
| चैनीखातर | – | मौजमजेसाठी |
| भौतिक सुविधा | – | जे तांत्रिक व वैज्ञानिक बदल दिसतात. |
| वैफल्य | – | जीवन जगत असताना काही अडचणी निर्माण झाल्यास व्यक्ती वैफल्यग्रस्त होते. |
| मंदीची लाट | – | व्यवसायात मालाच्या किमती कमी होणे. |
| नैवेद्य | – | भारतीय परंपरेनुसार देवासमोर निखारा ठेवून आपण बनविलेल्या पदार्थ टाकला जातो. त्यातून निघणारे धूर प्रत्यक्षात आकाशात देवतांना जाऊन पोहोचते असा समज. |

## ५.६ संदर्भसूची

(१) पी. के. कुलकर्णी (१९९८) भारतातील सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. १५६

(२) डी.एल. तोरवणे (२००८) भारतीय समजः प्रश्न आणि सामाजिक समस्या, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, पृष्ठ क्र. ९९

(३) भा. की. खडसे (१९९५) भारतीय सामाजिक समस्या, श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर पृष्ठ क्र. १५७

(४) प्रदीप आगलावे (२००१) आधुनिक भारतातील सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. १२९

(५) एस. चंद्रकुमार राय (२००४) भारतीय सामाजिक समस्याएँ, (अर्जुन पब्लिकेशन हाऊस, दिल्ली), पृष्ठ क्र. १३६

(६) सुधा काळदाते (२००५), भारतीय समाज प्रश्न आणि समस्या (विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद) पृष्ठ क्र. २२७

(७) सुनील माथी (१९९८) भारतीय सामाजिक समस्या (अंशुल प्रकाशन, नागपूर) पृष्ठ क्र. १५४

## ५.७ सरावासाठी प्रश्न/प्रात्यक्षिक कार्य/क्षेत्रीय कार्य

प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे. शिक्षणासाठी शासन स्तरावरून विविध योजना राबविण्याचे प्रयत्न करावेत.

मूल्य रुजविण्यास कुटुंब, समाज, आई, वडील, स्वयं सेवेशी संस्था यांनी सक्षमरित्या प्रयत्न करावेत.

दूरदर्शन, चित्रपट, आकाशवाणी या माध्यमातून चांगले दर्जेदार कार्यक्रमाची मांडणी करावी.

*** सरावासाठी प्रश्न**

(१) मद्यपान म्हणजे काय?

(२) मद्यपानाची कारणे विशद करा.

(३) मद्यपानाची म्हणजे काय? मद्यपानाची कारणे स्पष्ट करा.

(४) मद्यपानाची दोन कारणे.

(५) मद्यपान समस्येविषयी दोन उपाय सांगा.

**क्षेत्रीय कार्य –**

मद्यपान या विषयावर आकाशवाणी, दूरचित्रवाणी, यांनी सादर केलेल्या कार्यक्रमाचे थोडक्यात विश्लेषण करा. किंवा एखाद्या स्वयंमसेवी संस्थांनी मद्यपान होणाऱ्यावर काय परिणाम होतो याशिवाय पथनाट्य सादर केले असेल तर त्याच्या दहा ते पंधरा ओळी लिहा व तुमच्याकडून मद्यपी व्यक्ती जेवढे लांब घेऊन जाता येईल व त्याच्या विचारात भर टाकता येईल तो करण्याचा प्रयत्न करा.

# घटक ६
# राष्ट्रीय समस्या

**अनुक्रमाणिका**

६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ विषय विवेचन

६.२.१ बेरोजगारी (बेकारी)

६.२.२ लोकसंख्या वाढीची समस्या –

६.३ स्वयं अध्ययन प्रश्न

६.४ सारांश

६.५ पारिभाषिक शब्द

६.६ संदर्भसूची

## ६.० उद्दिष्टे :

विद्यार्थी मित्रहो, या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हाला,

१. राष्ट्रीय समस्यांची ओळख होऊन त्यांची गंभीरता लक्षात येईल.

२. बेकारीचा अर्थ जाणून घेता येईल.

३. बेकारीची कारणे समजून घेता येतील.

४. बेकारीचे विविध प्रकार समजून घेता येतील

५. तसेच बेकारी समस्येवरील उपाययोजना जाणून घेता येतील

६. लोकसंख्या वाढीचा अर्थ समजून लोकसंख्यावाढीची कारणे स्पष्ट करता येतील.

७. लोकसंख्या वाढीचे समाजावर होणारे परिणाम समजून घेता येतील.

८. लोकसंख्या वाढीच्या समस्येवर उपाय समजण्यास मदत होईल.

## ६.१ प्रस्तावना :

भारतीय समाजात अनेकविध प्रकारच्या समस्या आढळून येतात. यापूर्वीच्या घटकांमध्ये आपण विविध प्रकारच्या समस्यांचा अभ्यास केला. तसेच या समस्यांची कारणे, परिणाम व त्यावरील उपाय यांचाही अभ्यास आपण केला.

परंतु आधुनिक काळात काही समस्यांनी अतिशय उग्र रूप धारण कलेले आहे व त्या

समस्या राष्ट्रीय स्वरूपाच्या बनलेल्या आहेत. या समस्यांमुळे व्यक्तीच नव्हे तर संपूर्ण देशाला विचार करण्यास प्रवृत्त केलेले आहे. कारण या समस्यांमुळे देशाच्या आर्थिक स्थितीवर व तसेच राजकीय स्थितीवरही विशेष परिणाम होत आहे. देशाच्या विकासावर परिणाम करणाऱ्या या समस्या म्हणजे बेरोजगारी आणि लोकसंख्या वाढीची समस्या होत! समाजकर्ते, राज्यकर्ते, आर्थिक विचारवंत, धोरणकर्ते अशा सर्वच घटकांना या समस्यांनी हैराण केलेले आहे. बेरोजगारी व लोकसंख्या वाढ या दोन्ही समस्या तशा परस्पर संबंधीत आहेत. एका समस्येचा परिणाम दुसऱ्या समस्येवर होऊन त्यांची गंभीरता वाढताना दिसून येते. या दोन्ही समस्या या देशाच्याच समस्या नसून जागतिक स्वरूपाच्या आहेत. विकसित व अविकसित देशांमध्ये या समस्यांचे स्वरूप विभिन्न प्रकारचे आहे.

बेकारीची समस्या ही प्रगत व अप्रगत अशा सर्वच समाजात दिसून येते परंतु प्रगत समाजातील बेकारीचे स्वरूप आणि अप्रगत समाजातील स्वरूप यांमध्ये मूलभूत फरक आहे.

लोकसंख्या समस्या ही स्वातंत्र्योत्तर कालखंडातील गंभीर समस्या बनली आहे. अर्थशास्त्रीय भाषेत लोक संख्येचा स्फोट असेही म्हटले जाते. लोकसंख्या वाढीची अनेक कारणे आहेत. त्यांचा परिणाम होऊन अतिरिक्त लोकसंख्येचा प्रश्न निर्माण झाला आहे. या घटकात आपण लोकसंख्येच्या कारणांचा तसेच होणाऱ्या परिणामांचा विचार केला जाणार आहे. त्याचबरोबर लोकसंख्या वाढीच्या समस्येवर विविध उपाय कोणते आहेत याचाही विचार करणार आहोत.

## ६.२ विषय विवेचन

### ६.२.१ बेरोजगारी (Unemployment)

### ६.२.१ बेकारीचा अर्थ (Means of Unemployment)

आधुनिक काळात ज्या काही समस्यांनी सरकारला, सामाजिक विचारवंतांना गंभीर विचार करायला प्रवृत्त केले आहे, त्या समस्यांपैकी बेकारी ही महत्त्वाची समस्या आहे. बेकारी ही समस्या केवळ भारताचीच आहे असे नाही तर ती जागतिक समस्या आहे. बेकारी ही समस्या प्रगत व अप्रगत अशा सर्व प्रकारच्या समाजात दिसून येते. परंतु प्रगत समाजातील बेकारीचे स्वरूप व अप्रगत समाजातील बेकारीचे स्वरूप यामध्ये मूलभूत प्रकारचा फरक दिसून येतो. प्रगत किंवा विकसित देशात बाजारपेठेतील वस्तूंच्या मागणीत घट होते हे बेकारीचे मुख्य कारण आहे. मागणी कमी झाल्यामुळे उत्पादनात घट करावी लागते. काही मशिने बंद करावी लागतात. नवीन कामगारांची भरती होत नाही तसेच आहेत त्या कामगारांपैकी काही कामगारांना कामावरून कमी करावे लागते त्यातून बेकारी निर्माण होते.

तर अप्रगत किंवा अविकसित देशात काम करणाऱ्या व्यक्तींची मागणी कमी असते. वस्तूंची मागणीही कमी असते. भांडवल गुंतवणूक कमी नियोजन नसणे, उद्योगासाठी वीज, पाणी, रस्ते मोठ्या जागा यासारख्या सोयींचा अभाव यामुळे बेकारी समस्यां गंभीर स्वरूप धारण करीत आहे. लोकसंख्या प्रत्येक देशाची वाढत आहे; परंतु त्या लोकसंख्येला काम देणारी यंत्रणा अपूर्ण पडते. यातून बेकारी समस्या वाढत आहे.

जगाचा विचार केला तर भारताचा बेकारीच्या संदर्भात ९३वा नंबर लागतो. २०११च्या

आकडेवारीनुसार भारतात बेकारीचे प्रमाण ९.८% आहे. जे प्रमाण २००८ मध्ये ६.८% इतके तर २००२ मध्ये ८.८% इतके प्रमाण दिसून येते. म्हणजेच बेकारीचे प्रमाण हे अस्थिर स्वरूपाचे असून, काही प्रमाणात ते प्रमाण वाढताना दिसून येते. जगाच्या तुलनेत आज भारताची कामगारांसंबंधी बेकारीचे प्रमाण ४.४% इतके आहे. संघटित व असंघटित दोन्ही क्षेत्रात बेकारीचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

'बेकारी' या संज्ञेचा अर्थ हा अनेक प्रकारे घेतला जातो. सामान्यपणे बेकार हा शब्द नोकरीचा अभाव या अर्थाने वापरला जातो. जर हा अर्थ घेतला तर काम करण्याची इच्छा नसणारे, आजारपणामुळे कामावर जाऊ न शकणारे, संपावर गेलेले ज्यांना नोकरी किंवा काम देणे न देणे अशा विविध दृष्टीकोनांचा विचार करावा लागेल. त्यामुळे अर्थ समजून घेताना अनेक प्रकारचा गोंधळ निर्माण होऊ शकतो. वैज्ञानिक दृष्टीने बेकार या शब्दाचा अर्थ काम करण्याचे वय, इच्छा असणारे, धडधाकट व्यक्ती, योग्य वेतनावर नोकरी न मिळणे शारीरिक व मानसिक दोषांमुळे नोकरी किंवा काम करण्याची इच्छा नसणारे, आजारपणामुळे कामावर जाऊ न शकणारे, संपावर गेलेले, ज्यांना नोकरी किंवा काम देणे न देणे अशा विविध दृष्टीकोनाचा विचार करावा लागेल. त्यामुळे अर्थ समजून घेतांना अनेक प्रकारचा गोंधळ निर्माण होऊ शकतो. वैज्ञानिक दृष्टीने बेकार या शब्दाचा अर्थ काम करणेचे वय, इच्छा असणारे, धडधाकट व्यक्ती योग्य वतनांवर नोकरी न मिळणे, शारीरिक व मानसिक दोषांमुळे नोकरी किंवा काम करण्यास अपात्र व्यक्ती, काम मिळत असून, काम करण्याची इच्छा नसणाऱ्या व्यक्ती अशा कारणांचा बेकार या संदर्भात अंतर्भाव करता येत नाही. याचा अर्थ बेकारीची एकसंघ व्याख्या करणे अवघड आहे. तरी काही समाजशास्त्रज्ञांनी बेकारी या संकल्पनेचा केलेल्या व्याख्या त्यांचा विचार पुढीलप्रमाणे आपण पाहू.

*** बेकारीची व्याख्या :**

**(१) एच. पी. फेअरचाईल्ड :**

''बेकारी म्हणजे सामान्य कार्यशक्ती असलेल्या व्यक्तीला त्याच्या सेवाकाळात, सामान्य वेंतनावर आणि सामान्य सेवा अटीवरून त्याच्या मोबदल्याच्या कामावरून बळजबरीने किंवा इच्छेविरुद्ध दूर करण्याची क्रिया होय.''

**(२) जी. आर. मदन :**

''ज्या देशात समर्थ व्यक्तींना (अलश्रश लेवळशव झर्शीीप) योग्य वयात (थेीज्ञळपस रसश) त्याची काम करण्याची इच्छा असूनही जर काम मिळू शकत नसेल तर त्यास बेकार समजावे''

**(३) काल प्रिब्राम :**

यांच्यामते, ''बेकारी श्रम बाजारातील अशी स्थिती आहे की ज्यामध्ये श्रमशक्ती जास्त असूनही श्रमशक्तीची पूर्तता करणारी साधने कमी असतात.''

म्हणजेच काम करणारे बाजारपेठेत असूनही त्यांना त्या प्रमाणात श्रमाची साधने उपलब्ध होत नाहीत म्हणून ते श्रमिक बेकार राहतात.

**(४) सार्जन्ट फ्लोरेन्स :**

''काम करण्यास योग्य असणाऱ्या व काम करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्ती जेव्हा

रिकाम्या राहतात त्यांना बेकार म्हटले जाते.''

वरील व्याख्यांच्या आधारे आपणास बेकारी संज्ञेचा अर्थ समजण्यास मदत होईल. बेकारीचे स्वरूप लक्षात येण्यासाठी बेकारीचे कारणे व प्रकार, परिणाम यांचा अभ्यास करणे अधिक योग्य राहील.

**२. बेकारीची कारणे :**


भारतात बेकारीची समस्या अनेक वर्षांपासून आढळून येत असली तरी पहिल्या पंचवार्षिक योजनेपर्यंत या समस्येची निश्चित आकडेवारी उपलब्ध नव्हती. इ. स. १९७८ मध्ये श्री. कमला सुरी यांनी बेकारीच्या समस्येवर लेख लिहून समस्येची गंभीरता स्पष्ट केली. डॉ. वि.भ.सांडेकर यांनी असे म्हटले की, भारतात शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचा भार दुप्पट झाला व तो सतत वाढत आहे. शेतीत रोजगारी वाढली नाही. परिणामता बेकारी अफाट वाढली. १९७७-७८ मध्ये ४००७ कोटी लोकांना रोजगार मिळू न शकल्याने ते बेकार राहिलेत. १९९५ मध्ये बेकारीचे प्रमाण ४.१% टक्के होते. २०११ मध्ये बेकारीचे प्रमाण भारतात ९.८% इतके आहे. म्हणजेच बेकारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे आणि आधुनिक काळात अधिकाधिक यंत्राचा वापर होऊ लागल्यामुळे त्यात अजून भर पडेल असे वाटते.

बेकारीचा विस्तार शहरी भागात जास्त दिसून येतो. पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये बेकारीचे प्रमाण जास्त आहे. एकूण बेकारात सुशिक्षित बेकारीचे प्रमाणही वाढत आहे. औद्योगिक किंवा इतर क्षेत्रातील बेकारीपेक्षा कृषी (शेती) क्षेत्रातील बेकारी जास्त दिसून येते. देशात दरवर्षी रोजगारची वाढ केवळ २ टक्के आहे. त्यामुळे बेकारी समस्या गंभीर स्वरूप धारण करीत आहे.

बेकारी निर्माण होण्यास कोणकोणती कारणे कारणीभूत आहेत याचा विचार आता आपण करू.

बेकारी निर्माण होण्यास कारणीभूत कारणांचे व्यक्तीनिष्ठ कारणे किंवा वैयक्तिक कारणे आणि व्यक्ती निरपेक्ष किंवा वस्तूनिष्ठ कारणे अशा दोन भागात वर्गीकरण करता येते.

बेकारीच्या कारणांचे वर्गीकरण



### (१) आत्मनिष्ठ/व्यक्तिनिष्ठ/वैयक्तिक कारणे : (Personal Factors)

या घटकांमये वागणुकीतील दोष, शारीरिक असमर्थता या घटकांचा समावेश होतो.

**(अ) वय :**

साधारणपणे समाजातील तरुण व वयस्कर (वृद्ध) माणसांना नोकरी वा काम मिळण्यास, अडचणी निर्माण होतात. ज्या तरुणांनी आपले शिक्षण पूर्ण केलेले आहे, प्रशिक्षण घेतलेले आहे त्यांना आवश्यक अनुभव नसल्यामुळे नोकरी/काम मिळत नाही. तसेच ४० वर्षांपेक्षा जास्त वय विशेषत: ५० ते ६० वयोगटातील व्यक्तींना नोकऱ्या मिळू शकत नाही. श्रमाच्या बाजारात जेथे तरुणांची संख्या भरपूर आहे, तेथे वयस्कर व्यक्तींना चांगले काम मिळणे अशक्य आहे. वृद्ध व्यक्ती कमी उत्पादन करतात. वृद्ध व्यक्ती परिस्थितीशी जुळवून घेण्यास असमर्थ ठरतात. कामाच्या काळात वृद्धांच्या अपघाताची शक्यता जास्त असते या कारणांमुळेही वृद्ध व्यक्तींची परवड होते. नियोजन मंडळाच्या असे निदर्शनास आले आहे की वय झाल्यामुळे वृद्ध व्यक्तींना सार्वजनिक सेवांमधून वगळण्यात येते तर खासगी उद्योग क्षेत्रात तरुण वयाच्या व्यक्तींना संधी दिली जाते. अशाप्रकारे वय या घटकामुळेही बेकारी निर्माण होताना आढळते.

**(ब) अयोग्य मार्गदर्शन किंवा व्यावसायिक अयोग्यता :**

बऱ्याच तरुणांना त्यांच्या सामर्थ्यांची किंवा कुवतीची व अभिरुचीची जाणीव नसते. यामुळे स्वत:ची कुवत व अभिरुची विचारात न घेता व्यक्ती शिक्षण व प्रशिक्षण घेतात. शिक्षण घेताना बऱ्याचदा त्यांच्यासमोर कोणतेही ध्येय नसते. त्यामुळे समाजात ज्या प्रकारच्या गुणांची गरज नसते तसे गुण असणाऱ्या व्यक्ती मिळत नाही. काही क्षेत्रात विशिष्ट पदवी किंवा गुण असलेल्या योग्य प्रशिक्षित व्यक्तींची आवश्यकता असते. काही वेळेस तर एखाद्या व्यवसायात जागांपेक्षा प्रशिक्षित तरुणांची किंवा व्यक्तींची संख्या जास्त असते म्हणजेच पुरवठ्यापेक्षा मागणी कमी असते. त्यामुळेही बेकारी निर्माण होतांना दिसते.

**(क) शारीरिक दोष किंवा अयोग्यता :**

अनेक काम करणाऱ्या व्यक्ती आजारपणामुळे किंवा शारीरिक अयोग्यतेमुळे काही कालावधीसाठी  कायमस्वरूपी बेकार व्हावे लागते. औद्योगिक परिसरातील दूषित वातावरण, कामगारांच्या राहण्याच्या अयोग्य व अपुऱ्या सोयी, कामाच्या ठिकाणी अपघात अशा कारणांमुळे कामगारांचे आरोग्य खराब होते, कारखान्यात होणाऱ्या अपघातामुळे काही कामगार कायमस्वरूपी अपंग होतात. त्यामुळे ते कामासाठी किंवा नोकरीसाठी अयोग्य ठरतात. अशाप्रकारे अधू, अपंग व्यक्तींची संख्या बेकारात समावेशित करावी लागते.

अशा व्यक्तीनिष्ठ, किंवा वैयक्तिक कारणांमुळे अनेक लोकांना बेकार रहावे लागते.

### (२) व्यक्ती निरपेक्ष किंवा बहिर्गत कारणे :

यात प्रामुख्याने तांत्रिक किंवा आर्थिक कारणे, चक्रकार, तांत्रिक हंगामी बेकारी, कुटीर उद्योगधंद्यांचा नाश या कारणांचा समावेश होतो.

**(अ) तंत्रशास्त्रीय व आर्थिक घटक किंवा कारणे :**

औद्योगिक संरचनेत झालेले बदल हे बेकारीला कारणीभूत आहेत. आधुनिक काळात व्यापार किंवा उद्योग फार गतिमान झालेला आहे. वस्तूंची मागणी सतत बदलत असते.

कमी वस्तूची मागणी असणारा उद्योग बंद करण्याचा निर्णय व्यवस्थापन घेते. त्यातून बेकारी वाढत. उदा. औरंगाबाद येथील सिएट टायर बनवणाऱ्या उद्योगात १० वर्षापूर्वी लहान टायर बनविण्याचा उद्योग बंद केला. त्यामुळे शेकडो कामगारांना कामावरून काढून टाकले होते. परिणामी तो कामगार आज बेकार आहेत.

स्वयंचलित यंत्रामुळे मानवी कष्टकऱ्यांचे उच्चाटने झाले. उत्पादन प्रक्रिया बदलली. श्रमिकांची कामे स्वयंचलित यंत्रामार्फत करुन घेतल्यामुळे  बेकारीत भर पडली.

आर्थिक घटकाबाबत असे म्हणता येते की रोजगाराची समस्या सोडवायची असेल तर सविस्तार व विचार करून सावधपणे योजना आखणे महत्त्वाचे आहे. परंतु तसेच न झाल्यामुळे बेकारीत वाढ झाली. आज शेती मालाचे उत्पन्न वाढळे. तरी मात्र शेती व्यवसयात  रोजरागाच्या संधी मात्र वाढलेल्या दिसत नाहीत. शेतीतही यंत्रांचा वापर वाढला. परिणामी ग्रामीण भागातही बेकारी वाढली. आर्थिक वस्तूंच्या किंमती कमी होतात परिणामी वस्तूंचे उत्पादन कमी प्रमाणात होते किंवा काही वेळेस तर उत्पादन बंद केले जाते. अशा वेळेस त्या कामगारांवर तात्पुरती बेकारीची वेळ येते.

**(ब) कुटीर उद्योगधंद्यांचा नाश :**

प्राचीन काळापासून भारतात कुटीर उद्योग जगप्रसिद्ध होता व जगात भारतातील निर्माण होणाऱ्या वस्तूंना मागणी होती. कुटीर उद्योगात अनेक व्यक्तींना काम मिळत होते. परंतु औद्योगिकीरणाचा विकास झाला तसे कुटीर उद्योगांचा ऱ्हास व्हावयास लागला. आधुनिक काळात अनेक वस्तूंचे उत्पादन यंत्राच्या सहाय्याने होत असल्यामुळे यंत्राच्या सहाय्याने उत्पादीत होणाऱ्या वस्तूबरोबरच्या या स्पर्धेत ग्रामीण कुटीर उद्योगातील वस्तू टिकाव धरू शकत नाही. परिणामी भारतातील अनेक कुटीर उद्योग बंद पडलेत. परंपरागत उपजिविकेचे साधन नाही व नवीन कारखाना पद्धतीत काम करण्याची पात्रता नाही त्यामुळे अनेक व्यक्तींवर बेकार राहण्याची वेळ आली.

या वरील कारणांव्यतिरिक्त आणखी काही कारणे बेकारी निर्माण करण्यास कारणीभूत ठरतात ते खालीलप्रमाणे सांगता येतील.

**(३) दोषपूर्ण किंवा सदोष शिक्षण पद्धती :**

भारताला स्वातंत्र्य मिळवून आज जवळपास ६५ वर्षे पूर्ण झालीत तरीसुद्धा भारतातील शिक्षण पद्धतीत फार बदल झालेला नाही. शिक्षण प्रक्रियेत व्यावसायिक शिक्षण व तांत्रिक शिक्षणाला अजूनही फारसे विशेष स्थान मिळालेले दिसत नाही. परंपरागत शिक्षण पद्धतीत शारीरिक कष्ट करण्याची तयारी केली जात नाही. औपचारिक शिक्षण घेतलेली व्यक्ती शारीरिक कष्ट करण्यास तयार होत नाही. दिले जाणारे शिक्षण हे तात्विक स्वरूपाचे आहे. त्याला व्यवहाराची जोड नाही यामुळे शिक्षण पूर्ण केल्यानंतर व्यक्तींच्या अंगी स्वत:च्या पायावर उभे राहण्याची कुवत येत नाही. बहुतेक व्यक्तींचा शिक्षणाचा उद्देश नोकरी करणे हाच असतो. त्यांना विशिष्ट प्रकारच्या नोकऱ्यांवर अवलंबून राहावे लागते व अशा नोकऱ्यांचे प्रमाण कमी आहे. इतर क्षेत्रात मात्र हे शिक्षित व्यक्ती बेकार राहतात. शिक्षित व्यक्तीला एखादा धंदा करणे कमीपणाचे वाटते. त्यामुळे अनेकांवर बेकार राहण्याची वेळ येते. परिणामी बेकारीत वाढ होत जाते.

**(४) लोकसंख्या वाढ :**

भारतात ज्या प्रचंड वेगाने लोकसंख्या वाढत आहे, त्यामुळेही बेकारी निर्माण होत आहे असे म्हणता येते. १९२१ साली २५.२ कोटी असणारी लोकसंख्या २०११ साली १२१ कोटी झाली. परंतु ज्या गतीने लोकसंख्या वाढते आहे, त्या गतीने रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. सर्वांनाच नोकऱ्या उपलब्ध करून देणे सरकारला शक्य होत नाही. म्हणून भारतात लोकसंख्या वाढ हे बेकारी निर्माण होण्याचे कारण मानले जाते.

**(५) उपभोगापेक्षा बचतीचे प्रमाण वाढले :**

बेकारीचे प्रमाण उपभोग आणि बचत यांच्या प्रमाणावर अवलंबून असते. जर वस्तूंचा उपभोग घेण्याचे प्रमाण बचतीपेक्षा जास्त असेल तर खर्च जास्त होईल. जर जास्त खर्च केला तर निर्मित वस्तूंना भरपूर मागणी येईल. मागणी वाढली तर उत्पादन वाढवावे लागेल. त्यासाठी नवीन रोजगार किंवा नोकऱ्या निर्माण होतील परंतु याउलट जर उपभोगापेक्षा बचतीचे प्रमाण वाढले तर वस्तूंची मागणी कमी होईल. परिणमी उत्पादन कमी करावे लागेल. उत्पादकांचा नफा कमी होईल त्यासाठी काही कामगारांना कमी करावे लागेल. कामगार कपात होईल व त्यामुळे कामगारांवर बेकार होण्याची वेळ येईल.

**(६) सरकारी नियोजनाचा अभाव**

सरकार पंचवार्षिक योजना आखत असते. या योजना आखत असताना भविष्यात आपल्या देशात किती रोजगार निर्माण होणार आहे याचाही विचार करावा लागतो. परंतु नवीन निर्माण होणाऱ्या श्रमशक्तीसाठी कोणकोणत्या उद्योगांना चालना द्यावी लागेल व श्रमिकांना किंवा नवीन रोजगाराला कसे सामावून घेता येईल याबाबतचे धोरण व प्रत्यक्ष कार्यवाही यात मात्र तफावत दिसून येते. प्रत्यक्ष नियोजन केले जात नाही. सरकार फक्त आश्वासन देते. अंमलबजावणी मात्र पूर्ण केली जात नाही, यामुळेही बेकारीचे प्रमाण वाढत आहे.

वरीलप्रकारे बेकारी निर्माण होण्याची विविध कारणे सांगता येतात.

## ३. **बेकारीचे प्रकार** (Types of Unemployment) :

भारतीय समाजात बेकारी निर्माण होण्यामागे विविध कारणे कारणीभूत होत असतात. बेकारीला कारणीभूत होणाऱ्या कारणांनुसार परीस्थितीनुसार बेकारीचे वेगवेगळे प्रकार केले जातात. यापैकी काही प्रमुख प्रकारांचा आपण या ठिकाणी विचार करणार आहोत.

**(१) हंगामी बेकारी** (Seasonal Unemployment) :

काही उद्योगधंद्यात, व्यवसायात परिस्थितीनुसार उत्पादनाच्या प्रमाणात वाढ किंवा घट होत असते. जेव्हा उत्पादन जोरात असते तेव्हा कामगारांना कामावरून कमी केले जाते. उदा. भारतात पेरणीच्या दिवसात अनेक लोकांना काम मिळते तसेच नोव्हेंबर ते मार्च-एप्रिल या कालखंडात साखर उत्पादन जोरात असते. साखर कारखाने जोरात चालतात तेव्हा काम मिळते; परंतु कारखाने बंद झाल्यानंतर अनेक कामगारांना घरी बसावे लागते. डॉ. आर. के. मुखर्जी यांनी त्यांच्या 'इकॉनॉमी ऑफ इंडिया' या ग्रंथात म्हटले आहे की, उत्तर प्रदेशातील शेतकरी वर्गाला वर्षातून केवळ २०० दिवसच काम मिळते किंवा काम

करतो उरलेले दिवस ते बेकार असतात.

अशाप्रकारे उत्पादन क्षेत्रातील उलाढाली ठराविक काळात होत असल्यामुळे कामगारांना काही दिवस काम मिळते; परंतु इतर दिवस ते बसून राहतात. अशा बेकारीला हंगामी बेकारी असे म्हणतात. हंगामी बेकारी निर्माण होण्यास प्रामुख्याने लोकसंख्या वाढ, ग्रामीण उद्योगधंद्याचा ऱ्हास शेतीक्षेत्रातील अपूर्ण विकास ही कारणे कारणीभूत असतात.

**(२) तांत्रिक बेकारी** (Technological OR Frictional Unemployment) :

बाजारात वस्तूंची मागणी सतत कमी किंवा जास्त होत असते. जर एखाद्या वस्तूची मागणी जास्त झाली तर अशा वस्तूंचे उत्पादन जास्त काळ चालते किंवा अशा वस्तूचे उत्पादन करण्यात जो कामगार गुंतलेला असतो तो बेकार होत नाही. परंतु जर वस्तूंची मागणी कमी झाली तर मात्र या वस्तू तयार करणाऱ्या कामगारांवर बेकार होण्याची वेळ येते. हे केवळ बाजारातील वस्तूंच्या मागणीच्या परिणामामुळे घडून येते. अशा बेकारीला तांत्रिक बेकारी असे म्हणतात. अशी बेकारी जेव्हा जुन्या यंत्रांच्या किंवा मशिनरीच्या जागी नवी यंत्रे किंवा मशिनरी बसविल्यामुळे तसेच जी कामे किंवा वस्तूंचे उत्पादन पूर्वी हाताने केले जात होते तेथे यंत्राच्या सहाय्याने जर उत्पादन होऊ लागले तर अनेक कामगारांना घरी बसावे लागते. तेव्हा तांत्रिक बेकारी निर्माण होते.

तांत्रिक बेकारी निर्माण होण्यामागे बाजारपेठेतील वस्तूंची मागणी विषयी अनिश्चितता, स्वयंचलन ही कारणे कारणीभूत ठरतात.

**(३) तात्पुरते बेकार (**Temporary Unemployment**) :**

तरुणांनी शिक्षण व प्रशिक्षण पूर्ण करतात. त्यांना ताबडतोब काम किंवा नोकरी मिळत नाही. त्यांना पुरेसा अनुभव नसल्यामुळे किंवा कामगारांसाठी जागा शिल्लक नसल्यामुळे अनेकांना काही काळासाठी बेकार राहावे लागते. त्यामुळे शिक्षण व प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर योग्य काम मिळेपर्यंत व्यक्तीला बेकारी स्विकारावी लागते. तेव्हा त्यांचा समावेश तात्पुरत्या बेकारीत होतो.

**(४) ऐच्छिक बेकारी** (Voluntary Unemployment) **:**

बऱ्याचदा तरुणांनी घेतलेले शिक्षण व प्रशिक्षण यानुसार हवी असलेली नोकरी मिळत नाही. तसेच जर नोकरी किंवा काम मिळालेच तर त्या कामापासून मिळणारे वेतन कमी असते. अशा कारणांमुळे अनेकदा व्यक्ती नोकरी स्विकारत नाही. लायकीप्रमाणे काम न मिळाल्यामुळे मिळणारी नोकरी तरुण स्विकारत नाही व बेकार राहतात अशा बेकारांचा उल्लेख ऐच्छिक बेकार म्हणून केला जातो.

**(५) चक्राकार स्वरूपाची बेकारी** (Cyclic Unemployment) **:**

बाजारपेठेत नेहमी वस्तूंच्या मागणी व पुरवठ्यात चढ-उतार होत असतात. या चढउतारांचा परिणाम वस्तूंच्या किंमती कमी किंवा जास्त होण्यात होतो. जर वस्तूंची किंमत वाढली तर उतपादकांच्या किंवा मालकाच्या नफ्यात वाढ होते. तेव्हा उत्पादक आपले कारखान्यातील उत्पादन वाढविण्यासाठी जास्तीत जास्त भांडवल लावतो व गुंतवणूक करतो. त्यामुळे अनेक लोकांना काम मिळते व बेकारीचे प्रमाण कमी होते; परंतु या उलट

जर वस्तूंच्या किंमती कमी झाल्या तर वस्तूंचे उत्पादन कमी प्रमाणात केले जाते. अशा वेळेस अनेक कामगारांना कामावरून कमी केले जाते. तेव्हा बेकारीचे प्रमाण वाढते. अशाप्रकारे बाजारपेठेतील उलाढालीमुळे वस्तूंच्या मागणीत वाढ किंवा घट झाल्यामुळे बेकारीचे प्रमाण कमी-जास्त होते तेव्हा अशा बेकारीला चक्राकार स्वरूपाची बेकारी असे म्हणतात.

**(६) छुपी बेकारी :**

छुपी बेकारी किंवा प्रच्छन्न बेकारी म्हणजे ही बेकारी व्यक्तीच्या तसेच समाजाचाही लक्षात येत नाही. या प्रकारात प्रत्यक्ष व्यक्ती काम करताना दिसते परंतु त्यांच्या कामामुळे प्रत्यक्ष उत्पादनात वाढ झाल्याचे दिसत नाही. म्हणजेच प्रत्यक्ष व्यक्ती काम करीत असल्या तरी सामाजिक व आर्थिक दृष्टीकोनातून त्या बेकारच असतात. साधारणपणे मोठे पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या कुटुंबात अशा प्रकारची बेकारी दिसून येते. शेती, विणकाम, सुतारकी, मच्छीमारी या व्यवसायात ही बेकारी आढळते.

जेव्हा शेती व्यवसायात अवश्यकतेपेक्षा अधिक लोक काम करतात तेव्हा ते लोक शेतात अतिरिक्त आहेत असे म्हणावे लागते. अशा लोकांची उत्पादकता शून्य असते. म्हणजेच ते लोक खऱ्या अर्थाने बेकार असतात; पण त्यांची जाणीव नसते किंवा लक्षात येत नाही. उदा. ५ माणसांच्या कुटुंबाजवळ १० एकर जमीन असून, ती जमीन कसण्यासाठी ५ माणसांचे कष्ट पुरेसे आहेत. परंतु काही काळानंतर या कुटुंबात एका मुलाचा समावेश झाला. तो मोठा झाल्यावर शेतीकाम करतो. म्हणजेच आता कुटुंबात ६ सदस्य असून हा ६ वा सभासद शेतीत काम करीत असला तरी प्रत्यक्षात त्याच्या कामामुळे शेतीचे उत्पादन वाढत नाही. म्हणून त्याचे श्रम अतिरिक्त ठरतात व काम करत असूनही तांत्रिक दृष्टीने तो बेकार असतो. म्हणून अशा बेकारांना छुपी बेकारी असे म्हणतात. अशा प्रकारची बेकारी शहरी भागातही दिसून येते.

**(७) अनैच्छिक बेकारी** (Involuntary Unemployment) **:**

बऱ्याचदा व्यक्तींना त्यांच्या क्षमतेपेक्षा कमी प्रतीचे कमी लायकीचे काम करावे लागते किंवा पात्रतेपेक्षा कमी वेतनावर पगारावर काम करावे लागते. या प्रकारात असे दिसते की व्यक्तीला जरी काम मिळालेले असले तरी ते पुरेसे नसते किंवा व्यक्तीची लायकी (पात्रता) त्यापेक्षा जास्त काम करण्याची असते. परंतु व्यक्तीने नाइलाजाने ते काम स्विकारलेले असते, म्हणजे व्यक्ती नोकरीवर असते. परंतु पूर्ण क्षमतेने काम करू शकत नाही. इच्छेविरुद्ध काम करते याचा अर्थ ती बेकार नाही असा होत नाही. अशा बेकारीला अदृश्य किंवा अनैच्छिक बेकारी म्हणतात.

**४. बेकारी दूर करण्याचे उपाय (बेकारी निर्मूलनाचे उपाय) :**

बेकारी ही तात्पुरती असो किंवा कायमची असो. बेकारी समस्येचे दूरगामी परिणाम व्यक्तीच्या जीवनावर आणि समाजावर होतात. म्हणून बेकारी समस्या सोडविणे, तिची तीव्रता कमी करणे हे देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे हा प्रश्न सोडविण्यासाठी शासकीय, सामाजिक पातळीवर व आर्थिक पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. यासंदर्भात खालील उपाय सांगता येतात. त्यांचा आपण विचार करू.

**(१) शिक्षण व्यवस्थेत सुधारणा :**

सद्यस्थितीत जी शिक्षण पद्धती आहे. ती ब्रिटीश परंपरेवर आधारीत आहे. त्याऐवजी सुधारीत शिक्षण पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. केवळ तरुणांना शिक्षण देऊन पदवीपर्यंत पोहोचवतो पदवी मिळते; परंतु उपजिविका कशी करावी हे मात्र शिकविले जात नाही. शिक्षणाच्या बाजारात कारकून निर्माण होत आहेत; परंतु तंत्रज्ञांची उणिव आहे. हे थोपविण्यासाठी शासनाने पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून युवकांना तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन केल्यात परंतु परिस्थिती फारशी बदलली नाही म्हणून प्रथमिक शिक्षणानंतरचा अभ्यासक्रम असा तयार करावा की जो देशाच्या सर्व क्षेत्राच्या गरजा भागवेल. आज सरकारने राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणतर्फे देशातील 'श्रमिक बाळाची पाहणी' हाती घेतली असून, त्यानंतरच्या निष्कर्षानंतरच सरकार योग्य ते पाऊल उचलतील व भविष्यातील धोरण ठरणार आहे. व्यावसायिक शिक्षणात वाढ करणे महत्त्वाचे आहे.

**(२) लोकसख्या वाढीवर नियंत्रण :**

भारतात ज्या वेगाने लोकसंख्या वाढत आहे त्या प्रमाणात देशात कामधंदा किंवा नोकरी उपलब्ध होत नाही. त्यामुळे बेकारीचे प्रमाण वाढत आहे. हे टाळण्यासाठी वाढत्या लोकसंख्येबरोबर कडक नियंत्रण ठेवले पाहिजे. कुटुंब नियोजन, कुटुंब कल्याण कार्यक्रम यशस्वी रितीने राबविला पाहिजे. यासाठी सक्ती न करता लोकांचे मतपरिवर्तन करणे, लोकशिक्षण देणे, जाणीव करून देणे या मार्गाचा अवलंब करणे उपयोगी ठरेल. परिणामी बेकारी कमी होण्यास मदत होईल.

**(३) आर्थिक विकासाचा वेग वाढविणे :**

लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवतानाच देशाच्या आर्थिक विकासाची गती वाठविणे हे देखील तेवढेच आवश्यक आहे. त्यासाठी

- औद्येगिकीरणाची गती वाढविणे, मोठमोठे उद्योगधंद्यांची निर्मिती करणे.
- लघुउद्योग व कुटीरोद्योगांचे पुर्नर्जीवन करून त्यांचा योग्य विकास करणे.
- रस्ते बांधणी योजना, लघु पाटबंधारे योजना व इतर सामाजिक विकास कार्यातून ग्रामीण विकास साधणे.
- तांत्रिक साधनांचा विकास, पाटबंधारे योजनांचा योग्य विस्तार व शेतीचे पुनर्संघटन करून देशात दुसरी हरीत क्रांती घडवून आणणे.
- विविध उद्योगांना सरकारने मदत देऊन स्थिर करणे.

अशा विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिक विकासाचा वेग वाढविता येईल व त्याचा परिणाम म्हणून बेकारी समस्येची तीव्रता कमी होऊ शकते.

**(४) आर्थिक मदत :**

देशातील ग्रामीण भागातील गरीब, लहान शेतकरी यांना शेती व्यवसायात सुधारणा व दूध व्यवसाय, शेळी पालन, कुक्कूटपालन, मत्सोद्योग यासारखे व्यवसाय सुरू करण्यासाठी

कमी व्याजदराने, कर्जे उपलब्ध करून दिलीत तर लाखो शेतकरी कुटुंबांना फायदा होऊन रोजगार उपलब्ध होऊन बेकारी कमी होण्यास मदत होऊ शकते.

**(५) कृषी सेवा केंद्राची स्थापना :**

देशात अनेक सुशिक्षित, शेतकी पदवीधर इंजिनिअर्स आहेत. यांना स्वयंपूर्ण होता यावे म्हणून शेती व्यवसायाशी संबंधित अवजारे, त्यांची दुरुस्ती, ती औजारे भाड्याने देता यावी याची सोय शेतकऱ्यांना तांत्रिक स्वरूपाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण मार्गदर्शन, करणे, शेती औजारांच्या सुट्या भागांचा पुरवठा यासारख्या सेवा मिळवून देणारी कृषी सेवा केंद्र स्थापन केली पाहिजेत त्यामुळेही बेकारी कमी होण्यास मदत होईल.

**(६) पंचवार्षिक योजना आणि बेकारी निर्मूलन :**

भारत सरकारने स्वातंत्र्या प्राप्तीनंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पावले उचललीत. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत बेकारी दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेत. एकात्मिक ग्रामीण विकास यंत्रणा (IRDP) १९७८-७९ पासून सुरू केली. १९८० मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (NREP), १९८३ मध्ये ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम (RLEGP) या योजनेनुसार किमान एका व्यक्तीस दरवर्षी १०० दिवसांच्या रोजगार उपलब्ध करून देणे, १५ ऑगस्ट १९७९ रोजी ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षणाची योजना (TRYSEM) सुरू झाली. या योजनेनुसार १८ ते ३५ वयातील तरुणांना आवश्यक ते तांत्रिक प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगार करता यावा हा उद्देश आहे. १ एप्रिल १९८९ पासून जवाहर रोजगार योजना (JRS) कार्यान्वित केली.

तसेच महात्मा गांधी नॅशनल रोजगार गॅरन्टी स्किम (मनरेगा) शासनाने सुरू केली. यानुसार एका व्यक्तीला वर्षातून किमान १०० दिवस काम दिले जाते. अशा विविध रोजगाराभिमूख योजना शासन राबविते. त्या अधिक ठोसपणे अंमलबजावणी करून राबविण्यात त्याविषयी ग्रामीण भागात जाणीव जागृती केली तर बेकारी दूर होण्यास जास्त मदत होईल.

त्याचा सोबत अन्य योजनांचा समावेश बेकारी निर्मूलनात होतो.

**(र) बेकारी भत्ता कायदा :**

भारतातील सुशिक्षित व पदवीधर सुशिक्षितांना थोडीशी आर्थिक मदत मिळावी म्हणून हा कायदा करण्यात आला. हा कायदा महाराष्ट्र राज्याने प्रथम मंजूर केला. रोजगार कार्यालयात (Employment Office) नाव नोंदविल्यानंतर चौथ्यावर्षी सरकार या पदवीधारकाला नोकरी देऊ शकली नाही तर त्यास बेकार भत्ता देण्याची तरतूद आहे. महाराष्ट्र सरकारने सुशिक्षित बेकारांना दिल्या जाणाऱ्या भत्त्याची रक्कम आता दरमहा ३०० रु. इतकी केली आहे. यात काही दोष असतो. तरी थोडा आधार बेकारांना मिळतो.

**(ल) संजय गांधी स्वावलंबन योजना :**

ही योजना २ ऑक्टोबर १९८० पासून महाराष्ट्र राज्यात सुरू करण्यात आली. या योनजेच्या उद्दिष्टात

-बेकारी नाहीशी करणे.

– गरीब व्यक्तीला उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करून देणे.

– लहान उद्योग किंवा व्यवसायातून स्वयंरोजगार निर्माण करणे,.

या योजनेअंतर्गत कर्ज घेतलेली व्यक्ती चर्मोदयोगे, लोहारकाम, सुतारकाम, चहाचे दुकान, कुंभार काम, भाजीपाला विक्री केंद्र असे लहान व्यवसाय सुरू करू शकतात.

अशा विविध उपपाययोजनांमुळे देशातील बेकारीचे प्रमाण काही प्रमाणात कमी होऊन या समस्येची तीव्रता कमी होण्यास मदत होईल. आज १२१ कोटी देशाची लोकसंख्या असून, ९.८ कोटी लोकसंख्या बेकार आहे. ही संख्या जास्त नसली तरी अजून जाणीवपूर्वक व परिणामकारक प्रयत्न केल्यास ही संख्या कमी होऊ शकते व मजबूत देशाची सुदृढ समाजाची निर्मिती होईल असे म्हणता येईल!

### ६.२.२ लोकसंख्या वाढीची समस्या :

(Problems of Population Growth)

लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून विचार करता भारताचा जागतिक स्तरावर दुसरा क्रमांक दिसून येतो. भारत देश जगातील सातव्या क्रमांकाचा मोठा देश आहे. भारताचे एकूण क्षेत्रफळ ३९ लाख ८७ हजार २६३ चौ. कि. मी. इतके आहे. ते जगाच्या एकूण क्षेत्रफळाच्या २.४% इतके आहे तर भारताची लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात १६.७% इतकी आहे.

जगात सर्वात जास्त लोकसंख्या चीन देशाची आहे तर लोकसंख्येच्या दृष्टीने जगात भारताचा दुसरा क्रमांक लागतो. २००१ च्या जनगणनेच्या नुसार भारताची लोकसंख्या १०२ कोटी ७० लाख ५ हजार २४७ इतकी होती. तर २०११च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१ कोटी १ लाख ९३ हजार ४२२ इतकी होती. म्हणजे २००१ ते २०११ या १० वर्षांच्या कालखंडात भारताची लोकसंख्या १८ कोटी ३१ लाख ८८ हजार १७५ इतक्याने वाढली. म्हणजेच एकूण लोकसंख्येत १८.१५ कोटीने वाढलेली दिसून येते.

तर एकूण लोकसंख्येत १७.६४% ने वाढ झालेली आढळते.

इ. स. १९०१ मध्ये भारताची लोकसंख्या ही २३ कोटी २० लाख इतकी होती ती २०११ मध्ये १२१ कोटी १ लाख ९३ हजार ४२२ इतकी झाली म्हणजे जवळपास ११ वर्षात ९७ कोटी ८१ लाख लोकसंख्या वाढली म्हणजे ४ पटीपेक्षा जास्त लोकसंख्या वाढलेली दिसून येते. म्हणजे भारतात १९०१ मध्ये लोकसंख्येची घनता (दर स्क्वेअर मिटर) ७७ इतकी होती ती २०११ मध्ये ३८२ इकी झालेली आहे.

२०११च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येत पुरुषांची संख्या ६२ कोटी ३७ लाख २४ हजार २४८ (६२.३७) इतकी होती तर स्त्रीयांची संख्या ५८ कोटी ६४ लाख ६९ हजार १७४ (५८.६५ कोटी) इतकी आहे.

तर २०११ च्या जनगणनेनुसार स्त्री–पुरुष लिंग गुणोत्तर म्हणजे दर हजारी पुरुषामागे स्त्रीयांचे प्रमाण ९४० इतके आहे. साक्षरतेची विचार करता २०११ च्या जनगणनेनुसार ७४.०४% लोकसंख्या साक्षर दिसून येते. जे प्रमाण २००१ मध्ये ६४.८३ इतके होते.

पुरुषांची साक्षरता ८२.१४% तर स्त्रीयांची साक्षरता ६५.४६% इतकी आढळते.

वरील आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की जगातील एकूण लोकसंख्येपैकी ३४% लोकसंख्या केवळ चीन व भारत या दोन देशांची आहे व उरलेली ६६% लोकसंख्या ही जगातील इतर २३४ देशांची आहे. यावरून या दोन देशांची लोकसंख्या वाढीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. तर फ्रान्स, स्वीडन, जर्मनी, हॉलंड, स्वित्झर्लंड इ. देशात लोकसंख्या अतिशय कमी आहे. त्यामुळे या देशांमध्ये न्यून लोकसख्येची समस्या निर्माण झालेली आहे.

यावरून हे स्पष्ट होते की लोकसंख्येत जास्तीची प्रचंड वाढ होते. ही लोकसंख्येची वाढीची समस्या तर कमी लोकसंख्या असल्यामुळे न्यून लोकसंख्येची समस्या निर्माण होते.

लोकसंख्याविषयक अभ्यास करताना त्याबाबतीत ३ प्रकारच्या समस्या असू शकतात.

(१) नैसर्गिक साधन संपत्ती भरपूर असूनही जर तेथील लोकसंख्या अपूरी असेल तर तेथील साधनसामग्रीचा उपयोग करण्यासाठी ती लोकसंख्या अपूर्ण पडते म्हणून तेथे लोकसंख्येची समस्या

(२) देशातील लोकसंख्या इतकी वाढते की त्यामुळे त्या देशातील असलेल्या साधन सामग्रीवर ताण पडतो. ती अपूर्ण पडते. म्हणून त्या देशांमध्ये वाढती लोकसंख्या ही समस्या असते.

(३) तर काही ठिकाणी नैसर्गिक साधनसामग्री व लोकसंख्या हे परस्परपूरक नसल्यामुळे योग्य संतुलन नसल्यामुळे ती एक समस्या ठरते कारण असलेल्या लोकसंख्येत आळशी, परावलंबी, अपंग, रोगी, म्हातारे व मुल यांचे प्रमाण जास्त असते. म्हणजे सुदृढ, कार्यक्षम लोकांचे प्रमाण कमी असले तर देशाच्या प्रगतीत अडथळे निर्माण होतात.

अशाप्रकारे लोकसंख्येची समस्या ही तीन प्रकारची असू शकते. जास्त लोकसंख्या ही समस्या आहे. कमी लोकसंख्या ही समस्या आहे आणि आहे त्या लोकसख्येत जर गुणवत्तापूर्वक कार्यक्षम लोकसंख्या नसेल तरीही लोकसंख्याबातीतही समस्या दिसून येते.

लोकसंख्या वाढ आणि सामाजिक विकासासंबंधी अतिशय महत्त्वाचा विचार थॉमस रॉबर्ट, माल्थस यांनी १७९८ मध्ये मांडला. त्यांच्यामते लोकसंख्येचा आकार नियंत्रित करण्यासाठी व्यक्तीने नैतिक संयम पाळणे, विवाहाच्या वयात वाढ करणे, कुटुंब नियोजनाच्या साधनांचा वापर करणे असे उपाय केले नाहीत तर लोकसंख्या अशीच वाढत जाईल. जर मानवाने लोकसंख्येवर नियंत्रण ठेवले नाही तर निसर्गाकडून लोकसंख्येला आळा घातला जाईल जसे दुष्काळ, महापूर, भूकंप, उपासमार इत्यादी नैसार्गिक कारणांमुळे मृत्यू होऊन येथील मृत्युदर वाढेल आणि लोकसख्येत घट होईल. माल्थसने २१३ वर्षापूर्वी लोकसंख्यावाढीमुळे समाजावर होणाऱ्या विपरीत परिणामाबद्दल आपले विचार मांडून समाजाला जागृत केले होते. परंतु त्यांच्या या विचारांवर बरीच टीका केली गेली होती. लोकसंख्येचा विचार हा आर्थिक आणि सामाजिक विकास प्रक्रियेचा एक महत्त्वाचा घटक व्हावा म्हणून संयुक्त राष्ट्र संघाने १९७४ हे वर्ष जागतिक लोकसंख्या वर्ष म्हणून जाहीर केले.

लोकसंख्येचा आकार खूप जास्त असणे किंवा खूप कमी असणे या दोन्ही बाबी

समाजाच्या विकासाच्या दृष्टीने प्रतिकूल आहेत. लोकसंख्येची वाढ सतत्याने होत असेल तर लोकसंख्येचा विस्फोट होऊन त्याचा वाईट परिणाम सामाजिक विकासावर होत असतो. लोकसंख्या अतिरिक्त वाढल्यामुळे सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या ज्या योजना असतात त्या पूर्ण होऊ शकत नाहीत. परिणामी लोकांचा सामाजिक विकास होत नाही म्हणून कोणत्याही देशातील लोकसंख्या म्हणजे लोकसंख्येचा आकार जास्त किंवा कमी असता कामा नये. लोकसंख्येचा आकार योग्य म्हणजे पर्याप्त असेल तर त्या देशां चा सामाजिक व आर्थिक विकास होतो. म्हणून देशातील लोकसंख्येच्या आकारावर तेथील सामाजिक विकास अवलंबून असतो.

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये समाजातील सर्व स्तरातील लोकांचा सामाजिक विकास झाला पाहिजे आणि हा विकास लोकशाहीच्या मार्गाने व्हायला पाहिजे. कारण भारताने लोकशाही मूल्यांचा स्विकार केला आहे. परंतु जेव्हा लोकसंख्या जास्त असेल तेव्हा विकासाची गती मंद असते. कारण जास्त लोकसंख्येचा विकासाच्या प्रक्रियेवर विपरित परिणाम होत असतो.

भारतातील लोकसंख्या वाढ :

भारताच्या लोकसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. भारतातील लोकसंख्येचा विचार करताना १९०१ ते २०११ पर्यंतच्या लोकसंख्येची आकडेवारी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. ते पुढील कोष्टकाच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**भारतातील एकूण लोकसंख्या (१९०१ ते २०११)**

| वर्ष | लोकसंख्या कोटीमध्ये | दहा वर्षातील वाढ किंवा घट कोटीमध्ये | दहा वर्षांच्या वाढीच्या किंवा घराचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १९०१ | २३.८३ | १.१ | १.१ |
| १९११ | २५.२० | +१.३६ | +५.७५ |
| १९२१ | २५.१३ | −0.७७ | −0.३१ |
| १९३१ | २७.८९ | +२.७६ | +११.00 |
| १९४१ | ३१.३६ | +३.९६ | +१४.२२ |
| १९५१ | ३६.१0 | +४.२४ | +१३.३१ |
| १९६१ | ४३.९२ | +७.७६ | +२१.६४ |
| १९७१ | ५४.८१ | +१0.८९ | +२४.८0 |
| १९८१ | ६८.६३ | +१३.५१ | +२४.६६ |
| १९९१ | ८४.३३ | +१६.0६ | +२३.८६ |
| २००१ | १०२.७० | १८.३७ | +२१.३४ |
| २०११ | १२१.०१ | १८.३१ | १७.६४ |

वरील कोष्टकावरून असे लक्षात यते की १९०१ मध्ये भारताची लोकसंख्या २३ कोटी ८३ लाख होती. १९११ मध्ये ही लोकसंख्या २५ कोटी २० लाख इतकी झाली तर १९२१ मध्ये भारताची लोकसंख्या २५ कोटी १३ लाख इतकी होती. म्हणजे १९११ ते १९२१ या दहा वर्षांच्या कालखंडात भारताच्या लोकसंख्येत वाढ न होता लोकसंख्येत घट झालेली दिसून येते. कारण या कालखंडात १९१८ ते १९१९ च्या दरम्यान भारतात प्लेग, मलेरिया, कॉलरा, एन्फ्ल्युएंझा यासारख्या रोगांच्या साथी निर्माण झाल्या. त्यामुळे या काळात मोठ्या प्रमाणात मर्त्यता (मृत्यूदर) घडून आल्यात म्हणजेच जन्मदरापेक्षा मृत्यूदर अधिक होता.

१९२१ नंतरचा प्रत्येक दशकात मात्र भारताची लोकसंख्या वाढत गेली. १९५१ पर्यंत हळुवार लोकसंख्या वाढीचा काळ म्हणून ओळखला जातो. या तीस वर्षांच्या कालखंडात ११ कोटीनी लोकसंख्या वाढली. या कालखंडात वैद्यकीयशास्त्रात प्रगती होऊन रोग प्रतिबंधक औषधी उपलब्ध झाल्यामुळे मृत्युदरात घट घडून आली. परंतु जन्मदर मात्र तोच राहिला म्हणून लोकसंख्यत वाढ निर्माण झालेली दिसते.

१९५१ नंतर मात्र लोकसंख्ये मध्ये फार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसते. १९५१ ते १९८१ या कालखंडात ३२.२ कोटी इतकी लक्षणीय वाढ लोकसंख्येत झालेली आहे. १९८१ ते २००१ या वीस वर्षांच्या कालखंडात लोकसंख्या वाढीचा वेग अतिशय जास्त दिसतो. या वीस वर्षांच्या कालखंडात ३४.४ कोटी इतकी लोकसंख्या वाढ घडून आली. तर २००१ ते २०११ या दहा वर्षांच्या कालखंडात १८.३१ कोटीने लोकसंख्येत वाढ झालेली दिसून येते.

वरीलप्रमाणे चारही टप्प्यामध्ये ठळकपणे नजरेत भरणारी बाब म्हणजे १९२१ नंतर भारताच्या लोकसंख्येत सातत्याने वाढ होत गेली. १९२१ पर्यंत मात्र लोकसंख्या सामान्यपणे स्थिर असलेली दिसून येते. म्हणजेच १९२१ हे लोकसंख्या विभाजनाचे वर्ष आहे. १९२१ नंतर जन्मदर फारच कमी झाला नाही परंतु मृत्यूदर मात्र तीव्रतेने खाली आला. परिणामी एकूण लोकसंख्येत अकि जलदगतीने वाढ घडून आली. जर याच दराने लोकसंख्या वाढत रहिली तर इ. स. २०२१ मध्ये भारताची लोकसंख्या अंदाजे १३५ कोटींच्या घरात पोहोचण्याची शक्यता आहे.

देशाची भरभराट देशाच्या विकास त्या देशाच्या लोकसंख्येवर अवलंबून असतो. जी सी. व्हिपल्ने यांच्यामते 'राष्ट्राची खरी संपत्ती, जमीन, जंगले, खनिज संपत्ती, पाणी, पैसे हे नसून त्या देशातील सुदृढ व सुखी मुले,स्त्रिया आणि माणसे ही आहे.' असे असले तरी हे केव्हा होऊ शकते जेव्हा देशातील उपलब्ध लोकसंख्येचा विचार करून योग्य नियोजन व साधन सामग्रीचा मेळ घातला तर देशातील लोकसंख्यावाढ ही समस्या न वाटता विकासाचे साधन करुन देशाची प्रगती होऊन सर्वसामान्य माणसाचा राहणीमानाचा दर्जा यातून एक सक्षम विकसित राष्ट्र निर्माण होऊ शकते.

भारताचा एकूण लोकसंख्येचा विचार करता भारतात दरडोई शेतीचे प्रमाण एक एकराच्या खाली गेले. परिणामी पुढच्या पिढीला अधिक प्रमाणात उपासमारीचा सामना करावा लागेल.

व्यक्तीच्या अन्नाचा गरजांचा विचार करता भारतात दरडोई सुमारे २३०० कॅलरीज (उष्मांक) मिळतील इतके अन्न प्रत्येक माणसाला हवे. परंतु प्रत्यक्षात मात्र प्रत्येक व्यक्तीला फक्त १६५० कॅलरीज मिळतील एवढेच अन्न उपलब्ध आहे. म्हणजेच भारतातील प्रत्येक व्यक्तीला मिळणारे अन्न अपुरे आहे. हे वाढत्या लोकसंख्येचे लक्षण आहे.

भारतात लोकांना राहण्यासाठी घरांची व्यवस्थाही चांगली नाही. 'राष्ट्रीय नमुना पाहणीच्या' अहवालावरून असे निदर्शनास आले होते की ३९ % घरे केवळ एकाच खोलीची आहेत. शहरातील ४४% कुटुंब एका खोलीच्या घरात राहतात. २८% कुटुंब दोन खोल्यांच्या घरात राहतात. सुमारे ५% कुटूंबांना राहण्यासठी घरेच नाहीत.

जर भारतात सरकार लोकांना राहण्यासाठी योग्य घरे देण्यास असमर्थ असेल तर त्याचा अर्थ भारताची लोकसंख्या जास्तीची आहे असे म्हणावे लागेल.

वरील सर्व मुद्दयांचा विचार करता हे लक्षात येते की भारताची लोकसंख्या ही झपाट्याने वाढतांना दिसत आहे. दुर्दैवाने आज कोणत्याच राजकीय पक्षाचे नेते लोकसंख्या वाढीकडे गंभीरतेने पाहात नाहीत. त्यातील काही राजकीय नेतेच स्वत: कुटुंब नियोजनाचे धोरण पाळत नाहीत हेच दिसते. याचा परिणाम होऊन भविष्यात भारतात लोकसंख्या वाढीचा स्फोट झाल्याशिवाय राहणार नाही. यासाठी खबरदारी घेणे जरूरी आहे आणि म्हणून आधी लोकसंख्या वाढीची कारणे कोणती हे समजून घेतले तर लोकसंख्या वाढीवर नियंत्रणाचे उपायही सांगता येतील.

### १. भारतातील लोकसंख्या वाढीची कारणे :

भारतातील लोकसंख्या जलद गतीने का वाढते आहे याच्या कारणांचा जेव्हा समाजशास्त्रज्ञ व लोकससंख्याशास्त्रज्ञ यांनी शोध घेतला तेव्हा त्यांना त्यासाठी खालील कारणे कारणीभूत असल्याचे दिसून आले.

### (१) मृत्युदरापेक्षा जन्मदरात वाढ :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात औषध उपचाराच्या सोयी व समाजकल्याण संबंधी सवलतीत खूप वाढ झाली. ग्रामीण व आदिवासी भागात ठिकठिकाणी सरकारने प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना केली. त्यामुळे लोकांना औषधाच्या सोयी उपलब्ध झाल्या त्यामुळे मलेरिया, क्षय, प्लेग, कॉलरा, विषमज्वर यासारख्या साथीच्या रोगांवर नियंत्रण होऊ लागले. रोग तपासणीविषयक सवलतीत लक्षात येईल एवढी प्रगती झाली. याचा परिणाम भारतातील मृत्येचे प्रमाण घटण्यात झाला. मृत्यूदरापेक्षा जन्मदर अधिक नसल्यास लोकसंख्येत वाढ होते. १९२१ पर्यंत मृत्युदर आणि जन्मदर यात फारसा फरक नवहता. १९११ मध्ये २५.२१ कोटी लोकसंख्या भारतात होती. तर १९२१ मध्ये २५.१३ कोटी लोकसंख्या होती. म्हणजे १९११ ते १९२१ या दहा वर्षात जन्मदर हा मृत्युदरापेक्षा कमी होता म्हणून या दहा वर्षात लोकसंख्येत वाढ झाली नाही. परंतु १९२१ नंतर जन्मदराच्या तुलनेत मृत्युदरात खूप घट झाली. त्यामुळे लोकसंख्या सातत्याने वाढली. १९३१ ते १९४१ या दहा वर्षात दरहजारी जन्मदर ४५.२ तर मृत्यूदर ३६.२ इतका होता, तर १९९१ ते २००१ या काळात जन्मदर २४.८ आणि मृत्युदर ८.९ होता. या आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की सतत

मृत्युदरापेक्षा जन्मदर जास्त असल्यामुळे लोकसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. २०१२ च्या आकडेवारीवरून असे लक्षात यते की दर मिनिटाला ५१ बालके जन्माला येतात. जन्मदर व मृत्युदर हा जोपर्यंत सारखा होणार नाही तोपर्यंत लोकसंख्येत वृद्धी होत राहील.

**(२) दुष्काळावर नियंत्रण :**

इ. स. १९२१ पूर्वी पडलेल्या दुष्काळाचे स्वरूप स्थानिक स्वरूपाचे होते. त्या काळात दळणवळण व वाहतुकीच्या साधनांचा अभाव असल्यामुळे दुष्काळावर नियंत्रण ठेवणे अवघड झाले होते. परंतु पहिल्या महायुद्धानंतर दळणवळणाच्या व वाहतुकीच्या साधनांमध्ये जलद् गतीने विकास होत गेला. परिणामी खाद्यपदार्थ व इतर वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या म्हणजे आवश्यक ठिकाणी नेणे सोपे झाले. त्यामुळे दुष्काळात होणाऱ्या मृत्यूच्या प्रमाणात घट झाली. इ. स. १९४२ मध्ये बंगालमध्ये भिषण दुष्काळ पडला होता. परंतु दुष्काळामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी होते.

आज दळणवळाणाच्या आणि वाहतुकीच्या साधनांमध्ये वाढ झली. आर्थिक विकास झाला त्यामुळे दुष्काळाची झळ कमी पोहोचते, तीव्रता कमी होते. पूर्वी दुष्काळ हे मानवाच्या संहाराचे नैसर्गिक साधन मानले जात होते. आज मात्र तसे होत नाही. १९७०-७१, १९७२-७३, १९८४-८५, १९८६-८७, १९९२-९३ या काळात भारताच्या काही विभागात दुष्काळ पडूनही दुष्काळ नियंत्रण कार्यामुळे, दळणवळणाच्या वाहतुकीच्या सुविधांमुळे लोकांना दुष्काळाची तीव्रता जाणवली नाही. त्यामुळे लोकांचे बळी पडण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे मृत्युदरात घट झाली. परिणामी, लोकसंख्येत वाढ झालेली दिसते.

**(३) बालविवाह पद्धत किंवा कमी वयात विवाह करण्याची पद्धती :**

भारतात परंपरा व रूढींचा पगडा जास्त प्रमाणात दिसून येतो. आपल्या समाजात मुला-मुलींचे विवाह अल्पवयात करण्याची प्रथा आहे. ग्रामीण व आदिवासी समाजात मुला-मुलींचा विवाह लहान वयात करून दिला जातो. आपल्या मुला-मुलीचा विवाह करून देणे हे आई-वडील आपले कर्तव्य समजतात. तसेच विवाह हे पुत्र प्राप्तीचे वंश पुढे चालविण्याचे साधन मानले गेल्यामुळे हिंदू समाजात पुत्र प्राप्तीशिवाय मोक्षप्राप्ती होत नाही अशी श्रद्धा असल्यामुळे विवाह करणे अनिवार्य मानले जाते. परंतु कमी किंवा अल्पवयात विवाह झाल्यामुळे जननक्षमतेचा कालावधी जास्त मिळतो. जननशास्त्रज्ञांच्या मते १६ ते २५ या वयोगआचा कालावधी हा अधिक जननक्षमतेचा कालावधी असतो आणि भारतात या वयात मुला मुलीचे विवाह होऊन जातात. अल्पवयात विवाह केल्यामुळे भारतात जन्मदर जास्त आहे. म्हणून लोकसंख्या जास्त वेगाने वाढत आहे.

**(४) निरक्षरता किवां शिक्षणाचा अभाव :**

भारतात आजही शिक्षणाचे प्रमाण कमी दिसून येते. १९९१च्या जनगणनेनुसार भारतात साक्षरतेचे प्रमाण शेडा ५२.११% होते. २००१च्या जनगणनेनुसार भारतात साक्षरतेचे प्रमाण जवळपास ६४.८३% इतके होते. म्हणजे अजूनही ३५ ते ४०% जनता भारतीय समाजात निरक्षर आढळून येते. जरी साक्षरते प्रमाण वाढत असले तरी इतर देशांच्या तुलनेने ते खूप कमी आहे. एकूण भारताची साक्षरता ६४% असली तरी बिहार, राजस्थान मध्यप्रदेश,

उत्तरप्रदेश या राज्यांमध्ये साक्षरतेचे प्रमाण फार कमी आहे. एकूण साक्षरतेतही स्त्रीयांमधील साक्षरतेचे प्रमाण कमी दिसून येते. जर पती पत्नी हे दोघेही सुशिक्षित असतील तर ते कुटूंब नियोजनाचे महत्त्व सहजपणे समजू शकतात. परंतु त्यापैकी दोन्ही किंवा एक निरक्षर असतील तर ते पारंपरीक, आर्थिक विचारांचे असतात. मूल होणे ही परमेश्वराची इच्छा आहे. तो देवाचा प्रसाद आहे असे मानण्याची प्रवृत्ती दिसते. कुटुंब नियोजनाचे महत्त्व कळत नाही तसेच कुटूंब नियोजनाच्या साधन वापराबाबत उदासिनता आढळते. परिणामी, निरक्षर लोक जास्त मुलांना जन्म देतात. यावरून हे स्पष्ट होते की अधिक निरक्षतेमुळे जन्मदर जास्त असतो व त्यातून लोकसंख्या वाढण्यात मदत होते.

### (४) कुटुंब नियोजनाचा अभाव व धार्मिक दृष्टीकोन :

जे लोक धार्मिक दृष्टीने कर्मठ व परंपरावादी असतात ते कुटुंब नियोजनाच्या विविध उपयांना स्विकारत नाहीत व विरोध करतात. विविध स्त्रिया धर्मातील स्त्रिचा कुटुंब नियोजनाच्या साधनांचा वापर करणे त्यांना आवडत नाही. मुलांना जन्माला घालणे ही स्त्री जीवनाची सार्थकता आहे. असा विचार काही स्त्रीया करतात. अपत्य जन्माला घालणे परमेश्वराची इच्छा असते देवाच्या इच्छेविरुद्ध आम्ही का वागावे? असा विचार स्त्रिया मांडतात तर काही स्त्रिया व पुरुष हे मानतात की कुटुंब नियोजनाच्या साधनांचा वापर करून जन्माला येणाऱ्या बालकांचा जन्म रोखणे हे निसर्ग नियमाच्या विरुद्ध वागणे किंवा परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध जाणे होय. बऱ्याचदा हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन धर्मातील कट्टर धार्मिक विचारांनी माणसे कुटुंब नियोजन कार्यक्रमाला विरोध करतात. हिंदू धर्मात पुत्राच्या जन्माला महत्त्व आहे. मुलाच्या जन्मामुळे मोक्ष प्राप्त होतो. स्वर्ग प्राप्ती होते. अशी श्रद्धा हिंदू स्त्री-पुरुषांमध्ये असल्यामुळे पुत्र होईपर्यंत कुटुंब नियोजनाच्या साधनांचा वापर करत नाही त्यातून जन्मदर वाढून लोकसंख्या वाढ होताना दिसते.

### (५) कुटुंब नियोजनाच्या साधनांच्या वापराबाबत उदासिनता:

बहुतांशी ग्रामीण भागात आदिवासी भागात कुटुंब नियोजनाच्या साधनांचा प्रसार करण्यात सरकार अपयशी असल्यामुळे ही साधने लोकांपर्यंत पोहोचत नाही. तर काही ठिकाणी साधने पोहोचली परंतु त्या साधनांच्या वापराबाबत लोकांमध्ये उदासिनता आढळून येते. तर काही ठिकाणी धार्मिक श्रद्धा, अंधश्रद्धामुळे ही साधने वापरण्याची मानसिकता तयार होत नाही. त्यामुळेही जननदरावर नियंत्रण होत नाही परिणामी लोकसंख्या वाढत जाते.

### (६) संयुक्त कुटुंब पद्धती :

भारताच्या ग्रामीण समाजव्यवस्थेत संयुक्त कुटुंबाचे प्रमाण व महत्त्व जास्त असल्याचे दिसते. ग्रामीण भागात कृषिप्रधान व्यवस्था आढळते. शेती व्यवसाय उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. शेती व्यवसायासाठी मनुष्यबळ आवश्यक असते म्हणून कमी वयात मुलांचे विवाह करून घरात सून आणली जाते व ती शेतीत मदत करणारी एक व्यक्ती म्हणून पाहिले जाते परंतु कमी वयात विवाह केल्यामुळे जननक्षमता कलावधी जास्त मिळतो. परिणामी जननदर जास्त आढळतो. परिणामी एकूण लोकसंख्यात वाढ होताना दिसून येते.

**(७) मनोरंजनाच्या सोयीचा किंवा साधनांचा अभाव :**

आज मनोरंजानाच्या सोई उपलब्ध आहेत परंतु यापूर्वी ८ ते १० वर्षांपूर्वी रेडिओ किंवा काही प्रमाणात दूरदर्शन इतकीच साधने उपलब्ध होती, ग्रामीण भागात व गरीब कुटुंबात आजही मनोरंजनाच्या साधनांची उपलब्धता फारशी आढळत नाही. दिवसभर काम करून, कष्ट करून आल्यानंतर त्यांना मनोरंजनाचे साधन म्हणून फक्त लैंगिक समाधानाचा वापर करतात. परिणामी या अप्रत्यक्ष कारणामुळे घरात मुलांची संख्या वाढत जाते. आणि ही वाढती संख्या कुटुंबाच्या अर्थोत्पादनासाठी उपयुक्त असते. अशी भावना असे. परिणामी लोकसंख्या वाढत जाते.

वरीलप्रमाणे भारतीय समाजात लोकसंख्या वाढीला कारणीभूत ठरतात किंवा लोकसंख्या वाढीला हातभार लावतात.

**२. लोकसंख्या वाढीचे परिणाम**

**(Consequences of Population Growth)**

गेल्या शतकाचा विचार केला तर भारताची लोकसंख्या १९२१ नंतर झपाट्याने वाढलेली आढळून येते. जवळपास ३ पटीने लोकसंख्येत गेल्या शंभर वर्षात वाढ झाली. या वाढत्या लोकसंख्येचे सर्वच क्षेत्रांत दुष्परिणाम दिसण्याची शक्यता नाकारता येत नाही. समाजीवनाच्या सर्वच क्षेत्रात परिणाम होऊन अनेक गंभीर समस्या निर्माण होतात भारतीय समाजव्यवस्थेत आर्थिक, सामाजिक, राजकीय इ. सर्व क्षेत्रात लोकसंख्या वृद्धीचा परिणाम पडला असल्याचे दिसून येते.

**(१) आर्थिक परिणाम :**

लोकसंख्या वाढीचा आर्थिक जीवनावर फार मोठा परिणाम पडलेला दिसतो. त्यातून अनेक आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे –

**(अ) दारिद्र्य :**

भारतात लोकसंख्या वाढीमुळे दारिद्र्याची (गरीबीची) फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांच्या संख्येत फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. देशातील बहुसंख्य लोकसंख्या आपल्या जीवनावश्यक गरजांची पूर्ततासुद्धा करू शकत नाही. दरडोई उत्पन्न घटले आहे. राष्ट्राची उत्पन्नातील वाढ व लोकसंख्या वाढ यात समन्वय नसल्याने दरडोई उत्पन्नात घट झाली असावी परिणामी दारिद्र्यात भर पडते.

**(ब) बेकारीत वाढ :**

वाढत जाणारी लोकसंख्या म्हणजे श्रमाचा पुरवठा हे समीकरण १९७१ या वर्षापर्यंत खरे होते. परंतु आज सर्वच क्षेत्रात यांत्रिकीकरणाचा वापर होत असल्याने मानवी श्रमशक्तीची जागा यांत्रिक शक्तीने घेण्यास सुरुवात केली. एक संगणक (Computer) अनेक माणसांचे काम करतो. त्यामुळे तो तेवढ्या माणसांना बेकार करतो.

वाढत्या लोकसंख्येमळे सर्वांना रोजगार मिळणे अशक्य आहे. शेती क्षेत्रातही लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगार मिळत नाही. औद्योगिक व इतर नोकरीच्या क्षेत्रात वाढत्या लोकसंख्येच्या

प्रमाणात रोजगार मिळत नाही. त्यामुळे भारतात बेकारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आज भारतात २०११च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार ९.४ टक्के बेकारांची संख्या दिसून येते.

**(क) वाढती लोकसंख्या जमीनीवरील भार वाढविते :**

एकीकडे लोकसंख्या वाढत असतांना दुसरीकडे मात्र देशाचा भूभाग तेवढाच असतो. भारताची भूमी पाकिस्तान व बांगलादेशाच्या पातळीमुळे घटली. सुमारे ७५ टक्के जनता शेती व शेतीशी संबंधीत व्यवसायावर अवलंबून राहते. लोकसंख्या वाढते आहे. परंतु लागवडीमुक्त जमीन तेवढीच राहते  तसेच नागरिकांच्या प्रक्रियेमुळे कृषीयोग्य जमीनीचे आकृषिक जमिनीत रूपांतर झाल्यामुळे कमी होते. त्यामुळे लोकसंख्येचा जमीनीवरचा भार वाढतो तसेच शेती करणाऱ्या कुटुंबाचे प्रत्येक पिढीनंतर विभाजन झाल्यामुळे कुटुंबाच्या जमिनीचे तुकडे होतात व काही काळानंतर भूमिहीन कुटुंबाचे प्रमाण वाढते हा एक महत्त्वाचा दुष्परिणाम वाढत्या लोकसंख्येमुळे दिसून येत आहे.

**(ड) दरडोई उत्पन्न कमी :**

देशात लोकसंख्या जास्त असली तरी एकूण लोकसंख्येत उत्पादक लोकसंख्या कमी आहे. १५ ते ५९ वयोगटातील तरुण गट ही उत्पादक लोकसंख्या असते. भारतात २००१ मध्ये ५५.७% तरुण  वर्गाची आहे. भारतात बालक आणि वृद्ध या अनुउत्पादक लोकांची संख्या इतर विकसित देशांच्या मानाने जास्त आहे. अनुत्पादक लोकांचा भार उत्पादक लोकसंख्येवर पडतो. परिणामी भारतातील दरडोई उत्पन्न इतर देशांच्या प्रमाणात कमी आहे.

**(इ) आर्थिक प्रगतीत अडथळा :**

लोकसंख्या वाढीमुळे देशातील उत्पन्नाचा मोठा भाग अन्नधान्यासारख्या अत्यावश्यक बाबींवर खर्च करावा लागतो. लोकांचे आर्थिक उत्पन्न कमी असल्यामुळे लोक बचत करू शकत नाही. देशात मोठ मोठे उद्योगधंदे उभारण्यासाठी भांडवल पाहिजे असते.म्हणजे भांडवलाचा देखील अभाव असतो. स्वातंत्र्यानंतर भारताने विविध क्षेत्रात प्रगती केली असली तरी वाढत्या लोकसंख्येमुळे ही प्रगती दिसून येत नाही. अशाप्रकारे लोकसंख्या वाढीमुळे आर्थिक प्रगतीत अडथळा निर्माण होतो.

**(ई) कनिष्ठ प्रतीचे राहणीमान :**

वाढत्या लोकसंख्येमुळे लोकांचे राहणीमान हे अत्यंत खालच्या प्रतीचे आहे. बहुसंख्य लोक हे दारिद्र रेषेखाली जीवन जगत आहे. त्यांना अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्याविषयी या जीवनावश्यक गरजांची पूर्तता होत नाही. कमी उत्पन्नामुळे ते गलिच्छ ठिकाणी वास्तव्य करतात. मुलांना योग्य शिक्षण मिळत नाही, आरोग्यविषयक सोयींचा अभाव आढळतो. याचा परिणाम लोकांच्या आयुर्मानावर होतो. या वरील दुष्परिणामाप्रमाणे विविध वस्तूंची टंचाई, काळाबाजार, भ्रष्टाचार, महागाई असे विविध प्रश्न वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण झाले आहेत.

**(२) सामाजिक दुष्परिणाम :**

वाढत्या व अतिरिक्त लोकसंख्येमुळे असे आर्थिक दुष्परिणाम होतात तसेच सामाजिक दुष्परिणाम देखील दिसून येतात. जास्त अपत्ये असल्यामुळे कुटुंबाचा आकार वाढतो.

कुटुंबातील कर्त्या व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्या परावलंबी सदस्यांची संख्या वाढते. परिणामी कुटुंबाच्या आवश्यक गरजांची पूर्ती होऊ शकत नाही. कुटुंबातील माता सुद्धा काम करण्यासठी घराबाहेर जातात. त्यामुळे मुलांकडे दुर्लक्ष होऊन त्यांच्यावर चांगले संस्कार होत नाही. लहान मुलेही कामाला बाहेर जातात. यातून बालगुन्हेगारीसारखी समस्या निर्माण होते. या सर्व गोष्टींच्या परिणामामुळे कुटुंबातील शांतता व स्वास्थ्य आणि समाधान धोक्यात येते.

वाढत्या लोसंख्येमुळे राहत्या घरांची समस्या निर्माण झाली आहे. शहरात गलिच्छ वस्त्यांची समस्या गंभीर प्रश्न निर्माण करत आहे. मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास, हैद्राबाद, बंगलोर इ. मोठ्या शहरांमध्ये झोपडपट्टी व गलिच्छ वस्त्यांची भिषण समस्या निर्माण झाली आहे. वेश्यालय, मद्यपान विक्री. जुगार या वस्त्यांमध्ये सर्रास चालतात तसेच गुन्हेगारी, बालअपचारिता, हिंसक दंगे इ.चे प्रमाण अधिक असलेले दिसून येते. तसेच लोकसंख्या वृद्धीमुळे भिक्षावृत्ती कुटुंबविघटन, भ्रष्टाचार, सामाजिक अस्वास्थता इ. अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

**(३) आरोग्यावर परिणाम :**

ज्या कुटूंबात जास्त मुले असतात त्या कुटुंबात मुलांच्या आरोग्याकडे जास्त लक्ष दिले जात नाही. गरीब माता-पित्यांना आपल्या मुलांच्या आरोग्याची नीट काळजी घेण्यासाठी वेळ नसतो. तसेच जास्त बाळंपण झाल्यामुळे त्याचाही स्त्रीयांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. भारतात बाळंतपणांच्या वेळी मृत पावणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. जास्त बाळंतपणामुळे व लागोपाठ आपत्यांना जन्म दिल्यामुळे मातेच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. नंतरच्या बाळांची शरीराची वाढ पूर्णपणे होऊ शकत नाही. कुपोषित बाळ जन्माला येऊ शकतात.

लोकसंख्येत सातत्यानेवाढ होत असल्यामुळे सर्वच गरीब लोकांना सरकारी दवाखान्यातून आरोग्याच्या सोयी-सवलती, सेवा उपलब्ध करून देणे शक्य होत नाही. थोडक्यात लोकसंख्या वाढीचा देशातील लोकांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत असतो.

**(४) राजकीय व प्रशासकीय परिणाम :**

लोकसंख्या वाढीमुळे सामाजिक सुरक्षिततेची समस्या अधिक गुंतागुंतीची होते. शासनाला समाजावर नियंत्रणठेवणे शक्य होत नाही. समाजात उद्योगधंद्याची वाढ करणे, रोजगाराच्या सोयी निर्माण करून देणे, नवनवीन योजना कार्यान्वीत करणे इ. गोष्टींबाबत वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक प्रश्न निर्माण होतात.विविध राजकीय पक्ष या गोष्टीचा फायदा घेऊन पक्षाचे राजकारण करतात. त्यातून विकासाचा मुद्दा बाजूला पडून राजकारण सुरू होते. देशात भाषावाद, जातीयवाद, धार्मिकवाद इ. विविध प्रश्न राजकीय पक्ष निर्माण करतात. यातूनच देशतील बेरोजगार तरुणांचा वापर पक्ष राजकारणसाठी करतांना दिसून येतात. यातून राजकीय एकात्मतेची भावना संकटात येते.

**(५) पर्यावरणावर परिणाम :**

लोकसंख्या वृद्धीमुळे मोठ्या प्रमाणात जंगलांची तोड करून शेती केली जाते. तेथे

गाव व वस्ती वसविली जाते. जंगलांची राखीव जागा सेझच्या नावाखाली उद्योगधंद्यांना दिली जाते. लोकसंख्येच्या विविध गरजा भागविण्यासाठी नैसर्गिक साधन सामग्रीचा फार मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करण्यात येतो. दिवसेंदिवस खनिज तेल, नैसर्गिक वायू, कोळसा, पाणी, इ. नैसर्गिक साधन संपत्तीवर ताण पडत आहे. त्यातून नैसर्गिक असंतुलन निर्माण होऊन पर्यावरणावर भिषण परिणाम होत आहे. पर्यावरणात्मक प्रदूषणाची समस्या निर्माण झाली आहे. यातून मानवाच्या आरोग्यावर वाईट परिणाम जाणवायला लागले आहेत.

अशाप्रकारे वाढत्या लोकसंख्येमुळे आर्थिक, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय पर्यावरणात्मक व समाजाच्या आरोग्यविषयक समस्या निर्माण होऊन सामाजिक, संतुलन बिघडत आहे. असे दृष्टीस पडते. माल्थसने सांगितल्याप्रमाणे जर वाढत्या लोकसंख्येवर मानवाने स्वत: नियंत्रण केले नाही तर निसर्ग नियंत्रण करेल आणि निसर्गाचे नियंत्रण हे महाभयंकर असते म्हणून मानवाने वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण करण्यासाठी काही उपाययोजना करणे आवश्यक आहे.

### ३. लोकसंख्या वाढ नियंत्रणाचे उपाय :

या आगोदरच्या मुद्यात आपण वाढत्या लोकसंख्येचे विविध दुष्परिणाम अभ्यासलेत या दुष्परिणामापासून बचाव करण्यासाठी लोकसंख्येचे नियोजन करण्यासाठी लोकसंख्या धोरण ठरविणे आवश्यक असते. शासकीय यंत्रणेद्वारे राष्ट्रीय स्तरावर विविध प्रयत्न केले जातात. शासनाच्या पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून ठराविक उद्दिष्ट निश्‍चित करून लोकसंख्या नियंत्रणाचा प्रयत्न केला जातो.

वैद्यकीय क्षेत्रात नवीन संशोधन करून कुटूंब नियोजनाची नवनवीन साधने शोधली जात आहेत. त्यातून लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे शक्य होत आहे.

### (१) लोकसंख्या शिक्षण

सरकारने विविध उपाययोजना लोकसंख्या नियंत्रणासाठी केल्यात. परंतु अपेक्षित यश मिळत नसल्यामुळे लोकसंख्या शिक्षण देणे आवश्यक आहे. लोकसंख्या शिक्षण हे लोकसंख्या शिक्षणविषयक समस्यांच्या जागृतीचे एक प्रभावी माध्यम आहे. असे लोकसंख्या शास्त्रज्ञांचे मत आहे. लोकसंख्या शिक्षणामुळे फक्त लोकसंख्या रोखण्याचे शिक्षण दिले जात नाही तर लोकसंख्यांच्या विविध पैलूंची माहिती दिली जाते. लोकांना वाढत्या लोकसंख्येची जाणीव झाल्यास ते स्वत:हून कुटुंब नियोजनाच्या साधनांचा वापर करतील व सरकारी योजनांना मदत करतील. म्हणून भारत सरकारने लोकसंख्या शिक्षणास महत्त्व दिले आहे. त्यामुळेही काही प्रमाणात लोकसंख्या वाढीवर नियंत्रण करता येणे शक्य आहे.

### (२) शिक्षणाचा प्रसार व गुणवत्तेत वाढ :

सुशिक्षित लोकांना 'कुटुंब लहान सुख महान' याचे महत्व कळते. जास्त मुलांना जन्म दिल्यास त्यामुळे कोणत्या समस्या निर्माण होतात याची त्यांना कल्पना असते. शिकलेल्या व्यक्ती आपल्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी जाणिवपूर्वक कुटुंबातील अपत्यांची संख्या मर्यादित ठेवतात. विशेषत: स्त्रीयांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजे. शिक्षणामुळे

विवाह काळ लांबविता येतो. त्यांना स्वालवंबी होऊन अर्थाजन करता येते. तसेच मुलांचे स्वत:चे आरोग्यही सांभाळू शकतात त्यामुळे लोकसंख्या वाढीवर नियंत्रण येईल.

**(३) संतती नियमनाचा प्रभावी प्रचार :**

लोकसंख्या नियंत्रणासाठी संतती नियमनाच्या साधनांचा वापर लोकांनी मोठ्या प्रमाणावर करावा यासाठी प्रभावी प्रचारयंत्रणा उभी करणे. संतती नियमनाची साधने जसे निरोध, गर्भनिरोधक गोळ्या, कॉपर टी. इ. स्वस्तात पुरविणे व त्याबाबत योग्य मार्गदर्शन करणे या गोष्टीवर भर देऊन जन्मदर रोखता येऊ शकतात.

**(४) गर्भपातास मान्यता :**

भारतात विविध धर्मात गर्भपात करणे पाप मानले जाते. परंतु जर विशिष्ट परिस्थितीत एखाद्या दांम्पत्याला विशेषत: स्त्रिला मूल नको असेल तर १९७२ च्या कायद्यानुसार गर्भपातास मान्यता मिळाली. आज सरकारमान्य हॉस्पिटलमधून मोठ्या प्रमाणात सुविधा निर्माण झाली-जपान या देशात गर्भपाताबाबत कायदा करून लोकसंख्येची वाढ निम्म्याने कमी केली होती हे उदाहरण डोळ्यासमोर आहे.

**(५) प्रबोधनात्मक कार्यक्रम :**

विशेषत: भारतातील लोकांवर पारंपरीक व धार्मिक विचारांचा प्रभाव दिसतो काही धर्मात जास्त मलांना जन्म देणे पुण्याचे काम आहे असा विश्वास आहे. मुले ही देवाने जन्माला घातली आहेत! आम्ही फक्त निमित्त आहोत. असे गैरसमज दूर करण्यासाही विविध प्रकारच्या प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन केले पाहिजे. याकामी काही स्वयंसेवी संस्था, संघटना यांची मदत होऊन शाळा, महाविद्यालयात चर्चासत्र, भाषणे, चित्रकला स्पर्धा या माध्यमातून लोकांचे प्रबोधन करावे की ज्यामुळे लोकसंख्या नियंत्रणाचे महत्व पटविता येते.

**(६) आर्थिक विकास :**

लोकांची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्यामुळे ते जास्त अपत्यांना जन्म देतात पुढे हीच मुले मोठी झाल्यानंतर कुटुंबातील कामांला हातभार लावतील अशी गरीब पालकांची अपेक्षा असते. परिणामी जास्त अपत्यांना जन्म दिला जातो. जर देशाचा आर्थिक विकास झाला, राहणीमान उंचावले तर ते अधिक अपत्यांना जन्म देणार नाहीत. आपल्या एक-दोन आपत्यांना ते योग्यप्रकारे संगोपन करून शिक्षण देतील. जगाचा विचार केला तर अविकासित देशांपेक्षा विकसित देशांचा जननदर कमी दिसतो म्हणजेच अविकसित देशात लोकसंख्या वाढीची समस्या दिसून येते. म्हणून सरकारने देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी विशेष विचारपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे.

**(७) विवाहाच्या वयात कायद्याने वाढ करून अंमलबजावणी करणे :**

कायद्याने विवाहाच्या वयात वाढ करणे आवश्यक आहे. उशिरा विवाह झाल्यास जननकाळ कमी मिळतो. हे लक्षात घेऊन विवाहाची वयाची मर्यादा, मुलीचे वय १८ वर्षे व मुलांचे विवाहाचे वय २१ वर्षे करण्यात आली. परंतु या कायद्याची जाणीवूपर्वक कठोर

अंमलबजावणी करणेही तितकेच महत्वाचे आहे. त्याचा परिणाम म्हणजे कुटुंबाचा आकार मर्यादीत राहील. मुलांचे व आईचे आरोग्यही चांगले राहील.

**(८) कायदे :**

देशातील लोकसंख्येची वाढ रोखण्यासाठी भारत सरकारने विविध कायदे केलेत. विवाहाच्या वयात कायद्याने वाढ केली. मुलीचे १८ वर्षे आणि मुलाचे २१ वर्षे वय विवाहाचे केले. यापेक्षा कमी वयात विवाह केला तर तो दखलपात्र गुन्हा आहे. १ एप्रिल १९७२ रोजी गर्भपाताचा कायदा पारित केला. या कायद्यानुसार स्त्रीला गर्भपात करून घेण्याचे स्वातंत्र्य मिळाले. दोनपेक्षा जास्त अपत्य असणाऱ्या पालकांच्या मुलांना सोयी सवलती मिळणार नाही या बाबतचा अध्यादेश सरकारने काढला. चिन सरकारने ज्याप्रमाणे १ कुटुंब १ मूल हा कार्यक्रम राबविला. कुटुंब नियोजनाची सक्ती केली, त्यामुळे चीनमधील लोकसंख्या वाढीवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण आले आहे.

असेच काही कठोर कायदे भारत सरकारने राबवून व त्याची योग्य अंमलबजावणी केली तर वाढत्या लोकसंख्येचा मेरू थोपविता येऊ शकतो.

अशाप्रकारे लोकसंख्या शिक्षण, शिक्षणाचा प्रसार, प्रबोधनाचे कार्यक्रम, आर्थिक विकास, विवाह वयात वाढ, कुटुंब कल्याण कार्यक्रमांचा योग्य प्रसार, कायदे या माध्यमातून वाढत जाणाऱ्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## ६.३ स्वंय अध्ययनासाठी प्रश्न

**(I) खालील विधाने चूक (X) की बरोबर (✓) त्याप्रमाणे करा.**

(१) बेकारी ही फक्त ग्रामीण भागातच आढळते ( )

(२) लोकसंख्यावाढ हे बेकारीचे एक कारण आहे ( )

(३) जवाहर रोजगार योजना २ ऑक्टोबर १९८० पासून सुरू करण्यात आली ( )

(४) जगात सर्वात जास्त लोकसंख्या भारताची आहे ( )

(५) २०११च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१००१ कोटी होती. ( )

(६) गर्भपाताचा कायदा २ जून १९७२ रोजी पारीत झाला. ( )

उत्तरे : (१) (X), (२) (✓), (३) (X), (४) (X), (५) (✓), (६) ( ),

**(II) दोन वाक्यात उत्तरे लिहा**

(१) बेकाराची व्याख्या लिहा.

.........................................................................................

.........................................................................................

.........................................................................................

(२) तात्पुरते बेकार म्हणजे काय?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(३) २०११ च्या जनगनणेनुसार भारताची लोकसंख्या किती?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(४) भारतात जनगणना किती वर्षांनी केली जाते?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**(III) टीप लिहा**

(१) हंगामी बेकारी

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(२) चक्राकार बेकारी

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(३) लोकसंख्या शिक्षण

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(४) शिक्षण व लोकसंख्या वाढ परस्पर संबंध

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## (IV) दिर्घोत्तरी प्रश्न

(१) बेकारीचा अर्थ सांगून बेकारी निर्माण होण्याची कारणे सविस्तर स्पष्ट करा.

...............................................................................................

...............................................................................................

...............................................................................................

(२) बेकारी समस्या दूर करण्याचे विविध उपाय स्पष्ट करा.

...............................................................................................

...............................................................................................

...............................................................................................

(३) भारतातील लोकसंख्या वाढीची कारणे विशद करा.

...............................................................................................

...............................................................................................

...............................................................................................

(४) लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम सांगा.

...............................................................................................

...............................................................................................

...............................................................................................

(५) लोकसंख्या वाढ नियंत्रणाचे विविध उपाय सविस्तर लिहा

...............................................................................................

...............................................................................................

...............................................................................................

## ६.४ सारांश

विद्यार्थी मित्रहो, आपण या घटकात दोन राष्ट्रीय समस्यांचा अभ्यास केला. या दोन्ही समस्या राष्ट्राच्या विकासावर परिणाम करणाऱ्या आहेत. प्रथमत: आपण बेकारी या समस्येचा अर्थ समजून घेतला. बेकारी समस्येची विविध कारणे समजूनघेतलीच्या. बेकारीच्या कारणांवरून व समाजातील परिस्थितीवरून बेकारीचे विविध प्रकार लक्षात घेतलेत आणि बेकारी समस्येच्या निमर्लूनासाठी विविध उपाययोजना व तरतूदी यांचा उहापोह केला.

नंतर राष्ट्राची उन्नती महत्त्वाची समस्या म्हणजे लोकसंख्यावाढ. भारतातील सद्यस्थितीतील लोकसंख्या गेल्या शतकातील लोकसंख्या वाढीचा आढावा लक्षात घेतला. लोकसंख्या

वाढीस कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा विचार केला. त्याचबरोबर या वाढत जाणाऱ्या लोकसंख्ये समाजाच्या विविध घटकांवर कसा विपरीत परिणाम होतो याचाही अभ्यास केला. लोकसंख्या वाढ ही काही देशात समस्या निर्माण करते तर काही देशात लोकसंख्या वाढीला चालना दिली जाते. अविकसित व विकसनशील देशात वाढती लोकसंख्या ही गंभीर समस्या आढळून येते. म्हणून लोकसंख्या वाढ नियंत्रणाचे वेगवेगळे उपायासाठी या घटकात आपण अभ्यास केला. या घटकाच्याा अभ्यासामुळे आपणास देशातील दोन महत्त्वाच्या समस्या समजून घेण्यास व त्यावर काम, उपाययोजना करता येऊ शकतात. याची माहिती आपणास झालीच असेल व आपण समाजाचे एक जागृत घटक म्हणून या समस्यांवर निश्चितच चिंतन करून समाजाप्रती आपले योगदान काय असेल? याचाही विचार कराल असे वाटते व यातून आपणही उपाय सुचवू शकतात आणि समस्या निर्माण होणार नाही याविषयी कटिबद्ध होऊ या.

## ६.५ पारिभाषिक शब्द शब्दार्थ

अतिरिक्त – आवश्यकतेपेक्षा जास्त (Over)

न्यून – आवश्यकतेपेक्षा कमी.

अभिरुची – व्यक्तीची संस्कारीत आवड

स्वयंचलन – (Automation) जेथे उत्पादन प्रक्रियेतील शेवटच्या बिंदूपर्यंत सर्व कामे यंत्राच्या सहाय्याने करणे.

सर्वेक्षण – (Survey) घटनेच्या विषयाबाबत बघून माहिती मिळविणे किंवा बाह्यरूपातून बघणे.

लोकसंख्या धोरण – (Population Polic) लोकसंख्येचे वैशिष्ट्ये, वितरण, लोकसंख्येची रचना आकार यावर परिणाम करणारा नियोजन आराखडा होय.

दरडोई – (Per Capital) दर मानसी उत्पन्न

## ६.६ संदर्भसूची :


१. कुलकर्णी पी. के. (१९९८). भारतातील सामाजिक समस्या नागपूर, विद्या प्रकाशन, पृष्ठ क्र. १९ ते ४८ व ६२ ते ८२.

२. आगलावे प्रदीप – (२००९) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन, पृष्ठ क्र. ३४९ ते ३७३.

३. अग्रवाल ए. एन. (२०११) भारतीय अर्थव्यवस्था विकास एवं आयोजन, नई दिल्ली, न्यू एज इंटरनॅशनल पब्लिकेशन.

४. संघवे विलास (१९९१) भारतातील सामाजिक समस्या, कोल्हापूर, पॉप्यलर प्रकाशन, पृष्ठ क्र. १४२ ते २७४.

५. सवदी ए. बी. कोळेकर पी. एस. (२००३) मानवी लोकसंख्या भूगोल पुणे, निराली प्रकाशन.

६. देव झामरे (१९९८) भारतीय अर्थशास्त्र, नागपूर, पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स पृष्ठ क्र. २६६ ते २७९.

७. तोरवणे डी.एल व महाजन जयश्री (२००८) भारतीय समाज प्रश्न आणि सामाजिक समस्या, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन, पृष्ठ क्र. १२७ ते १५१.

८. गंदेवार एस. एन, भारतीय समाज (वादातीत विषय आणि समस्या) लातूर, विद्याभारती प्रकाशन.